तृतीय वर्ष कला

राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. ६

समकालीन राजकारणातील महत्त्वाचे प्रश्न

(Major Issues in Contemporary Politics)

© : University of Mumbai

डॉ. संजय देशमुख
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. अंबुजा साळगांवकर
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : **श्री. अनिल बनकर**,
सहाय्यक प्राध्यापक - नि - सहाय्यक उपसंचालक
दूर व मुक्त अध्यन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०९८.

अभ्यास समन्वयक व संपादक : **डॉ. एस्. एम्. वाघ**,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिवाळे,
ता. मुरबाड, जि. ठाणे.

लेखक : **डॉ. एस्. एम्. वाघ**,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिवाळे,
तालुका - मुरबाड, जिल्हा - ठाणे.

प्रा. संदीप घोडके,
महात्मा फुले कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पनवेल,
जिल्हा - रायगड.

प्रा. केतन भोसले,
साठ्ये महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई.

प्रा. भिमराव खरात,
बिर्ला महाविद्यालय, कल्याण.

तृतीय वर्ष कला, राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्र - ६, समकालीन राजकारणातील महत्त्वाचे प्रश्न.

सप्टेंबर २०१५

Published by : I/C Director
Institute of Distance and Open Liarning
University of Mumbai,
Vidyanagari, Mumbai-400 098.

अक्षरजुळणी :: **श्री ग्राफिक सेंटर**
२८, मंगल वाडी,
मुंबई - ४०० ००४

Printed by

समकालिन राजकारणातील महत्त्वाचे प्रश्न

अनुक्रमणिका

क्रमांक क्रमांक	पाठाचे नाव	पृष्ठ
१)	शीतयुध्दोत्तर समस्या	१
२)	संयुक्त राष्ट्र संघटना - तिची यंत्रणा व भूमिका	१७
३)	जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण	३५
४)	विकास आणि पर्यावरणाचे प्रश्न	४५
५)	मानवी हक्क	५७
६)	स्त्रीवादी चळवळ	७४
७)	दहशतवाद	८४
८)	नागरी समाज	१०४
	संदर्भ ग्रंथ	१३२
	विद्यापीठ प्रश्नपत्रिका नमुना	१३३

SYLLABUS

T.Y.B.A. Paper VI

MAJOR ISSUES IN CONTEMPORARY POLITICS

Section – I

Module	**1**	**Post-Cold War World**
	1.1	Unipolar World
	1.2	Poverty
	1.3	Health
Module	**2**	**The United Nations: Role of Core and Special Agencies:**
	2.1	Unipolar World – Security Council and General Assembly.
	2.2	Poverty – United Nations Development Programmer and Food and Agricultural Organisation.
	2.3	Health – World Health Organisation.
Module	**3**	**Globalisation, Liberalisation and Provatisation :**
		Role and Function of
	3.1	The World Bank.
	3.2	The International Monetary Fund.
	3.3	The World Trade Organisation.
Module	**4**	**Development and Environmental Issues:**
	4.1	Models of Development.
	4.2	Movement Promoting alteration Models of Development.
	4.3	Movement Promoting Protection of the Environment.

Section – I

Module	**5**	**Human Right**
	5.1	Major Landmark if their Evolution
	5.2	Three Generation of Rights.
Module	**6**	**Feminist Movement**
	6.1	Changing Nature of the Movement
	6.2	Women in Politics (with reference to India)
Module	**7**	**Terrorism**
	7.1	State - sponsored Terrorism.
	7.2	Anti-State Terrorism.
	7.3	Peace Movement.
Module	**8**	**Civil Society**
	8.1	Nature and Role.
	8.2	Case Study - Amnesty International
	8.3	Case Study - Consumer International - International Committee of the Red Cross.

१

शीतयुध्दोत्तर समस्या

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ एकध्रुवीय जग

१.४ दारिद्र्य

१.५ आरोग्य

१.६ सारांश

१.७ विद्यापीठीय प्रश्न

१.१ उद्दिष्ट्ये :

शीतयुध्दाची पार्श्वभूमीचा अभ्यास करुन शीतयुध्दोत्तर निर्माण झालेल्या एकध्रुवीय व्यवस्था. दारिद्र्य व आरोग्य या समस्यांचा अभ्यास करणे.

१.२ प्रास्ताविक :

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया या देशांव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडू शकतील अशा शक्तीशाली सत्ता नव्हत्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव वाढावा म्हणून अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमध्ये वर्चस्वासाठी सत्तासंघर्ष सुरु झाला. परिणामी जगाची दोन गटात विभागणी झाली आणि दोन भिन्न विचारसरणींमध्ये शीतयुध्दास सुरुवात झाली. परिणामी शस्त्रस्पर्धा सुरु झाली. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे अणुयुध्दाचा धोका निर्माण झाला. परिणामी नव्याने स्वतंत्र्य झालेल्या राष्ट्रांना देखील आपली शस्त्र सज्जता वाढवावी लागली. यामुळे देशाच्या विकासावरील पैसा सरंक्षणावर खर्च करावा लागला. पुढे १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि अमेरिका ही एकमेव महासत्ता म्हणून उदयास आली आणि शीतयुध्दाची समाप्ती झाली. या शीत युध्दानंतरच्या काळात जागतिक एक ध्रुवीय व्यवस्था पुढे आली. तसेच दारिद्र्य व आरोग्य इत्यादी समस्या जागतिक पातळीवर प्रकर्षाने जाणवू लागल्या. या समस्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे दिसून येतो.

१.३ एक ध्रुवीय जग किंवा व्यवस्था (Unipolar World) :

आंतरराष्ट्रीय राजकरणाच्या अभ्यासात एक ध्रुवीय संकल्पना समजुन घेणे महत्त्वाचे आहे. "आंतरराष्ट्रीय राजकरणात आर्थिक, सामाजिक, राजकिय, लष्करी क्षेत्रात आपल्या प्रभावाने बदल घडवून आणणारी शक्ती असते. तीला एक ध्रुवीय व्यवस्था असे म्हटले जाते." याप्रमाणे जागतिक पातळीवर प्रभाव असलेल्या व्यवस्था व शक्ती पूर्वी देखील होत्या. उदा. इ.स. १५ ते १७ व्या शतकातील तुर्कीचे साम्राज्य, आणि सन १८ व १९ व्या शतकातील ब्रिटीश साम्राज्य आणि सन १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतर अमेरिका ही एकमेव महासत्ता उदयास आली. व आंतरराष्ट्रीय राजकरणात ही शक्ती आपल्याला अनुकूल असे धोरण राबवू लागली. थोडक्यात जागतिक एक ध्रवीय व्यवस्था दिसून येते. या संदर्भातील तपशिल पुढील प्रमाणे पहाता येईल.

रशियाचे विघटन :

सन १९८५ मध्ये मिखाईल गोबाचेव्ह यांची सोव्हिएट रशियाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी पुनर्ररचना व खुलेपणा (पेरेस्त्रोईका व ग्लासनोस्त) हे धोरण राबविण्यास सुरुवात केली. यामुळे सोव्हिएट संघराज्यात मोठी उलथापालथ झाली. व १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि त्यांच्या साम्यवादी साम्राज्याचा अंत झाला, त्याचबरोबर शीतयुध्दही संपले. परिणामी आंतरराष्ट्रीय रालकरणात अमेरिका ही एकमेव महासत्ता निर्माण झाली. जगाचे आपण कैवारी आहोत. असे समजुन अमेरिकेने आपल्याला अनुकुल असे निर्णय आंतरराष्ट्रीय क्षेत्रात घेण्यास सुरुवात केली. याचाच अर्थ १९९२ पासून अमेरिकेने जागतिक राजकरणात आपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली. आणि जगाचे एक ध्रुवीय चित्र दिसू लागले.

अमेरिकेचे कुवैत मुक्त धोरण :

सन २६ फेब्रुवारी १९९१ रोजी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली बहुराष्ट्रीय सैन्याने इराकच्या ताब्यातून मुक्त केले. त्या आखाती युध्दातील विजयापासून २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात अमेरिकेचा प्रभाव वा दादागिरी वाढतच गेली. या प्रभावाला समर्थपणे तोंड देण्यासाठी कोणतीही नवी सत्ता त्या काळात पुढे आली नाही. या उलट आखाती युध्दातील विजयामुळे अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांची लोकप्रियता वाढतच गेली.

बिल क्लिंटन यांचे धोरण :

सन १९९३ ते २००१ या कालावधीत अमेरिकेचे धोरण पूर्वीपेक्षा लवचिक व कायदेशीर होते. महासत्ता पदाचा प्रभाव न दाखविता आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले वर्चस्व कायम ठेवणे, हे बिल क्लिंटन यांचे धोरण होते. लोकशाहीचा रक्षणकर्ता, मानवी हक्कांचा रक्षणकर्ता, अशा गोंडस नावांचा वापर करुन अमेरिकेने जगात घडणाऱ्या लहान मोठ्या घटनांची दखाल घेतली. उदा. पॅलेस्टाईन-इस्त्रायल मध्यस्थीचा प्रश्न, तैवानचे

स्वातंत्र्य, अफगाणिस्तानातील तालिबान राजवट, कोसावोतील नाटोचे हस्तक्षेप इ. आंतरराष्ट्रीय प्रश्नात अमेरिकेने जातीने भाग घेतला.

जॉर्ज बुश (ज्युनियर) यांचा कार्यालय :

दि. २० जानेवारी, २०११ रोजी जॉर्ज बुश (ज्युनियर) यांनी अमेरिकेचे अध्यक्ष पद स्विकारल्यानंतर त्यांनी प्रथम दक्षिण अमेरिका, युरोप इ. देशांचा दौरा केला. तसेच डॉ. कोंडालिझा राईस या महिलेचे राष्ट्रीय सल्लागार म्हणून नियुक्ती केली. डॉ. कोंडालिझा राईस यांनी ('America and Europe Partners Tomorrow and the day after') या विषयावर लेख लिहिला होता. या लेखात युरोपची जडण-घडण करण्याची जबाबदारी अमेरिकेची आहे. तसेच अमेरिकी मुल्ये केवळ अमेरिकेची नसून ती जागतिक मुल्ये आहेत. असा उल्लेख त्यांनी केला होता. यावरुन एक ध्रुवीय व्यवस्थेचे स्वरुप लक्षात येते.

तसेच संपूर्ण जगाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपलीच आहे. असे अमेरिकेचे धोरण होते, याकरिता अमेरिकेने मे २००१ मध्ये राष्ट्रीय क्षेपणास्त्र सुरक्षा कार्यक्रम (National Missile Defence Programmes) तयार केला. परंतु या कार्यक्रमाच्या नावाखाली अमेरिकेला धोका असलेल्या राष्ट्रांवर वर्चस्व निर्माण करणे हा हेतू होता. उदा. उत्तर कोरिया, इराक, इराण, अफगाणिस्तान, लिबिया इ. अमेरिकेने हा कार्यक्रम जाहिर केल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध कडवट प्रतिक्रिया उमटल्या. परंतु या विरोधी, प्रभावी व जाहिर विरोध कुठल्याही देशाने केल्याचे दिसून येत नाही.

अमेरिकेचे दहशतवादा विरुध्दचे धोरण :

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात दहशतवादाचा प्रभाव वाढला आणि जगातील बहुतेक राष्ट्रांना या दहशतवादांचा फटका बसला व बसत आहे. पण अमेरिकेला दहशतवादाची अद्याप झळ बसलेली नव्हती. त्यामुळे दहशतवादाविरुध्द युध्द वा कारवाई करु नये असा सल्ला अमेरिका देत होती. पण जेव्हा दि. ११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी वर्ल्ड ट्रेड सेंटरवर विमानांन हल्ला केला. तेव्हा दहशतवाद काय असतो व त्याचे परिणाम काय असतात हे जेव्हा प्रत्यक्ष स्वत:ला कळले. तेव्हा दहशतवाद ही जागतिक समस्या आहे. दहशतवाद हा जागतिक शांततेपुढे एक आव्हान आहे. याप्रमाणे अमेरिका जगाला ओरडून सांगू लागला म्हणून दहशतवादाविरुध्द लढण्याची जबाबदारी केवळ आपलीच आहे, असे समजून "दहशतवाद हा जागतिक प्रश्न आहे आणि तो सोडविण्यासाठी सर्व राष्ट्रांनी आपल्याला सहकार्य करावे. दहशतवाद नष्ट करण्यासाठी तुम्ही आमच्याबरोबर तरी रहा किंवा दहशतवाद्यांच्या बाजूला जा." असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश (ज्युनियर) यांनी जगाला दिला. या इशाराचा अर्थ असा कि, जे राष्ट्र दहशतवादाला पाटिंबा व सहकार्य करतील त्यास अमेरिका आपला शत्रू समजणार याचा अर्थ असा कि, आपल्या आक्रमक परराष्ट्र धोरणास अनुसरुन अमेरिका अशी एक नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्था उभी करील की ज्यामुळे अमेरिकेचे महासत्तापद अबाधित राहून इतर कोणत्याही सत्तेस दुय्यम स्थान मिळेल.

दि. ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर २६ दिवसांनी दहशतवादाच्या विरोधात अफगाणिस्तानवर कारवाई केली. पण ही कारवाई करताना अमेरिकेने संयुक्त राष्ट्रसंघाच्या विचारांची दखल घेतली नाही. केवळ इतर राष्ट्रांच्या पाठिंब्याने ही कारवाई केली. याप्रमाणेच तेल जगतात आपले वर्चस्व राहावे व आशिया खंडात आपला प्रभाव राहावा याकरिता इराक या देशाकडे आण्विक, रासायनिक आणि जैविक अशी संहारक शस्त्रे आहेत व त्यापासून जगाला धोका आहे म्हणून इराकने आपल्याकडील शस्त्रसाठा नष्ट करावा असा इशारा सुरक्षा समितीने दिला. याप्रमाणे इराकने नि:शस्त्रीकरणास सुरुवात केली व आपल्याकडे विनाशकारी शस्त्रसाठा नसल्याचा खुलासा केला. पण संयुक्त राष्ट्राने हा खुलासा मान्य केला नाही. हे निमित्त साधून अमेरिकेने मित्र राष्ट्रांना घेऊन युनोच्या खांद्यावर बंदूक ठेवून इराकवर आक्रमण केले व आपला हेतू साध्य करुन घेतला.

थोडक्यात वरील गोष्टींचा आढावा घेतला असता. शीतयुध्दानंतर जागतिक एक ध्रुवीय व्यवस्था सन १९९१ नंतर काही वर्षे दिसत असली तरी २००५ नंतर जागतिक एक ध्रुवीय व्यवस्था आहे की नाही या संदर्भात एकमत दिसून येत नाही असे असले तरी एक ध्रुवीय व्यवस्थेच्या समर्थनार्थ खालील मते दिसून येतात.

१. सन १९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले आणि अमेरिका जागतिक एकमेव महासत्ता बनली त्यामुळे आंतरराष्ट्रीय परिस्थिती बदलली १९९२-१९९३ मध्ये अमेरिकेने रशियावर दबाव आणून दि. १६ जुलै, १९९३ रोजी क्रायोजेनिक इंजिने व त्यासंबंधीचे तंत्रज्ञान पुरविण्याचा करार रद्द करण्यास रशियाला भाग पाडले त्यामुळे या दोन्ही देशांमधील संबंध तणावयुक्त बनले.

२. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये अमेरिकेची सत्तेत वाढ होऊन तिचे आतंरराष्ट्रीय महत्त्व वाढले. जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया, चीन, अलिप्ततावादी राष्ट्रांची चळवळ, युरोपियन संघ आणि संयुक्त राष्ट्रसंघ यांच्यापैंकी कोणीही अमेरिकेला आपल्या नियंत्रणात ठेवू शकले नाही.

३. शीतयुध्दानंतर अमेरिकेने आपले आंतरराष्ट्रीय स्थान अधिक बळकट केले. ज्या देशाला इतर देशांच्या धोरणावर सर्वांपेक्षा अधिक प्रभाव टाकता येतो. त्या देशाला प्रथम स्थान मिळते, असे मत सॅम्युअल हंटीग्टन यांनी मांडले आहे. त्यांच्या विचारानुसार अमेरिकेने इतर देशांच्या ध्येय धोरणावर प्रभाव पाडलेला दिसून येतो. याचे कारण आर्थिक, राजकीय व लष्करी शक्ती, नैसर्गिक संसाधने, भूप्रदेश ही अमेरिकेची शक्तीस्थाने आहेत.

४. अमेरिकेची लष्करी शक्ती सर्व देशांपेक्षा कित्येकपटीने जास्त आहे. उदा. चीन, भारत, फ्रान्स, जर्मनी, जपान, रशिया आणि ब्रिटन यांच्या एकत्रित संरक्षणावरील खर्चापेक्षा अधिक खर्च केवळ अमेरिकेचा आहे. त्यामुळे आपल्या लष्करी शक्तीच्या बळावर अमेरिका गरज वाटेल तिथे प्रदर्शन करणारा अमेरिका हा एकमेव देश आहे. उदा. इराकवरील आक्रमण, अफगाणिस्थानावरील आक्रमण इत्यादी.

५. रशियाला जी-८ राष्ट्रांच्या गटांत सामील करुन घेण्यात आले. चीनला सध्याच्या उदारिकरणाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी अमेरिकेने विशेष असे प्रयत्न केले व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे नियम स्विकारण्यास भाग पाडले. याप्रमाणे अमेरिकेने आपल्या स्पर्धकांना लष्करी शक्तीच्या जोरावर नमविले अथवा आपल्या गटात सामावून घेतले.

६. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर अमेरिकेने जागतिक घडामोडींमध्ये जातीने लक्ष घातलेले दिसून येते ते वरील उदाहरणांवरुन दिसून येते. विविध विचारवंतांच्या मते, केवळ एक ध्रुवीय व्यवस्थेमुळे अमेरिकेने हे वर्चस्ववादी धोरण स्विकारलेले दिसून येते.

अशा प्रकारे शीतयुध्दानंतर जागतिक एक ध्रुवीय व्यवस्थेविषयी विवेचन करता येईल.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न : एक ध्रुवीय जग याविषयी चर्चा करा.

१.४ दारिद्र्य :

शीतयुध्द संपल्यामुळे सर्व काही ठीक-ठाक होईल असे वाटले होते. परंतु शीतयुध्दानंतर विविध वंश, जमाती, धर्म यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यामुळे गरिबी, दारिद्र्य, आरोग्य यासारख्या समस्या जागतिक पातळीवर वाढू लागल्या. त्यापैकींच दारिद्र्य ही समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. दारिद्र्य ही आर्थिक समस्या असली तरी त्याचा समाज जीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम पडत असतो. दारिद्र्यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. दारिद्र्यामुळे समाजात असमानता निर्माण होते. बहुसंख्य लोक आपल्या गरजापूर्ण करु शकत नाहीत. विविध देशांनी दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम राबविले पण अजूनही बहुतेक देशांमध्ये सर्वांगीण विकास साधता आला नाही. दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्या नसून ती एक सामाजिक समस्या आहे.

दारिद्र्याचा अर्थ :

व्यक्तीला जगण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची आवश्यकता असते. जर या गरजांची पूर्तता होत नसेल तेव्हा व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांना जीवन स्तर इतरांच्या जीवन स्तरापेक्षा खाली असतो. तेव्हा त्या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात. याचप्रमाणेच दारिद्र्याचा अभ्यास करताना विविध अर्थशास्त्रज्ञांच्या व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

गिलीन आणि गिलीन या विचारवंताच्या मते "दारिद्र्य ही एक अशी अवस्था आहे कि, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती कमी उत्पन्नामुळे अथवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवन स्तर उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची आणि मानसिक स्वास्थ टिकवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत. त्या समाजाच्या जीवनमूल्याप्रमाणे योग्य प्रकारे ते कार्य करु शकत नाही."

गोडार्ड या विचारवंताच्या मते, "दारिद्र्य हे अशा वस्तूंचा अभाव आहे किंवा अपर्याप्त पूर्ती आहे कि, जी एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्याकरिता स्वस्थ आरोग्य आणि कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक कार्य आहे."

वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, दारिद्र्य म्हणजे ही एक अशी अवस्था आहे कि, व्यक्तीचे उत्पन्न कमी असते. या कमी उत्पन्नामध्ये व्यक्ती स्वत:चा आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे व्यक्ती इतरांप्रमाणे अपेक्षित जीवन जगू शकत नाही. त्याच्या समोर मूलभूत गरजा पूर्ण करण्याचा प्रश्न असतो. दारिद्र्यामुळे लोक आपला आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांचा जीवन स्तर इतर समान्य राहणीमान असणाऱ्यांसारखे टिकवू शकत नाही म्हणून त्यांचा जीवनस्तर न्युनतम जीवनस्तरापेक्षा ही खालचा असतो.

दारिद्र्याचे निकष :

व्यक्तीच्या मूलभूत गरजांची पूर्तता न होणे म्हणजेच दारिद्र्य होय; म्हणून मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. दारिद्र्याचे निकष वा निर्देशांक कोणते या विषयी विचार करणे आवश्यक आहे. दारिद्र्याचे निकष हे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **व्यक्तींच्या मूलभूत गरजांची पूर्ती :** व्यक्तींच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा असून या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न व्यक्ती करीत असते. १९९३ च्या किंमतीनुसार आवश्यक किंवा आरोग्य वस्तूवरील खर्च हा ग्रामीण भागातील लोकांकरिता १३० रुपये आणि शहरी भागातील लोकांकरीता १५३ रुपये प्रतिव्यक्ती, प्रतिमाह आवश्यक वस्तूवरील खर्च वरील खर्चापेक्षा कमी असेल तर अशा व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील आहेत, असे मानले जाते.

२) **राष्ट्रीय उत्पन्न :** राष्ट्रीय उत्पादनाच्या आधारावर दरिद्री कोण हे ठरविले जाते. १९८९-९० च्या किंमतीनुसार भारताचे राष्ट्रीय उत्पन्न १९५०-५१ मध्ये ८,८१२ कोटी रुपये होते. १९८०-८१ मध्ये १,२२ लाख कोटी रुपये होते. १९८५-८६ मध्ये २,३२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. १९८७-८८ मध्ये २,७१ लाख कोटी रुपये होते. १९९३-९४ मध्ये राष्ट्रीय उत्पादनाच्या वृध्दीचा दर १९५०-५१ च्या तुलनेत ४.२ टक्के होता. या राष्ट्रीय उत्पादनाच्या आधारे दारिद्र्याचे मोजमाप केले जाते.

३) **कॅलरीज :** चांगले जीवन जगण्यासाठी व आरोग्याच्या स्वास्थासाठी प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जेवणातून कमीत कमी २४०० कॅलरीज मिळायला हवे. कॅलशियम, व्हिटॅमिन्स, प्रोटीन्स आणि खनिजे व्यक्तीला त्याच्या जेवणातून मिळायला हवे, म्हणजेच रोजच्या जेवणातून व्यक्तीला दररोज २४०० कॅलरीज मिळाल्यास व्यक्तीचे आरोग्य, मानसिक आरोग्य आणि कार्यक्षमता चांगली राहते. जर यापेक्षा कमी कॅलरीज मिळाल्या तर व्यक्ती कुपोषणाला बळी पडते.

४) **व्यक्तीचे मासिक उत्पन्न :** व्यक्तीचे मासिक उत्पन्न किती आहे. यावरुन व्यक्ती दारिद्र्य रेषेखाली आहे किंवा नाही हे ठरविले जाते. १९९२-९३ च्या किंमतीच्या

आधारे प्रति व्यक्ती प्रतिमाह ४६० रुपये निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे मासिक उत्पन्न हे ४६० रुपये असले पाहिजे. ज्या व्यक्तीचे उत्पन्न यापेक्षा कमी असेल अशा व्यक्तींचा समावेश दारिद्र्य रेषेखाली केला जातो.

दारिद्र्याची कारणे :

दारिद्र्य ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. दारिद्र्य हे व्यक्तिगत, सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर अनुभवास येऊ शकते. गरज नसताना साधनसंपत्तीची केलेली उधळपट्टी आणि चुकीची आर्थिक धोरणे यामुळे दारिद्र्य वाढू शकते. शहरीकरण, महागाई, आर्थिक मंदी, स्थलांतर विस्थापन, आर्थिक विषमता, युध्द इत्यादी कारणांमुळे दारिद्र्याची समस्या निर्माण होऊ शकते. एका विशिष्ट कारणामुळे ही समस्या निर्माण झाली असे सांगता येत नाही. गिलीन आणि गिलीन या विचारवंताने दारिद्र्याची खालील कारणे सांगितलेली आहेत.

१. व्यक्तीची अकार्यक्षमता.

२. प्रतिकूल भौतिक वातावरण.

३. आर्थिक घटक.

४. साजिक संघटनांचे दोष.

५. युध्द.

या घटकांबरोबरच इतरही काही घटक दारिद्र्यास कारणीभूत आहेत.

१) आर्थिक घटक :

दारिद्र्यास इतर घटकांबरोबरच आर्थिक घटकांचा मोठ्या प्रमाणावर परिणाम दिसून येतो. या आर्थिक घटकांमध्ये खालील मुद्यांचा विचार केला जातो.

अ) शेती व्यवसायाची वाईट अवस्था : जगातील बहुतेक लोकांचा व्यवसाय हा शेती किंवा व्यवसायाशी संबंधीत आहे. तसेच शेती व्यवसाय हा पावसाच्या पाण्यावरचा जुगार आहे. शिवाय आधुनिक पध्दतीने शेती करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. यामुळे शेतीचे उत्पन्न कमी मिळते. परिणामी दारिद्र्याची समस्या वाढीस लागते.

ब) आर्थिक मंदी : जगातील आर्थिक व्यवस्थेतील तेजी आणि मंदीच्या चक्रावर दारिद्र्याचा दर ठरत असतो. तेजीच्या काळात दारिद्र्याचा दर मंदावतो. तर मंदीच्या काळात दारिद्र्याचा दर वाढतो. २००८-२००९ पासून सुरु झालेल्या आर्थिक मंदीचा फटका वा झळ गरिब देशांना सोसावी लागली.

क) नैसगिक संसाधनाचा कमी उपयोग : जगात नैसर्गिक साधनांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. उदा. खनिज संपत्ती, पाणी, जमीन इत्यादी नैसर्गिक साधने मोठ्या प्रमाणात आहेत. पण त्यांचा उपयोग नियोजन पध्दतीने केला जात नाही. परिणामी दारिद्र्य वाढीस लागते.

ड) **मूलभूत उद्योगांची स्थिती :** जगामध्ये अजूनही काही देशांत मूलभूत उद्योगांचा पुरेसा विकास झालेला नाही. काही उद्योगांमध्ये लोकांना रोजगार मिळतो. पण त्यांना कामाचा पुरेसा मोबदला मिळत नाही. परिणामी दारिद्र्य वाढीस हातभार लागतो.

इ) **अन्नधान्याच्या किंमती :** गरीब लोक हे श्रीमंतीपेक्षा आपल्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा अन्नधान्यावर खर्च करतात. परिणामी अन्नधान्याच्या किंमतीला वाढ होते आणि त्याचा परिणाम गरिब लोकांवर होतो. उदा. २००७ च्या उत्तरार्धात काही गरीब देशांमध्ये अन्नधान्याच्या किंमती वाढल्यामुळे दंगली झाल्या होत्या. अन्नधान्याच्या किंमती खूप कमी झाल्यामुळे गरीब अल्पभूधारक शेतकऱ्यांवर त्याचा वाईट परिणाम होतो.

फ) **दळणवळण आणि सूसिंचनाच्या साधनांचा अभाव :** उद्योग आणि व्यापाराच्या विकासासाठी दळणवळ आणि सूसिंचनाच्या साधनात वाढ झाली पाहिजे कारण, विकासामध्ये या साधनांचे मोठे योगदान आहे. परंतु आजही बहुतेक देशांमध्ये या साधनांची कमतरता आहे. ग्रामीण भागामध्ये तर या साधनांचा अभाव दिसून येतो. याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर पडतो.

ज) **बँक आणि पतसंस्थाची कमतरता :** जगातील बहुसंख्य देशात बँक आणि पतसंस्थांचा पुरेसा विकास झालेला नाही. फक्त मोठ्या शहरात वा तालुक्यांच्या ठिकाणी या सोयी उपलब्ध आहेत. ग्रामीण वा दुर्गम भागात तर अजूनही या संस्थांचा विकास झालेला नसल्यामुळे शेती वा उद्योगधंद्यांच्या विकासासाठी अर्थ पुरवठा नसल्याने आर्थिक विकास होण्यास मदत होत नाही. परिणामी देशाचा आर्थिक विकासाचा दर उंचावत नसल्याने दारिद्र्याची समस्या वाढतच जाते.

२. **सामाजिक कारणे :**

दारिद्र्याच्या समस्येकरिता खालील सामाजिक घटक जबाबदार आहेत.

अ) **जाती व्यवस्था :** समाजातील व्यवसाय हे जातीवर आधारित असल्याने व्यक्तीला आपल्या आवडीनुसार वा गुणांनुसार व्यवसाय करता येत नाही. जातीवर आधारित व्यवसाय बंधनकारक असल्याने आर्थिक विकास होऊ शकत नाही.

ब) **व्यवसायभिमुख शिक्षणाचा अभाव :** जगातील अनेक देशात तांत्रिक वा व्यवसायाभिमुख शिक्षण पुरेशा प्रमाणात तेथील व्यक्तींना मिळत नाही. त्यामुळे कुशल कारागिर वा कामगार मिळत नाही. परिणामी देशाचा विकासाचा दर वाढत नाही.

क) **एकत्र कुटुंब पध्दती :** एकत्र कुटुंब पध्दत ही दारिद्रयाच्या समस्येकरीता मोठ्या प्रमाणात लबाबदार आहे. कारण प्रत्येक सदस्याची पालनपोषणाची जबाबसारी एकत्र कुटुंबात घेतली जाते. त्यामुळे काही सदस्य हे कामकरण्यासाठी परावृत्त होतात. अशी प्रवृत्ती वाढत गेल्याने ते आळशी बनतात. तरीही लग्न केली जातात. एकत्र कुटुंबात जन्मदर अधिक असतो.

ड) **सामाजिक रुढी परंपरा :** भारतासारख्या अनेक देशात अनिष्ठ सामाजिक रुढी परंपरा आहेत. ज्यांचा परिणाम देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर होतो. विवाह, धार्मिक संस्कार यासारख्या अनुउत्पादक गोष्टींवर लोक अनाठायी खर्च करतात. आजही अनेक लोक अनिष्ठ सामाजिक रुढी परंपरेनुसार वर्तन करीत असतात. यामुळे शास्त्रीय विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्यामध्ये अडथळा निर्माण होतो.

इ) **लोकसंख्या :** जगाची लोकसंख्या भरमसाट पध्दतीने वाढत आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेने देशातील अन्नधान्याचे उत्पादन कमी पडत आहे. परिणामी अन्नधान्याच्या किंमती वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दरवर्षी बेरेजगारी वाढत आहे. सतत लोकसंख्येत होणाऱ्या वाढीमुळे देशाची प्रगती लक्षात येत नाही. उलट त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. म्हणून वाढती लोकसंख्या ही दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे.

३. राजकीय घटक :

राजकीय परिस्थितीचा मोठा प्रभाव देशाच्या विकासावर पडत असतो. उदा. भारतात दारिद्र्याची समस्या वाढण्यास येथील राजकारण जबाबदार आहे. कारण भारतातील राजकीय पक्ष हे श्रीमंत आणि उद्योगपतीची बाजू घेणारे आहेत. कारण निवडणूकीच्या काळात सर्वच राजकीय पक्ष त्यांच्याकडून निवडणूक निधी घेतात आणि निवडून आल्यावर उद्योगपतींना अनुकूल असे धोरण राबवितात व त्याचा परिणाम हा सर्वसामान्य लोकांवर पडतो. म्हणून राजकीय विचारसरणी, राष्ट्रीय धोरण राज्यव्यवस्था हे घटक कसे आहेत. यावर त्या देशातील दारिद्र्याची समस्या अवलंबून असते.

दारिद्र्याचे परिणाम :

दारिद्र्य ही एक सामाजिक समस्या आहे. दारिद्र्याचा समाज जीवनावर प्रभाव पडून अनेक समस्या निर्माण होतात. दारिद्र्याचे परिणाम स्वरुप अधिक दारिद्र्य असे एक दृष्ट चक्र दिसून येते. दारिद्र्याचे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) **आरोग्य :** जो समाज व व्यक्ती दारिद्र्यात राहतात त्यांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होत नाहीत. संपूर्ण जगातील एकूण मृत्युपैकी १/३ मृत्यू म्हणजे जवळपास १८ दशलक्ष लाक दरवर्षी किंवा ५०,००० लाक दरदिवशी मृत्यू पावतात. हे लोक कोणत्यातरी दारिद्र्याशी संबंधीत आजाराशी असतात. १९९० ते २००८ पर्यंत एकूण २८० दशलक्ष लोकांचा मृत्यू दारिद्र्यांमुळे झाला. यात महिला आणि बालकांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. गरिबांना होणाऱ्या आजाराला थेट संबंध गरिबीशी आहे. करोडो लोकांचा बळी एड्स्, क्षयरोग आणि मलेरिया यामुळे होत आहे.

२) **गुन्हेगारी :** व्यक्ती आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतो. पण व्यक्ती या गरजापूर्ण करु शकत नाही. त्यातच मुले, पत्नी, आजारी असल्यास तो खर्च भागवता येत नाही. अशावेळी मनुष्य गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो. म्हणून समाजात गुन्हेगारी वा चोरीसारखे प्रकार वाढत जातात.

३) **घटस्फोट :** दारिद्र्यामुळे घरातील बायका-मुलांची उपासमार होते. पती-पत्नीत यावरुन वाद निर्माण होतात. कधी-कधी तर त्याचा परिणाम घटस्फोटात होतो.

४) **भ्रष्टाचार :** दारिद्र्यामुळे व्यक्ती आपल्या मूलभूत गरजा भागवू शकत नाही किंवा आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी असे त्याला वाटते. पण सरळमार्गाने परिस्थिती सुधारणे शक्य नसते म्हणून व्यक्ती भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबून आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे दारिद्र्य हा घटक समाजात भ्रष्टाचार निर्माण होण्यास कारणीभूत ठरतो.

५) **बालगुन्हेगारी :** दारिद्र्य अवस्थेत असणारे मुले आपल्या कुटुंबाची हलाखीची परिस्थिती पाहून वाईट मार्गाचा अवलंब करतात. रोज उपासमार, आवश्यक वस्तूंची पूर्ती न होणे इत्यादी कारणांमुळे मुले गुन्हे करुन पैसे मिळवितात. यामुळे बालगुन्हेगारीची समस्या निर्माण होते. बहुसंख्य बालगुन्हेगार हे दारिद्र्य कुटुंबातील दिसून येतात.

६) **भिक्षावृत्ती :** दारिद्र्यामुळे व्यक्तीची उपासमार होते. कुणाची मदत नसते. आपल्या बायका-मुले यांना उपाशी मारण्यापेक्षा भिक मागून त्यांची भूख भागविणे. असा विचार करून भिक मागण्याचा मार्ग पत्करतात.

७) **आत्महत्या :** व्यक्ती आपल्या कुटुंबाचे व्यवस्थित पालन-पोषण करु शकत नाही. मुलाबाळांची होणारी उपासमार पाहून त्याला खूप वाईट वाटते. परंतु तो काही करु शकत नाही. या दारिद्र्य अवस्थेला कंटाळून व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. दारिद्र्यामुळे व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. त्यामुळे देखील व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.

८) **वेश्यावृत्ती :** कुटुंबाची दारिद्र्य अवस्था पाहून काही स्त्रिया वेश्यावृत्तीचा मार्ग अवलंबून पैसा मिळवितात. घरातील तरुण मुली स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी वेश्याव्यवसाय करतात. कारण त्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा कोणताच मार्ग नसतो. दारिद्र्यामुळे अनेक स्त्रियांनी वेश्याव्यवसाय स्वीकारला असल्याचे आढळून येते.

दारिद्रय निर्मूलनाचा उपाय :

व्यक्तीचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास साधावयाचा असेल तर दारिद्र्य निर्मूलनाचे ध्येय गाठायलाच हवे. या करिता राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर दारिद्र्य निर्मूलनाकरिता पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) **लोकसंख्या नियंत्रित करणे :** वाढती लोकसंख्या हे दारिद्र्याचे महत्वाचे एक कारण आहे. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य, बेरोजगारी, आरोग्य, झोपडपट्टींमध्ये वाढ, पाणी, महागाई इ. समस्या निर्माण होतात. म्हणून कुठल्याही परिस्थितीत लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

२) **व्यवसायाभिमुख शिक्षणाचा प्रसार करणे :** व्यक्तीला स्वता:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून व्यवसायभिमुख शिक्षणाचा प्रसार करणे, दारिद्र्य रेषेखालील तरुणांना वीशेष सवलतीच्या योजनेअंतर्गत हे शिक्षण देणे, जेणेकरुन ते स्वत:चा व्यवसाय करु शकतील किंवा कुशल कामगार म्हणून त्यांना उद्योगांमध्ये रोजगार मिळू शकेल. त्यामुळे कुटुंबास आर्थिक मदत होऊन आर्थिक विकास होईल.

३) **ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची उभारणे करणे :** ग्रामीण भागाचा विकास तर देशाचा विकास, या वाक्याप्रमाणे ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारल्यास स्थानिक पातळीवर बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल. शिवाय शहरीभागावरचा ताणही कमी होईल.

४) **समान वितरण व्यवस्था :** जगातील एकूण उत्पन्नापैकी फार मोठे उत्पन्न हे श्रीमंत लोकांचे आहे म्हणून लोकांच्या उत्पन्नामधील ही विषमता कमी होणे आवश्यक आहे. संपत्तीचे समान वितरण करणे शक्य नसले तरी संपत्तीच्या वितरणामधील जी मोठी विषमता आहे, ती विषमता काही प्रमाणात कमी करणे शक्य आहे. तसेच मूलभूत गरजा, शिक्षण आणि स्वास्थ विषयक सेवा उपलब्ध होतील असा प्रयत्न प्रत्येक देशांनी करायला हवा. तसेच शासनांनी असे धोरण राबवावे की जेणे करुन दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांना खऱ्या अर्थाने त्याचा लाभ मिळून ते आपल्या परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.

५) **कृषीक्षेत्राचा विकास करणे :** जगातील बहुतेक लोक हे शेती आणि शेती संबंधीत व्यवसायाशी संबंधीत आहे. त्यामुळे कृषीक्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे दारिद्र्य कमी होण्यास मदत होऊ शकते.

६) **निर्मितीक्षम साधनांचा लाभ :** दारिद्र्यात राहणाऱ्या व्यक्ती निर्मितीक्षम साधनांपासून वंचीत राहणार नाहीत हे पाहिले पाहिजे. उदा. जमीन, शिक्षण, प्रशिक्षण, तंत्रज्ञान आणि माहिती कर्जाची सुविधा, नागरी सेवा, धोरणातील निर्णय प्रक्रियेतील सहभाग इ. यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधी वाढून आर्थिक स्तर बदलू शकतो.

जागतिक शिखर परिषदेने दारिद्र्य निर्मुलनासाठी पुढील उपाय सुचविलेले आहेत.

१) मनुष्यबळ विकास आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करावा.

२) कुटुंबसंस्था बळकट आणि स्थिर करण्यासाठी धोरणांची आखणी करावी.

३) गरीब लोकांच्या विकासासाठी सर्व सरकारी व खाजगी साधनांचा उपयोग करावा.

४) राष्ट्रीय धोरणांमध्ये दारिद्र्य कमी करण्यासाठी उपाय योजना हवी तसेच ध्येय निश्चित करुन ती पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा संबंधीत राष्ट्रांनी ठरवावी.

५) दारिद्र्य निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांची मदत संबंधीत राष्ट्रांनी घ्यावी.

६) बेरोजगार, रुग्ण, गर्भवती स्त्रिया, अपंग आणि वृध्दांना पुरेसे आर्थिक आणि सामाजिक संरक्षण मिळेल याकरिता प्रयत्न करणे.

७) आर्थिक साधनांचा विस्तार अशा प्रकारे करावा कि, जेणेकरुन गरीब जनतेच्या सर्वांगीण क्षमतेचा विकास होईल.

८) सर्वांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील याकरिता प्रयत्न करणे.

९) एखाद्या राष्ट्रांमध्ये विशिष्ट पध्दतीत असणारे दारिद्र्यांचे मोजमाप करण्यासाठी अभ्यास पध्दती विकसीत करावी. जे लोक अत्यंत दारिद्र्य गटात आहे, त्यांना तात्काळ मदत करावी.

१०) आर्थिक धोरणे आणि राष्ट्रीय अर्थसंकल्प यांचे वेळोवेळी विश्लेषण करुन दारिद्र्य निर्मूलनाच्या धोरणाशी ते सुसंगत करुन घ्यावेत.

आपली प्रगती तपासा

प्रश्न. दारिद्र्याची कारणे व उपाय सांगा.

१.५ आरोग्य :

आरोग्याचा संबंध हा व्यक्ती जीवनाशी येतो. परंतु आरोग्याचा संबंध हा केवळ व्यक्ती जीवनाशी मर्यादीत नाही तर आरोग्याचा संबंध सामाजिक जीवनाशीही आहे. यावरुन आपणास असे म्हणता येईल की राष्ट्राची प्रगती केवळ औद्योगिकरण, विज्ञान-तंत्रज्ञान यावरच अवलंबून नसते. तर त्या देशातील लोकांच्या निकोप आरोग्यावर अवलंबून असते.

आरोग्य हा शब्द बऱ्याचवेळा आरोग्य म्हणजे रोग नसणारा व्यक्ती किंवा निरोगी व्यक्तीस आरोग्य ही संकल्पना जोडली जाते. परंतु शास्त्रीय दृष्ट्या आरोग्य या शब्दाचा एवढा मर्यादीत अर्थ नाही. तर आरोग्य या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात येते. "आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे किंवा दुबळे असणे असे नव्हे तर आरोग्य ही मनाची आणि शरीराची सामाजिक प्राणी या नात्याने एक परिपूर्ण अवस्था असते."

जागतिक आरोग्य संघटनेने या व्याख्येस मान्यता दर्शविलेली आहे. तर १९८६ च्या ओटावा जाहिरनाम्यामध्ये आरोग्यविषयक प्रचार करताना जागतिक आरोग्य संघटनेने असे म्हटले आहे की, "आरोग्य ही शारीरिक, सामाजिक, वैयक्तिक स्त्रोतांची सकारात्मक कल्पना आहे. आरोग्यपूर्ण जीवन हे केवळ आयुष्याचे उद्दिष्ट नसून तो आयुष्य जगण्यासाठीचा महत्त्वाचा स्त्रोत आहे." वरील व्याख्यांवरुन असे म्हणता येईल कि, शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक सुदृढता म्हणजे आरोग्य होय.

साधारणत: आरोग्याचे पुढील प्रमाणे प्रकार सांगता येतात.

१) **मानसिक आरोग्य :** मानसिक आरोग्य म्हणजे व्यक्तीची भावनिक आणि मनाची तंदुरुस्ती. सुदृढ, उत्तम मानसिक आरोग्य असणाऱ्या व्यक्ती आपल्या भावनांवर

योग्य नियंत्रण ठेवू शकतात, तसेच भावनिक क्षमतेचा बावर करुन समाजातील विविध कामांमध्ये सकारात्नक भुमिका बजावू शकते.

२) **शारीरिक आरोग्य :** शारीरिक म्हणजे नियमित व्यायाम, पोषाक आहार आणि पुरेशी विश्रांती यामुळे मिळणारी तंदुरुस्ती, स्थानिक लोकसंख्येच्या उत्तम आरोग्याचा निदर्शक म्हणजे त्याची उंची आणि त्याचे वजन याबरोबरच त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही महत्त्वाचा आहे.

३) **सामाजिक आरोग्य :** व्यक्तीचे सामाजिक आरोग्य हे समाजातील सामाजिक आणि आर्थिक घटकांवर अवलंबून असते.

समाजात राहणाऱ्या व्यक्तीला विविध आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. व्यक्तीच्या आरोग्यावर सामाजिक घटकांचा परिणाम होतो का? यावर संशोधन हाती घेण्यात आले. या संशोधनातून सामाजिक आणि आर्थिक घटक माणसाच्या आरोग्यावर परिणाम करतात हे सिध्द झाले. याप्रमाणेच पुढील काही घटक देखील आहेत.

१) व्यक्तिगत आरोग्य.
२) आरोग्य विषयक सेवा, सुविधा.
३) संस्कृती.
४) उत्पन्न आणि सामाजिक स्थान.
५) शिक्षण आणि आरोग्यविषयक साक्षरता.
६) सामाजिक पर्यावरण.
७) जीवन कौशल्य.
८) सामाजिक सहकार्याचे जाळे.
९) जैव पर्यावरण.
१०) शारीरिक आणि जनुकीय देणगी.
११) बालकाची सुदृढ वाढ.
१२) लिंग.
१३) रोजगार आणि कामकाजाचे वातावरण.

संसर्गजन्य रोगाच्या वाढीची कारणे :

संसर्गजन्य रोग विविध कारणांमुळे होतो. उदा. विषाणू, जीवाणू, बुरशी. तसेच सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, पर्यावरणीय वातावरण इत्यादी कारणांमुळे देखील

संसर्गजन्य रोगांचा उगम आणि प्रसार होत असतो. सध्याची एकंदरीत शहरीकरण-औद्योगिकरण सामाजिक वातावरण व आर्थिक परिस्थिती ही रोगांच्या प्रसाराकरिता अनुकूल आहे. अमेरिकेतील आरोग्यविषयक समितीने संसर्गजन्य रोगांवरील सहा घटक शोधले आहेत. जे संसर्गजन्य रोगाच्या निर्मितीस आणि पुर्ननिर्मितीस कारणीभूत आहेत. हे सहा घटक पुढीलप्रमाणे आहेत.

१) आर्थिक विकास आणि जमीन-वापराच्या पध्दतीतील बदल.

२) सूक्ष्मजीवांमधील बदल.

३) मानवी लोकसंख्येतील बदल आणि वर्तणूकीतील बदल.

४) सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यात आलेल्या योजनांचे अपयश.

५) तंत्रज्ञानातील प्रगती आणि औद्योगिकीकरणातील बदल.

६) आंतरराष्ट्रीय प्रवास आणि व्यापार यांमध्ये झालेली प्रचंड वाढ.

जागतिक पातळीवर संसर्गजन्य रोगाचा वाढता प्रभाव :

संसर्गजन्य रोगाने होणारे मृत्युचे अधिक प्रमाण हे विकसनशील देशांमध्ये असले तरी त्याचा धोका हा संपूर्ण जगाला आहे. त्याचे कारण त्याचा झपाट्याने होणारा प्रसार होय. यामुळे जागतिक पातळीवर त्याच्याकडे लक्ष देणे अधिक महत्त्वाचे आहे. संसर्गजन्य रोग हा देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासास बाधा आणू शकतो. बहुतेक देशांमध्ये आरोग्यसेवा ही महागडी ठरते. त्यामुळे आर्थिक उत्पन्नातील महत्त्वाचा वाटा या रोगाच्या प्रतिबंधासाठी खर्च होतो. परिणामी इतर आवश्यक सुविधांकडे दुर्लक्ष होते. विशेषत: मागासलेल्या देशांमधील गरीब कुटुंबांमध्ये या रोगावरील खर्च करण्याची आर्थिक ताकद नसते. कारण या रोगांवरील खर्च त्यांना परवडणारा नसतो. परिणामी कुटुंबांतील आजारी व्यक्तीचा जीव जाण्याची शक्यता असते.

संसर्गजन्य रोगास कुठल्याही सीमारेषा नसतात. जागतिकीकरणामुळे व दळणवळणाच्या सोयींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाहतूक वाढली. त्यामुळे एका भागात निर्माण झालेल्या संसर्गजन्य रोग वा साथी दुसऱ्या भागात वा अन्य देशात सहज पोहचत असतो. उदा. २००३ मध्ये आलेला सार्स, बर्ड फ्ल्यू, स्वाईन फ्ल्यू हे रोग आज जगातील बहुतेक देशात कमी-अधीक प्रमाणात आढळतात.

तसेच जागतिकीकरणाचा सार्वजनिक आरोग्य आणि आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. परस्परावलंबित्व आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे जगातील देश एकमेकांच्या जवळ आलेले आहेत. परिणामी संसर्गजन्य रोगांचा प्रसार झपाट्याने होत आहेत. उदा. एड्स, क्षयरोग, कॉलरा व मलेरिया इत्यादी.

वरील कारणांशिवाय जागतिक तापमानात झालेली वाढ, पर्यावरणाचा ढासळणारा समतोल, औद्योगिकरण, शहरीकरण, अस्वच्छता, जलप्रदूषण, वायू प्रदूषण, स्थलांतर इत्यादी

घटकांमुळे देखील जागतिक पातळीवर संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्यास मदत होते.

जागतिक आरोग्य संघटना (WHO) :

जागतिक पातळीवर आरोग्याच्या संदर्भातील विविध आजारांचे निर्मूलन करण्यासाठी व लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी दि. ७ एप्रिल १९४८ रोजी या संघटनेची स्थापना झाली. म्हणून दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून ओळखला जातो. या संघटनेने आरोग्य संदर्भात पुढीलप्रमाणे कार्य केलेले आहेत व करीत आाहे.

१) **संसर्गिक व असंसर्गिक रोगांवर नियंत्रण :** संसर्गिक व असंसर्गिक रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने सर्व सभासद राष्ट्रांची मदत घेऊन संपूर्ण जगातून देवी या रोगाचे उच्चाटन केले, तसेच हिवताप, क्षयरोग, पटकी, पीतज्वर, प्लेग या व इतर रोगांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करीत आहे. याशिवाय कर्करोग, रक्तदाब, मधुमेह, मानसिक रोग इत्यादी असंसर्गिक रोगाच्या नियंत्रणासाठी कार्य करीत आहे.

संसर्गजन्य रोगांना कुठलीही सीमारेषा नसते. म्हणून या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक पातळीवर नियमावली तयार केलेली आहे. ज्यामुळे या रोगांचा जागतिक प्रसार थांबेल. उदा. आंतरराष्ट्रीय प्रवास किंवा व्यापार करताना घ्यावयाची जबाबदारी इत्यादीमुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्यास काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल.

२) **रोगाचे सर्वेक्षण :** ज्या ठिकाणी रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. त्या ठिकाणी सर्वेक्षण करुन रोगावर अचूक नियंत्रण आणि प्रतिबंध करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, आरोग्यविषयक महत्त्वाच्या सोयीसुविधा पुरविणे.

३) **आरोग्यसेवा यंत्रणेचा विकास :** ही संघटना विकसनशील देशांना त्यांच्या आरोग्यसेवा यंत्रणेचा विकास करण्यासाठी मदत तसेच तांत्रिक माहिती आणि सल्ला वेळोवेळी पुरविते.

४) **आरोग्यदायी पर्यावरण :** पाणी, हवा यांचा दर्जा राखणे, कामगारांचे आरोग्यमान उंचावणे तसेच नवनवीन तयार करण्यात आलेल्या किटकनाशकांचा मानवावर होणारे परिणामांचा अभ्यास करणे व विपरीत होणाऱ्या परिणामांना आळा घालण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

५) **वैद्यकीय संशोधन :** जागतिक पातळीवर निर्माण होणाऱ्या रोगांवरील औषधे, लसी शोधणे. उदा. मलेरिया, एच.आय.व्ही. (एड्स), क्षय, कर्करोग यासारख्या गंभीर आाजारावर औषधे, लदी शोधण्याचे कार्य चालू आाहे.

६) **कौटुंबिक आरोग्य :** या संदर्भात माता व बालसंगोपन, लसीकरण, समतोल आहार, कुटुंबकल्याण, कुटुंब नियोजन, आरोग्य शिक्षण कार्ये करणे.

७) **आरोग्यावरील लेख व माहिती प्रकाशित करणे :** आरोग्याच्या संदर्भात जागतिक पातळीवर करण्यात येणारे कार्य, विविध आजारांच्या संदर्भात घ्यावयाची काळजी, नवनवीन लागलेले शोध यांची माहिती सर्व लोकांपर्यंत व्हावी याकरिता संबंधीत विषयांवरील माहिती विविध मासिके, पुस्तके, नियतकालिके याद्वारे प्रकाशित करुन ती सर्वांपर्यंत पोहचविणे.

१.६ सारांश :

दुसऱ्या महायुध्दानंतर जगाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, शीतयुध्दाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएट रशिया असे दोन गट निर्माण झाले होते. अमेरिका भांडवलशाहीचा पुरस्कार करीत होती. तर सोव्हिएट रशिया साम्यवादी विचारप्रणाली पुरस्कार करीत होती. याच कालावधीत १९८५ मध्ये मिखाई गोर्बाचेव्ह यांनी खुलेपणा (ग्लासनोस्त) आणि पुनबांधणी (खुलेपणा) हे धोरण राबविण्यास सुरुवात केली. या धोरणांमुळे रशियामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होऊ लागले व १९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले आणि शीतयुध्दाची समाप्ती होऊन आतंरराष्ट्रीय राजकारण एकध्रुवीय बनले. या एकध्रुवीय सत्तेची जागा अमेरिकेने घेतली याचाच अर्थ एकध्रुवीय सत्ता निर्माण झाली. या सत्तेने काय पराक्रम केलेत याचे विवेचन आपण पाहिलेच, याचप्रमाणे शीतयुध्दानंतर दारिद्र्य व आरोग्याची समस्या निर्माण झाली. विशेषत: वसाहत असलेले वा पारतंत्र्यात असलेले राष्ट्र स्वातंत्र्य झालेत अशा राष्ट्रांमध्ये या समस्या प्रकर्षाने दिसून आल्या. या समस्यांचे निवारण होण्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, संयुक्त, राष्ट्र संघटना व जागतिक आरोग्य संघटना इत्यादी आपापल्या पातळीवर प्रयत्न करीत आहेत. सर्व देशांनी एकमेकांस सहकार्य केले तर या समस्या दूर होण्यास फारसा काळ लागणार नाही. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्तीची.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न :

१) शीतयुध्दोत्तर जग हे एकध्रुवीय आहे चर्चा करा.
२) शीतयुध्दोत्तर काळातील दारिद्र्याची समस्या व उपया विशद करा.
३) जागतिक आरोग्याची समस्या आणि उपाय स्पष्ट करा.

टीपा :

१) एकध्रुवीय जग.
२) दारिद्र्य.
३) जागतिक आरोग्य संघटनेची कार्ये.

* * *

२
संयुक्त राष्ट्र संघटना, प्रमुख विभाग व भूमिका

२.१ एकध्रुवीय जग

२.२ दारिद्र्य

२.३ आरोग्य

२.४ विद्यापीठीय प्रश्न

२.१ एकध्रुवीय जग - आमसभा व सुरक्षा परिषद :

पार्श्वभूमी - "मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे." (Man is a social Animal) त्याला समाजात रहावेसे वाटते. ती त्याची सहजप्रवृत्ती आहे. त्याच्या मानसिक, बौध्दिक, शारीरिक गरजांची पूर्तता समाजामध्ये वास्तव्य करुन रहात असताना होते. ज्या पध्दतीने मानवाची स्थिती समाजाप्रती आहे. त्याप्रमाणे राज्याची सुध्दा आहे. कोणतेही राज्य स्वयंभू, परिपूर्ण नाही शिवाय जगातील इतर देशांच्या सहवासात राहणे योग्य वाटते. देशाची यासंदर्भातील भूक भागवण्यासाठी व I, II, महायुध्दजन्य स्थिती पुन्हा उद्‌भवू नये. तसेच संघर्षाला (तणावाला) पर्याय शोधता यावा. या व्यापक हेतूने राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटनेची (युनोची) स्थापना झाली.

मानव जातीच्या राजकीय जीवनाचा प्रारंभ संघर्षाने झाला. संघर्षाचे रुपांतर हिसंक युध्दात कधी झाले हे कळलेच नाही. याचा अर्थ युध्द हा समाजाचा आदर्श आहे असे नव्हे, तसे पाहता अगदी प्राचीन काळापासून मानवाने शांततेचा, सहजीवनाचा खात्रीने प्रयत्न केला आहे. पण त्यास योग्य ते यश कधी प्राप्त झालेच नाही. त्यातून कमी अधिक प्रमाणात हिंसक युध्दे झाली तरीही त्याची व्याप्ती मर्यादित होती. परंतु विसाव्या शतकाच्या प्रारंभीचे १९९४ - १९१९ च्या दरम्यान झालेले युध्द अतिशय विनाशकारी ठरले व त्याची व्याप्ती ही फार मोठी होती. त्यामुळे या युध्दास महायुध्द किंवा जागतिक युध्द अशी संज्ञा प्राप्त झाली. या महायुध्दाच्या जबर तडाख्यामुळे सर्वत्र पुन्हा "युध्द नको" अशी भावना निर्माण झाली अशी युध्दजन्य स्थिती निर्माण होऊ नये म्हणून पहिल्या महायुध्दानंतर राष्ट्रसंघाची १९२० मध्ये स्थापना झाली. परंतु युध्द टाळण्यात राष्ट्रसंघ अपयशी ठरल्याने, दुसरे महायुध्द झाले. दुसऱ्या महायुध्दाची दाहकता पहिल्या महायुध्दापेक्षा जास्त होती, भयानक संहारक शस्त्रास्त्रामुळे व आधुनिक युध्द तंत्रामुळे हे युध्द भयानक, विनाशकारी ठरले. दुसऱ्या महायुध्दाची दाहकता जसजशी वाढत गेली तसतशी युध्द टाळण्यासाठी विचार करणारी प्रक्रिया लोकशाही राष्ट्रांच्या नेत्यांच्या मनात आली. युध्द

समाप्तीनंतर जगातील लोकशाही शक्ती एकत्र आल्या व जागतिक शांततेचा गंभीरपणे विचार करु लागल्या. असा वैचारिक मंथनातूनच "संयुक्त राष्ट्रसंघाचा" युनोचा जन्म झाला.

युनोचा जन्म : पंतप्रधान चर्चिल व अध्यक्ष रुझवेल्ट यांनी अटलांटा सनदेची घोषणा केली. (१४ ऑगस्ट, १९४१) त्यानंतर इंग्लंड, फ्रान्स, चीन, अमेरिका यांनी मिळून संयुक्त राष्ट्र संघटनेचा जाहिरनामा तयार केला. (१ ऑगस्ट, १९४२) त्यास २६ देशांनी पाठिंबा दिला. नंतर मास्को येथे रुझवेल्ट, स्टॅलिन, चर्चिल व चँग-कै-शेक यांनी मिळून लवकरच आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याकरिता आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे ठरविले व या संघटनेत सर्व शांतताप्रेमी राष्ट्रांना सदस्यत्व देण्याचे ठरविले. त्यामध्ये लहान-मोठी राष्ट्रे असा भेदभाव न करता सर्वांना समान दर्जा दिला जाईल असे ठरविले. (३० ऑक्टोबर, १९४३) यानंतर लेहबन येथे पुन्हा बड्या राष्ट्रप्रमुखांची भेट होऊन (१ डिसेंबर, १९४३) त्यांनी व युध्दकाळात व नंतरही शांतता टिकविण्याच्या कार्यात परस्परांना सहकार्य देण्याचे ठरविले. युध्दसमाप्तीनंतर म्हणजे १९४५ च्या २६ जूनला युनोची सनद तयार करण्यात आली व २४ ऑक्टोंबर, १९४५ या दिवशी कार्यान्वित करण्यात आली. वर्षाअखेरीस ५१ राष्ट्रांनी या संघटनेला आपली मान्यता दिली.

युनोच्या घटनेचा सरनामा : या संघटनेच्या स्थापने मागील हेतू घटनेच्या सरनाम्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आला आहे. युध्दाच्या ज्या भीषण आपत्तीने आमच्या आयुष्यातच दोन वेळा मानव जातीस अतोनात दु:खात लोटले तीच्यापासून भावी पिढ्यांचा बचाव करण्याकरिता मानव जातीचे मुलभूत हक्क, मानवाची प्रतिष्ठा व योग्यता, स्त्री व पुरुष आणि छोटी-मोठी राष्ट्रे यांच्या समान हक्कावरील, श्रध्दा व्यक्त करण्याकरिता या संघटनेची उभारणी आम्ही युनोचे सदस्य करीत आहे.

संयुक्त राष्ट्र संघाचे धैर्य : संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत १९ भाग असून १११ कलमे आहेत. सनदेचा शुभारंभ सरनाम्याने झाला आहे. "आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाची जनता" या सरनाम्यात युनोची धैर्य स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत ती धैर्य पुढीलप्रमाणे -

१) सर्व राष्ट्रांनी शांततेने एकत्र राहून सहिष्णूतेचे पालन करणे.

२) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन करण्यासाठी सर्वांनी आपली शक्ती एकवटणे.

३) सर्वांच्या हितासाठी, युध्दाची आवश्यकता नसल्यास इतर वेळी शस्त्रबळाचा वापर कधीही न करणे.

४) सर्व जनतेच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय यंत्रणेचा वापर करणे.

वरील धैर्य साध्य करण्यासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आली.

संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे -

- ❖ आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवणे.
- ❖ समान हक्क व स्वयंनिर्णय या तत्त्वांच्या स्विकार केलेल्या राष्ट्रांमधील मित्रत्वाचे संबंध वृध्दिंगत करणे.
- ❖ आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगती व मानवी हित यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य संपादन करणे.
- ❖ मूलभूत स्वातंत्र्ये व मानवी हक्क याबद्दल आंतरराष्ट्रीय पातळीवर आदर निर्मान करणे व उपरोक्त धैर्य साध्य करण्यासाठी विविध राष्ट्रांच्या कृतीत एकसूत्रता आणून त्यांच्यात मेळ घालणे.

वरील धैर्य व उद्दिष्ट्ये यांची पूर्ती करण्यासाठी प्रमुख सात तत्वांचा अवलंब केला गेला.

संयुक्त राष्ट्र संघाची तत्त्वे :

१) सभासद असलेली सर्व राष्ट्रे समान आहेत.

२) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार सभासदांनी जी बंधने स्विकारली आहेत त्यांचे त्यांनी प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे.

३) सभासद राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता व न्याय यांना धक्का न पोहोचेल अशा रितीने परस्परातील वाद शांततापूर्ण मार्गाने मिटवावेत.

४) संयुक्त राष्ट्रसंघाच्या तत्त्वांशी विसंगत आणि विधायक (विशेषत: युध्दाची धमकी देणे वा बळाचा वापर करणे) अशा मार्गापासून सभासद राष्ट्रांनी दूर रहावे.

५) युनोच्या प्रत्येक कार्यास मनापासून सहकार्य करणे आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे आदेश न मानणाऱ्या अथवा ज्या राष्ट्रविरुध्द संयुक्त राष्ट्रसंघ कृती करील, त्या राष्ट्रांना कोणतेही सहाय्य न करणे.

६) संयुक्त राष्ट्रसंघ कोणत्याही देशांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही. प्रत्येक राष्ट्राला एकटे अथवा संयुक्तरित्या स्वसंरक्षण करण्याचा अधिकार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवण्यासाठी परस्परांना प्रादेशिकतह वा करार करण्यास संयुक्त राष्ट्र संघाची संमती राहिल.

वरील सर्व धैर्य, उद्दिष्टे व तत्त्वे यांचा विचार करता असे स्वच्छपणे दिसले कि, युनोचा प्रमुख भर सहकार्य व सामंजस्य या दोन बाबींवर आहे असे सहकार्य व सामंजस्य मिळवण्यासाठी युनोच्या नियंत्रणाखाली अनेक घटक संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत व गेली ६५ वर्षे कमी - अधिक प्रमाणात त्या कार्यरत आहेत.

युनोचे सदस्यतव :

युनोची सनद तयार करण्यांवर फार मोठी जबाबदारी होती. त्यांना सर्व सभासद राष्ट्रंमध्ये समानता तर प्रस्थापित करायची होतीच. त्याचबरोबर जागतिक शांतता व सुरक्षितता स्थापन करुन ती टिकवण्यासाठी जगातील बड्या राष्ट्रांमध्ये ऐक्य व सहकार्य निर्माण करावयाचे होते. प्रत्येक छोट्या-मोठ्या सभासद राष्ट्राचे सार्वभौमत्व अबाधित ठेवून त्यांना समान दर्जा प्राप्त करुन द्यायचा होता. शांतता व सुरक्षितता प्रस्थापनेसाठी सर्व सभासद राष्ट्रांचे विश्लेषणे करुन बड्या राष्ट्रांचे एकमत असणे आवश्यक होते म्हणून बड्या राष्ट्रांना युनोत व सुरक्षा परिषदेत खास महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. सर्व सभासद राष्ट्रे आपल्या अधिकाराबाबत विशेष जागृत होती. त्यांच्या लहान-मोठ्या प्रश्नांना व प्रतिपादनास स्थान मिळावे म्हणून आमसभेची निर्मिती करण्यात आली आहे व त्यामध्ये सर्व देशांना (लहान-मोठ्या) समान प्रतिनिधित्व व अधिकार देण्यात आले होते.

युनोचे सदस्यत्व मिळवण्यासाठी काही अटींची पूर्तता करावी लागते. सेनफ्रेन्सीको परिषदेत ज्या राष्ट्रांनी भाग घेऊन सनदेवर सह्या केल्या त्या राष्ट्रांना संस्थापक देश म्हणतात. तसेच युनोच्या सनदेतील अटी जे राष्ट्र पूर्ण करु शकतील अशी सुरक्षा परिषदेची खात्री झाली व तिने त्या राष्ट्राच्या सभासदस्य देण्याची शिफारस आमसभेकडे केल्यास व आमसभेने उपस्थित असलेल्या दोन तृतियांश सभासदांच्या बहुमताने त्यास मान्यता दर्शविल्यास त्या राष्ट्रास युनोचे सभासदत्व देण्यात येते आणी याच पध्दतीने एखाद्या राष्ट्राचे सदस्यत्व रद्द करण्याचीही सनदेत तरतूद आहे, सध्या १९६ देश सदस्य आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य घटक -

१) महासभा.

२) सुरक्षामंडळ.

३) आर्थिक व सामाजिक मंडळ.

४) विश्वस्त मंडळ.

५) आंतरराष्ट्रीय न्यायालय.

६) सचिवालय.

१. महासभा (General Assembly) :

युनोच्या ज्या अंगास "जगाची आमसभा" म्हटले जाते ते युनोचे सर्वात महत्त्वाचे आणि सर्वात मोठे अंग आहे. इतर सर्व समित्यांची जननीच आहे. या महासभेचे सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात. प्रत्येक सभासद राष्ट्रास स्वतःचे जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी महासभेवर पाठवता येतात. अर्थात ५ प्रतिनिधी खेरीज ५ पर्यायी प्रतिनिधी, तज्ञ व तत्सम दर्जाचे प्रतिनिधी शिष्ट मंडळास आवश्यक वाटतील तेवढे पाठविता येतात. मात्र प्रत्येक सभासद राष्ट्रास मत एकच असेल. सभासद राष्ट्रांच्या प्रतिनिधींना आपल्या सरकारच्या सूचनानुसार सदस्य देश आपल्या प्रतिनिधीची नियुक्ती करतात व आपल्या सरकारच्या हुकुमानुसार ते काम करतात. त्या अर्थाने आमसभा म्हणजे राजनैतिक परिषदच असते.

महासभेच्या सहा प्रमुख समित्या : १) राजकीय व सुरक्षा विषयक समिती, २) आर्थिक व अर्थ विषयक समिती, ३) सामाजिक, मानविय व सांस्कृतिक समिती, ४) विश्वस्त समिती, ५) प्रशासकीय समिती व अर्थसंकल्प विषयक समिती, ६) कायदा समिती.

महासभेची कार्ये व अधिकार -

सर्वसाधारण कार्य : महासभेच्या कामाचे मुख्यत: दोन प्रकार आहेत. १) ज्या विषयावर महासभेमध्ये चर्चा व्हावयाची आहे. त्या विषयावरची सर्व वास्तव्य स्थिती आणि त्याबाबातची सर्व माहिती मिळविणे. २) संबंधीत विषयावर महासभेत झालेली चर्चा व व्यक्त केलेली मते यावर आधारित निश्चित स्वरुपात शिफारस करणे, महासभा आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य वृध्दींगत करण्यासाठी शिफारस करु शकते. अर्थात अशी शिफारस बंधनकारक नसते, फक्त महासभेचे एक मत आहे. एवढाच अर्थ त्यातून निष्पन्न होतो, सनदेने निश्चित केलेल्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही विषयावर महासभा चर्चा करु शकते व इतर विभागांना शिफारस करु शकते.

राजकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य, आंतरराष्ट्रीय कायद्यातील प्रागतिक सुधारणा, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व आरोग्य विषयक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्य, मानवी हक्कांचे रक्षण, वंश, धर्म, लिंग इत्यादी भेदभाव नकरता सर्वांच्या मूलभूत हक्कांची हमी याबाबतीत आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविण्यासाठी उपकृपशीलता दर्शवून त्यांची शिफारस करण्याचे काम महासभेला करावे लागते. परंतु युनोच्या सनदेने सुरक्षामंडळाकड सोपविलेल्या विषयांवर सुरक्षा मंडळ कार्यरत असेल. त्या विषयांवर महासभेला शिफारस करता येत नाही. पण शिफारस मागितल्यास ती महासभा देऊ शकते.

असे विस्तृत अधिकार महासभेला असले तरी देशांतर्गत प्रश्नांवर चर्चा महासभेस करता येत नाही. पण एकदा विषय अंतर्गत आहे किंवा नाही हे ठरविणे कठीण झाले आहे. उदा. १९८६ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील हिंदी जनतेवर तेथे अन्याय होत आहे अशी तक्रार केली होती पण आफ्रिकेने ही बाब अंतर्गत आहे असे सांगितल्यामुळे युनोला त्या विषयात काहीही करता आले नाही.

कायदेविषयक कार्य - युनोच्या सनदेचे कायदेनिर्मितीची जबाबदारी आमसभेवर सोपविली नाही पण आंतरराष्ट्रीय प्रश्नाबाबत चर्चा करुन निर्णय घेत असताना ते निर्णय कायद्याचे स्वरुप धारण करतात. उदा. दुसऱ्या महायुध्दानंतर इटलीच्या वसाहतींचे भवितव्य ठरविण्याच्या प्रश्नावरुन अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व सोव्हिएट रशिया यांच्यात तीव्र मतभेद झाल्याने तो विषय आमसभेवर सोपविला. त्याप्रमाणे आमसभेने घेतलेला निर्णय बंधनकारक झाला म्हणजेच त्याला कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले.

देखरेखविषयक कामे - महासभा युनोच्या सर्व घटक, उपघटकांवर यांच्यावर देखरेख करते. त्यांना आपले वार्षिक अहवाल महासभेकडे पाठवावे लागतात. सुरक्षा मंडळालाही आपले वार्षिक व खास अहवाल महासभेसमोर सादर करावे लागतात. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय

शांतता व सुरक्षितता टिकवण्यासाठी कोणते निर्णय घेतले व त्याची अंमलबजावणी कशी झाली याचा खुलासा असावा लागतो. युनोच्या सचिवालयातील नोकरवर्गाची नियुक्ती करणे व तेथील कामकाजावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी महासभेकडे असते.

अर्थविषयक कामे - युनोचा अर्थसंकल्प मंजूर करण्याची जबाबदारी महासभेवर असते. प्रत्येक सभासद राष्ट्राने वार्षिक वर्गणी म्हणून किती रक्कम युनोस द्यावी हे त्या राष्ट्राच्या आर्थिक कुवत लक्षात घेऊन महासभा निश्चित करते. युनोच्या प्रत्येक अंग-उपांगासाठी व घटकासाठी किती अनुदान द्यावयाचे हे निश्चित करुन त्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य महासभा करते.

निवडणूकविषयक कामे - महासभा सुरक्षा मंडळाच्या अस्थायी सभासद राष्ट्रांची निवड करते. आर्थिक व सामाजिक मंडळ, विश्वस्त मंडळ या घटकांवरील सभासद राष्ट्रांची निवड करते. सचिवालयासाठी सरचिटणीसाची निवड, सुरक्षा मंडळाच्या शिफारशीवरुन महासभा करते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिशांची निवड महासभा सुरक्षा मंडळाच्या सहकार्याने करते. एखाद्या राष्ट्राचे सभासदत्व निलंबित करणे वा रद्द करणे हे कामही महासभा करीत असते.

सनददुरुस्ती विषयक कार्य - युनोच्या सनदेत दुरुस्ती करण्याचे कार्य कलम १०८ नुसार महासभेकडे सोपविण्यात आले आहे. सनदेच्या दुरुस्ती विषयक सूचना महासभेच्या सर्वसाधारण सभेच्या २/३ मताने मंजूर व्हावी लागते. मंजूरीच्या बाजूने मतदान करणाऱ्या सभासदामध्ये सुरक्षा मंडळाचे कायम सभासद असले पाहिजेत ही महत्त्वाची अट असते.

महासभेचे महत्त्व :

सुरक्षा मंडळाच्या तुलनेत महासभा अगदी दुय्यम महत्त्व असलेली संस्था वाटते. महासभेच्या शिफारशीही सुरक्षा समितीने गांभिर्याने घेतल्याचे दिसत नाही. परंतु "कोरिया" पेच प्रसंगात महासभेने "शांततेसाठी एकता ठराव" मंजूर करुन सुरक्षा मंडळावर मात करण्यात यश मिळविले आहे.

विसाव्या शतकाच्या ६ व ७ व्या दशकात शीतयुध्द परकोटीच्या तीव्रतेस पोहचले होते. अशा परिस्थितीत जगातील तिसरी सत्ता म्हणून अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीने महासत्तावर दबाव आणण्याचा थोडाफार प्रयत्न केला, परंतु त्यास फारसे यश आले नाही. अशा प्रसंगी युनोसारखी संघटना (आंतरराष्ट्रीय) काही करु शकत नसेल तर ती व्यर्थ आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस संयुक्त राष्ट्र संघटना एक आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून पुढे येऊ लागली आहे. त्याचे महत्त्वाचे कारण सुरक्षा मंडळ आपल्याकडे सोपविलेली जबाबदारी व्यवस्थित पार पडत नाही असे लक्षात येत आहे. विशेषतः सुरक्षा मंडळातील देशच संघर्ष निर्माण करु लागली आहेत, त्यामुळे महासभेकडे सर्व देशांनी मोठ्या अपेक्षेने पहायला सुरुवात केली आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे युनोची सदस्यांची संख्या वाढत आहे. बहुतेक देश लहान आहेत. महासभेत मोठ्या धाडसाने चर्चा करुन मतदान करु लागली आहेत. त्या छोट्या देशांनी बड्या देशांच्या राजकारणापासून स्वत:ला अलिप्त ठेवले आहे. त्यामुळे मोठ्या मतांच्या मंजूरीने महासभेने सुरक्षा मंडळाकड एखादी शिफारस केल्यास, सुरक्षा मंडळास, महासभेचा असा आदेशाच आहे. या दबावाचा प्रारंभ १९५० साली झाला आहे. "शांततेसाठी एकता ठराव" (Unity for Peace Resolution) मांडला. या ठरावाला सोव्हिएट रशियाने विरोध केला तरीही महासभेने हा ठराव ०३/११/१९५० रोजी मोठ्या बहुमताने मंजूर केला. शांतता एकता ठरावाने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची अंतिम जबाबदारी युनोच्या महासभेवरच आहे, हे सिध्द झाले. आंतरराष्ट्रीय शांततेच्या ठराव महासभेने २/३ बहुमताने पारित केल्यास नकाराधिकार असलेले सुरक्षा मंडळदेखील अडवणूक करु शकणार नाही.

थोडक्यात "शांततेसाठी एकता ठराव" ही तरतूद युनोच्या सनदेचाच एक भाग बनली आहे. तरीही शांततेसाठी एकता ठरावातील आणीबाणी अधिवेशनाशिवाय इतर तरतूदींचा वापर करण्यात आला नाही, त्यामुळे हा ठरावही काही प्रमाणात निष्प्रभ झाल्याने दिसून येते.

महासभेचे अधिवेशन - वर्षातून किमान एकदा महासभेचे अधिवेशन बोलविण्याची तरतूद सनदेत करण्यात आली आहे. हे अधिवेशन साधारणत: सप्टेंबर - ऑक्टोंबर महिन्यात बोलविण्यात येते व ते सुमारे एक महिना चालते. आवश्यकता वाटल्यास किंवा आणीबाणीत विशेष अधिवेशन बोलविण्याची तरतूद आहे. प्रत्येक अधिवेशनासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड महासभाच करते.

सुरक्षा परिषद (Security Council) :

युनोच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम या अत्यंत महत्त्वाच्या सुरक्षा परिषदेकडे असते. विशेषत: "आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता" या युनोच्या उद्दिष्ट पूर्तीची जबाबदारी सुरक्षा मंडळावर टाकण्यात आल्याने यास अतीमहत्त्व आले आहे.

सुरक्षा परिषदेची रचना : सुरक्षा समिती व एकूण १५ सदस्य असून त्यापैंकी पाच सदस्य कायम स्वरुपाचे असतात. अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स व चीन हे सुरक्षा मंडळाचे पाच कायम सदस्य आहेत. अस्थायी सदस्य १० असून त्यांची मुदत दोन वर्षे असते. अस्थायी सदस्यांची निवड दोन वर्षांसाठी प्रादेशिक विभाग तत्त्वावर करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे राष्ट्रकुल देश, साम्यवादी देश, पश्चिम युरोपीय देश, पश्चिम आशियायी राष्ट्रे, लॅटिन अमेरिका व आफ्रिका खंडातील राष्ट्रे असे प्रादेशिक विभाग सुरक्षा मंडळासाठी अस्थायी सदस्य निवडताना घेतात. त्यांची पात्रता ठरवित असताना त्या देशाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी किती व काय केले आहे याचा विचार निवडीच्या वेळी होतो.

नकाराधिकार - सुरक्षा मंडळाच्या पाच स्थायी सदस्यांना आंतरराष्ट्रीय शांततेसाठी महत्त्वाच्या प्रश्नावर "नकाराधिकार" देण्यात आला आहे. अर्थात एखादा प्रश्न महत्त्वाचा

आहे किंवा नाही हे ठरवितानाही नकाराधिकाराची तरतूद महत्त्वाची ठरते म्हणजे एखाद्या स्थायी सदस्याला प्रश्न महत्त्वाचा आहे वा नाही यासाठी एखादा नकाराधिकार वापरता येतो म्हणजे स्थायी सदस्यांना दोन नकाराधिकार (Double Veto) बहाल केलेले आहेत असे म्हणता येईल. नकाराधिकाराचा वापर अनेक वेळा करण्यात आला आहे. बड्या देशांच्या हातातील नकाराधिकार हे एक प्रभावी अस्त्र आहे. १९६० पर्यंत ९१८ वेळा नकाराधिकार वापरण्यात आला आहे.

सुरक्षा परिषदेची बैठक - सुरक्षा मंडळ हे युनोचे कायम कार्यरत असलेले मंडळ आहे. मंडळाच्या बैठका किती घ्याव्यात यावर बंधन नाही. तरीही सप्ताहात एकदा मिटींग घेण्याचा संकेत आहे. त्या मिटींगला संबंधीत देशाच्या प्रतिनिधीस राहता येते पण त्यात मतदानाचा अधिकार असणार नाही.

सुरक्षा मंडळाचे अधिकार व कार्ये :

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सुरक्षा परिषदेवर आहे. युनोच्या सनदेत कलम २४ ते २६ मध्ये सुरक्षा परिषदेचे अधिकार व कामे यांची स्पष्टपणे नोंद केलेली आहे.

वादग्रस्त प्रश्नांसाठी शांततामय मार्ग - ज्या वादग्रस्त प्रश्नामुळे आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात येण्याची शक्यता आहे, अशा प्रश्नांशी संबंधित देशास बोलावून सुरक्षा मंडळाने प्रथम वाटाघाटी, चौकशी, तडजोड, लवाद, न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रादेशिक तह वा करार याचा आधार घेऊन संबंधित देशास जो मार्ग सोयीस्कर वाटेल त्या मार्गाने संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न करावा, असा प्रश्न सोडवायचा की न्यायालयाकडे पाठवायचा हा निर्णय परिषद घेते.

शस्त्रास्त्राचा वापर : आंतरराष्ट्रीय शांतता राखण्यासाठी अगदी बळाचा वापर करण्याचा अधिकारही परिषदेत आहे. लष्करी व बिनलष्करी असे दोन प्रकार आहेत. अर्थात सुरक्षा मंडळ बिनलष्करी प्रयोग प्रथम करेल. उदा. आर्थिक नाकेबंदी, रेल्वे, पोष्ट, रेडिओ, हवाईमार्ग, जलमार्ग इत्यादी मार्गे नाकेबंदीचा उपयोग होत नसल्यास सुरक्षा मंडळ नाइलाजास्तव इतर देशांच्या सहकार्याने लष्करी बळाचा वापर संबंधितांवर करेल. युनोचे स्वतःचे सैन्य बळ नाही. पण मागणी केल्यास सदस्य देश युनोस सैन्यबळ पुरवितात. आवश्यकता वाटल्यास युनोस सदस्य देशांनी सैन्यबळ पुरवावे अशी तरतूद आहे. पण युनोने तशी सक्ती अद्याप केली नाही.

निवडणूक विषयक अधिकार - युनोच्या महासभेत सरचिटणीस पदाची निवड सुरक्षा मंडळाच्या शिफारशी शिवाय करता येत नाही. सुरक्षा परिषदेच्या सर्व स्थायी सदस्यांना ज्या व्यक्तीची या पदावर निवड करावयाची आहे, ती व्यक्ती सर्वांना मान्य असली पाहिजे. त्यापैकी एका स्थायी सदस्याने नकाराधिकाराचा वापर केल्यास महासभेत शिफारस करता येत नाही. उदा. १९९६ साली डॉ. ब्युट्रोस घाली यांची सरचिटणीस पदी पुन्हा पाच वर्षांसाठी निवड करण्याच्या प्रस्तावस स्थायी सदस्यांनी एकमत न दाखविल्याने (अमेरिकेचा

नकार असल्याने) त्यांची शिफारिस झाली नाही, तसेच आंतरराष्टीय न्यायालयाच्या न्यायाधीश पदासाठीच्या निवडणूक प्रक्रियेत सुरक्षा परिषद सहभागी असते.

सदस्तत्वाचा अधिकार - एखाद्या नविन देशास युनोचे सदस्य (महासभेचे) द्यावयाचे किंवा नाही तसेच असलेल्या सदस्य देशाचे निलंबन करावयाचे किंवा नाही याबाबत सुरक्षा परिषदेची शिफारिस अत्यंत महत्त्वाची मानली जाते. एखाद्या सदस्य देशाने युनोच्या सनदेचा बारबार भंग केल्यास सुरक्षा समिती त्या राष्ट्राचे सदस्यत्व निलंबित करण्याची शिफारस करु शकते.

सुरक्षा मंडळाचे महत्व :

१) राजकीय तज्ञांच्या मते, ज्या आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी सुरक्षा मंडळाची स्थापना केली. ते काम अपेक्षेप्रमाणे मंडळाकडून होत नाही. उलट सुरक्षा मंडळाऐवजी महासभेकडे सभासद राष्ट्रांचा जास्त ओढा आहे. शिवाय "डबर्टन" परिषदेत महासभा व सुरक्षा मंडळ यांच्यातील वेगळेपण जाणवण्यासाठी सुरक्षा मंडळाला प्राधान्य दिले होते पण त्यानंतर हे प्राधान्य कमी होऊन अलीकडे महासभेलाच जास्त महत्व येत आहे.

२) युनोची मध्यवर्ती संस्था म्हणून सुरक्षा मंडळावर जी महत्त्वाची जबाबदारी टाकण्यात आली होती, ती जबाबदारी यशस्वीपणे पार न पाडता येण्याचे प्रमुख कारण म्हणजे द्वितीय महायुध्दोत्तर काळात जगातील बड्या संत्तामधील मतभेद व संघर्ष हेच आहे. सुरक्षा मंडळाच्या कायम सदस्यांना देण्यात आलेल्या नकाराधिकारामुळे, मंडळ प्रभावीपणे काम करु शकले नाही. कोरियन युध्दाच्या पेचप्रसंगावेळी १९५० मध्ये सुरक्षा मंडळाचे महत्व कमी होऊन महासभेचे महत्व वाढले.

३) आंतरराष्ट्रीय शांततेच्या संदर्भात समस्या मंडळासमोर आल्या त्या प्रमाणात सुरक्षा मंडळाच्या बैठकी होत नसत व तातडीचे प्रश्न सोडविण्यासाठी दिरंगाई होऊ लागली. परिणामी आंतरराष्ट्रीय समस्या गंभीर बनत चालल्या. साहजिकच अशा समस्या युनोच्या आमसभेसमोर तक्रार स्वरुपात मांडल्या जाऊ लागल्या व महासभेने त्यांची तातडीने दखल घेऊन त्याचे निराकरण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली.

४) सुरक्षा मंडळाचे कायम सदस्यांनी नेहमी नकाराधिकार वापरल्याने सुरक्षा परिषदेचे महत्व कमी झाले. अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स व चीन या देशांनी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता या संदर्भातच नकाराधिकार वापरावा अशी युनोची अपेक्षा होती. परंतु एखाद्या देशाला सदस्यत्व देणे सरचिटणीसाची नियुक्तीच्या शिफारशी अशा साध्या विषयांवर कायम सदस्यांकडून नकाराधिकार वारंवार वापरला गेला.

५) युध्दोत्तर काळात अमेरिका व रशिया या महासत्तांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला प्रभाव वाढविण्यासाठी आर्थिक व शस्त्रास्त्र सहाय्य करणाच्या हेतूने परस्परांविरुध्द नाटो, सेंटो, सीटो, वॉर्सा करार घडवून आणले. हे करार सुरक्षा मंडळाच्या

कक्षेबाहेर राहिल्याने आंतरराष्ट्रीय शांतता संदर्भात घडलेल्या घटना युनोच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर न येता त्याचा परस्पर गटा-तटातील देशांपुढे निकाल लागत असे. शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी सुरक्षा समिती अस्तित्वात आहे. याचाच या देशांना विसर पडला.

थोडक्यात सुरक्षा मंडळाचे महत्व कमी होऊन ऱ्हास होत चालत असल्याचे दिसत आहे. तरी सुध्दा आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी सुरक्षा मंडळास शक्तीसंपन्न व सामर्थ्यवान केले पाहिजे याबाबत दुमत नाही. यासाठी काही उपाययोजना गरजेच्या वाटतात त्या पुढीलप्रमाणे-

सुरक्षा समितीच्या यशस्वीतेचे उपया -

१) सुरक्षा मंडळावर कायम सदस्यत्वाची तरतूद रद्द केली जावी, असे काही तज्ञांचे मत आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय व शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरक्षा मंडळास सहकार्य करण्याऐवजी त्यांनी त्यांना मिळालेलया खास नकाराधिकाराचा उपयोग आपले वैयक्तिक हितसंबंध जपण्यासाठी व आपली प्रतिष्ठा उंचावण्यासाठी अनेक वेळा केला. परिणामी आंतरराष्ट्रीय शांतता भंग होऊन सुरक्षा समितीचे अवमुल्यन झाले आहे म्हणून कायम सदस्य रद्द करुन त्यांना मिळालेले नकाराधिकार काढून घेतला पाहिजे.

२) राजकीय तज्ञांच्या मते सुरक्षा समितीतील अस्थायी सदस्यांची संख्या वाढविण्यात यावी. युनोच्या १९५ सदस्य देशांच्या तुलनेत १० अस्थायी सदस्य संख्या खुपच कमी आहे. त्यामुळे इतरांना आपली मते मांडणे अडचणीचे होते. अस्थायी सदस्य वाढवावेत असा युनोवर दबाव येत असूनही त्यांची संख्या तेवढीच राहिली आहे.

३) स्थायी सदस्यांचा नकाराधिकार पूर्णतः नष्ट व्हावा व सर्व सदस्यांना समान मताधिकार प्राप्त व्हावा. नकाराधिकार अत्यावश्यक वाटत असल्यास अत्यंत मर्यादित प्रमाणात वापर करण्याची तरतूद व्हावी.

४) सुरक्षा मंडळांमध्ये एकूण सदस्य संख्या वाढविण्याची जशी मागणी होत आहे, तशीच मंडळांमध्ये कायम सदस्यंची संख्या वाढवावी अशीह मागणी आहे. भारत, जर्मनी व जपान या राष्ट्रांना कायम सदस्य म्हणून घेऊन त्यांनाही नकाराधिकाराचा खास अधिकार देण्यात यावा असे जागतिक लोकमत बनत आहे.

५) सुरक्षा मंडळाचा प्रभाव वाढण्यासाठी त्यांनी आपल्या कामकाज पध्दतीत बदल केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय अशांतता निर्माण झाल्यास संबंधित देशास चर्चा, मध्यस्थी, सहमती, तडजोड यावर भर द्यावा. युनोच्या सरचिटणीसांनी त्या प्रश्नावर सखोल चर्चा करुन त्या राष्ट्रास आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी. त्यानंतर सुरक्षा मंडळाने बैठक बोलावून त्या प्रश्नावर कारवाईचा निर्णय द्यावा. त्यामुळे राष्ट्रा-राष्ट्रांतील अनावश्यक कटुता नष्ट होईल.

एकंदरीत सुरक्षा समितीचा प्रभाव वाढण्यासाठी त्यांच्या कार्यपध्दतीचे परिक्षण करुन दोष घालविण्याचा प्रयत्न व्हावा.

संयुक्त राष्ट्र संघटनेचे योगदान :

अ) शीतयुध्दकालीन कार्य :

संयुक्त राष्ट्रसंघटनेची निर्मिती आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवून युध्दाचा धोका टाळण्यासाठी, वाटाघाटी, चर्चेचा मार्ग उपलब्ध व्हावा म्हणून झाली होती. ह्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सर्व सदस्य देशांचे विशेषत: मोठ्या देशांचे सहकार्य आवश्यक होते. ज्याप्रमाणे राष्ट्रसंघावर पक्षपातीचे आरोप जर्मनी, इटली सारख्या देशांकडून झाले होते. तसे आरोप दुसऱ्या महायुध्दातील पराभूत राष्ट्रांकडून होऊ नयेत याची काळजी युनोच्या संस्थापकांना घ्यावी लागणार होती. दुर्देवाने ह्या अपेक्षांची पूर्तता युनोच्या सुरुवातीच्या काळात करता आली नाही, याचे प्रमुख कारण म्हणजे जन्मापासून युनो शीतयुध्दाच्या राजकारणात सापडली. याचा युनोच्या कार्यावर नकारात्मक परिणाम झाला. अमेरिका व रशिया हे दोन देश सुरक्षा समितीचे सदस्य असल्याने ते शीतयुध्दाच्या राजकारणातील महत्त्वाचे घटक असल्याने सुरक्षा परिषदही चर्चेचे किंवा निर्णय घेण्याचे व्यासपीठ होण्याऐवजी महायुध्दाचे स्वरुप प्राप्त झाले. युनोकडे चर्चेला गेलेला प्रत्येक प्रश्न किंवा वाद हा शीतयुध्दाच्या तराजूत तोलला गेला. शह-प्रतिशहाच्या शीतयुध्दाच्या राजकारणापासून अनेक छोटे-मोठे लष्करी गट, संघटना निर्माण झाल्या. युनोचे सदस्य असलेले अनेक देश विविध संघटनांचे सदस्य बनले. त्यांची बांधिलकी विभागली गेली. धृवीकरणाच्या प्रक्रियेमुळे परस्पर अविश्वास, संशय आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. अशा वातावरणात युनो कोणताही निर्णय सर्वानुमते घेऊ शकली नाही. सुरुवातीच्या तीन दशकांमध्ये निर्माण झालेले कोरिया, इंडोनेशिया, काश्मिर, सुवेझ, क्युबा, हंगेरी, बर्लीन इत्यादी प्रश्न शीतयुध्दाच्या राजकारणामुळे चिघळले. तथापि अशा वातावरणातही संघर्षाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अनेकदा शांतीसेना पाठविण्यात आली. उदा. सायप्रस, इस्त्रालय लेबनॉन इत्यादी.

संयुक्त राष्ट्र संघटनेचे शीतयुध्दकालीन योगदान थोडक्यात -

तिसरे महायुध्द टळावे हे उद्दिष्ट युनोचे होते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यास युनोला यश प्राप्त झाले. शीतयुध्दाच्या काळात दोन्ही महासत्तांमध्ये अनेकदा युध्दजन्य स्थिती निर्माण झाली. पण प्रत्यक्ष युध्द झाले नाही याचे श्रेय युनोला जाते.

शांतीसेनेची कल्पना आणि ती कल्पना अमलात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून झालेले प्रयत्न हे शीतयुध्दकाळातील संयुक्त राष्ट्र संघटनेचे मोठे योगदान आहे. सन १९४८ पासून आतापर्यंत ५४ वेळा शांतीसेनेचा वापर केला. सध्या १५ देशांमध्ये शांतीसेनेचा वापर चालू आहे.

शीतयुध्दाच्या काळातही संयुक्त राष्ट्र संघटना एवढे कार्य करु शकली याचे श्रेय जाते तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांना, युनोला कार्यरत ठेवण्यात विकसनशील राष्ट्रांच्या अलिप्तवादी चळवळीने अतिशय महत्त्वाची भूमिका केली.

ब) संयुक्त राष्ट्र संघटनेचे शीतयुध्दोत्तरकालीन कार्य -

शीतयुध्द व आंतरराष्ट्रीय राजकारणातील धृवीकरण हे रशियाच्या विघटनामुळे समाप्त झाले. शीतयुध्द कालीन संशय, असुरक्षितता व त्यातून वाढलेली शस्त्रास्त्र स्पर्धा कमी होऊन युनोला आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवण्यात अडथळे कमी होतील असे आशेचे वातावरण निर्माण झाले. तसेच परस्पर विश्वास, प्रकरणे मार्गी लागणे हे अपेक्षित होते पण अमेरिकेने एकमेव महासत्ता म्हणून दावा केल्याने त्यामुळे अनेक अडचणी आल्या संपूर्ण विश्वाची संरक्षणाची जबाबदारी आपल्याकडेच आहे अशा थाटात अमेरिका वावरु लागली. याची प्रचिती १९९१ च्या खाडीयुध्दात आली युनोला विश्वासात न घेता इराक-कुवैत युध्द काळात अमेरिका व मित्रदेश वागले. अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा अतिरेक २००१ च्या अफगाणिस्तानच्या लष्करी कारवाईत व २००३ च्या इराक विरुध्द कारवाईत दिसला. हा या दोन्ही देशांच्या सार्वभौमत्वाचा अपमान होता. आपल्या स्वार्थासाठी युनोचे व्यासपीठ अमेरिकेने वापरले. वार्सा करार शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर संपुष्टात आला. पण अमेरिकाप्रणीत नाटो ही लष्करी संघटना अमेरिकेने जाणीव पूर्वक जीवंत ठेवली आहे. या संघटनेच्या कारवाया ही वाढतच आहेत. त्यामुळे युनोच्या अधिकारावर मर्यादा आल्या आहेत. तरीसुध्दा युनोने पुढील क्षेत्रात भूमिका बजावल्या.

१) नि:शस्त्रीकरणासाठी महत्त्वाचे कार्य युनोने केले. १९९५ साली अणवस्त्र प्रसार बंदी कराराला अनिश्चित काळासाठी मुदतवाढ देण्यात आली व १९९७ साली भूसुरुंग बंदी करारावर युनोला शंभरहून अधिक देशांनी सहमती दिली.

२) राजकीय अस्थिरता, संघर्ष, वांशिक दंगली, हिंसाचार असणाऱ्या अनेक राष्ट्रांमध्ये शांतता व स्थैर्य निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने आपले शांतीसैन्य वाढविले. कुवैत (१९९१), पश्चिम सहारा (१९९१), अंगोला (१९९७), हैती (१९९७), कोसोवा (१९९९) अशा व इतर राष्ट्रांमध्ये युनोने शांतीसैन्य पाठवून महत्त्वाची भूमिका पार पाडली.

३) पर्यावरण संरक्षण, महिला बालकल्याण, आरोग्य, निर्वासितांचे संरक्षण यामध्ये युनोचे योगदान दिले. पर्यावरण रक्षणासाठी १९९२ ची रिओदीजानिरोपरिषद, १९९५ ची क्योरो परिषद, मानवी हक्कासाठी १९९८ साली आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापना, १९९५ ची महिला परिषद ज्यांमध्ये महिलासंबंधी अनेक विषयांवर चर्चा झाली.

क) संयुक्त राष्ट्राचे दहशतवाद विरोधी शीतयुध्दोत्तर काळातील प्रयत्न :

आमसभेचे ठराव - १९९४ मध्ये आमसभेने एक विशेष ठराव मंजूर करुन सर्व प्रकारच्या दहशतवादी कारवायांमुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात येते. राष्ट्रा-राष्ट्रांमधील मित्रत्वाचे संबंध धोक्यात येतात. परस्पर संशय व भिती वाढते. विकास व प्रगतीच्या प्रक्रियेला खीळ बसते. अशा दहशतवादी कारवायांचा निषेध करुन या समस्येचा सामना करण्यासाठी सामुहिक प्रयत्न करायला हवे असे आवाहन ठरावाद्वारे करण्यात आले.

दहशतवादाला आर्थिक मदत करण्याविरोधी करार - अनेक राष्ट्रांकडून विशेषत: पश्चिम आशियाई राष्ट्रांकडून दहशतवादी संघटनांना मिळणारे आर्थिक सहाय्य थांबावे या हेतूने ०९/१२/१९९५ रोजी आमसभेने एक ठराव मंजूर करुन त्याचे पुढे करारात रुपांतर झाले. १९८० पर्यंत बहुतेक वसाहतींना स्वातंत्र्य प्राप्त झाले होते. पण असे असतानाही दहशतवादी कारवायांच्या प्रमाणात आणि त्यातून होणाऱ्या हिंसाचारात कपात झाली नाही. दहशतवादाचे एक नवे रुप जगासमोर आले आणि हे रुप होते धार्मिक मुलतत्ववादाचे प्रभावित दहशतवादाचे. या दहशतवादाचे केंद्र होते पश्चिम आशिया. पश्चिम आशियातील इस्लामिक मुलतत्ववादी चळवळीने दहशतवादाला प्रभावित केले होते. श्रीमंत अरब राष्ट्रांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपे दहशतवादी संघटनांना अर्थसहाय्य दिले जात होते. अनेकदा असे अर्थसहाय्य पाकिस्तानसारख्या राष्ट्राच्या माध्यमातून दिले जात होते. अफगाणिस्तानामध्ये १९९६ मध्ये प्रस्थापित झालेली तालीबान राजवट दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यात आणि त्यांच्यासाठी निधी उभा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत होती. आमली पदार्थाच्या व शस्त्रास्त्रांच्या वापरातून दहशतवाद्यांसाठी पैसा उभा केला जात होता. याविषयी आंतरराष्ट्रीय जनमत जागृत व्हावे या हेतूने आमसभेने बहुमताने दहशतवादाला आर्थिक सहाय्य करण्याविरोधीचा ठराव मंजूर केला. या ठरावाने कराराचे रुप घेतल्याने यावर सही करणाऱ्या देशाला दहशतवाद्यांना आर्थिक मदत न करणे बंधनकारक बनले.

२.२ दारिद्र्य :

दारिद्र्य (Poverty) : समाजशास्त्रज्ञांच्या मते दारिद्र्य ही एक केवळ आर्थिक समस्या नाही तर ती एक सामाजिक समस्या देखील आहे. बहुसंख्य लोक आपल्या आवश्यक गरजांची पूर्ती करु शकत नाही. त्यांच्या जीवनमानाचा स्तर हा अत्यंत निकृष्ठ प्रतीचा असतो. दारिद्र्य ही एक समस्या असली तरी ह्या समस्येतून गुन्हेगारी, आत्महत्या, घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती अशा अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात.

दारिद्र्याचा अर्थ - प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्ती होणे महत्त्वाचे आहे. चैनीच्या वस्त आवश्यक आहेत पण या वस्तू जीवनावश्यक नाहीत आपल्या जीवनाचा एक न्यूनतम स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र व निवारा या बाबी आवश्यक असतात. स्वत: व्यक्ती आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या आवश्यक गरजांची पूर्ती होत नाही तेव्हा व्यक्ती आणि त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचा जीवनस्तर न्यूनतम जीवन स्तरापेक्षा खाली असतो तेव्हा त्या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात.

संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम व अन्न आणि कृषी संघटना -

प्रस्तावना - संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम ही संयुक्त राष्ट्राची महत्त्वाची संघटना असून ती जागतिक पातळीवरील बदलांचा पुरस्कार करते. जगातील विविध देशांमध्ये

ज्ञान, अनुभव आणि साधनसंपत्तीचा माध्यमातून जनसामान्यांचे जीवन अधिकतर चांगले करण्याचा तीचा प्रयत्न असतो. या संघटनेमध्ये १६६ सभासद देशांचा समावेश असून जागतिक व राष्ट्रीय विकासातील समस्या सोडविण्यावर भर दिला जातो.

जागतिक नेत्यांनी शतकातील विकासाची धैर्य निश्चित केलेली आहेत. त्यामध्ये २०१५ साली सध्याची दारिद्र्याची स्थिती निम्यावर आणण्याचे धैर्य देखील आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम हे धैर्य साध्य करण्यासाठी करण्यात येणाऱ्या जागतिक आणि राष्ट्रीय प्रयत्नांमध्ये एक सूत्रता आणण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांचा प्रयत्न पुढील क्षेत्रात भरीव काम करण्याचा आहे.

१) लोकशाही शासनाचा पुरस्कार.

२) दारिद्र्य निर्मुलन.

३) आपत्ती निर्मुलन व व्यवस्थापन.

४) पर्यावरण व उर्जा.

५) एच.आय.व्ही. (एडस्).

याशिवाय मानवी हक्काची जपणूक आणि महिलांचे सक्षमीकरण याकरिता ही संघटना विकसनशील देशांना मदत करते. या संघटनेकडून दरवर्षी मानवी विकासाचा अहवाल सादर केला जातो. त्याद्वारे जागतिक पातळीवरील विकास विषयक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा घडवून आणली जाते. तसेच विकास विषयक समस्यांवर तोडगे सुचविण्याबरोबरच त्यांचे आधुनिक पध्दतीने विश्लेषण केले जाते. प्रत्येक देशामध्ये या संघटनेचा एक स्थानिक प्रतिनिधी असून तो विकासविषयक कामांचा स्थानिक समन्वयक म्हणून भूमिका बजावतो. यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेल्या आंतरराष्ट्रीय साधनांचा आणि मदतीचा परिणामकारक वापर केला जातो.

संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम हे संयुक्त राष्ट्रसंघाचा जागतिक विकासासाठीचा कार्यक्रम असून संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत हे कार्यकारी मंडळाची भूमिका पार पाडते. या विकास कार्यक्रमाचा प्रशासक हा युनोमध्ये सचिव म्हणून ओळखला जातो. त्याचे मुख्यालय न्यूयॉर्क शहरात असून १६६ देश याचे सदस्य आहेत.

कार्यक्रम - संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाचा कर्मचारी वर्ग आणि कार्यालये १६६ देशांमध्ये पसरलेली आहेत. स्थानिक प्रशासनासोबत काम करुन जागतिक आणि राष्ट्रीय विकास कामासंदर्भातील आव्हानांचा विचार केला जातो. हा विकास कार्यक्रम प्रामुख्याने पुढील पाच क्षेत्रात काम करतो.

लोकशाही शासनाचा पुरस्कार - लोकशाही शासन व्यवस्थेचा पुरस्कार व प्रसार हे विकास कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विविध राष्ट्रांना लोकशाही विषयक सुधारणांबाबत जागृती निर्माण करणे. दोन देशांतील परस्पर संवादावर भर देऊन एकमेकांच्या अनुभवातून शिकण्यासाठी प्रोत्साहन देणे.

दारिद्र्य निर्मुलन - संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न करणाऱ्या देशांना विविध स्वरुपाची मदत करतो. गरिबांना आर्थिक संधी व साधने कशि उपलब्ध होतील ते पाहणे, हा विकासाचा कार्यक्रम जागति व्यापार, जागतिक गुंतवणूक यामध्ये देखील काही बदल सुचवितो. जागतिक पातळीवर गरीबांसाठी कर्ज माफी योजना राबवून, गरीबातल्या गरीबांस जागतिकीकरणापासून फायदा मिळेल अशा पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न करते. हा विकासाचा कार्यक्रम विकास कार्यक्रमांना प्रायोजित करतो. विकासातील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यावर भर देतो. बिगर शासकीय संघटना (N.G.O.) दानशूर व्यक्ती व शासन यांच्यातील प्रयत्नांमध्ये सुसुत्रता आणतो. हा विकास कार्यक्रम स्थानिक नेते व शासनासोबत काम करुन तेथील आर्थिक स्थिती सुधारण्यावर भर देतो.

आपत्ती निर्मुलन व व्यवस्थापन - संयुक्त राष्ट्रसंघाचा विकास कार्यक्रम दोन राष्टांमधील हिंसक संघर्ष टाळण्यावर भर देतो. तसेच आपत्ती घडून गेल्यावर संकटाचे लवकरात लवकर निवारण करण्यावर भर देतो. आपत्ती निवारण्यातील आपली क्षमता ओळखण्यासाठी क्षमतेचा विकास करण्यासाठी सुसंघटीत नियोजन व धोरणांसाठी हा विकास कार्यक्रम संबंधित राष्ट्राला सहकार्य करतो.

पर्यावरण व उर्जा - जगामध्ये सर्वत्र पर्यावरणाचा खालावलेला स्तर आणि उर्जाविषयक समस्यांचा वाईट परिणाम गरिब समुदायावर झाला आहे. युनो या समस्यांचा अभ्यास करुन निरंतर विकास कसा साध्य करता येईल यासाठी मदत करतो.

एच.आय.व्ही./एडस् - संपूर्ण विश्वाची सर्वात घातक समस्या म्हणून () कडे पाहिले जाते. युनोचा विकास कार्यक्रम हा रोग रोखण्यासाठी, त्याच्या निर्मुलनासाठी विविध देसांना मदत करतो. १९९० पासून युनो चा हा कार्यक्रम मानवी विकास निर्देशांकावर आधारित मानवी विकासाचा अहवाल प्रकाशित करीत आहे.

अन्न व कृषी संघटना - आधुनिक शेती विषयक तंत्रज्ञान व सुधारणा, जंगल व्यवस्थापन, मत्स्यपालन, पोषणमूल्य व अन्न सुरक्षितता या घटकांबाबत अन्न व कृषी संघटना महत्त्वाची माहिती व ज्ञान सर्व देशांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करते. या संघटनेचे लॅटिन भाषेत घोषवाक्य आहे. "फियान पॅनीस" ज्याचे इंग्रजीत भाषांतर "Let these be bread" म्हणजेच "सर्वांना भाकरी मिळू दे!"

रचना व विकास - अन्न व कृषी संघटना या संघटनेची स्थापना १६/१०/१९४५ रोजी क्यूबेक या कॅनडातील शहरात झाली. १९५१ साली या संघटनेचे मुख्यालय अमेरिकेतील वॉशिंग्टन येथून इटलीतील रोम मध्ये हलविण्यात आले. ०८/०८/२००८ रोजी या संघटनेचे १९३ सदस्य देश झाले. या संघटनेचे कामकाज सदस्य राष्ट्रांच्या परिषदेमार्फत होते. हे सदस्य दर दोन वर्षातून भेटून संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेतात व पुढील दोन वर्षांसाठीचा अर्थसंकल्प मंजूर करतात. सदस्य राष्ट्रांची परिषद ९८ सभासदांची निवड कार्यकारी मंडळावर करते.

संघटनेचे उपक्रम :

एकात्म किटकनाशक व्यवस्थापन - विविध किटकांमुळे दरवर्षी हजारो-लाखों टन अन्न-धान्य वाया जाते. ही समस्या लक्षात घेऊन १९९० नंतर या संघटनेने एकात्म किटकनाशक व्यवस्थापन राबविण्याचा निर्णय घेतला. याचा फायदा आशिया खंडातील तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना झाला. हजारो-लाखों शेतकऱ्यांना किड व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. संघटनेच्या कामकाजावर आंतरराष्ट्रीय पातळीवरुन टिका करणाऱ्या संस्थांनाही या कामाची प्रशंसा करावी लागली.

अन्न प्राप्तींचा अधिकार - २००५-२०१५ च्या दरम्यान संघटनेने सर्वांसाठी अन्न सुरक्षितता हा महत्त्वाचा मुद्दा मानला असून अधिकार म्हणून त्याकडे पाहिले जाते असे मत मांडले आहे. सध्याच्या व भावी पिढ्यांसाठी अन्न सुरक्षितता महत्त्वाची मानली आहे.

उपासमार विरोधी आंतरराष्ट्रीय युती - जून २००२ च्या जागतिक अन्नशिखर परिषदेत जागतिक नेत्यांची उपासमार होणाऱ्या एकूण लोकसंख्येपैंकी लोकांची संख्या २०१५ पर्यंत निम्याने कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे मान्य केले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २००३ साली १६ ऑक्टोबरला "जागतिक अन्न दिवशी" "आंतरराष्ट्रीय उपासमार विरोधी युती" ची स्थापना करण्यात आली. यामध्ये शासकीय व बिगर शासकीय संघटनांचा समावेश केला गेला आहे. या युतीच्या जागतिक कामकाजामध्ये पुढील चार महत्त्वाच्या कार्यक्रमांचा समावेश केला आहे. प्रसार, उत्तरदायित्व, साधनांची देवाणघेवाण आणि समन्वय ही युती केवळ दोन वर्षांच्या कालावधीतच ३६ देशांमध्ये स्थापन झाली असून त्यापैकी ब्राझिल, फ्रान्स, अमेरिका व भारत या देशांत या युतीचे क्रियाशील कार्य आहे.

२.३ आरोग्य :

जागतिक आरोग्य संघटना (World Health Organisation - W.H.O.) :

राष्ट्रसंघाने युध्दकाळात निर्माण होणाऱ्या कॉलरा, विषमज्वर इत्यादी सार्थीच्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेचा एक भाग म्हणून "आरोग्य संघटना" स्थापन केली होती. फार थोडी राष्ट्रे यांची सदस्य झाली होती. शिवाय राष्ट्रसंघाचे सदस्य नसलेल्या देशांनीही आरोग्य संघटनेचे सभासदत्व स्विकारले होते. तीच आरोग्य संघटना संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर सनदशीर रुप घेऊन "जागतिक आरोग्य संघटना" झाली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचे स्वरुप उद्देश - विश्वातील सर्व देशांतील सर्व नागरिकांना शारीरिक, मानसिक व सामाजिक सुदृढतेवर आधारलेले उत्तम आरोग्य प्राप्त करुन देण्याचा उद्देश जागतिक आरोग्य संघटनेने आपल्यासमोर ठेवला आहे. युनोची सर्व राष्ट्रे या संघटनेची सदस्य आहेत. युनोचे सदस्यत्व नसलेल्या देशांनाही याचे सदस्यत्व घेता येते. संघटनेची

वार्षिक वर्गणी न देणाऱ्या राष्ट्रांना मतदान करता येत नाही, शिवाय अशा देशांमध्ये संघटनेने सुरु केलेले आरोग्य विषयक कार्य स्थगित केले जाते. सदस्य देशांनी आपल्या देशातील आरोग्य संघटनेच्या कार्याचा वार्षिक अहवाल संघटनेकडे पाठवावा. तसेच संघटनेने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी देशाने कशाप्रकारे केली आहे याची ही माहिती दिली पाहिजे.

जागतिक आरोग्य संघटनेची कार्य - कार्यपध्दती - जागतिक आरोग्य संघटना, जागतिक आरोग्य सभा, कार्यकारी मंडळ व सचिवालय या तीन विभागांच्या द्वारे आपले कार्य करीत असते.

जागतिक आरोग्य सभा ही संघटनेची सर्वसाधारण सभा असून संघटनेचे सदस्य असलेल्या सर्व देशांचे प्रतिनिधी त्यात भाग घेतात. संघटनेचे धोरण ठरविले. कार्यकारी मंडळाच्या संचालकांची नियुक्ती करणे, अर्थसंकल्प मंजूर करणे. जमा व खर्च यावर देखरेख ठेवणे. कार्यकारी संचालकांची निवड करणे, आरोग्यविषयक संशोधनास उत्तेजन देणे, कार्यकारी मंडळास संघटनेच्या धोरणानुसार कार्यक्रम ठरविण्याची सूचना देणे व त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे इत्यादी कामाची जबाबदारी जागतिक आरोग्य सभेवर असते.

संघटनेच्या कार्यकारी मंडळामध्ये २४ तांत्रिक व अतांत्रिक सदस्य असतात. त्यांची मुदत तीन वर्षे असून ते पुननियुक्तीस पात्र असतात. मंडळाच्या अध्यक्षांची निवड मंडळच करते. वर्षांतून किमान दोन बैठका ठरविलेल्या वेळी व स्थळी होणे आवश्यक असते. मंडळावर मुख्य जबाबदारी सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची असते. रोगाच्या साथी किंवा आरोग्यविषयक अचानक उद्‌भवलेल्या संकटावर मंडळाला तातडीची उपाय योजना करण्याचा अधिकार आहे.

सचिवालय जागतिक आरोग्य संघटनेचा प्रशासकीय विभाग असून त्याचा प्रमुख म्हणून सरसंचालक असतो. संघटनेची प्रशासकीय व दैनंदिन स्वरुपाची सर्व कामे सचिवालयाकडून केली जातात.

जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्यविषयक सुधारणा करुन लक्षणीय कामगिरी केली आहे. संघटनेने साथींच्या रोगांना पूर्णतः आटोक्यात आणले आहेच, शिवाय सर्वसामान्य नागरिकांमध्ये विविध रोगांविषयी माहिती पुरवून आरोग्यविषयी जागरुकता निर्माण केली आहे. पोलिओ, क्षयरोग, देवी, कॉलरा, प्लेग इत्यादी रोग समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. मलेरिया नष्ट करण्यासाठी संघटनेने सातत्यपूर्ण मोहिम चालविली आहे. "एडस् (H.I.V.)" या महाभयंकर रोगांवर उपाय शोधण्यासाठी संशोधन चालू आहेच, त्याहीपेक्षा दरवर्षी लक्षावधी लोकांच्या बळी घेणाऱ्या एडस् वर प्रतिबंधात्मक उपाय योजनांची जोरदार मोहिम जागतिक आरोग्य संघटनेने उघडली आहे.

अलीकडच्या काळात (W.H.O.) च्या कार्याची व्याप्ती खूपच वाढली आहे. स्वाईन फ्लू, बर्डस् फ्लू वगैरे नविन घातक सार्थिचे प्रमाण वैश्विक स्वरुप धारण करीत आहे. जागतिक आरोग्य संघटनेचे सध्या १९३ देश सदस्य असून दरवर्षी मे महिन्यात जिनिव्हा येथे ते सभेसाठी भेटतात. या संघटनेच्या कार्यकारी मंडळात ३४ सदस्य असून आरोग्य क्षेत्रात काम करण्यासाठी पूर्ण पात्र असतात.

अंमलीपदार्थ नियंत्रण मंडळ - जगात फार मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा बेकायदेशीर व्यापार चालतो व या पदार्थांच्या सेवनामुळे कोट्यावधी तरुणांची आयुष्ये बरबाद होत आहेत. या बरबादीपासून मानव जातीला वाचविण्यासाठी युनोचे प्रयत्न सुरु केले. त्याचा एक भाग म्हणून युनोने अमली पदार्थ नियंत्रण मंडळ स्थापन केले. या मंडळाने अमली पदार्थांचे उत्पादन, पुरवठा, व्यापार, सेवन इत्यादींना बंदी घालण्याचे जगातील सर्व देशांना आवाहन केले आहे.

२.४ विद्यापीठीय प्रश्न :

१. आजच्या कामामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास योजनांचे टिकात्मक परिक्षण करा.

२. आजचे जग एकध्रुवीय आहे का? या संदर्भात चर्चा करा.

३. संयुक्त राष्ट्राचे दहशतवादाविरोधीप्रयक्न चर्चा करा.

४. दारिद्र्याचा अर्थ, कारणे व उपाय स्पष्ट करा.

५. आरोग्याच्या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेचे कार्य विशद करा.

* * *

३

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण

३.० प्रास्ताविक
३.१ उदारीकरण
३.२ खाजगीकरण
३.३ जागतिकीकरण
३.४ जागतिक बँक
३.४.१ बँकेचे नियामक मंडळ
३.४.२ संचालक मंडळ
३.४.३ उपाध्यक्ष
३.४.४ बँकेचे कामकाज
३.५ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
३.५.१ संघटना
३.५.२ कार्यकारी मंडळ
३.५.३ व्यवस्थापकीय मंडळ
३.५.४ उद्दिष्ट्ये
३.५.५ कार्य
३.५.६ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवरील टीका
३.६ जागतिक व्यापार संघटना
३.७ प्रश्न

३.१ प्रास्ताविक :

या प्रकरणात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या तीन प्रक्रिया समजावून घेऊन त्या प्रक्रियांसंदर्भात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना यांच्या भूमिकेचा अभ्यास आपण करणार आहोत.

३.२ उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण :

सर्वप्रथम आपण उदारीकरणाचा विचार करु. उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे अर्थव्यवस्था खुली होते आणि त्याचा फायदा जागतिकीकरणासाठी होतो. आर्थिक उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेवरील सरकारी बंधने कमी करणे किंवा काढून टाकणे. उदारीकरणामुळे अर्थव्यवस्था देशी आणि विदेशी खाजगी संस्थांसाठी खुली करणे, अर्थव्यवस्थेमधील सरकारी कंपन्यांची मक्तेदारी संपुष्टात आणून एखाद्या क्षेत्रात खाजगी कंपन्यांना व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात येते. या उदारीकरणामुळे काही चांगले बदल निश्चितपणे झाले. व्यवसायामध्ये

स्पर्धा वाढली. ग्राहकांना अनेक पर्याय उपलब्ध झाले. वस्तूंच्या किंमतीमध्ये चढओढ निर्माण होऊन ग्राहकांना कमी किंमतीत चांगल्या सेवा मिळू लागल्या. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व्यावसायिकांनी योजलेल्या धोरणांमुळे ग्राहकांचा फायदाच झाला.

३.२ खाजगीकरण :

सरकारी क्षेत्रातील उद्योग खाजगी उद्योगांना विकरणे किंवा विविध उद्योगांमध्ये गुंतवलेले भागभांडवल काही प्रमाणात किंवा पूर्ण प्रमाणात काढून घेणे म्हणजे खाजगीकरण याला निर्गुंतवणूक असेही म्हणतात.

भारताच्या संदर्भात बोलायचे झाले तर १९९० पासून आजपर्यंत अनेक सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले आहे. १९९९ साली भारतात केंद्रीय अर्थमंत्रालयांतर्गत एक नवीन निर्गुंतवणूक विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागामार्फत खाजगीकरणाचे धोरण राबविले जाते. खाजगीकरणाचे काही फायदे आणि तोटे आहेत. एक म्हणजे सरकारवरील आर्थिक बोजा कमी होतो व उद्योगांमध्ये गुंतवलेले भांडवल विकास आणि कल्याणकारी कामांसाठी वापरता येते.

३.३ जागतिकीकरण :

जागतिकीकरणाच्या संकल्पनेला अनेक पैलू आहेत. आपण मात्र या प्रकरणात आर्थिकदृष्ट्या जागतिकीकरण म्हणजे देशांची अर्थव्यवस्था इतर देशांसाठी खुली करणे. आपल्या देशांत इतरांना मुक्तपणे व्यापार आणि आर्थिक व्यवहार करु देणे आणि आपण इतरांच्या देशात त्याचप्रकारे व्यापार आणि आर्थिक व्यवहार करणे. १९८० पूर्वी जागतिक आर्थिक व्यवहारांमध्ये खुलेपणा नव्हता. प्रत्येक राष्ट्राची बंदिस्त व्यवस्था होती. १९८० नंतर जगभर काही राष्ट्रांकडून अर्थव्यवस्था खुली करण्याच्या आग्रहाला सुरुवात झाली. यामध्ये अमेरिका, ब्रिटन इत्यादी विकसित राष्ट्रांचा पुढाकार होता. जागतिकीकरणामुळे विकसित देशांना नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात. त्यांच्याकडील प्रगत तंत्रज्ञानामुळे ते नवीन बाजारपेठांमधील स्पर्धेमध्ये इतर स्थानिक स्पर्धकांना सहज मागे टाकतात आणि सहजपणे बाजारपेठ काबीज करतात. मागास देशांचाही या प्रक्रियेत फायदा होतो. त्यांना नवीन तंत्रज्ञान भांडवल उपलब्ध होते. पण त्याचबरोबर प्रगत राष्ट्रांच्या जीवनशैलीचा प्रभाव त्यांच्यावर पडून सांस्कृतिक संघर्षाला सुरुवात होऊ शकते. भांडवली तंत्राचा वापर केल्याने यंत्राचा वापर वाढून माणसांची-कामगारांची गरज कमी होते. त्यातून कामगार कपातीला सुरुवात होऊन बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

या तीन प्रक्रियेंचा संदर्भामध्ये आपण आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटनेचा अभ्यास करणार आहोत.

३.४ जागतिक बँक :

जागतिक बँकेची स्थापना संपूर्ण जगातून दारिद्र्य नष्ट करणे, सर्वाधिक गरीब देशातील गरीब जनतेला मदत करणे, तसेच सर्व जगाने मान्य केलेली सहस्त्रक विकास उद्दिष्ट्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी राष्ट्रांना मदत करणे यासाठी झाली. त्यानंतर जशी

बँकेच्या सदस्यांची संख्या वाढत गेली तसा बँकेच्या कामाचा व्याप वाढला व कामाचे स्वरुपही बदलत गेले. केवळ कर्ज देणे आणि वसूल करणे असे मर्यादित काम राहिले नाही. कामाची गुंतागुंत आणि व्याप्ती वाढल्यामुळे बँकेने संलग्न अशा चार संस्था स्थापन केल्या. सध्यातरी या पाच संस्था एकत्रितपणे काम करतात. यांनाच जागतिक बँक गट (World Bank Group) असेही संबोधिले जाते. या पाच संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

१) आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक (जागतिक बँक) याची स्थापना १९४४ साली झाली. याची एकूण सदस्यसंख्या १८५ आहे. २००६ मध्ये ३३ दशांतील १९२ प्रकल्पांना १४.१ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज वाटप केले आहे.

२) आंतरराष्ट्रीय विकास संघ यांची स्थापना १९६० साली झाली. याची सभासद संख्या १६६६ असून स्थापनेपासून आजपर्यंत १६१ अब्ज डॉलरची मदत केली आहे.

३) आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ.

४) बहुराष्ट्रीय गुंतवणूक संस्था.

५) आंतरराष्ट्रीय गुंतवणूक तंटा निवारण केंद्र.

जागतिक बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली. तेव्हा बँकेचे ३८ सदस्य होते. १९५० आणि १९६० च्या दशकात अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्यापैकी बहुतेकांनी बँकेचे सदस्यत्व घेतले. त्यामुळे या काळात बँकेच्या सभासदांची संख्या एकदम वाढली. दारिद्र्य निवारणासाठी जगभरात विकासाला चालना देणे, आर्थिक संधी उपलब्ध करणे आणि गरीबांनी या संधीचा फायदा घ्यावा म्हणून त्यांना मदत करणे. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी कामे जागतिक बँक करते.

३.४.१ बँकेचे नियामक मंडळ :

या बँकेचे कार्य एखाद्या सहकारी संस्थेमध्ये असते. सर्व सभासद राष्ट्रे बँकेचे भागधारक आहेत. प्रत्येक सभासद देश आपले प्रतिनिधी पाठवतो. हे प्रतिनिधी सहसा त्या देशाचे अर्थमंत्री अथवा केंद्रीय बँकेचे प्रमुख असतात. प्रत्येक सदस्याबरोबर एका पर्यायी सदस्याची निवड केली जाते. ही निवड संबंधित राष्ट्रांच्या शासनाकडून केली जाते. सर्व प्रतिनिधींचे मिळून एक नियामक मंडळ असते. या नियामक मंडळात सर्व निर्णय घेतले जातात. निर्णय घेण्याचे सर्वोच्च अधिकार या नियामक मंडळाला असतात. नियामक मंडळाची बैठक वर्षातून एकदा होते.

३.४.२ संचालक मंडळ :

नेहमीचे कामकाज करण्यासाठी नियामक मंडळ २४ कार्यकारी संचालकांचे संचालक मंडळ निवडून देते. फ्रान्स, जर्मनी, जपान, ब्रिटन आणि अमेरिका या पाच सर्वात मोठ्या भागधारकांचे प्रत्येक एक संचालक असतात. तर इतर १९ संचालक उर्वरित १८० देशांचे प्रतिनिधित्व करतात. बँकेचे अध्यक्ष संचालक मंडळाचे नेतृत्व करतात. बँकेच्या परंपरेनुसार अमेरिकन अध्यक्ष अमेरिकन नागरिकाला पाच वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष पदावर नियुक्त करतात. संचालक मंडळाची बैठक आठवड्यातून किमान दोनदा होते.

३.४.३ उपाध्यक्ष :

अध्यक्षांच्या मदतीला बँकेचे उपाध्यक्ष असतात. आफ्रिका, पूर्व आशिया, पॅसिफिक, युरोप आणि मध्ये आशिया, दक्षिण अमेरिका आणि कॅरेबियन देश, मध्यपूर्व आणि उत्तर आफ्रिका आणि दक्षिण आशिया अशा सहा विभागांसाठी उपाध्यक्ष काम करतात. याशिवाय काही उपाध्यक्षांकडे मानवी विकास, दारिद्र्यनिवारण यासारखे स्वतंत्र विभाग देण्यात आले आहेत.

३.४.२ बँकेचे कामकाज :

१९४४ मध्ये बँकेची स्थापना झाली. दुसऱ्या महायुध्दामुळे उद्ध्वस्त झालेल्या युरोपला सावरण्यास मदत करणे इतकेच बँकेचे उद्दिष्ट होते. परंतु पुढील दशकांमध्ये बँकेच्या कामाचा व्याप वाढत गेला. जगभरातील दारिद्र्याचे निवारण करण्याचे मोठे कार्य बँकेने हाती घेतले. रॉबर्ट मॅकनमारा यांची १९६८ मध्ये बँकेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी बँकेच्या धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. शाळा आणि दवाखाने उभे करणे. साक्षरतेचा प्रसार, शेती सुधारणा या विषयांवर लक्ष केंद्रीत केले. त्यांनी विकसनशील आणि गरीब देशांना कर्ज देण्याची प्रक्रिया सोपी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बँकेचे भांडवल वाढविण्याचे नवे मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला.

नंतरच्या विकसनशील देशांनी कल्याणकारी योजना बंद करुन तो पैसा अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी वापरावा असा आग्रह धरण्यात आला. त्या दृष्टीने विकसनशील देशांमध्ये अर्थव्यवस्था लादण्याचा प्रयत्न केला गेला. चलनचे अवमूल्यन करावे, किंमतीवरील नियंत्रण संपवावे, सर्व प्रकारच्या सबसीडी बंद कराव्यात, परदेशी गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करावे, प्रशासनात सुधारणा करुन भ्रष्टाचाराला आला घालावा इत्यादी अटी घालण्यात आल्या. या अटी स्विकारल्यासच कर्ज मिळेल अशी अट घालण्यात आली. आशिया, द. अमेरिका आणि आफ्रिकेमधील विकसनशील देशांना पर्याय नसल्यामुळे त्यांनी या अटी स्विकारल्या. त्याचे गंभीर परिणाम त्या देशांना भोगावे लागले.

अनेक स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या टीकेला प्रतिसाद देत बँकेने आपली धोरणे पुन्हा विकसोन्मुख करण्याचा प्रयत्न केला. आज बँका पुन्हा दारिद्र्यनिवारण आणि पर्यावरण संरक्षण या विषयावर आपले लक्ष केंद्रीत करत आहे. बँक केवळ आर्थिक मदत देत नाही तर दिलेली मदत योग्य लोकांपर्यंत पोहोचत आहे की नाही त्याची तपासणी करते. ज्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला असेल त्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवते.

जागतिक बँक विकसनशील राष्ट्रांसाठी निधी आणि ज्ञान उपलब्ध करुन देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून आपली भूमिका पार पाडते.

३.५ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) :

ही संयुक्त राष्ट्रांची विशेष संस्था आहे. १९४४ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना झाली आणि १९४७ साली आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. आज जगातील १८५ राष्ट्रे त्याची सदस्य आहेत. निधीचे मुख्यालय अमेरिकेच्या

राजधानीत वॉशिंग्टन येथे आहे.

३.५.१ संघटना :

बोर्ड ऑफ गव्हर्नस् - व्यवस्थापकीय मंडळ.

या संघटनेचे एकूण १८५ सदस्य आहेत. जागतिक बँकेचे सदस्यत्व हवे असल्यास आधी निधीचे सदस्य होण्याची अट आहे. सर्व १८५ सदस्यांचे मिळून निधीचे बोर्ड ऑफ गव्हर्नस् तयार होते. ही संरता निधींची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. यामध्ये प्रत्येक देशाचा किंवा देशांच्या गटाचे प्रतिनिधीत्व करणारा एक गव्हर्नर आणि एक पर्यायी गव्हर्नर असतो. गव्हर्नरची नियुक्ती सदस्य राष्ट्रांकडून केला जातो. बहुतेकदा तो त्या देशाचा अर्थमंत्री किंवा त्या देशांच्या केंद्रीय बँकेचा गव्हर्नर असतो. भारताचे अर्थमंत्री भारताचे प्रतिनिधीत्व करतात.

३.५.२ कार्यकारी मंडळ :

कार्यकारी मंडळाचे सदस्य निधीच्या १८५ सदस्य राष्ट्रांमधून निवडले जातात. त्यामध्ये सदस्य राष्ट्रांनी किंवा राष्ट्रांच्या गटांनी नियुक्त केलेल किंवा निवडून दिलेले २४ सदस्य असतात. अमेरिका, रशिया, सौदी अरेबिया आणि चीन यासारख्या मोठी अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांचे स्वतंत्र सदस्य असतात, तर छोटी राष्ट्रे गट करुन सदस्य निवडून पाठवतात.

नाणेनिधीमध्ये प्रत्येक राष्ट्राचे स्थान त्याच्या आर्थिक ताकदीवर ठरते. प्रत्येक राष्ट्राचा ठरवून दिलेला कोटा हा त्याच्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. अमेरिकेचा कोटा सर्वाधिक म्हणजे १६.७७ इतका आहे. कोटा म्हणजे एखाद्या राष्ट्राला निधीकडून मिळू शकणारी कमाल मदत. ही मदत ते राष्ट्र निधीला भरत असलेल्या वर्गणी इतकी आहे.

३.५.३ व्यवस्थापकीय संचालक :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्यकारी मंडळ संचालकाची निवड करते. या पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास कार्यकारी मंडळ शक्यतो सहमतीने निवड करण्याचा प्रयत्न करते.

व्यवस्थापकीय संचालक आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे नेतृत्त्व करतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये १७ विविध खाली आहेत. या सर्व खात्यांमधील सर्व कर्मचाऱ्यांचा तो प्रमुख असतो आणि तोच निधीच्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. व्यवस्थापकीय संचालकाच्या मदतीला आणखी तीन उपसंचालक असतात.

३.५.४ उद्दिष्टे :

१) जागतिक मंदीची पुर्नरावृत्ती टाळणे.

२) आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याला चालना देणे.

३) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा समतोल विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

४) चलन विनिमय दरांमध्ये स्थिरता राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
५) आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचा व्यवहार सुलभ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
६) आर्थिक संकटे टाळण्याचा प्रयत्न करणे व प्रसंगी संकटात सापडलेल्या राष्ट्रांना मदत करणे.
७) एकूण आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्थिर राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
८) विकासाला चालना देऊन दारिद्र्य निवारणात मदत करणे.
९) विविध राष्ट्रांना समर्थ अर्थव्यवस्था निर्माण करण्यात मदत करणे.

३.५.५ कार्य :

आर्थिक अडचणीत सापडलेल्या राष्ट्रांना कर्ज देण्याचे मुख्य काम या निधीकडून होते. १९९७ च्या आशियायी आर्थिक संकटाच्या काळात फिलीपाईन्स, थायलंड, इंडोनेशिया आणि कोरिया या देशांना मदत करण्यात आली.

२००१ मध्ये तुर्कस्तानला तर २००८ मध्ये जॉर्जियाला तातडीने मदत देण्यात आली. नाणेनिधी मुख्यतः तीन प्रकारची कार्ये करतो. निरिक्षण, तांत्रिक सहाय्य आणि कर्जपुरवठा, नाणेनिधी वर्षांतून दोन वेळा World Economic Outlook नावाचा अहवाल प्रसिध्द करते. यामध्ये जागतिक आणि प्रादेशिक घडामोडींचा आढावा घेतला जातो. तसेच भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. बऱ्याचदा सदस्य राष्ट्रांना मोफत तांत्रिक सल्ला आणि प्रशिक्षन दिले जाते. यामध्ये चलन व्यवस्था, बँकांचे नियंत्रण, आर्थिक धोरण, विनिमय दर या विषयांचा समावेश असतो.

३.५.६ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवरील टीका :

१) नाणेनिधीच्या निर्णया प्रक्रियेवर श्रीमंत राष्ट्रांचे वर्चस्व आहे, याचे कारण म्हणजे निधीमधील सदस्याचे स्थान त्याच्या आर्थिक ताकदीवर अवलंबून असते.
२) शीतयुध्दाच्या दरम्यान निधीचे धोरण भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे होते व साम्यवादी राष्ट्राला मदत केली जात नसे.
३) सध्याच्या काळात निधीने आक्रमक उदारमतवादाचा पुरस्कार केला आहे.
४) नव्याने मुक्त झालेल्या व नव्यान उद्यास येत असलेल्या अनेक राष्ट्रांना मुक्त अर्थव्यवस्था स्विकारण्यास भाग पाडून निधीने अडचणीत आणले आहे.

३.६ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation) :

जागतिक व्यापार संघटनेची स्थापना १९९५ मध्ये झाली. परंतु प्रत्यक्षात या संघटनेने १९४५ साली झालेल्या गॅट (General Agreement on Trade & Tariff) या कराराची जागा घेतली म्हणजेच या संस्थेला साधारण ६५ वर्षांचा इतिहास आहे.

या संघटनेचा इतिहास व कार्ये आपण नंतर समजावून घेऊ या. सर्वप्रथम या संस्थेची रचना लक्षात घेऊ.

रचना -

जागतिक व्यापाराच्या ९७ टक्के व्यापार जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांप्रमाणे चालतो. जागतिक व्यापार संघटनेचे एकूण १५३ सदस्य आहेत. या संघटनेने सर्व निर्णय सर्वसंमतीने घेतले जातात. सर्व सदस्य राष्ट्रांची संमती असेल तरच एखादा निर्णय घेतला जातो. शिवाय राष्ट्रांचा प्रत्येक निर्णय त्याच्या कायदे मंडळाकडून संमत केलेला असतो. निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार वर्षातून किमान दोन वेळेस भरणाऱ्या मंत्री पातळीवरील परिषदेला असतो. या परिषदेलाच जागतिक व्यापार संघटनेत निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार असतो. त्याच्या खालोखाल जनरल कौन्सिल काम पाहते. यामध्ये सदस्य देशांचे राजदूत, जिनिव्हा येथील जागतिक व्यापार संघटनेच्या मुख्यालयातील शिष्टमंडळातील सदस्य व काही वेळेस त्या-त्या देशांकडून पाठवले गेलेले विशेष सदस्य या सर्वांचा समावेश जनरल कौन्सिलमध्ये होतो. कौन्सिलच्या बैठका वर्षांतून बऱ्याच वेळा होतात. राष्ट्रांच्या व्यापारी धोरणांचा आढावा घेणे आणि तंटा निराकरण करण्याचे काम कौन्सिल करते.

त्याच्या खालच्या पातळीवर वस्तू परिषद, सेवा परिषद आणि बौध्दिक संपदा परिषद आपले अहवाल जनरल कौन्सिलला सादर करतात. इतर अनेक विशेष समित्या, कार्यगट विकास, पर्यावरण, सदस्यत्वासाठीचे अर्ज, नव्याने झालेले प्रादेशिक व्यापार करार यांचा अभ्यास करतात. जिनिव्हामधील जागतिक व्यापार संघटनेच्या कार्यालयात साधारण ६२७ कर्मचारी आहेत. ते मुख्य संचालकांच्या नेतृत्वाखाली काम करतात. त्यांच्या हाताखाली चार उपसंचालक कार्य करतात. जिनिव्हाच्या बाहेर सचिवालयाची शाखा नाही. इतर आंतरराष्ट्रीय संघटनांच्या सचिवालयांना असतात तसे निर्णय घेण्याचे अधिकार या सचिवालयाला नाहीत कारण, सर्व निर्णय सदस्य राष्ट्रे घेतात. सर्व मंत्रीपातळीवरील बैठका, जनरल कौन्सिल, समित्या इत्यादींना तांत्रिक आधार माहिती देण्याचे कार्य हे सचिवालय पार पाडते. विकसनशील देशांना तांत्रिक बाबतीत मदत करण्याचे कार्यही सचिवालय करते. जागतिक व्यापाराचे विश्लेषण करुन आमजनतेला आणि माध्यमांना माहिती देणे. तसेच तंटा सोडविण्याच्या कामात कायदेशीर मदत करण्याचे व नव्याने सदस्य होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्रांना सल्ला देण्याचे कार्यही सचिवालय करते.

जागतिक व्यापार संघटनेचा इतिहास -

दुसरे महायुध्द संपल्यानंतर विजयी राष्ट्रांना एक आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करायची होती. परंतु ती संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. त्या ऐवजी गॅटची निर्मिती करण्यात आली. गॅटचे मुख्य उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय व्यापारामधील अडथळे दूर करणे हे होते.

गॅट करार -

सर्वात प्रथम म्हणजे गॅट हा करार होता. संघटना नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे. दोन राष्ट्रांनी एकत्र येऊन करार करण्यापेक्षा अनेक राष्ट्रांनी एकत्र येऊन करार करावा यावर गॅटमध्ये अधिक भर देण्यात आला होता. गॅटच्या २३ संस्थापक सदस्यांमध्ये अमेरिका, कॅनडा इत्यादी विकसित देशांबरोबर भारत, श्रीलंका, पाकिस्तान, क्युबा इत्यादी विकसनशील देशांचाही सहभाग होता याची विशेष नोंद घेणे गरजेचे आहे.

गॅटचा इतिहास तीन टप्प्यांमध्ये विभागला जाऊ शकतो. गॅटच्या पहिल्या फेऱ्यांमध्ये केवळ आयात-निर्यात कर कमी करण्यावर भर होता. परंतु पुढच्या चर्चांमध्ये इतर अनेक विषयांचा समावेश करण्यात आला. या चर्चेचा थोडक्यात इतिहास पुढीलप्रमाणे -

१९४७ जिनिव्हा (स्विझीलँड) अमेरिकेच्या सहकार्यामुळे चर्चेची पहिली फेरी यशस्वी झाली.

१९४९ अनेसी (फ्रान्स) दहा नवीन सदस्य सामिल झाले.

१९५०-५९ टोरक्के (यु. के.).

१९५५-५६ जिनिव्हा (स्विझीलँड) - १९५० च्या दशकात गॅट अंतर्गत फारशा हालचाली झाल्या नाहीत.

१९६०-६२ जिनिव्हा (स्विझीलँड).

१९६४-६७ केनेडी.

या काळात EEC (Europeopn Economic Community) म्हणजेच युरोपीय आर्थिक समितीचा उदय झाला. या फेरींमध्ये गॅटच्या इतिहासात पहिल्यांदाच कराक करण्यात अडचणी निर्माण झाल्या. बऱ्याचशा चर्चा अर्थवट सोडून द्याव्या लागल्या.

- **१९७३-७९ टोकियो :**

  या फेरीच्या दरम्यान संपूर्ण जग तेलाच्या समस्येमध्ये बुडून गेले होते. चर्चेदरम्यान अमेरिका आणि वर्चस्व कायम राहिले. विकसनशील राष्ट्रांना फारशा सवलती मिळाल्या नाहीत त्यामुळे ते नाराज झाले.

- **१९८६-९४ उरुग्वे :**

  या फेरीच्या दरम्यान जगभर मंदीचे सावट होते. अमेरिका, जपान आणि दरम्यान व्यापारासंदर्भात अनेक वाद निर्माण झाले. अमेरिका आणि EEC मध्ये शेतीमालाच्या संदर्भात वाद होते. जपानने आपला बाजार अमेरिकेसाठी खुला करावा असे अमेरिकेचे म्हणणे होते. जगभरच्या राष्ट्रांनी आपले बाजार पुन्हा बंदिस्त करायला सुरुवात केली. चर्चा करण्यासाठी चार प्रमुख गटांची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये -

१) व्यापारातील अडथळे आणि त्यासंबंधीत बाबी.

२) शेती, नैसर्गिक संसाधने, सेवा क्षेत्र, टेक्सटाईल आणि कापड उद्योग, ट्रॉपिकल उत्पादने.

३) प्रक्रिया.

४) इतर बाबी.

चर्चेची नवी फेरी सुरु करावी अशी मागणी बऱ्याच राष्ट्रांकडून केली जात होती. परंतु EEC ने त्याकडे दुर्लक्ष केले.

डंकेल ड्राफ्ट :

राजकारण्यांनी वायफळ चर्चा सोडून मुक्त व्यापाराच्या विकासासाठी धाडसाने काही निर्णय घेतले पाहिजेत असे ४९९१ मध्ये गॅटचे सेक्रेटरी जनरल ऑर्थर डंकेल यांचे मत होते. त्यांनी तयार केलेल्या मसुद्यास डंकेल ड्राफ्ट म्हणून ओळखले जाते. या ड्राफ्टला काही राष्ट्रांनी विरोध केला होता. भारत त्यात आघाडीवर होता. बऱ्याच

विलंबानंतर १९९४ मध्ये उरुग्वे पॅकेजवर सही करण्यात आली. यामध्ये डंकेल प्रस्तावातील बऱ्याच मुद्यांचा समावेश करण्यात आला होता. अखेर १ जानेवारी, १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती करण्यात आली.

दोहा विकास कार्यक्रम :

नोव्हेंबर २००१ मध्ये दोहा (कतार) येथे जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्री परिषदेत विकसनशील राष्ट्रांशी संबंधित दोहा विकास कार्यक्रमांच्या चर्चेला सुरुवात झाली. यामध्ये शेती आणि सेवा क्षेत्रांसंबंधी सुरु झालेल्या वाटाघाटींचा समावेश करण्यात आला. विकसनशील देशांच्या आग्रहावरुन या चर्चेला सुरुवात झाली. विकसनशील देशांना करारच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी तसेच व्यापार आणि पर्यावरण या संबंधीच्या चर्चेला सुरुवात झाली.

गॅट हा जागतिक व्यापार संघटनेच्या वस्तूंच्या वापराचा मुख्य कायदेशीर आधार आहे. वस्तूंचा व्यापारगॅट करारातील तरतूदीप्रमाणे चालतो. उरुग्वे वाटाघाटींमध्ये सेवाक्षेत्र, बौध्दिक संपदा आणि तंटा निराकरणासंबंधी नवीन नियम केले गेले. या व्यवस्थेमध्ये विकसनशील राष्ट्रांच्या सोयीच्या दृष्टीने काही तरतूदी करण्यात आल्या आहेत, असा जागतिक व्यापार संघटनेचा दावा आहे. नव्या कराराप्रमाणे वस्तूंच्या व्यापारासंबंधीचे सर्व नियम आता सेवाक्षेत्रालाही लागू होणार आहेत. याचा फायदा परदेशात व्यवसाय करु इच्छिणाऱ्या बँका, विमा कंपन्या, दूरसंचार क्षेत्रातील कंपन्या, प्रवाशांसाठी सहलींचे आयोजन करणाऱ्या कंपन्या, हॉटेल्स इत्यादींना मिळेल. या नव्या तत्वांचा समावेश सेवा क्षेत्रासंबंधीच्या नव्या करारात करण्यात आला आहे. General Agreement on Trade in Services (GATS) हा करार बौध्दिक संपदेच्या रक्षणासाठी कलेले नियम कॉपीराईटस्, पेटंस्, ट्रेडमार्कस् इत्यादींच्या संरक्षणाचे मार्ग दाखवतो.

जागतिक व्यापार संघटनेची कार्ये :

१) जागतिक व्यापार संघटना केवळ मुक्त व्यापाराचेच समर्थन करते असे नाही. काही वेळेस व्यापारावर बंधने घालण्यासही सुचवते. उदा. पर्यावरण किंवा ग्राहक हित रक्षणाचा प्रश्न असल्यास.

२) जागतिक व्यापारी संघटना व्यापारी करार करण्यास मदत करते, वाद सोडवीते परंतु तिच्याकडे कोणतीही अतिमानवी ताकद नाही. ज्याचा उपयोग करुन ती कोणताही प्रश्न चुटकीत सोडवू शकेल.

३) आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत, न्यायमुक्त होण्यासाठी प्रयत्न करणे हे जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे साध्य करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना खालील कार्य करते.

   अ) करारांची अंमलबजावणी करणे.

   ब) वाटाघाटींसाठी राष्ट्रांना मंच उपलब्ध करुन देणे.

   क) व्यापारासंदर्भातील वाद सोडविणे.

   ड) राष्ट्रांच्या व्यापारी धोरणांचा आढावा घेणे.

इ) तांत्रिक मदत आणि प्रशिक्षण कार्यक्रम याद्वारे विकसनशील राष्ट्रांना व्यापारी धोरणांचा आखणीबाबत मदत करणे.

ई) इतर आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर कार्याचे परिक्षण.

जागतिक व्यापार संघटनेच्या कार्याचे परिक्षण :

ही संघटना विकसित देशांच्या बाजूला झुकलेली आहे असे म्हटले जाते त्यात तथ्य आहे. तसेच जागतिक व्यापार अजून खुला झालेला नाही आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारी करार करताना केवळ विकसित राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून विचार केला जातो. विकसनशील राष्ट्रांकडे असलेले तंत्रज्ञान मागास स्वरुपाचे आहे. त्याच्या आधारे विविध वस्तूंचे उत्पादन करताना पर्यावरणाची हानी होते. पण तेच तंत्रज्ञान वापरण्याशिवाय विकसनशील राष्ट्रांकडे दुसरा पर्याय नसतो. आधुनिक तंत्रज्ञान खर्चिक असते. त्याकरिता अधिक भांडवल गुंतवणूकीची व कौशल्याची आवश्यकता असते. ते भांडवल व ती कौशल्ये या राष्ट्रांकडे नाहीत. आंतरराष्ट्रीय व्यापार करताना पर्यावरणासंबंधीत निर्बंध घालून विकसनशील राष्ट्रांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न केले जातात असे निर्बंध घातल्यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे अवघड होऊन बसते. ही राष्ट्रे स्पर्धेतून आपोआपच बाद होतात. सध्याच्या अमेरिकेतील मंदीमुळे जागतिक व्यापारावत परिणाम झाला आहे. जागतिक व्यापार संघटनेने व्यापार आणखी खुला करण्याचा सल्ला दिला आहे. परंतु त्यामुळे नैसर्गिक संसाधनांवर अधिक ताण पडेल आणि त्याचा परिणाम म्हणजे पर्यावरणाची अधिक हानी होईल.

जागतिक व्यापारी संघटना ही केवळ युरोप आणि विकसित राष्ट्रांपुरतीच मर्यादित न राहता खऱ्या अर्थाने जागतिक व्हावयास हवी.

३.७ प्रकरणावरील महत्त्वाचे प्रश्न :

१) अ) जागतिक बँकेने अधिकृतरित्या स्विकारलेली उद्दिष्टे कोणती ?

ब) जागतिक बँक खा.ऊ.जा. चा प्रसार करते काय ? कशाप्रकारे ?

२) जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची रचना स्पष्ट करा.

३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी जागतिक व्यापार संघटना जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या तीन संघटनांनी केलेल्या प्रयत्नांचे टीकात्मक परीक्षण करा.

* * *

४

विकास आणि पर्यावरणाचे प्रश्न

४.१ प्रस्तावना
४.२ विकास या संकल्पनेबाबत
४.३ संयुक्त राष्ट्रे आणि विकास
४.३.१ सहस्त्रक विकास उद्दिष्टे
४.३.२ चिरंतन विकास
४.४ विकासाची प्रतिमाने
४.४.१ भांडवलवादी प्रतिमान
४.४.१.१ बाजार
४.४.१.२ अभिजात उदारमतवाद
४.४.१.३ आधुनिक उदारमतवाद
४.४.१.४ नवउदारमतवाद
४.४.१.५ समाजवादी प्रतिमान
४.४.२ मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान
४.४.३ गांधीवादी प्रतिमान
४.५ विकासाचे सिध्दांत
४.५.१ आधुनिकीकरणाचा सिध्दांत
४.५.२ अवलंबित्वाचा सिध्दांत
४.६ पर्यायी विकासाच्या चळवळी
४.६.१ ग्रामीण बँक
४.६.२ आसा, बांग्लादेश
४.६.३ राळेगण सिध्दी प्रकल्प
४.७ पर्यावरण संरक्षण चळवळी
४.७.१ ग्रीन पीस
४.७.२ फ्रेंडस् ऑफ अर्थ इंटरनॅशनल
४.७.३ नर्मदा बचाओ आंदोलन
४.८ प्रश्न

४.१ प्रस्तावना :

जागतिकीकरणाच्या संदर्भातच नव्हे तर १९ व्या व २० व्या शतकातही विकासाचा मुद्दा कायमच महत्त्वाचा राहिला आहे. किंबहुना मानवी संस्कृतीचा ऐतिहासिक वेध घेतल्यावर आपल्या असे लक्षात येते कि, उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांवर मानवाचा

विकास होत आलेला आहे. जागतिकीकरणाच्या संदर्भात मात्र नव्याने काही मुद्दे उपस्थित झाले आहेत आणि एकूणच विकास म्हणजे काय? त्याची आवश्यकता काय? त्याची प्रतिमाने कोणती असावीत? तसेच विकास आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध आहे का? असल्यास तो कोणत्या स्वरुपाचा आहे? त्याच्यात काही जैविक प्रक्रिया आहे का? यासारखे महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा वैचारिक धोरणांच्या पातळीवर होत असताना दिसते. अगदी थोडक्यात सांगायचे झाले तर सध्याच्या उदारमतवादी धोरणात भांडवलशाही मार्गाने विकास शक्य आहे असा मतप्रवाह प्रबळ दिसत असतानाच विकास हा पर्यायी मार्गानेही शक्य आहे असा मतप्रवाह जोरकसपणे पुढे येताना दिसतो आहे. या सर्वांचा उहापोह करण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

४.२ विकास या संकल्पनेबाबत :

सर्वप्रथम आपण "विकास" ही संकल्पना समजवून घेण्याचा प्रयत्न करु. विकास आणि वाढ या दोन्ही वेगवेगळ्या संकल्पना आहेत. वाढीपेक्षा विकास ही संकल्पना अधिक व्यापक आहे. वाढ म्हणजे मुख्यत: आर्थिक वाढ, राष्ट्रीय उत्पन्नासारख्या संख्याशास्त्रीय मापदंडाच्या आधारे ती मोजली जाते. या आकडेवारीच्या आधारे त्या राष्ट्राने किती जागृती केली आहे हे आपल्याला समजते. परंतु या प्रगतीमध्ये कोणाचा वाटा किती व त्या प्रगतीचा कोणाला फायदा झाला हे स्पष्ट होत नाही.

विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नव्हे विकास म्हणजे जीवनाचा दर्जा सुधारणे. सर्वांगिण विकास, "डेव्हलपमेंट ॲज फ्रिडम" या आपल्या पुस्तकात विकासासाठी आवश्यक असलेल्या पाच प्रकारच्या स्वांतत्र्याचा उल्लेख विख्यात अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी केलेला आहे. त्यामध्ये राजकीय स्वातंत्र्य आर्थिक साधने आणि सुविधांची उपलब्धता, सामाजिक संधी, पारदर्शक प्रशासन, सुरक्षित वातावरण या मुद्यांचा समावेश केला आहे. या सर्व घटकांमुळे माणसांची क्षमता वाढण्यास मदत होते. हे सर्व घटक परस्परपूरक आहेत. शासनाचे धोरण या सर्व घटकांचा विचार करुन ठरवले गेले पाहिजे. अमर्त्य सेन यांच्या मते एका बाजूला प्रचंड सुबत्ता, संपन्नता आणि पैशाची सूज दिसत असताना दुसऱ्या बाजूला दारिद्र्य, अत्याचार, दडपशाही आणि शोषण ही आहे. बहुसंख्य लोकांच्या प्राथमिक गरजाही भागत नाहीत. दुष्काळ आणि आवर्षण यामुळे अनेक समाज त्रस्त आहेत. पर्यावरणाला असलेला धोका वाढत आहे. खऱ्या अर्थाने विकास करायचा असल्यास हे प्रश्न प्रथम सोडवले पाहिजे.

४.३ संयुक्त राष्ट्रे आणि विकास :

संयुक्त राष्ट्रांनी मानवलक्षी विकासावर भर दिला आहे. त्यांच्या मते मानवलक्षी विकास म्हणजे माणसांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी योग्य वातावरणाची निर्मिती करणे, अशा वातावरणामुळे प्रगतीला वाव मिळतो आणि समाजाचा विकास साध्य होतो. आम जनतेला केंद मानून विकास साधला पाहिजे. मानवी विकास अहवालाची संकल्पना मकबूल-उल-हक या समाजशास्त्रज्ञाने मांडली. त्यांच्या मते ज्ञानाची उपलब्धता, पोषक

आहार, आरोग्यसेवा, गुन्हेगारी-हिंसाचार मुक्त समाज, व्यक्तिगत कारणांसाठी भरपूर वेळ असणे, सामूहिक जीवनातील सहभागीता, राजकीय आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य या सर्व गोष्टी आर्थिक वाढीपेक्षा अधिक महत्त्वाच्या असतात.

१९९० मध्ये पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ मकबुल-उल-हक, सर रिचर्ड जोली आणि गुस्ताव रानीस हे येल विद्यापीठातील प्राध्यापक तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे लॉर्ड मेघनाद देसाई यांनी मानवी विकास निर्देशांक विकसित केला. हा निर्देशांक तयारकरताना अमर्त्य सेन यांचेही विचार लक्षात घेण्यात आले. पुढील कारणांमुळे मानवलक्षी विकासाची संकल्पना मांडण्यात आली.

१) खुल्या अर्थव्यवस्थेमुळे व खुल्या बाजारपेठेमुळे आर्थिक विकासाचा प्रसार होऊन विकसित देशांबरोबर विकसनशील देशांचाही विकास होईल यावर कोणाचाही विश्वास राहिला नाही.

२) खुली अर्थव्यवस्था स्विकारताना जे रचनात्मक बदल करावे लागले त्यामुळे दुर्बल घटकांचे मोठे नुकसान झाले.

३) गुन्हेगारी, अशांतता, एडस्चा प्रसार हे प्रश्न जगभर अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहेत. आर्थिक वाढ होऊनही हे प्रश्न सुटत नाही हा सर्वांचाच अनुभव आहे.

४) १९९० नंतर जगभर लोकशाहीचा प्रसार वेगाने झाला. त्यामुळे विकासाच्या प्रश्नाकडे सर्वत्र नव्या दृष्टीकोनातून पाहिले जाऊ लागले.

४.३.१ सहस्त्रक विकास उद्दिष्टे :

नव्या शतकात प्रवेश करताना सप्टेंबर २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेत ही उद्दिष्टे स्विकारण्यात आली. २००५ पर्यंत ही उद्दिष्टे साध्य करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ही उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत -

१) परकोटीचे दारिद्र्य आणि भूक नष्ट करणे.

२) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करणे.

३) स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार आणि महिलांचे सबलीकरण.

४) बालमृत्युचे प्रमाण कमी करणे.

५) मातेचे आरोग्य सुधारणे.

६) एडस्, मलेरिया आणि इतर रोगांचा मुकाबला करणे.

७) पर्यावरण संवर्धन.

८) विकासासाठी जागतिक पातळीवर सहकार्याची भावना विकसित करणे.

त्या दिशेने आजपर्यंत काही प्रगती करण्यात आलेली आहे. परंतु प्रश्नांचे स्वरुपच इतके भयंकर आहे की एकूण परिस्थितीत फारसा फरक पडल्याचे दिसून येत नाही.

४.३.२ चिरंतन विकास :

ब्रन्डलॅण्ड कमिशनने पहिल्यांदा चिरंतन विकासाची संकल्पना मांडली. त्यांच्या मते या विकास प्रक्रियेत वर्तमानाबरोबरच भविष्यातील पिढ्यांच्या गरजा भागविण्याचा विचार केला जातो. सध्याच्या गरजा भागविताना भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर गदा येणार नाही याची काळजी घेतली जाते. संसाधने टिकवणे हा औद्योगिक समाजापुढचा मोठा प्रश्न आहे. औद्योगिकीकरणामुळे उत्पन्नाचा वेग वाढला. त्याबरोबर वस्तुंचा खपही वाढला. कारखाने, वाहने, विमाने, वातानुकूल यंत्रे, संगणक या सर्वांनी मोठ्या प्रमाणावर उर्जेची गरज असते. माणसाने एकूण वापरलेल्या उर्जेपैकी निम्मी उर्जा केवळ शंभर वर्षांमध्ये खर्ची पडली आहे असे ऑल्वीन टॉफलर आपल्या फ्युचर शॉक या पुस्तकात म्हणतात.

आज जगात सर्वत्र ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर कोळशाचा वापर करण्यात येतो. कोळशाचे साठे मर्यादित आहेत. त्याची पुन:निर्मिती करता येत नाही. पुढील काही दशकांमध्ये जगातील कोळशाचे साठे नष्ट होतील. हीच वस्तुस्थिती तेल आणि पाण्याच्या बाबतीतही लागू होते. उर्जेची ही संसाधने नष्ट झाल्यानंतर पर्यायी साधने कोणती असतील यासंबंधी सध्या जगभर विचार चालू आहे.

१९७२ नंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर चिरंतन विकासाचे प्रारुप विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. १९७२ मध्ये स्विडनमधील स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांतर्फे पर्यावरणसंबंधी चर्चा करण्यासाठी परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेच्या अहवालामध्ये खालील मुद्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे महत्त्वाचे विषय आहेत. त्यांचा माणसाच्या जगण्यासी आणि आर्थिक विकासाशी अतिशय जवळचा संबंध आहे. त्यामुळे तातडीने याबाबतीत पाऊले उचलली पाहिजेत, तशी सर्व जगातील जनतेची इच्छा आहे आणि ते सर्व शासनव्यवस्थांचे कर्तव्यही आहे. जगात आम जनता सर्वात महत्त्वाची आहे. तेच आपल्या कष्टाने समाजाची प्रगती करतात. संपत्ती निर्माण करतात. शास्त्र आणि तंत्रज्ञानाचा विकास करतात आणि मानवी पर्यावरणामध्ये बदल घडवून आणतात. शास्त्र आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे माणसाची पर्यावरणामध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता वाढत चालली आहे. ही परिषद सर्व शासनव्यवस्थांना आणि आमजनतेला सामुहिक प्रयत्नांनी पर्यावरणाचे संवर्धन करण्याचे आवाहन करते आहे. आपल्या आणि भावी पिढ्यांच्या आरोग्यासाठी हे करणे अत्यंत आवश्य आहे. या परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षणासाठी एक विशेष उपक्रमाची म्हणजेच संयुक्त राष्ट्र पर्यावरण उपक्रम (United Nations Environment Programme - UNEO) ची स्थापना करण्यात आली. पर्यावरण संरक्षण आणि चिरंतन विकासाच्या क्षेत्रात या संस्थेने आजवर बरेच योगदान दिले आहे. आधी उल्लेख केलेल्या ब्रँण्डलँड आयोगाने १९८७ साली अवर कॉमन फ्युचर या नावाचा अहवाल प्रसिध्द केला. त्या अहवालात पर्यावरण आणि विकासाच्या प्रश्नासंबंधी बरेच सखोल चिंतन करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षण आणि विकास दोन्ही गरजेचे आहे. दोन्हींमधील समतोल कसा साधायला हवा याचे मार्गदर्शन या अहवालात करण्यात आले

आहे. या अहवालातील संक्षिप्त परंतु प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

जगातील काही देश प्रंचड वेगाने साधनसंपत्तीचा वापर करीत आहेत. त्यांचा हा वेग असाच राहिला तर भविष्यातील पिढ्यांसाठी काहीच शिल्लक राहणार नाही. बहुसंख्य लोक संसाधनांचा फारच थोडा उपभोग घेतात. भूक, दारिद्र्य, रोगराई, आपत्कालीन मृत्यू या त्यांच्या नेहमीच्या समस्या आहेत. बऱ्याच वेळा विकासामुळे नैसर्गिक संसाधने नष्ट होतात. त्याचा परिणाम म्हणून आर्थिक खुंटतो. दारिद्र्य हे जगातील पर्यावरणाच्या प्रश्नांचे मुख्य कारण आणि परिणाम आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर असमानता, दारिद्र्य या मुलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन पर्यावरणाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे निरर्थक आहे. पर्यावरणाच्या प्रश्नांकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. नैसगिक संसाधनांचा आपण ज्या पध्दतीने वापर करीत आहोत त्या पध्दतीने लवकरच ही संसाधने नष्ट होतील. आज आपल्याला त्याचे फायदे मिळत असतील पण आपल्या मुलांना केवळ तोटेच दिसतील. आपण भविष्यातील पिढ्यांकडून नैसर्गिक संसाधनांच्या रुपात भांडवल उधार घेत आहोत पण ते परत करण्याची आपली इच्छा नाही. भविष्यातील पिढ्या याबद्दल सतत आपल्याला दोष देत राहतील.

या अहवालावर जगभर चर्चा झाली. त्याच्या परिणामस्वरुप १९९२ मध्ये ब्राझिलची राजधानी रिओ डी जानिरो येथे वसुंधरा शिखर परिषद (Earth Summit) संयुक्त राष्ट्र चिंतन विकास आयोगाची स्थापना ही या शिखर परिषदेची फलश्रुती होय. २००२ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे दुसरी वसुंधरा शिखर परिषद घेण्यात आली. २०१२ मध्ये पुन्हा ब्राझिलमध्ये तिसऱ्या वसुंधरा परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. एकंदरीत संयुक्त राष्ट्रसंघामध्ये "चिरंतन विकासाच्या" मुद्याला अनन्यसाधारण महत्व आले आहे.

४.४ विकासाची प्रतिमान (Models of Development) :

विकास कसा करावा याचे मार्गदर्शन करणारी काही प्रतिमाने आहेत. काही प्रतिमाने आदर्श आहेत. काही प्रतिमानांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचा आरोप केला जातो. तर काही प्रतिमानांवर समाजातील सर्व घटकांचा विचार केला गेला नसल्याचा आरोप होतो. काही चळवळी अस्तित्वात असलेली सर्व प्रतिमाने नाकारुन पर्याय शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशाच चार प्रतिमानांचा आपण थोडक्यात परिचय करुन घेणार आहोत.

४.४.१ भांडवलवादी प्रतिमान :

हे विकासाचे सर्वात जुने प्रतिमान आहे. माणसाच्या विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये हे प्रतिमान अस्तित्वात होते. प्रत्यक्ष व्यवहारातील वापरामधून विकसित झालेले ते एकमेव प्रतिमान आहे. माणसांमधील परस्पर आर्थिक संबंधातून ते विकसित झाले आणि नंतर पुढच्या टप्प्यावर सिध्दांत विकसित झाले हे सिध्दांत उदारमतवादी तत्वज्ञानाचे भाग झाले.

४.४.१.१ बाजार :

विकासाच्या भांडवली प्रतिमानामधील बाजार ही केंद्रीय संकल्पना आहे. या प्रतिमानामधील सर्व घटक बाजार या संकल्पनेभोवती फिरतात. बाजाराला स्वत:ची गती असते. मागणी आणि पुरवठ्याच्या समीकरणावर ती ठरते. बाजारातील प्रत्येक वस्तूंची किंमत खरेदी आणि विक्री करणाऱ्यांच्या संबंधातून ठरते. एखाद्या वस्तूची मागणी वाढली की किंमत वाढते. किंमत चांगली मिळू लागली आणि मागणी वाढत राहिली तर पुरवठाही वाढतो. पुरवठा वाढला की किंमती खाली येतात. पुरवठ्याचे प्रमाण तसेच राहिले तर मागणी कदाचित काही काळानंतर कमी होऊ शकते. कारण प्रत्येक गोष्टींची उपयुक्तता ठराविक काळानंतर कमी होत जाते. मग पुन्हा पुरवठा कमी होतो. हे चक्र असेच अविरतपणे चालू असते. जमीन, श्रम, भांडवल आणि उद्योजकता ही उत्पादनाची प्रमुख साधने आहेत. ज्यांच्याकडे उत्पादन साधनांची मालकी असते ते बाजारावर प्रभुत्व मिळवतात आणि त्या प्रभुत्वाच्या आधारे अंतिमत: अर्थव्यवस्थेवर नियंत्रण मिळवतात. स्पर्धा हे या प्रतिमानाचे मूलत्व असते. नफा कमविणे हे एकमेव उद्दिष्ट असते. उत्पादक, विक्रेते आणि खरेदीदार यांच्यामध्ये सर्व बाबतीत स्पर्धा असते. एकूण वातावरणच स्पर्धात्मक असते. आर्थिक ताकदीच्या प्रमाणात बाजारात पर्याय आणि संधी उपलब्ध असताता. जितकी ताकद अधिक तितके पर्याय अधिक असतात. बाजार डार्विनच्या निसर्गासंबंधीच्या नियमाप्रमाणे चालतो. जो सक्षम असेल तो टिकेल बाकीचे नष्ट होतील हा तो नियम आहे. हाच या व्यवस्थेमधील सर्वात मोठा धोका आहे. समाजातील दुर्बल घटकांना या व्यवस्थेत टिकून राहणे कठीण होऊन बसते.

४.४.१.२ अभिजात उदारमतवाद :

१७व्या शतकात जॉन लॉकने मांडलेल्या अभिजात उदारमतवादाने भांडवलशाहीला तात्विक चौकट पुरवली. लॉकने बाजारपेठेवर आधारित खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. शासनाने आर्थिक बाबतीत अहस्तक्षेपाचे धोरण स्विकारावे असे त्याचे मत होते. माणसांना काही नैसर्गिक हक्क असतात असे त्याचे मत आहे. हे नैसर्गिक हक्क शासनाने दिलेले नसल्यामुळे ते बदलण्याचा कोणताही हक्क त्यांना नसतो. भांडवलदारांनी आणि उद्योजकांनी त्याचे स्वागत केले. भांडवलदारांनी आर्थिक बळाच्या आधारावर राजकीय सत्ताही काबीज केली. आपल्याला हवे तसे कायदे करुन घेतले. १८व्या आणि १९व्या शतकात औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदारांचे बळ अधिक वाढले. यंत्रांच्या उपयोगामुळे उत्पादन प्रचंड वाढले. बाजारपेठांच्या विस्तारीकरणाची गरज निर्माण झाली. त्यातूनच साम्राज्यवादाला सुरुवात झाली. नव्या वसाहतींमध्ये भांडवलशाही पध्दतीने व्यवहार सुरु झाले.

४.४.१.३ आधुनिक उदारमतवाद :

१९व्या शतकात जॉन स्टुअर्ट मिलने अभिजात उदारमतवादामध्ये अनेक सुधारणा सुचविल्या. त्याच्या विचारांना आधुनिक उदारमतवाद म्हणतात. शासनाने आर्थिक बाबींमध्ये

हस्तक्षेप वाढवावा. कामगारांच्या हिताचे कायदे करावेत. भांडवलदारांच्या नफेबाजीवर नियंत्रण आणावे असे विचार त्याने मांडले. राज्याने कल्याणकारी कामे हाती घ्यावीत. समाजातील दुर्बल घटकांना मदत करावी आणि खऱ्या अर्थाने मुक्त व्यापारासाठी योग्य वातावरण निर्माण करावे अशी त्याची अपेक्षा होती.

४.४.१.४ नवउदारमतवाद :

२०व्या शतकात विशेषतः १९३० च्या दशकातील मंदीचे सावट दूर झाल्यावर भांडवलदारांनी आणि उदारमतवाद्यांनी जगभर आक्रमक नव-उदारमतवादी धोरणांचा पुरस्कार करण्यात सुरुवात केली.

१९८० च्या दशकात उत्तर अमेरिका आणि युरोपातील बहुतेक देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना सोडून दिली. नव उदारमतवादी धोरणांना माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीचा फायदा झाला. उत्पादनाचे तंत्र पूर्णतः बदलून गेले. प्रदूषण वाढवणारे आणि धोकादायक रासायनिक उद्योग तिसऱ्या जगातील देशात हलवले गेले. स्वतःच्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होणार नाही याची काळजी घेणारे प्रगत देश तिसऱ्या जगातील पर्यावरणाचा समतोल बिघडवू लागले. भांडवलवादी विकासाचे प्रतिमान केवळ भांडवलाला प्राधान्य देते. मानवी विकास आणि मानवलक्षी विकास या दोन्ही संकल्पनांना या प्रतिमानामध्ये फारसे स्थान नाही. पर्यावरण संरक्षणाचा विचार या प्रतिमानामध्ये फारसा केला जात नाही. भांडवलशाहीमध्ये बाजारातील मागणीनुसार निर्णय घेतले जातात. गरजूंच्या गरजांचा त्यामध्ये विचार केला जात नाही. विकासाचे अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहे. भांडवलशाहीचे विकासाचे प्रतिमान बहुसंख्यकांना मानवणारे नाही. या प्रतिमानामध्ये विकास अनियोजित, असमान आणि अन्याय पध्दतीने होतो. परंतु हे विकासाचे प्रतिमान मोठ्या प्रमाणावर स्विकारलेले आढळून येते.

४.४.१.५ समाजवादी प्रतिमान :

भांडवलवादावरील टीकेच्या स्वरुपात समाजवादी विचार १९व्या शतकात युरोपात विकसित झाला. कामगारांच्या हिताचे रक्षण हे या विचारसरणीचे मुख्य उद्दिष्ट आहे. कार्ल मार्क्सने समाजवादाला क्रांतीची दिशा दिली. लेनिनने १९४७ मध्ये रशियात या विचाराच्या आधारे साम्यवादी क्रांती घडवून आणली. त्यानंतर त्याने विकासाचे एक वेगळे प्रतिमान विकसित केले. तेच समाजवादी प्रतिमान होय. या प्रतिमानामध्ये नियोजनाला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले आहे. मार्क्सच्या तत्वज्ञानाप्रमाणे उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या मालकीची होती. भांडवलशाही व्यवस्थेप्रमाणे समाजात मालक आणि कामगार हे दोन परस्परविरोधी वर्ग नव्हते. केवळ एकच वर्ग आणि तो म्हणजे कामगार वर्ग. त्यामुळे वर्गसंघर्षाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. खाजगी संपत्ती बाळगण्याला परवानगी नव्हती. स्पर्धेला आणि नफेबाजीला स्थान नव्हते. आरोग्य, शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधा सर्वांसाठी मोफत होत्या. नागरिकांना कामाचा मूलभूत अधिकार देण्यात आला होता. सोव्हिएट युनियमध्ये वस्तूंच्या किंमतीचे नियमन केले जात होते. सुरुवातीच्या काही दशकात विकासाचे हे समाजवादी प्रतिमान यशस्वी ठरले. परंतु या प्रतिमानामध्ये काही मूलभूत स्वरुपाचे दोष होते. या प्रतिमानामध्ये व्यक्तीला खाजगी

संपत्ती जमा करण्याचा हक्क नसल्यामुळे काम करण्यासाठी आवश्यक ती प्रेरणा शिल्लक राहत नाही. खाजगी संपत्ती ही माणसाची उपजत भावना आहे. त्यापासून वंचित रहावे लागल्यामुळे माणसाचा काम करण्याचा उत्साह कमी होतो. त्यांची उत्पादनक्षमता घटते आणि त्याचा परिणाम राष्ट्राचे एकूण उत्पन्न घटण्यामध्ये होतो. १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचा अस्त झाल्यावर विकासाचे हे प्रतिमान मागे पडले.

४.४.२ मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान :

मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रतिमान लोकशाही समाजवादावर आधारित आहे. समाजवाद आणि भांडवलवाद यातील चांगली तत्वे एकत्र आणण्याचा प्रयत्न या प्रतिमानामध्ये करण्यात आला आहे. अर्थव्यवस्था ही संमिश्र असेल. पायाभूत सेवांची उभारणी तसेच अवजड उद्योग सरकारच्या मालकीचे असतील इतर सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले असतील. भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर या प्रतिमानाचा स्विकार केला. त्याचा योग्यतो फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला झाला. १९७० च्या दशकापर्यंत मिश्र अर्थव्यवस्थेचे हे प्रतिमान यशस्वी झाले. पण त्यानंतर या व्यवस्थेमध्ये काही दोष निर्माण झाले. नोकरशाहीचा ताठरपणा, भ्रष्टाचार, लोकांची उदासिनता या सर्व बाबींचा विकासावर विपरित परिणाम झाला. अनेक सरकारी उद्योग तोट्यात गेले. १९५० नंतर शासनाने नव-उदारमतवादी धोरणे अवलंबल्याला सुरुवात केली. आजही शासनाची धोरणे त्याच दिशेने आखली जात आहेत. आजपर्यंत अनेक सरकारी उद्योगांचे खाजगीकरण केले गेले आहे. मिश्र अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानाचा टप्प्या-टप्प्याने त्याग करण्यात येत आहे.

४.४.३ गांधीवादी प्रतिमान :

हे प्रतिमान इतर प्रतिमानांपेक्षा वेगळे असून इतर सर्व प्रतिमाने आर्थिक विकासाला प्राधान्य देतात. परंतु हे प्रतिमान व्यक्तीच्या नैतिक विकासाला अधिक महत्त्व देते. हे प्रतिमान आदर्श तत्वांवर आधारित आहे आणि त्यामुळे प्रत्यक्षात आणण्यास कठीण आहे. अहिंसेचे तत्व हे या प्रतिमानाचा मुख्य आधार आहे. त्यामुळे हे प्रतिमान बळाचा वापर करुन किंवा सक्ती करुन अंमलात आणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. साधेपणाने जगण्यावर गांधीजींचा भर होता. स्वयंपूर्ण खेडे हे गांधींच्या स्वराज्याचे म्हणजेच रामराज्याचे मुख्य घटक होते. या खेड्यातील नागरिक पातळीवरही समाधानी असतील तर ते खेडे स्वयंपूर्ण बनेल. या खेड्यातील नागरिक सभोवतालच्या पर्यावरणाशी जोडून घेतील त्यामुळे त्यांना बाहेरुन काही आयात करावे लागणार नाही व ते बाहेरच्या जगावर अवलंबून असणार नाहीत. ते स्वयंशिस्त पाळतील. त्यामुळे कायदा, पोलिस, न्यायालये या संस्थांची गरज शिल्लक राहणार नाही. महात्मा गांधींना खेड्यामध्ये राहणारा साधा समाज अपेक्षित होता. त्यांच्या विकासाच्या कल्पना पर्यावरणाच्या शोषणावर आधारित नव्हत्या. उलट भोवतालच्या निसर्गाला थोडाही धक्का न लावता, निसर्ग नियमांना अनुसरुन साधे, सरळ आयुष्य जगावे. कशाचीही हाव असू नये. कष्ट टाळण्याऐवजी अधिकाधिक कष्ट करण्याची प्रवृत्ती असावी, आराम आळस टाळावा असा त्यांचा आग्रह होता. गांधींनी खेड्यातील जीवनाचे

एक आदर्श चित्रच आपल्यापुढे उभे केले आहे. पंचायत राज्य व्यवस्था, समूह विकास योजना इत्यादीद्वारे सरकारने गांधीवादी तत्वे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला परंतु फारसे प्रामाणिक प्रयत्न झालेले नाहीत.

४.५ विकासाचे सिध्दांत :

अर्थव्यवस्था भविष्यात कशा विकसित होतील त्याचे अंदाज हे सिध्दांत आणि प्रतिमाने बांधतात. या सिध्दांताच्या आधारे विविध देशातील शासनव्यवस्था विकासाची धोरणे आखतात. मात्र प्रत्येक देशातील परिस्थिती वेगळी असते. त्याचप्रमाणे त्यांचे प्रश्नही वेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक सिध्दांत प्रत्येक देशाच्या परिस्थितीला पूर्णपणे लागू होईलच असे नाही. प्रत्येक देशाच्या संदर्भात सिध्दांताचे अर्थ तसेच परिणामकता बदलत जातात.

४.५.१ आधुनिकीकरणाचा सिध्दांत :

या सिध्दांतानुसार सध्याचे विकसनशील देश आजच्या विकसित देशांनी मागच्या शतकात विकसित होण्यासाठी वापरलेल्या मार्गाचे अनुकरण करुन आपला विकास करुन घेऊ शकतात. वॉल्ट रोस्तोव, ऑर्गन्स्की आणि सॅम्युएल हंटिग्टन या समाजशास्त्रज्ञांनी या सिध्दांताचा विकास केला. हंटिग्टनच्या मते विकास ही रेखीय म्हणजेच सरळ रेषेत घडत जाणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक देश विकासाच्या ठराविक अवस्थांमधून जात असतो. तंत्रज्ञान आणि शिक्षणाचा प्रसार यामुळे विकसनशील देशांमध्ये विकास घडून येईल. विकासाच्या प्रक्रियेत विकसनशील देशांना विकसित देशांची मदत घेणे अपरिहार्य असेल. विकसनशील देश लवकरच विकसित देशांइतकेच प्रगती करतील.

रोस्तोव या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ राज्यशास्त्रज्ञांच्या मते प्रगत राष्ट्रांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या स्वरुपात विकसनशीळ राष्ट्रांना मदत केल्यास हे देश समाजवादाच्या आहारी जाणार नाहीत. रोस्तोवच्या मताप्रमाणे विकसनशील देश विकासाच्या खालील टप्प्यांवरुन प्रगती करतील-

१) पारंपारिक समाज ही त्यांची पहिली अवस्था आहे. हे समाज या अवस्थेत मानवाने केलेल्या शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीबद्दल पूर्णतः अनभिज्ञ असतील.

२) दुसऱ्या अवस्थेत विकासाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. लोक ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतात.

३) तिसऱ्या अवस्थेत आर्थिक विकासाला सुरुवात झालेली असते. पारंपारिक मूल्यांपेक्षा आर्थिक प्रक्रिया अधिक महत्त्वाची ठरते. ही अवस्था विकसनशील देशाला साधारण दहा ते पंधरा वर्षात गाठता येईल.

४) पुढील पन्नास ते शंभर वर्षांमध्ये ही व्यवस्था अधिकाधिक प्रगल्प होत जाते. त्यानंतर हा समाज पूर्णतः विकसित झाला आहे असे म्हणता येते.

४.५.२ अवलंबित्वाचा सिध्दांत :

हा सिध्दांत म्हणजे आधुनिकीकरणाच्या सिध्दांतावरील टीका आहे. हा सिध्दांत आधुनिकीकरणाचा सिध्दांत नाकारतो. हा सिध्दांत १९६० च्या दशकात दक्षिण अमेरिकेतील विकसनशील देशातील समाजशास्त्रज्ञांनी मांडला. हा सिध्दांत विकसनशील देश भांडवल आणि तंत्रज्ञानासाठी विकसित देशांवर अवलंबून असल्याने त्यांचा विकास खुंटला असे सांगतो. हे मत स्पष्ट करण्यासाठी त्यांनी केंद्र (Center) आणि परिघाच्या (Periphery) संकल्पना मांडल्या आहेत. विकसित देश हे व्यवस्थेच्या केंद्रस्तानी असतात आणि विकसनशील देशांचे शोषण करतात. विकसित देश भांडवल आणि तंत्रज्ञान देताना काही अटी घालतात. काही आर्थिक सवलती घेतात. त्याचा विपरित परिणाम विकसनशील देशांना भोगावा लागतो. यासाठी जागतिक व्यवस्थेतच मूलभूत स्वरुपाचे बदल केल्याशिवाय ही परिस्थिती सुधारणार नाही, असे हा सिध्दांत मांडणाऱ्यांचे म्हणणे आहे.

४.६ पर्यायी विकासाच्या चळवळी :

प्रकरणाच्या या आधीच्या भागात आपण विकासाच्या महत्त्वाच्या प्रतिमानांचा आढावा घेतला आहे. ही प्रतिमाने समाजातील समस्यांचा त्यांच्या पध्दतीने विचार करतात. प्रगतीच्या आणि विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये त्यांच्या दुर्बलतेमुळे काही घटक समाविष्ट होऊ शकत नाहीत. ते परिघावरच राहतात. खुल्या बाजारातील स्पर्धेत ते सामील होऊ शकत नाही. कधी-कधी शासनालाही त्यांच्यापर्यंत पोहोचणे शक्य नसते. या मागास गटांशिवाय काही प्रादेशिक विभाग मागासलेले असतात. या सर्व गटांकडे आणि विभागांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते. संपूर्ण जगभरात काही व्यक्ती आणि संस्था चिकटीने हे कार्य करीत आहेत. त्यांनी आपल्या कामाच्या अनुभवातून या गटांच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन विकासाची काही विशेष प्रतिमाने विकसित केली आहेत. पुढील भागात आपण यापैकी काही गटांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

४.६.१ ग्रामीण बँक :

पर्यायी विकासाच्या चळवळीत ग्रामीण बँकेचे स्थान फार महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्राचे प्राध्यापक असणाऱ्या मोहम्मद युनुस यांनी ग्रामीण बँकेची स्थापना केली. ग्रामीण भागातील दारिद्र्य नष्ट करणे हे या बँकेचे उद्दिष्ट होते. त्यासाठी त्यांनी ग्रामीण भागातील गरीब लोकांना कर्जे देण्याचा कार्यक्रम राबवायला सुरुवात केली. १९८३ साली ग्रामीण भागातील गरीबांना विशेषत: महिलांना कर्जे देणारी बँक म्हणून ओळखली जाऊ लागली. जुलै २००५ पर्यंत बँकेने ५० लाख गरजूंना ५ अब्ज डॉलर्सचे कर्ज दिले. त्यापैकी ९६ टक्के महिला होत्या आणि ९९ टक्के कर्जाची परतफेड झाली. गरीब लोकांमध्ये अगदी खालच्या पातळीवर असणाऱ्या भिकाऱ्यांसाठी बँकेने एक विशेष कार्यक्रम राबवायचे ठरवले. कर्ज मिळणे हा मानवी हक्क आहे असे बँक मानते. भिकाऱ्यांसाठीच्या उपक्रमाची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. बँकेचे साधारण नियम या उपक्रमाला लागू

होत नाहीत. भिकाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास आणि सन्मान वाढावा यासाठी बँक प्रयत्न करते. भिकाऱ्यांना ब्लँकेटस्, लोकरीच्या शाली, मच्छरदाण्या आणि छत्र्या कर्जाऊ दिल्या जातात. या कर्जावरही व्याज आकारले जात नाही. बँक भिकाऱ्यांना भीक मागणे सोडून देण्याची सक्ती करत नाही. परंतु बऱ्याच सदस्यांनी आपणहून भीक मागणे बंद केले आहे.

४.६.२ आसा, बांग्लादेश :

१९७८ मध्ये बांग्लादेशात आसाची स्थापना करण्यात आली. सध्या ती जागातील सर्वात मोठी आणि कार्यक्षम सूक्ष्मवित्तीय संस्था म्हणून कार्यरत आहे. दारिद्र्य निवारण हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. सुरुवातीला त्यांनी सामाजिक कार्यासाठी जाणीवजागृतीचे अनेक कार्यक्रम हाती घेतले. १९८० च्या दशकात त्यांनी आरोग्य, सांडपाणी व्यवस्थापन आणि शिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करण्यास सुरुवात केली. त्याचवेळेस त्यांनी छोट्या रक्कमेची कर्जे गरजूंना देण्यास सुरुवात केली. जून २००८ पर्यंत बांग्लादेशात आसाच्या ३३२४ शाखांमधून २५,१२५ कर्मचारी काम करीत होते. त्यांनी ७२,२०४ खेड्यांमधून लाखोंहून अधिक गरजूंना मदत पुरवली होती. आंतरराष्ट्रीय संस्थांनंतर काही भारतीय संस्थांची माहिती आपण यापुढे करुन घेणार आहोत.

४.६.३ राळेगण सिध्दी प्रकल्प :

महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यातील राळेगण सिध्दी हे एक दुष्काळग्रस्त गाव. या गावात अण्णा हजारेंना आपल्या परिश्रमाने आणि वेगळा विचार करण्याच्या क्षमतेच्या आधारे मोठा बदल घडवून आणला. पावसाचे पाणी अडवणे आणि जिरवणे हा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. त्यासाठी पाझर तलाव खणण्यात आले. त्याचप्रमाणे छोटे बंधारे बांधण्यात आले. वृक्ष लागवडीचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या सर्व उपायांमुळे भूभार्गातील पाण्याची पातळी वाढली तसेच पावसाचे प्रमाणही वाढले. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढले. संपन्नतेमुळे लोकांमधले संबंध सुधारले. यानंतर अण्णांनी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा विचार सुरु केला. अनेक घरांमध्ये बायोगॅसची सयंत्रे उभी करण्यात आली. या वायूच्या वापरामुळे स्त्रीयांचा जळण शोधण्याचा त्रास संपला. या गावात सौरउर्जेच्या वापराला सुरुवात झाली. ग्रामपंचायतीमध्ये स्त्रीयांना एकमताने निवडून देण्यात आले. त्यांनी पंचायतीमध्ये बसून गावाच्या विकासासंबंधीचे निर्णय घेण्यास सुरुवात केली. गावकऱ्यांनी स्वच्छेने हुंडाबंदी आणि दारुबंदी घडवून आणली. गावकऱ्यांनी आपआपसातील भांडणे सामोपचाराने सोडविण्यासाठी एक सर्वमान्य यंत्रणा उभारली.

४.७ पर्यावरण संरक्षण चळवळी :

विकासाच्या नावाखाली माणसे पर्यावरणाचा ऱ्हास कशा पध्दतीने करतात हे आपण पाहिले आहे. पर्यावरणासाठी धोकादायक ठरणाऱ्या अनेक गोष्टी मानवजात करीत असते. अशा धोकादायक कृतींपासून निसर्गाचे रक्षण करणे आणि पर्यावरणाचा दर्जा सुधारणे

यासाठी या चळवळी कार्य करतात. आधुनिक पर्यावरणवादी चळवळींची सुरुवात १९६० च्या आसपास युरोपमध्ये झाली. वायुप्रदुषणामुळे युरोपातील काही देशात आम्लयुक्त पाऊस पडला आणि पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला. या सगळ्यामुळे विकसनशील जगतात सामान्य नागरिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या संघटना उभ्या राहिल्या. १९६० आणि १९७० च्या दशकातील पर्यावरणवादी चळवळीचा सूर मुख्यतः निराशावादी होता. त्यांनी पर्यावरणाच्या हानीसाठी त्यावेळच्या व्यवस्थेला दोषी धरले. तसेच कीटकनाशकाच्या अतिरेकी वापरामुळे पक्षी इतर प्राणी आणि माणसे मारली जात आहेत, असा त्यांचा दावा होता. १९७० च्या दशकात पर्यावरणवाद्यांनी पर्यायी ऊर्जा स्त्रोत, आर्थिक आणि सामाजिक नियोजनाचे विकेंद्रीकरण, प्रमुख औद्योगिक क्षेत्रांची फेररचना, शेतीमधील बदल या मुद्यांची चर्चा केली. पुन्हा वापरात येणाऱ्या अक्षय ऊर्जा साधनांचा वापरावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामध्ये सौरऊर्जा, वाऱ्यापासून वीजनिर्मिती यांचा समावेश होता. प्लास्टिकला आणि रासायनिक खतांना विरोध सुरु झाला. खाजगी वाहनांच्या ऐवजी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर अधिक झाला पाहिजे. ऊर्जेचा अधिक चांगला वापर झाला पाहिजे यावर या चळवळी भर देऊ लागल्या. अनेक स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्ष या चळवळीमध्ये उतरले. लोकशाही, सामाजिक न्याय, पर्यावरण, अहिंसा या मुद्यांना या चळवळींनी महत्व दिले.

विकसनशील देशांमध्ये दारिद्र्य, लोकशाहीचा प्रसार, राजकीय आणि मानवी हक्क स्थानिकांचे आणि देशातील मूळ रहिवाशांचे हक्क हे मुद्दे पर्यावरणवाद्यांनी उचलून धरले. तर पश्चिमेकडील विकसित देशांमध्ये पर्यावरणवदी चळवळीत प्रामुख्याने तेथील मध्यमवर्गीय लोकांनी भाग घेतला. शासनाची धोरणे बदलण्याचा प्रयत्न करणे, पर्यावरणवादी मूल्यांचा प्रसार करणे यावर या चळवळींचा मुख्य भर होता.

१९७० च्या दशकात पर्यावरणवादी राजकीय पक्ष उदयास आले. पर्यावरण रक्षणाच्या मुद्यांना राजकीय स्वरुपद देऊन शासन आणि राज्ययंत्रणेला पर्यावरणाच्या प्रश्नांसंबंधी अधिक संवेदनशील, पारदर्शी आणि जबाबदार बनविण्याचा प्रयत्न केला.

पर्यावरणवादी पक्षांमध्ये जर्मनीत स्थापन झालेला ग्रीन पार्टी हा पक्ष आजवरचा सर्वात यशस्वी पर्यावरणवादी पक्ष आहे. १९८० साली स्थापन झालेल्या या पक्षाने १९९८ पर्यंत सत्तेत जाण्याइतपत मजल मारली. भारतात तसेच जागतिक पातळीवर ग्रीन पीस, फ्रेंडस् ऑफ अर्थ इंटरनॅशनल आणि वर्ल्ड वाईल्ड लाइफ फंड यासारख्या संस्थांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला दबदबा निर्माण केला. या चळवळींना समजून घेण्यासाठी पुढील तीन चळवळींची आपण चर्चा करणार आहोत.

१) ग्रीन पीस, २) फ्रेंडस् ऑफ अर्थ इंटरनॅशनल, ३) नर्मदा बचाव आंदोलन.

४.७.१ ग्रीन पीस:

नेदरलँडस् येथे १९७१ साली स्थापन झालेली पर्यावरणवादी संस्था आहे. ग्रीन पीसच्या संस्थापकाच्या मते जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय समाजाचे पर्यावरणविषयक वर्तन आणि दृष्टिकोन बदलणे, पर्यावरणाचे रक्षण आणि शांततेचा प्रसार करणे हे ग्रीन

पीसचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टांच्या अनुषंगाने ही संघटना पुढील मुद्यांवर भर देते.

१. जलप्रदूषणापासून सागराचे रक्षण.

२. जगभरातील प्राचीन जंगलांचे रक्षण.

३. शांततेसाठी आणि नि:शस्त्रकरणासाठी चळवळी उभारणे.

४. अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांच्या वापराला प्रोत्साहन देणे.

५. चिरंतन स्वरुपाच्या शेतीसाठी प्रयत्न करणे.

६. प्रदूषणापासून मुक्त अशा जगाची निर्मिती.

ग्रीन पीसने ज्या अनेक चळवळी चालवून यशस्वी केली आहेत त्यात अमचिक्ता बेटावरची चळवळ महत्त्वाची आहे. अमेरिकन सरकारने बेटावर अणुचाचण्या घ्यायचे ठरवले होते. परंतु या बेटावरच्या विविध दुर्मिळ प्रजातींचा जीव धोक्यात येणार होता त्यामुळे ग्रीन पीसने या अणू चाचण्यांना विरोध केला. प्रदीर्घ काळ चिकाटीने लढा दिल्यावर अमेरिकेने माघार घेतली आणि अमचिक्ता बेट हे पक्षी अभयारण्य घोषित केले. जे पर्यावरणाचे शत्रू ते आमचे शत्रू आणि जे पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करतील ते आमचे मित्र हे ग्रीन पीसचे सर्वसाधारण धोरण आहे.

४.७.२ फ्रेंडस् ऑफ अर्थ इंटरनॅशनल :

अमेरिका, इंग्लंड, स्वीडन आणि फ्रान्समधील चार संघटनांनी एकत्र येऊन फ्रेंडस् ऑफ अर्थ इंटरनॅशनलची स्थापना केली. आज ५००० छोट्या संघटना त्याच्याशी संलग्न आहेत. त्यांचा जागतिकीकरणास विरोध असून विकासाचे भांडवली प्रतिमान ते नाकारतात. या संघटनेची अंतर्गत रचना लोकशाहीवर आधारित आहे. त्यामुळे सर्वसंमतीने निर्णय घेण्यावर त्यांचा भर असतो. पर्यावरण संरक्षणाला महत्व देण्याचा आणि न्याय समाजाची उभारणी करण्याचा त्याचा मानस आहे.

४.७.३ नर्मदा बचाव आंदोलन :

गुजरातमधील सरदार सरोवर प्रकल्पाला विरोध करण्यासाठी मेघा पाटकर यांनी १९८५ साली या संघटनेची स्थापना केली. गुजरातमध्ये नर्मदेवर धरण बांधल्यामुळे अनेक गावे विस्थापित होणार होती. या लोकांचे पुनर्वसन कसे करणार ही त्यांच्यापुढची प्रमुख समस्या होती. तसेच पर्यावरणाचे होणारे नुकसान कसे भरुन काढणार याविषयी त्यांनी सरकारकडे विधारणा केली. सरकारने योग्य उत्तरे दिली नाहीत तर धरणाचे काम करु दिले जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. मोठी धरणे, आदिवासींचे जीवन, त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने. त्या साधनांची केली जाणारी लूट, शेती आणि उद्योगांमधील दरी, खेडे आणि शहरातील भेदभाव, भांडवलवादाल पोषक अशी उद्दिष्टे तसेच सामाजिक न्याय आणि पर्यावरणाला पोषक अशी विकासाची दृष्टी याबाबत नर्मदा

बचाव आंदोलनाची स्वत:ची मते आहेत आणि ती मते त्यांनी अनुभवाच्या आधारे ठरवली आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. नर्मदा बचाव आंदोलनांचे असे म्हणणे आहे कि, हे धरण स्थानिक आदिवासींसाठी विनाशकारी ठरणार आहे. त्यांच्या मते, सरकारने विस्थापितांचे पुनर्वसन करण्याच्या योजनाही योग्य पध्दतीने आखलेल्या नाहीत. सरकारच्या या धोरभांविरुध्द आंदोलकांनी सर्वोच्च न्यायालयाकडेही धाव घेतली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल सरकारच्या बाजूने लागला असून या प्रकल्पाला विरोध आता त्यांना करता येणार नाही. त्यामुळे पुनर्वसनाच्या आणि पर्यावरण रक्षण आणि संवर्धनाच्या विविध मुद्यांवर त्यांना लक्ष केंद्रित करावे लागेल.

४.८ प्रश्न :

प्र.१. (अ) विकासाची प्रचलित संकल्पना कोणती ?

(ब) पर्यायी विकासाची संकल्पना प्रचलित संकल्पनेपेक्षा वेगळी कशी आहे याची चर्चा करा.

प्र. २. विकासाच्या तीन महत्त्वाच्या प्रतिमानांची चर्चा करा.

प्र. ३. पर्यायी विकासाच्या प्रतिमानांचा गाभा स्पष्ट करा.

प्र. ४. चिरंतन विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ५. टीपा लिहा.

(अ) मानवी विकास निर्देशांक.

(ब) विकासाचे आधुनिक आणि परावलंबित्ववादी सिध्दांत.

(क) पर्यावरणवाद.

* * *

५

मानवी हक्क

घटक रचना

५.१ मानवी हक्कांचा उदय - A
५.२ मानवी हक्कांचा अर्थ
५.३ मानवी हक्कांचे स्वरुप
५.४ उत्क्रांतीतील महत्त्वाचे टप्पे
५.५ मानवी हक्कांचा विकास - B

५.१ मानवी हक्कांचा उदय - A :

मानवी हक्कांचा उल्लेख मानवाधिकार असाही कधी-कधी केला जातो. मानवी हक्क ही संकल्पना अगदी प्राचीन काळापासून समाजात अस्तित्वात होती असे लक्षात येते. माणूस हा अगदी प्राचीन काळापासून आपल्या सुखासाठी धडपडत आलेला आहे, म्हणूनच मानवी हक्कांची संकल्पना ही सामान्य माणसाच्या सुखासाठी जोडली गेलेली आहे.

मानवी हक्कांचा अर्थ आज जो प्रचलित आहे त्याचा उच्चार सर्वप्रथम इंग्लंडमध्ये १३ व्या शतकात केला गेला. "राजा जॉन" याने तत्कालीन प्रथा, परंपरा, नियम, संकेत चालीरिती धुडकावून लावल्या. जनतेवर झालेला हा फार मोठा अन्याय होता, म्हणून आपल्या हक्कांसाठी धडपडणाऱ्या जनतेने राजाला मॅग्नाकार्टावर सही करावयास लावली.

युरोपखंडामध्ये प्रबोधनाच्या काळात अनेक विचारवंतांनी मानवी हक्कांसंबंधी विचार मांडल्याचे दिसून येतात. त्यामध्ये "थॉमस पेन, जॉनलॉक जे. एस. मिल" इत्यादी विचारवंतांचा करता येईल. या विचारवंतांनी आपल्या परीने या संकल्पनेची मांडणी करुन विकसित प्रयत्न केला. कोणी या संकल्पनेस नैसर्गिक हक्क म्हटले तर कोणी जीवन जगण्यास (सुव्यवस्थित) आवश्यक असलेली परिस्थिती म्हटले. काही अभ्यासकांच्या मते "मानवी हक्क" या संकल्पनेचा उल्लेख. पाश्चिमात्य विचारवंत "हेन्री डेव्हिड थारो" या विचारवंताने आपल्या सुप्रसिध्द "डिसओबिडीयन" या ग्रंथात स्पष्ट केलेला आहे आणि त्यावेळेपासून "मानवी हक्क" ही संकल्पना जागतिक स्तरावर प्रचलित झालेली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

वास्तविक पाहता मानवी अधिकार किंवा हक्क ही संकल्पना अनेक वर्षाहून अधिक काळात अनेक प्रकारचे बदल होऊन अस्तित्वात आलेली आहे. ही संकल्पना अस्तित्वात येण्यामध्ये अनेक-अनेक विचारवंतांचे मोठे योगदान आहे. ऐतिहासिक घटकांना प्रभावित झालेल्या अनेक महत्त्वाच्या अशा घटनांनी सुध्दा एक संकल्पना म्हणून मानवीहक्कावर आपला ठसा उमटविला आहे. व्यक्तीच्या हक्कांच्या संदर्भात कायद्याची संहीता निर्माण

करण्याऱ्यांपैकी एक उदाहरण म्हणून "हम्मुराबी"ची लिखित संहिता ही होय. ही संहिता जनतेची जुलमी छळापासून आणि शिक्षांपासून संरक्षण करणारी अशी होती. पूर्वीच्या काळी मानवी हक्क हे नैसर्गिक हक्कांना समानार्थक स्वरुपात मानले जात असतं. ते हक्क, जे नैसर्गिक नियमांमधून अंकुरित झाले होते.

आज अस्तित्वात आलेली मानवी हक्कांची संकल्पना ही अनेक विचारवंतांच्या तत्वज्ञानातून योगदानातून आलेली आहे.

५.२ मानवी हक्कांचा अर्थ :

मानवी हक्क संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी प्रथम हक्क म्हणजे काय? हे लक्षात घेणे गरजेचे आहे म्हणून हक्क म्हणजे - ज्याच्याशिवाय मानवाला आपला विकास करुन घेणे शक्य होणार नाही. अशा परिस्थितीला हक्क म्हणता येईल. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल कि, जर हक्क नसतील तर मानवला प्रगती करता येणार नाही. "हक्कहीन जीवन हे निरर्थक असते" ज्या व्यक्तीला हक्क मिळत नाहीत त्या व्यक्तीवर अन्याय होतो.

म्हणून समाजाने (पीडित लोकाने) पाठिंबा दिलेल्या मागणीला मान्यता देणे शासनात भाग पडते. कोणतेही राज्य व्यक्तीला हक्काची निर्मिती करीत नसते. तर राज्य हे हक्कांना मान्यता प्रदान करीत असते. राज्याचा कायदा हक्कांची निर्मिती करीत नसून तो व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करतो, असे आधुनिक विचारवंत हेरॉल्ड लास्की यांनी म्हटलेले आहे.

व्यक्तीला माणूस म्हणून जगण्यासाठी निसर्गाने काही हक्क दिलेले आहेत. यामुळे प्रामुख्याने जीविताचा हक्क, संपत्तीचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, संरक्षणाचा हक्क, कुटुंबाचा हक्क, निवाऱ्याचा हक्क, विवाहाचा हक्क, भाषणाचा हक्क इत्यादी उल्लेख करता येऊ शकेल म्हणूनच "प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे आणि तो हक्क प्रत्येकाला मिळायलाच हवा", याची स्पष्ट जाणीव संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांचा सनदेत करुन देण्यात आलेली आहे. अलिकडच्या काळात गर्भजल परिक्षण करुन स्त्रीलिंग गर्भाची हत्या करणे हे मानवी हक्कांच्या विरुध्द समजले गेलेले आहे. हक्क आणि स्वातंत्र्य या संदर्भात स्त्री आणि पुरुष समान मानले गेलेले आहोत.

थोडक्यात मानवी हक्कांची सनद तयार करताना संयुक्त राष्ट्रांनी कोणताही ठराविक गट किंवा ठराविक समाज अथवा देश नजरेपुढे ठेवलेला नाही. हे मानवी हक्कांच्या व्याख्येतूनही स्पष्ट होते.

मानवी हक्कांच्या व्याख्या :

१. मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ प्रमाणे "मानवी हक्क म्हणजे व्यक्तीचे जीवनस्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा, या संबंधीचे तसेच राज्य घटनेने हमी दिलेले अथवा आंतरराष्ट्रीय करारात समाविष्ट केलेले तसेच न्यायालयांना अंमलबजावणी करता येतील असे हक्क होय."

२. "सर्व मानवांना म्हणजे स्त्री, पुरुषांना वंश, रंग, लिंग, भाषा, प्रांत, धर्म, राजकीय मत, देश, जन्म सम्पती, दर्जा अशा कोणत्याही भेदभावशिवाय असलेले आणि

समानतेवर आधारलेले मूलभूत वा जीवनावश्यक असे अधिकार आणि स्वातंत्र्य म्हणजे मानवाधिकार होय."

३. "जगातील प्रत्येक मानवाला तो केवळ मानवी कुटुंबाचा सदस्यच आहे. एवढ्या एकाच कारणाने जे हक्क मिळायलाच पाहिजेत अशा हक्कांना मानवी हक्क असे म्हणतात."

५.३ मानवी हक्कांचे स्वरुप :

सुरुवातीला मानवी हक्कांचे स्वरुप अमूर्त आणि पुस्तकी स्वरुपाचे होते. जागतिक व्यवहारांमध्ये व राजकारणात मानवी हक्कांची संकल्पना अलिकडील काळामध्ये हळूहळू मान्य होऊ लागलेली आहे. जगातील विविध देशांतील विचारवंतांनी आणि राजकीय नेत्यांनी मानवी हक्कांचे समर्थन केलेले असून संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांची सनद १० डिसेंबर, १९४८ रोजी जाहीर केलेली आहे. जगातील जनमतामुळे बहुसंख्य सदस्य देशांनी मानवी हक्कांच्या सनदेवर सह्या केल्या. त्यानंतरही मानवी हक्काबदल संयुक्त राष्ट्र संघटनेने विविध ठराव मंजूर केलेले आहेत. बदलत्या काळानुसार मानवी हक्कांच्या विचाराचे स्वरुप बदलत गेलेले आहे. एकूण सारासार विचार करता मानवी हक्कांचे स्वरुप साकार करण्यासाठी पुढील मुद्यांचा विचार करावा लागेल.

१) समाजप्रधानता :

मानवी हक्क हे केवळ एका व्यक्तीपुरते अथवा एखाद्या गटापुरते मर्यादित नाहीत तर ते हक्क जगातील संपूर्ण समाजाशी संबंधित आहेत. कोणत्याही व्यक्तीने आपले हक्क उपभोगत असताना इतरांच्याही हक्कांची जाणीव ठेवली पाहिजे. इतरांच्या हक्कात आपला हस्तक्षेप होणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे याचाही समावेश मानवी हक्कांच्या सनदेत करण्यात आलेला आहे.

२) सार्वत्रिकता :

मानवी हक्काची सनद तयार करताना कोणताही एक व्यक्ती अथवा एक गट एक देश नजरेपुढे न ठेवता ही सनद जगातील अविकसित विकसनशील तसेच विकसित देशातील प्रत्येक व्यक्तीला उपभोगता येतील असेच आहेत.

३) मानवी हक्क सर्वकालीन आहेत :

मानवी हक्कांचे स्वरुप हे सर्वकालीन आहे म्हणजे याचा अर्थ पूर्वीच्या काळी, सद्य परिस्थितीत व भावी काळातही लोकात माणूस म्हणून जगता यावे असे या हक्काचे स्वरुप आहे म्हणून मानवी हक्कांना "इतिहासाचा संदर्भ सोडून मांडलेली संकल्पना" असे म्हणता येईल.

४) मानवी हक्क वृध्दिंगत होतात :

मानवी हक्कांमध्ये सतत वाढ होत असते कारण, प्रत्येक व्यक्ती ही मानवी हक्कांचे उगमस्थान आहे. हे हक्क व्यक्तीच्या नैतिक व्यक्तिमत्वातून निर्माण होतात. व्यक्ती जगात जेथे जाईल तेथे हे हक्क तिच्याबरोबर जातात.

५) कायदेशीर स्वरुप :

मानवी हक्कांचे स्वरुप वर्तमान काळात केवळ पुस्तकी, दार्शनिक, नैतिक आणि अमूर्त राहिलेले नसून जगातील सर्व मानव जातींनी या हक्कांना मान्यता दिलेली आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन झाले तर त्याची दखल घेण्याचे काम संबंधित देशातील शासन संख्येप्रमाणे काही निमशासकीय तसेच अशासकीय संस्थासुध्दा करत आहेत. उदा. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग. अमेस्टी इंटरनॅशनल इत्यादी एकूण विचार करता जागतिक स्तरावर विविध संघटनांच्या आणि विशेष करुन संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नांमुळे मानवी हक्कांना कायदेशीर स्वरुप प्राप्त होत आहे.

मानवी हक्कांच्या स्वरुपाची चर्चा करीत असताना ते हक्क समाजप्रधान आहेत असे आपण पाहिलेले आहे. परंतु व्यक्ती व संपूर्ण समाज यांच्या कल्याणाकरीता मानवी हक्कांचे रक्षण होणे आवश्यक आहे असे वाटते.

मानवी हक्कांचे रक्षण झाले पाहिजे कारण -

१) हक्क हे सन्माने जीवण जगण्याचे धैर्य आहेत :

माणूस हा जनावराप्रमाणे जीवन जगत नाही. तर तो समाजात सन्मानाचे जीवन अपेक्षित करतो. आपल्या क्षमते व आवडीप्रमाणे तो काम करण्याचा (मिळवण्याचा) प्रयत्न करतो कारण, कामाशिवाय प्रतिष्ठेने जीवन जगता येणार नाही. हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

समाजात काही लोक सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत. उदा. भारतात अनुसूचित जाती, जमाती, इतर दुर्बल घटक आहेत. या सर्वांना बरोबर घेण्यासाठी हक्कांची गरज असते.

२) न्यायिक संरक्षण :

न्यायिक संरक्षणाच्या हक्कामुळे अगदी तुरुंगात असणारा कैदीसुध्दा संरक्षण मागू शकतो. ते एक माणूस म्हणून कोणत्याही व्यक्तीला लहरीनुसार (पोलिसांच्या) अटक झाली असेल तर त्याला संरक्षण मिळणे गरजेचे आहे.

३) अभिव्यक्ती स्वातंत्र्य :

प्रत्येक व्यक्तीला भाषण अथवा लेखणीद्वारे आपले मत, विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. आपला हेतू पूर्ण करण्याकरिता समाजमान्य आणि शासनमान्य मार्गाने एकत्र येऊन संघटना स्थापन करता यावी. तसेच कायदेशीर मार्गाने प्रतिकार, विरोध करता आला पाहिजे.

वरील कारणामुळे हक्कांचे रक्षण होणे गरजेचे आहे.

मानवी हक्कांचे महत्त्व :

व्यक्ती व्यक्तींमध्ये भेदभाव न करता सर्वांना समान हक्क प्राप्तीचा उल्लेख मानवी हक्कांच्या सनदेत करण्यात आलेला आहे. आंतरराष्ट्रीय शांततेला मानवी हक्कांमुळे प्रोत्साहन मिळते आणि म्हणून त्या संदर्भात मानवी हक्कांचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) **मानवता हा एकमेव धर्म :**

मानवी हक्कांच्या सनदेत आखिल मानव जातीचा विचार केलेला आहे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल कि, मानवी हक्कांच्या सनदेत "मानवता" हा धर्म मानला गेलेला आहे. प्रत्येक देशातील शासनाने आपल्या देशातील जनतेला सर्व हक्क उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्यामुळे शांतता नांदण्यास मदत होते म्हणजे जागतिक शांततेच्या संदर्भात मानवी हक्कांची सनद महत्त्वपूर्ण ठरते.

२) **शोषणमुक्त समाजाची निर्मिती :**

मानवी हक्कांच्या सनदेमध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता यांना विशेष महत्त्व आहे. या तत्त्वांना या सनदेने आदर्श मानले आहे. कोणत्याही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीचे शोषण होणार नाही याची खबरदारी मानवी हक्कांच्या सनदेने घेतलेली आहे म्हणून शोषणमुक्त समाज निर्माण करणे हे मानवी हक्कांचे मुख्य धैर्य आहे.

३) **धर्मस्वातंत्र्य :**

जगामध्ये अनेक ठिकाणी धर्माच्या व भाषेच्या कारणावरुन हिंसाचार आणि दंगली होताना आढळतात. अलिकडच्या काळामध्ये "दहशतवादास" धार्मिक कारण जोडण्यात आलेले आहे. मानवी हक्कांच्या सनदेने जागतिक प्रत्येक व्यक्तीला धर्म स्वातंत्र्याचा हक्क बहाल केलेला आहे. २१ व्या शतकामध्ये सर्व प्रकारच्या समाजात व्यक्तीसाठी धर्मस्वातंत्र्य हा "मूलभूत हक्क" मानण्यात आलेला आहे.

४) **मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या देशावर जागतिक दडपण :**

मानवी हक्कांच्या सनदेने जगामधील प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रीयत्वाचा हक्क प्रदान केलेला आहे. कोणत्याही व्यक्तीला देश राष्ट्रीयत्वापासून वंचित ठेवू शकणार नाही. कोणत्याही व्यक्तीला तिचे राष्ट्रीयत्व बदलण्यापासून वंचित ठेवले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती आपल्या सार्वभौम सत्तेच्या विरोधात मानवी हक्क मिळावेत म्हणून आग्रह धुर शकते, असा उल्लेख मानवी हक्कांच्या सनदेत करण्यात आलेला आहे थोडक्यात वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते कि, जागतिक शांतता राखण्यासाठी मानवी हक्कांची सनद ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असे म्हणता येईल.

५.४ मानवी हक्कांच्या उत्क्रांतीमधील महत्त्वाचे टप्पे :

आज आधुनिक युगात अस्तित्वात असलेल्या मानवी हक्कांच्या संकल्पनेच्या उत्क्रांतीचा इतिहास बघितल्यास ती खूप विकसित झालेली संकल्पना आहे, असे दिसून येईल. मानवी हक्कांच्या उत्क्रांतीचा पहिला टप्पा म्हणजे "हम्मुराबी"ची लिखित संहिता मानता येईल. ही संहिता जुलमी छळापासून आणि शिक्षांपासून संरक्षण करणारी होती. तसेच ती जुलमी एकतर्फी न्यायनिवाड्याला प्रतिबंध घालणारी होती. "हम्मुराबी"च्या काळात सर्व लोकांच्या हक्कांना मान्यता नव्हती ही गोष्ट खरी आहे.

मानवी हक्कांच्या विकासक्रमातील पुढचा टप्पा म्हणजे हे हक्क नैसर्गिक आहेत असे मानले जाऊ लागले. ग्रीसमध्ये जुलमी छळापासून मुक्ततेसाठी ही संकल्पना व्यक्त होऊ लागली. मानवी हक्क हे नैसर्गिक हक्कांना समानार्थक स्वरुपात मानले जाऊ लागले.

नंतर रोमनांनी अथेनियन्स हा वारसा स्विकारला. यात बुध्दिनिष्ट जग व वास्तविक जग यांच्यातील फरकावर भर होता आणि त्यांना रोमन कायद्याची रचना करण्यासाठी या संकल्पनेचा वापर केला. रोमनाचा कायदा हा बुध्दिनिष्ट नैसर्गिक कायद्याच्या कल्पनेवर आधारित होता. जो संपूर्ण मानवजातीला लागू पडू शकत होता. कारण, तो संपूर्ण मानव जातीने स्विकारलेल्या आदर्श, बुध्दिनिष्ट कल्पना विश्वातून निर्माण झालेला होता.

असे असले तरी, आजचे मानवी हक्क व नैसर्गिक रोमन कायद्यांची संकल्पना यांच्यात मूलभूत फरक आहे. उदा. पदरी गुलाम बाळगणे हे नैसर्गिक मानले जाई पण ते आज मानवी हक्कांच्या पूर्णपणे विरोधी आहे.

नैसर्गिक हक्क सिध्दांत :

मानवी हक्क विकास प्रक्रियेतील हा पुढचा टप्पा होय. याविषयी सेंट थॉमस अक्विनास, ह्यूगो ग्रॅसियस, थॉमस हॉब्ज, जॉन लॉक इत्यादी विचारवंतांनी आपले विचार मांडलेले आहे. इतरांप्रमाणे मात्र ग्रोसियसने नैसर्गिक कायद्याला ब्रह्मज्ञानावर आधारलेले मानलेले नाही.

हॉब्जची संकल्पना : हॉब्ज विचारवंत मानवाच्या नैसर्गिक स्वातंत्र्य व समतेचा समर्थक होता. त्याच्यामते नैसर्गिक अवस्थेत व्यक्तीस हिंसेची भिती वाटल्याने त्या एकत्रित आल्या आणि राज्य बनविण्यासाठी त्यांनी परस्परांशी करार केला. सुखप्राप्तीसाठी राज्याने नैसर्गिक हक्कांवर आधारलेल्या नैसर्गिक कायद्याची आखणी करावी आणि त्या बदल्यात व्यक्तींने राज्याशी एकनिष्ट रहावे हा हॉब्जचा सकारात्मक कायद्यावर भर दिसून येतो.

नैसर्गिक कायद्याची टर उडविताना "जेरेमी बेन्थम" सारखा विचारवंत म्हणतो कि, "हक्क हे कायद्याचे मूल आहे, खऱ्याखुऱ्या कायद्याद्वारा खरे हक्क मिळतात, परंतु काल्पनिक कायदे म्हणजे नैसर्गिक कायदे यांच्यापासून काल्पनिक हक्क मिळतात. नैसर्गिक हक्क हा शुध्द मूर्खपणा आहे.

लॉक व रुसो ची संकल्पना :

ब्रिटिश विचारवंत "जॉन लॉक" याने पहिल्यांदा मानवी हक्कांच्या सर्वसमावेशक सिध्दांना विकसित केले. त्याने असे लिहून ठेवलेले आहे कि, लोक समाज बनवतात, समाज सरकार प्रस्थापित करतो आणि त्याद्वारे नैसर्गिक हक्कांचा उपभोग घेण्याची खात्री मिळवू पाहतो.

राज्य म्हणजे दुसरे - तिसरे काही नसून शासन व जनता यांच्यात झालेला सामाजिक करार होय. सरकार तेव्हाच कायदेशीर असू शकतो जेव्हा ते पध्दतशीरपणे नागरिकांच्या मानवी हक्कांच्या सन्मान करुन रक्षण करते.

लोकांच्या हक्कांसंबंधीचा सिध्दांत मर्यादित स्वरुपाचा होता. तो फक्त वैश्विक पातळीसंबंधी बोलत होता. मात्र प्रत्यक्षात मानवाला धारक युरोपियन लोकांकडेच त्याचा रोख होता. महिला विदेशी रहिवाशी, नोकर, मजूर या लोकांना हक्क उपभोगण्याची मान्यताच नव्हती.

रुरोची संकल्पना :

फ्रेंच विचारवंत जीन-जॅक्स रुसो यांच्यामते, वैयक्तिकरित्या एखाद्याची खाजगी इच्छा असू शकते आणि त्याची व्यक्तिगत आवडनिवड इतरांच्या आवडीनिवडीपेक्षा वेगळी असू शकते. रुसोच्या मते माणूस सामाजिक करार करुन आपले नैसर्गिक स्वातंत्र्य गमावतो आणि सर्वांसाठी असलेल्या अमर्याद हक्कांच्या मोहात पडून जे तो मिळवू शकतो, त्याच्या मोबदल्यात त्याला नागरी स्वातंत्र्याची प्राप्ती होते. रुसोच्या कालकिर्दितच असे म्हणता येईल कि, नैसर्गिक हक्क हा शब्द प्रयोग मागे पडत गेला व जागतिक हक्कांची संकल्पना मात्र चांगली रुजली. "डेव्हिड थारो" हा पहिला विचारवंत होय कि, त्याने मानवी हक्क या शब्द प्रयोगाचा विस्तार केला. यापूर्वी मानवी हक्कांचे उल्लेख इंग्लिश तत्वज्ञ जे. एस. मिल याने आपल्या "ऑन लिबर्टी" या ग्रंथात मांडलेले आहेत. तसेच अमेरिकन तत्वज्ञेचा "थॉमस पेन" याने आपल्या "मानवाचे हक्क" "The rights of man" या ग्रंथात केलेला आहे.

मानवी हक्कांसंबंधीचे ठळक दस्ताऐवज :

मानवी हक्कांसंबंधीचे ठळक दस्ताऐवज म्हणून पुढील कागदपत्राचा स्पष्टपणे उल्लेख करता येईल.

अ) मॅग्नाकार्टा (Megnacarta) : फ्रान्सच्या राजाकडून पराभूत झालेल्या व अनेक जुन्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या इंग्लंडच्या राजाबाबत तेराव्या शतकातील उमराव व प्रतिनिष्ठत लोक समाधानी नव्हते म्हणून त्यास शेवटी १२१५ मध्ये पुढील हक्क व स्वातंत्र्याचा समावेश असलेल्या मॅग्नाकार्टा नावाच्या करारावर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले. ते हक्क व अधिकार पुढीलप्रमाणे :

१. चर्चेस राज्याच्या नियंत्रणापासून मुक्त असावेत.
२. लंडन व अन्य शहरांना आपले स्वातंत्र्य व परंपरा उपभोगण्याचे स्वातंत्र्य असावे.
३. व्यापारी व अन्य व्यवसायिकांवर अन्याय स्वरुपाचे कर लादले जाऊ नयेत.
४. कलम १९ नुसार कोणत्याही स्वतंत्र व्यक्तीला अटक करता येऊ नये.
५. बेकायदेशीररित्या काढून टाकले तर देशाबाहेर हद्दपार केले जाऊ नये.
६. मालमत्ताधारक महिलांना पुनर्विवाह न करण्याची मुभा असावी.
७. सर्व स्वतंत्र नागरिकांना वारसाहक्काने अगर अन्य मार्गाने मालमत्ता धारण करणे आणि अमर्याद करापासून मुक्तीचा हक्क.

मॅग्नाकार्टा हा इंग्लंडच्या जनतेला स्वातंत्र्याकडे घेऊन जाणाऱ्या मैलाचा दगड मानला जातो.

ब) इंग्लिश बिल ऑफ राईट :

"दुसरा जेम्स" हा राजा अनियंत्रित पध्दतीने वागू लागल्याने इंग्लिश प्रजेने त्यास १६८८ मध्ये पदच्युत केले. यास "यशस्वी क्रांती" असे म्हणतात. इ.स. १६८९ मध्ये "मेरी आणि विल्यम तिसरा" यांना सिंहारुढ केले. त्या बदल्यात सम्राटाने "बिल ऑफ राईट"च्या स्वरुपात त्यांच्या अधिकारावर पार्लमेंटने

घातलेल्या बंधनांना मान्यता दिली. "बिल ऑफ राईट"ने जनतेच्या अधिकारावर पार्लमेंटने घातलेल्या बंधनांना मान्यता दिली.

या बिलाने पार्लमेंटच्या संमतीशिवाय कायद्यात बदल करायला राजाला मुभा दिली नाही, त्याचप्रमाणे पार्लमेंटच्या सभासदासाठी खुल्या निवडणुका घेतल्या जातील अशी तरतूद केली. तसेच पार्लमेंटमधील भाषण स्वातंत्र्याला कोठेही आव्हान दिली जाणार नाही अशीही घोषणा केली.

१६६९ चे "बिल ऑफ राईट" म्हणजे इंग्लंडमधील जबाबदार आणि मर्यादित सरकारची प्रतिष्ठापणा करणारे महत्त्वाचे साधन होय.

अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा - १७७६ :

ब्रिटिशांचा स्वातंत्र्याचा सूर्य कधीही माळवत नव्हता तसा तो अमेरिकेवरही तळपत होता. अमेरिका ही १३ वसाहतीमध्ये विभागलेली होती. या १३ (तेरा) वसाहती ब्रिटिशांच्या मनमानी कारभाराला कंटाळल्या होत्या कारण, ब्रिटिश शासनव्यवस्था ही शोषण करणारी होती. त्यांनी वसाहतीवर अमर्याद कर लावलेला होता. वसाहतीच्या व्यापार-उद्योगांवर एकतर्फी नियंत्रणे घातलेली होती. तसेच ब्रिटिश सम्राट "जॉर्ज तिसरा" याने मोठ्या घोडचुका केल्या. परिणामस्वरुप अमेरिकन जनतेने आपल्या हक्कांचा आदर व रक्षण करेल असे स्वतंत्र प्रजासत्ताक करण्याचा निश्चय केला.

दिनांक ४ जुलै, १७७६ रोजी जाहिरनामा स्पष्ट केला आणि हा जाहीरनामा फक्त अमेरिकनांसाठी नसून तो संपूर्ण मानवजातीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. अमेरिकन जाहीरनाम्यामुळे प्रथमच लोकशाहीची तत्वे, मर्यादित शासन, व्यक्तीस्वातंत्र्य आणि हक्कांचे रक्षण या गोष्टी जगासमोर आल्या. तसेच दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व मानवजातीमध्ये वैश्विक ऐक्य आहे कारण, त्यांना विशिष्ट असे हक्क मिळालेले आहेत, असे या जाहीरनाम्याने घोषित केले.

अमेरिकन बिल ऑफ राईट :

अमेरिकेच्या मूळ राज्यघटनेत "बिल ऑफ राईटस्"ची संकल्पना गृहीत धरण्यात आलेली नव्हती. कारण, तेथील घटनाकारांना त्याची गरज वाटत नव्हती. पण "थॉमस जेफरसरन" याने अमेरिकन स्वातंत्र्याचा मसुदा तयार केलेला होता. त्यांच्या मते राज्यघटनेमध्ये "बिल ऑफ राईटस्"चा समावेश असावा. राज्यघटना स्विकृतीसाठी राज्याकडे पाठविली तोपर्यंत लोकांना "बिल ऑफ राईटस्"ची कल्पना आलेली होती म्हणूनच "बिल ऑफ राईटस्" विषयी आश्वासन मिळाल्याशिवाय राज्यघटनेत अनेक राज्यांनी नकार दिला होता.

शेवटी १७९१ मध्ये या हक्कांची तरतूद असलेल्या दहा सुधारणा घटनेत स्विकृत करण्यात आल्या. "फॅकलीन डी. रुझवेल्ट" ने त्यांना स्वातंत्र्य आणि मानवाचा दर्जा यासंबंधातील "जाहीरनामा" म्हटले.

अशाप्रकारे अमेरिकनांनी प्रथम "बिल ऑफ राईट"च्या माध्यमातून मानवी हक्कांना घटनात्मक दर्जा मिळवून दिला असे म्हणता येईल. या दहा सुधारणा म्हणजे उदा -

१) भाषण व वृत्तपत्र स्वातंत्र्य.

२) शोध घेणे व पकडला जाणे यापासून स्वातंत्र्य.

३) शिघ्र व खुल्या चौकशीचा हक्क.

४) समतेचा हक्क इत्यादी.

अशा रितीने या दहा सुधारणांनी मानवी स्वातंत्र्याचा भरीव पाया घालून दिला.

मानवी हक्कांचा जाहीरनामा - १७८९ (फ्रेंच राज्य क्रांती) :

अमेरिकन स्वातंत्र्य युध्दामुळे युरोपियन सुधारकांना जोरदार प्रेरणा मिळाली त्यामुळेच कदाचित फ्रेंच राज्यक्रांती झाली असे म्हणता येईल. फ्रेंच राज्यकर्ते अस्थिर व दुबळे होते. तसेच अकार्यक्षम होते. जनतेला प्रचंड कर भरावे लागत होते. धर्मगुरु आणि सरदार समाजामध्ये एक उच्च वर्ग तयार झाला होता. हा वर्ग सर्व सुखसोयीचा (सवलतीचा) उपभोग घेत होता म्हणून उच्चवर्गियांच्या जुलमातून दडपशाहीतून मुक्त होण्यासाठी, त्याविरुध्द बंड करण्यासाठी मॉन्टेस्क्यू, व्हॉलेटिअर, रुसो यासारख्या विचारवंतांनी हातभार लावला. त्याचे फलित म्हणूनच दिनांक ४ ऑगस्ट, १७८९ रोजी फ्रेंच नॅशनल असेब्लिने भविष्यकाळात सरंजामशाही नष्ट करण्याचा अतिशय महत्त्वाचा जाहीरनामा प्रसिध्द केला.

या जाहीरनाम्याचा अर्थ असा कि,

१) माणसे ही स्वतंत्र जन्माला आली असून त्यांना समान हक्क असतील.

२) सर्व राजकीय संस्थांनी माणसाचे स्वातंत्र्य, मालमत्ता, सुरक्षितता आणि हक्क यांचे रक्षण केले पाहिजे.

३) कोणीही एक व्यक्ती ही सत्ताधीश नाही, राष्ट्र हेच सार्वभौम आहे - कायदे हे नागरिक व्यक्तीगत पातळीवर करु शकणार नाही.

४) कायदा स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकेल, पण केवळ त्याने समाजहित असेल तेव्हा.

५) कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या प्रक्रियेशिवाय गुन्हेगार ठरविता येणार नाही. अटक करता येणार नाही. ज्यामुळे समतेच्या हक्काचे संरक्षण होईल.

या जाहीरनाम्याचा परिणाम असा झाला कि, लवकर म्हणजे इ.स. १७९१ मध्ये घटना स्विकारण्यात आली. या घटनेने मर्यादित जबाबदार सरकारची प्रतिष्ठापना केली आणि "माणूस आणि नागरिक" यांच्या हक्कांच्या जाहीरनाम्याचा स्विकार केला. जनतेला जबाबदार बनविण्यासाठी फ्रेंच घटनेने पुढील उपाय सुचविले.

१) अनुवंशिक पदे - कालबाह्य ठरवून सर्वांसाठी समान नागरिकत्वाची हमी देण्यात आली.

२) गुन्हेगारी प्रकरणात पंचाकडून चौकशी करण्याचे ठरविले.

३) फ्रेंच कायद्यामध्ये मूलभूत सुधारणा घडविली.

४) राज्यघटनेने मध्यम व उच्च वर्गापुरता मतदानाचा अधिकार मर्यादित केला.

५) राजाचे प्रशासकीय अधिकार कमी केले.

अशा रितीने फ्रेंच राज्यक्रांतीने अखिल मानवी समाजाला प्रतिष्ठेचे, सन्मानाचे जीवन जगण्याची संधी निर्माण करुन दिली.

१८६३ चा बंधमुक्तीचा जाहीरनामा :

अमेरिकेमध्ये जरी लोकशाही प्रस्थापित झाली असली व लोकांना काही प्रमाणात लिखित हक्क जरी मिळाले असले तरी अमेरिकेमध्ये बरीच जनता ही गुलामगिरीचे चटके सहन करीत होते. अमेरिकेच्या मोठ्या प्रदेसामध्ये इ.स.१६५४ ते १८६५ पर्यंत गुलामी ही कायदेशीर मानली जात होती. बहुसंख्य गुलाम हे श्वेतवर्णीय नव्हते ते कृष्णवर्णीय होते. श्वेतवर्णीय गुलामांची संख्या ही अल्पप्रमाणात होती. दक्षिणेकडील राज्यात १८६० च्या जनगणेनुसार जवळपास ४ दशलक्ष गुलाम होते, जवळपास १५ राज्यांमध्ये गुलामी कायदेशीर होती.

संयुक्त अमेरिकेचे विभाजन होऊ नये या उद्देशाने इ.स. १८६१ साली "सिव्हिल वॉर" सुरु झाले. गुलामी रद्द करण्याची मागणी करणारे अल्पसंख्यांक होते. अब्राहम लिंकन यांनी शेवटी गुलामगिरीच्या मुक्ततेचा पक्ष घेतला व नंतर "बंधमुक्ततेचा जाहीरनामा" प्रसिध्द केला. जाहीरनामा हा युध्दातील एक डावपेच होता. गुलाम असलेल्या राज्यांनी गुलामीवर प्रतिबंध घालण्यासाठी विधेयक मंजूर केली होती. अखेर १८ डिसेंबर, १८६५ रोजी तेराव्या सुधारणेने गुलामी कायमची नष्ट करण्यात आली आणि सर्व अमेरिकन नागरिकांना मानवी हक्क प्रदान करण्यात आले.

५.५ मानवी हक्कांचा विकास :

प्रस्तावना :

मानवी हक्क ही संकल्पना काळानुसार बदलणारी आहे. या बाबतीत कोणाचेही दुमत नाही. मानवी हक्क हे कालमानानुसार बदलत असल्यामुळे काही हक्क कायमस्वरुपी आहेत. तर काही मानवी हक्कांमध्ये बदल होत असतात म्हणूनच आधुनिक काळाच्या सुरुवातीपासून मानवी हक्कांच्या स्वरुप आणि व्याप्तीमध्ये कशाप्रकारे बदल झाले आणि त्यावर विविध विचारसरणीचा कसा परिणाम झाला ह्याचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.

या संदर्भामध्ये एक विदुषी "कारेल वसाक्यांनी" येथील आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संस्थेमध्ये १९७९ मध्ये "मानवी हक्कांच्या तीन पायऱ्या" ही संकल्पना मांडली. वसाकांच्या विचारसरणीवर फ्रेंच तत्त्वाचा पगडा आहे.

- नागरी व राजकीय हक्कांची पहिली पायरी (लिबटा).
- आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्कांची दुसरी पायरी (इक्वालिटी).
- नव्याने उल्लेखिल्या जाणाऱ्या संघटीत हक्कांची तिसरी पायरी (फ्रॅटनिटी).

वरील तीन पायऱ्यांचा सिध्दांत मानवी हक्कांच्या काहीशा कठीण उत्क्रांतीचे सोपे केलेले वर्णन म्हणता येईल.

हक्कांची पहिली पायरी :

हक्कांच्या पहिल्या पायरीमध्ये राजकीय हक्कांचा समावेश होतो. त्याचे मूळ अठराव्या शतकातील सुधारणावादी चळवळीमध्ये दिसून येत असले तरी इंग्लिश, अमेरिकन आणि फ्रेंच राज्यक्रांत्यांमध्ये देखील दिसून येते. लोकांनी अन्यायकारक धार्मिक बंधने आणि हुकुमशाही राजवट यांच्या विरोधात केलेल्या संघर्षातून नागरी हक्क व राजकीय हक्कांचा उदय झालेला आहे. हक्कांच्या पहिल्या पायरीबाबत खालील मुद्यांचा विचार करता येईल.

पहिल्या पायरीतील हक्क नकारात्मक स्वरुपात स्पष्ट केलेले दिसून येतात. त्यामध्ये सकारात्मकता दिसून येत नाही.

माणसाच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर सरकारी हस्तक्षेप असू नये कारण, सरकारच स्वातंत्र्याच्या विरोधात असते. त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारचा हस्तक्षेप नसावा.

मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यामध्ये कलम दोन ते कलम एकवीस यामध्ये पहिल्या पायरीतील हक्कांचा समावेश आहे.

यामध्ये वांशिक भेद, गुलामगिरी, अमानवी वागणूक, छळवणूक, अपमानास्पद वागणूक आणि शिक्षा बेकायदेशीर अटक खाजगी जीवनातील हस्तक्षेप या सर्वांपासून स्वातंत्र्य हे अंतर्भूत आहे.

यामध्ये जीवन जगण्याचे स्वातंत्र्य तसेच व्यक्तीगत सुरक्षेचा हक्क, नि:पक्षपाती न्याय आणि खुल्या सुनावणीचा हक्क देशामध्ये एखाद्याचा छळ होत असेल तर त्याला दुसऱ्या देशात राजकीय आश्रय मिळण्याचा हक्क सरकारमध्ये निवडणुकींच्या माध्यमातून सहभागी होण्याचा आणि मालमत्ता किंवा संपत्ती बाळगण्याचा हक्क अशा शब्दांत मांडलेला हक्कांचाही समावेश आहे.

पहिल्या पायरीतील हक्कांच्या संकल्पनेमध्ये मुख्य मुद्दा असा मांडला जातो कि, राजकीय सत्तेच्या दुरुपयोगापासून तिचे संरक्षण करणे. हाच विश्वास जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांच्या राज्यघटनेमध्ये स्पष्ट झालेला आहे.

हक्कांची दुसरी पायरी :

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला फ्रान्समध्ये उदयास आलेली समाजवादी विचारसरणी आणि त्यानंतर झालेले क्रांतीकारी संघर्ष व चळवळी यामध्ये दुसऱ्या पायरीतील सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक हक्कांचे मूळ आहे. बऱ्याचदा भांडवलशाहीतून उदयास आलेल्या विकासाच्या वाईट गोष्टींचा परिणाम म्हणूनही दुसऱ्या पायरीकडे बघितले जाते. व्यक्तीगत स्वातंत्र्य ह्या संकल्पनेचा चुकीचा अर्थ घेऊन भांडवलवाद्यांनी / भांडवलदारांनी कामगार वर्गाची आर्थिक पिळवणूक केली. त्याची प्रतिक्रिया म्हणून दुसऱ्या पायरीतील हक्क निर्माण झाले. लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियायी वसाहतींची झालेली पिळवणूक हे ही दुसऱ्या पायरीतील हक्क निर्माण होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणता येईल.

ऐतिहासिकदृष्ट्या दुसऱ्या पायरीतील हक्क हे पहिल्या पायरीतील हक्कांच्या विरोधातले म्हणून ओळखले जातात.

हे हक्क स्वच्छ स्वरुपात मांडले गेल्याने त्याला हक्कांचे स्वरुप प्राप्त झाले.

ह्या हक्कांना अंमलात आणण्यासाठी सरकारच्या सहकार्याची / कार्यभागाची गरज प्रतिपादली आहे.

मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम २२ ते कलम २७ मध्ये हक्क स्पष्ट केले आहेत.

यामध्ये सामाजिक सुरक्षेचा हक्क, काम करण्याचा हक्क, काम करत असताना योग्य वेळ विश्रांती आणि मोकळा वेळ मिळण्याचा हक्क. चांगले जीवन जगण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव असतो.

सामाजिक व आर्थिक समतेची मागणी दुसऱ्या पायरीतील हक्कांच्या माध्यमातून केली जाते.

हक्कांची तिसरी पायरी :

या पायरीतील हक्क हे सामूहिक किंवा समूहाचे हक्क आहेत. पहिल्या पायरीतील आणि दुसऱ्या पायरीतील हक्कांशी ते जोडले गेले आहेत.

दुसऱ्या महायुध्दानंतर साधारपणे ४० ते ५० वर्षांच्यानंतर असे लक्षात आले कि, राष्ट्र-राज्ये ही समूहाचे रक्षण आणि कल्याण साधण्यात कमी पडत आहेत.

मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनाम्यातील कलम २८ मध्ये समूहाच्या हक्कांचा उल्लेख केलेला आहे.

तिसऱ्या पायरीतील हक्कांमध्ये सहा हक्क अंतर्भूत केले आहेत. ज्याचा संबंध तिसऱ्या जगात उदयास आलेल्या राष्ट्रवादांशी व त्यातून सत्ता आणि संपत्तीचे वितरण व्हावे या मागणीशी आहे.

यापैंकी खाली तीन हक्क पुढीलप्रमाणे आहेत :

१) राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये स्वंयनिर्णयाचा हक्क सर्व समूहांना आहे.

२) आर्थिक विकासाचा हक्क.

३) मानवाच्या सामूहिक वारशापासून ज्या जमिनीवर विखुरलेली संसाधने, सांस्कृतिक ठिकाणी ऐतिहासिक स्थळे यांचा समावेश होतो.

तिसऱ्या पायरीतील हक्कांना पहिल्या व दुसऱ्या पायरीतील हक्काप्रमाणे मान्यता मिळालेली नाही. थोड्याफार प्रमाणात मान्यता मिळाली आहे ज्याप्रमाणे देशांतर्गत समाजामध्ये असमानता दिसून येते. त्याचप्रमाणे इतर देशांमध्ये आणि देशांच्या समूहांमध्येही असमानता आहे.

आंतरराष्ट्रीय मानवहिताची कायद्यास प्रारंभ - जिनेव्हा परिषद :

संयुक्त संस्थानांमध्ये गुलामगिरी पध्दत औपचारिकपणे नष्ट होत असताना ॲटलांटिक महासागरापलिकडे मानवी हक्कांचे उल्लंघन होण्याची संबंधित असा एक महत्त्वपूर्ण मुद्यांचा उहापोह केला जात होता. तोपर्यंत आधुनिक युध्दांचे नियंत्रण करु शकणारे असे कोणतेही नैतिक नियम अंमलात आले नव्हते.

शत्रुकडच्या सैनिकांना दुसऱ्या सेना अतिशय क्रौर्याने वागवीत असत. इ.स. १८६४ मध्ये जिनेव्हा परिषदेमध्ये युध्दकाळात हक्कांचे उल्लंघन होणे हा आंतरराष्ट्रीय विचारांचा मुख्य मुद्दा असावा असे रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीने स्पष्ट केले.

विविध राष्ट्रांच्या युध्दकाळामध्ये तेथील परिस्थितीवर, वागणुकीवर नियंत्रण ठेवणारा तसेच त्या परिस्थितीतील वर्तनावर नियंत्रण ठेवणारा पहिलाच आंतरराष्ट्रीय कायदा असलेला करार, जिनेव्हा परिषद ही पहिलीच. त्यामुळेच तिला आधुनिक मानवता जपणारी आणि मानवी हक्क यांचे उगमस्थान मानतात.

जिनेव्हा परिषदेने आजारी आणि जखमी सैनिकांसाठी उपचारासाठी वेगळी अशी तरतूद केली. ती तरतूद कायदेशीत होती.

परिषदेतील निर्णयामध्ये अनेक वेळा पुनर्विचार होऊन सुधारणा केल्या गेल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर इ.स. १९४९ मध्ये मंजूर झालेल्या मसुद्यामध्ये चार वेगवेगळ्या प्रकारच्या परिषदामधील निर्णयांचा समावेश आहे. पहिल्या व दुसऱ्या परिषदेमध्ये जमिनीवरील युध्द व सागरावरील युध्दाबाबत विचारविनिमय झाला आणि युध्द संबंधातील व्यवहाराचा विचार तिसऱ्या परिषदेत झाला. चौथ्या परिषदेमध्ये सामान्य नागरीक व युध्दापासून दूर असलेले इतर घटक इत्यादींच्या सुरक्षिततेचा विचार झाला.

थोडक्यात असे स्पष्ट करता येईल कि, चार जिनेव्हा परिषदांनी मिळून युध्द सदृश्य परिस्थितीमध्ये सुध्दा मानवी प्रतिष्ठेचा आदर राखण्याचे ठरवले होते, असे स्पष्ट होते. त्यांनी घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीवर रेडक्रॉस आंतरराष्ट्रीय समिती लक्ष ठेवते.

राष्ट्रसंघ आणि मानवी हक्कांच्या प्रमाणाचे आंतरराष्ट्रीय विवरण :

पहिल्या जागतिक महायुध्दानंतर राष्ट्रसंघाने मानवी हक्कांचा विकास साधण्यासाठी केलेले प्रयत्न हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणावा लागेल. इ.स. १९१९ मध्ये पहिले जागतिक महायुध्द औपचारिकपणे संपण्या अगोदरच संयुक्त संस्थानाचे अध्यक्ष व्रडो विल्सन यांनी सन १८१८ मध्ये काँग्रेसला संबोधित करतात "न्याय व योग्य व्यवहारास यांना समर्पित अशा जगाची निर्मिती व्हावी अशी इच्छा व्यक्त केली. त्यावेळेस मांडल्या गेलेल्या १४ कलमी कार्यक्रमामध्ये या कलमांचा विस्तार केला गेला. ज्यामध्ये राजकीय स्वातंत्र्य असणाऱ्या देशांना राष्ट्र म्हणून मान्यता मिळणाऱ्या व स्वयंनिर्णयाचा हक्क असण्याचा समावेश होता.

इ.स. १९१९ च्या व्हर्सायच्या शांतता कराराचा विल्सनचे चौदा मुद्दे हा पाया होता. त्याने राष्ट्रसंघ आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची प्रतिष्ठापना केली. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेकरिता राष्ट्रसंघानी कृती करावी अशी अपेक्षा होती. तसेच सभासद राष्ट्रांनी इतर राष्ट्रांवर युध्द पुकारणे किंवा युध्दाचे आवाहन देणे आणि त्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे हे ही अपेक्षित होते. या संदर्भामध्ये काही महत्त्वपूर्ण गोष्टी आहेत. त्या पुढीलप्रमाणे विषद करता येतील.

अल्पसंख्याकांच्या हक्कांना मान्यता देण्यासाठी केलेले करार :

आंतरराष्ट्रीय कामगारांच्या हक्कांचा मुद्दा व गुलामगिरी नष्ट करण्याकरिता झालेले प्रयत्न.

अल्वानिया, ऑस्ट्रिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, इस्टोनिया, फिनलँड, ग्रीस अशा अनेकविध देशांमधील विशिष्ट अल्पसंख्यांकांच्या हक्कांच्या रक्षणाकरिता मित्रराष्ट्रे आणि पूर्वेच्या युरोपियन देशांनी अल्पसंख्यांसाठी करारनामे करुन जाहीरनामा प्रसारित केला.

सरहद्दीची फेरआखणी करणे, नवीन राज्यांची निर्मिती करणे, अल्पसंख्यांकावर होणारा दुर्व्यवहार यापासून त्यांना वाचवता यावे हा या मागचा मुख्य उद्देश होता.

काही आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या विशिष्ट गटातील लोकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी करारनाम्यांनी दिशा दाखविली.

कामगारांच्या हक्कांच्या रक्षणासाठी राष्ट्रसंघ हा क्रियाशील होता. कामगारांच्या स्त्री आणि पुरुष, मुले यांना आवश्यक असलेल्या अवस्थाच्या धैर्यांचा करारामध्ये स्पष्टपणे उल्लेख केला होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेचा विशेष विभाग असलेल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे ह्या धैर्यपत वाटचाल करणे अतिशय महत्त्वाचे कार्य झाले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने गुलामीच्या समस्येचीही आवश्यक तेवढी दखल घेतली. काही राष्ट्रांनी गुलामगिरीची प्रथा आणि गुलामांचा व्यापार संपुष्टात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न होण्याची गरज होती.

गुलामीविरोधी संघटनेसारख्या अशासकीय संस्था संघटनांनी आंतरराष्ट्रीय कृती होण्यासाठी दबाव टाकला आणि गुलामगिरी प्रथेविरुध्दचा हा संघर्ष मानवी हक्क आंदोलनांचा जणू प्रारंभ ठरला. राष्ट्रसंघाने गुलामी प्रथेविरुध्द आयोग नेमणे सन १९२६ परिषदेच्या गुलामी प्रथेविषयीच्या परिषदेच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या आणि १९१० च्या श्वेत गुलाम व्यापार म्हणून ओळखल्या गेलेल्या समस्येचा विचार करणाऱ्या त्याबरोबरच स्त्रिया व मुले यांचा व्यापारावर कायमस्वरुपी निर्बंध घालणाऱ्या परिषदांची स्थापना केली.

राष्ट्रसंघाचे सर्व प्रयत्न महत्त्वपूर्ण असले तरी देखील स्वतः राष्ट्रसंघ अपयशी ठरले. राष्ट्रसंघ आणि जगातील सर्व राष्ट्रे ६ दशलक्ष ज्यु लोकांचा सर्वनाश रोखू शकली नाहीत आणि संपूर्ण युरोपमधील अल्पसंख्यांकांना वाचवू शकली नाहीत आणि दुसरे महायुध्दी रोखू शकले नाहीत.

संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद :

इ.स. १९४१ मध्ये आपल्याशी निगडीत अशा कृतीद्वारे संयुक्त संस्थानाचे अध्यक्ष "फ्रँकलिन रुझवेल्ट" यांनी राष्ट्रीय काँग्रेसला उद्देशून केलेल्या प्रख्यात अशा राष्ट्रीय भाषणात चार महत्त्वपूर्ण असलेल्या मानवी स्वातंत्र्याचा उल्लेख केला. उच्चार, स्वातंत्र्य, पूजाअर्चा करण्याचे स्वातंत्र्य, गरजापासून स्वातंत्र्य व भयापासून स्वातंत्र्य, भाषणाच्या ओघात त्यांनी असेही स्पष्ट केले कि, मानवी हक्क म्हणजे मानवी हक्काचे सार्वत्रिक स्वरुपाचे सार्वभौमत्व.

त्याचप्रमाणे अध्यक्ष रुझवेल्ट आणि ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांनी "अटलांटिक सनद" या नावाने ओळखले जाणारे संयुक्त निवेदन प्रसारीत केले. ज्याच्या माध्यमातून युध्दोत्तर जगातील त्याचा दृष्टिकोन दिसून आला.

संयुक्त निवेदनात असे म्हटले आहे कि, "जुलमी नाझी राजवटीच्या अंतिम विद्वासानंतर आपण आता आशा करु शकतो कि, "शांतता प्रभावित झालेली आपण पाहू शकू. ज्यामुळे सर्व राष्ट्र आपआपल्या सीमाच्या आत सुरक्षित अशी राहू शकतील आणि त्याचबरोबर सर्व भूमीवरच्या सर्व लोकांना भय आणि गरजा यापासून मुक्त असे जीवन जगण्याची शाश्वती लाभेल."

इतर २६ सह्योगी राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी नंतर १ जानेवारी, १९४२ रोजी एका निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आणि अटलांटिक सनदेमधील हेतू, उद्देश व तत्त्वांची भर घातली.

यावरुन आमची अशी खात्री झाली आहे कि, जीवन, स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य याच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या तसेच इतरांच्या देशात देखील मानवी हक्क व न्याय यांचे रक्षण झाले पाहिजे. त्यासाठी शत्रुवर विजय मिळणे क्रमप्राप्त ठरते. त्याचप्रमाणेच ही सर्व जगार कब्जा करणाऱ्या दृष्ट प्रवृत्तीच्या विरोधात एकत्रित होवून संघर्ष करण्यात मग्न आहेत हे ही दिसते.

यामध्ये आणखी भर पडली ती अशी कि, महासत्तांच्या युध्दकाळात मित्रराष्ट्रांपैंकी २१ राष्ट्रांनी ऑगस्ट १९४५ मध्ये जाहीरनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या. एकत्र आलेल्या या गटाने संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ५१ मूळ सभासद असलेल्या राष्ट्रांचा महत्त्वपूर्ण घटक बनला. इ.स. १९४५ मध्ये मंजूर झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेच्याद्वारा मानवी हक्कांचा आदर करण्यास प्रोत्साहन देण्याची हमी देण्यात आली. त्याप्रमाणेच सदस्य राष्ट्रांना काही वचने बंधनकारक केली कि, त्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेला मानवी हक्कांचा जागतिक स्तरावर सन्मान करावा.

त्यांना सहकार्य करावे असे असले तरी देखील त्यावेळेस, हक्कांच्या कायदेशीर बंधनाच्या संबंधित विधेयक अंतर्भूत करण्याचे प्रयत्न सफल झाले नाहीत. उलट भर दिला गेला तो आंतरराष्ट्रीय गुन्ह्याबाबत न्यायालयीन कारवाईवर -

सनदेमधील मानवी हक्कांच्या संदर्भातील काही तरतुदी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) पहिले असे कि, संयुक्त राष्ट्र संघटना ही सर्व मानवजातीच्या समता व स्वयंम निर्णय या तत्वावर आधारलेली आहेत. सर्व वसाहत रुपी देश प्रदेशांच्या स्वातंत्र्यासाठीच्या पाठपुराव्याच्या दृष्टीकोनातून स्वयंनिर्णयाचे तत्व आधारभूत मानले जाते. हे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अनेक अशापैंकी एक म्हणता येईल.

२) दुसरे असे कि, संयुक्त राष्ट्र संघटना ही राष्ट्रा-राष्ट्रांमधील आणि माणसा-माणसतील भेदभाव न करण्याच्या तत्वावर आधारलेली असी. त्यामध्ये वंश, लिंग, भाषा इत्यादी आधारे भेदभाव केला जात नाही. समतेबद्दलची निष्ठा संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन झाल्यापासून महत्त्वपूर्ण ठरली आहे आणि त्याचबरोबर भावी जगाचे स्वरुप पाहाण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या पायाभूत तत्त्वांपैकी एक आहे.

३) तिसरे असे कि, मानवी हक्कांच्या पुढाकारासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा पाठपुरावा करण्यासाठी सदस्य राष्ट्रांनी स्वतःला वाहून घेतले.

४) सर्व सदस्य राष्ट्रांनी मानवी आणि मूलभूत स्वातंत्र्य यांना सर्व जगात प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्यासाठी संयुक्तपणे व स्वतंत्र्यपणे प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेतली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ५५ व ५६ यामध्ये वचन स्विकृतीचे महत्त्व प्रतिपादिले आहे. या कलमामध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय दृढ ऐक्य ह्या तत्वाचा मानवी जीवन सुखकर होण्यासाठी, त्याचे कल्याण होण्यासाठी आणि मानवी हक्कांची जाणीव जागृती करण्याच्या हेतूने समावेश करण्यात आला.

५) पाचवे असे स्पष्ट करता येईल कि, मानवी हक्क आयोग स्थापन करुन मानवी हक्कांना योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने आर्थिक, सामाजिक समितीने कार्यकारी आयोग म्हणून काम करावे असा हेतू होता. मानवी हक्क संदर्भातील आंतरराष्ट्रीय विधेयकासाठी सॅन-फ्रान्सिस्को अधिवेशनामध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर विचार-विमर्श करण्यास या आयोगाला सांगण्यात येणार होते.

मानवी हक्कांचा जागतिक आढावा :

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेतील तरतुदीबद्दल मानवी हक्कांचे तपशील स्पष्ट झाले नाहीत. मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीय विधेयकाद्वारे मानवी हक्कांचा परिचय करुन त्यांचे प्रतिपादन व संरक्षण करणे अपेक्षित होते. या विधेयकामध्ये एका जाहीरनाम्याचा समावेश अपेक्षित होता. ज्याने मानवजातीच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच हक्कांना जागतिक पातळीवर स्विकार्हता प्राप्त झाली आणि त्याच्या अंमलबजावणीकरिता नेमक्या तरतुदी असलेल्या करारनाम्याचा स्विकार करण्यात आला. त्यामुळे मानवी हक्क आयोगाने या विधेयकाचा मसुदा तयार केला. दिनांक १० डिसेंबर, १९४८ रोजी पॅरिसमध्ये झालेल्या बैठकीत भामसभेने त्याचा स्विकार केला म्हणजेच वरील विधेयक हे मानवाच्या विश्वातील सर्वच सर्व कुटुंबातील सर्व सदस्यांच्या कोणत्याही न टाळता येणारे व पवित्र न्याय अशा हक्कांची मुख्य अशी आंतरराष्ट्रीय उद्घोषणा आहे असे म्हणता येईल. जेव्हा राष्ट्रांच्या सुव्यवस्थित समुदायाने मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य या संबंधातील महत्त्वपूर्ण घोषणा केली होती.

प्रस्तावनेबरोबरच जाहीरनाम्यात मानवी हक्क व स्वातंत्र्य याबाबत आवश्यक ते स्पष्टीकरण असलेल्या ३० कलमांचा समावेश करण्यात आला आहे. मानवाने आजपर्यंत नागरी, राजकीय, धार्मिक स्वातंत्र्याचा प्राप्त करण्यासाठी केलेल्या संघर्षाचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये नवीन सामाजिक व राजकीय हक्कांना स्थान दिले गेले. त्याप्रमाणे प्रस्तावनेमध्ये पुरुष, स्त्रिया आणि बालके (मुले) यांना मिळालेल्या मानवी हक्कांचा समावेश करण्यात आला आहे.

या विधेयकातील तरतुदी पुढील प्रकारात विभागता येईल.

सर्वधर्मसमभाव - यामध्ये सर्व माणसे ही ते रहात असलेले ठिकाण, प्रदेश किंवा इतर भेदभावाचा विचार न करता सर्व समान आहेत. परंतु त्याच्या स्वातंत्र्याचा आणि दर्जाचा

मुद्दा उचलून धरला आहे. अखिल मानव समाजाला मूलभूत मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी जबाबदार धरले आहे आणि जाहीरनाम्यात उल्लेख केलेल्या मानवी हक्कांच्या बाबतीत अन्य कलमांचा पाया घातला असल्याचे दिसून येते.

नागरी व राजकीय हक्क - हे हक्क कलम ३ ते कलम २१ मध्ये दिले गेले आहेत. ज्याप्रमाणे व्यक्तीने जीवन सुरक्षित रहावे, त्यांना स्वातंत्र्य उपभोगता यावे त्याप्रमाणेच समतेचा हक्क आणि कायद्याचे समान स्वरुपात संरक्षण ही व्हायला हवे.

सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक हक्कांना प्राधान्य :

सामाजिक सुरक्षितता, श्रम, विश्रांती यांच्याप्रमाणेच आरोग्य, शिक्षण व किमान सुखी जीवनासाठी आवश्यक असे जीवनमान इत्यादीवरील हक्कांचा कलम २२ ते २७ मध्ये आहे.

वरीलप्रकारचे हक्क जगातील मानवजातीसाठी आहेत. त्याला कोणतेही राष्ट्र अगर व्यक्ती नष्ट करु शकणार नाहीत.

यावरुन असे स्पष्ट करता येईल कि, जाहीरनामा म्हणजे तह किंवा करार नव्हे तर आमसभेने तो (कायद्याचा दर्जा नसलेला एक विचार या स्वरुपात) मंजूर केला होता. त्यामुळेच तो कायद्याच्या चौकटीत कायदेशीर दस्तऐवज मानता येत नाही. याबाबतीत अनेक लोकांमध्ये मतभेद होतो. त्यामुळे तो लोकांनी स्विकारला किंवा नाही स्विकारला तरी देखील तो बंधनकारक असेल असा विचार मांडला.

जाहीरनाम्याचे कायदेशीर स्वरुप आणि महत्त्व काहीही असले तरी आज तो मानवी हक्कांच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाचा असा दस्ताऐवज आणि मूलभूत स्वातंत्र्याचा पुरस्कार आणि संरक्षणाच्या दृष्टीने स्फूर्तिदायक ठरला आहे हे मान्य करावेच लागेल.

महत्त्वपूर्ण प्रश्न :

प्र. १. मानवी हक्कांची संकल्पना स्पष्ट करुन त्यांचे स्वरुप स्पष्ट करा.

प्र. २. मानवी हक्कांचा उदय कसा झाला ते सांगून मानवी हक्कांच्या उत्क्रांतीतील टप्पे सांगा?

प्र. ३. मानवी हक्कांच्या संदर्भात अमेरिकन बील ऑफ राइट्सची संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ४. मानवी हक्कांच्या विकासातील नैसर्गिक हक्कांची संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ५. मानवी हक्कांच्या संदर्भात लॉक आणि रुसोची संकल्पना सांगा.

प्र. ६. मानवी हक्कांच्या विकासातील महत्त्वाच्या पायऱ्या लिहा.

* * *

६

स्त्रीवादी चळवळ

६.१ उद्दिष्ट्ये

६.२ प्रास्ताविक

६.३ स्त्रीवादी चळवळीचे बदलते स्वरुप

६.४ स्त्रीवादी राजकीय सहभाग

६.५ सारांश

६.६ विद्यापिठीय प्रश्न

६.१ उद्दिष्ट्ये :

स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, भेदभाव, स्त्रियांना हक्कापासून वंचित ठेवणे, या विरुध्द लढण्यासाठी व आपल्या न्याय हक्कांसाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्यात, या चळवळींची निर्मिती, बदलते स्वरुप व स्त्रियांचा राजकीय सहभाग समजून घेणे.

६.२ प्रास्ताविक :

पूर्वीपासून समाजाचा स्त्री वर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा संकुचित दिसून येतो. स्त्री म्हणजे केवळ भोगवस्तू या समजूतीमुळे स्त्रियांना उंबरठ्याच्या आतच रहावे लागत होते. परिणामी पुरुषांपेक्षाही स्त्रीमध्ये चांगले गुण असूनही तिला चार भिंतीच्या आतच रहावे लागत होते. या अवस्थेतून स्त्रीयांना बाहेर काढण्यासाठी, तिच्यावरील अन्याय दूर व्हावा, तिला देखील पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळावेत याकरिता अनेक विचारवंतांनी, समाजसुधारकांनी तसेच काही स्त्रियांनी पुढे येऊन स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने कार्य सुरु केले व यामधूनच स्त्रीवादी चळवळीचा जन्म झाला. या स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप कसे बदलत गेले व त्यामुळे स्त्रियांमध्ये जागृती होऊन राजकीय सहभाग कसा होत गेला ते आपणांस पुढीलप्रमाणे पहावयास मिळते.

६.३ स्त्रीवादी चळवळीची निर्मिती व बदलते स्वरुप :

स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, जगामध्ये सर्व समाज पुरुष प्रधान आहे. त्यामुळे स्त्रियांना कुठेही संधी नव्हतीच. याउलट त्या पुरुषी

जाचालाही बळी पडत होत्या. या अन्याया विरुध्द स्त्रियांनी वेळोवेळी आवाज उठविलेला दिसून येतो. तसेच आपल्या न्याय हक्कांसाठी स्त्रियांनी विविध चळवळी उभ्या केलेल्या दिसून येतात. या स्त्रीवादी चळवळीची बीजे १८व्या शतकातच रोवली गेलीत.

स्त्रीवादी चळवळीची जनक म्हणून इंग्लंडची मेरी वॉल्स्टनक्राप्ट या स्त्रीकडे पाहिले जाते. १९७२ मध्ये "द व्हिंडिकशन ऑफ द राइटस् ऑफ वुमन" हा ग्रंथ लिहिला व या ग्रंथात तिने स्त्री-पुरुषांमध्ये सामाजिक व नैतिक समानतेचा पुरस्कार केला. मेरी वॉल्स्टनक्राप्टचे कार्य स्त्रीवदी चळवळीचे कार्य करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. या चळवळींमुळे स्त्रियांना मर्यादित मताधिकार प्राप्त झाला.

या प्रमाणेच अमेरिकेत देखील १८४८ मध्ये स्त्रीवादाची चळवळ सुरु झालेली दिसून येते. एलिझाबेथ कॅन्डी स्टॅन्सन या स्त्रीने १३ जुलै, १९४८ रोजी स्त्रीयांच्या हक्कांकरिता सेनेका परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये सामाजिक, नागरी व धार्मिक स्थिती आणि स्त्रियांचे हक्क यावर चर्चा झाली. स्त्रियांचे कोणकोणते हक्क देशात डावलेले जातात. यांची यादीच तयार करण्यात आली. उदा. स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता, कायदे निर्मितीत स्त्रियांना स्थान नव्हते. स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार नव्हता. उच्च शिक्षणाची संधी नव्हती. प्रतिनिधी मंडळात स्थान नव्हते इत्यादी अधिकार मिळावेत याकरिता अमेरिकेमध्ये स्त्रीवादी चळवळी सुरु झालेल्या दिसून येतात.

१९६० नंतरची स्त्रीवादी चळवळ :

१९६० पूर्वी स्त्रियांच्या हक्कांकरिता ज्या चळवळी झाल्यात त्या चळवळींनी प्रामुख्याने राजकीय व कायदेशीत हक्क मिळविणे हे धैर्य समोर ठेऊन चळवळी सुरु केल्या होत्या पण १९६० नंतरच्या स्त्रीवादी चळवळींनी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समानता हे धैर्य समोर ठेऊन कार्य करीत होत्या. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत. याकरिता आवाज उठविण्यात आला. त्याप्रमाणे मागण्या करण्यात आल्या. याचा परिणाम म्हणजे स्त्रियांसाठी समान रोजगार संधी व समान वेतन कायदे तयार करण्यात आले. शिक्षणाची समान संधी मिळाली. विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांना संधी प्राप्त होऊ लागली. स्त्रियांवरील अत्याचार प्रतिबंधक कायदे तयार होऊ लागले. तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त होण्यासाठी स्त्रीला कुटुंब नियोजनाचा हक्क मिळाला. जो जगात कुठेही नव्हता. यामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या सबल होऊ लागल्या. याप्रमाणेच १९७० च्या सुमारास फ्रांसमध्ये देखील स्त्रीवादी चळवळीने जोर धरला होता. अमेरिका व इंग्लंडमधील स्त्रीवादी चळवळींपेक्षा फ्रांसमधील चळवळ गुणात्मकदृष्ट्या वरचढ होती असे दिसून येते.

१९९० नंतरची स्त्रीवादी चळवळ :

१९६० पूर्वीची स्त्रीवादी चळवळ आणि १९६० नंतरची चळवळ या प्रामुख्याने गोऱ्या वर्णच्या स्त्रियांची चळवळ होती. उदा. ग्लोरीया ॲन्झाल्ड्यूआ, बेल हुक्स, चेला सँडोवेल, चेरी मोरागा इत्यादी काळ्या वर्णाच्या स्त्रियांनी काळ्या स्त्रियांचे प्रश्न वेगळे असतात, असे मत मांडले आहे. या चळवळींमुळे आफ्रिकन वंशाच्या अमेरिकन स्त्रिया भारताच्या संदर्भात दलित स्त्रिया, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील स्त्रिया अशा आजवर दुर्लक्षित गटांतील स्त्रियांच्या प्रश्नांकडे १९९० नंतर विशेष लक्ष दिले जात असल्याचे पहावयास मिळते. उदा. सार्वजनिक ठिकाणे, कार्यालये, कुटुंबात होणारे स्त्रीचे लैगिंक शोषण, आर्थिक, सामाजिक शोषण इत्यादी.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - स्त्रीवादी चळवळीचे बदलते स्वरुप चर्चा करा.

६.३ भारतातील महिला चळवळींचे स्वरुप :

भारतातील महिला चळवळींच्या संदर्भात अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, भारतात पूर्वीपासूनच महिलांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. सर्व बांजूनी तिचे शोषण होत आहे. यापासून स्त्रियांची मुक्ती होण्यासाठी भारतात १९व्या शतकापासून समाजसुधारकांनी व स्त्रियांनी चळवळी सुरु केलेल्या दिसून येतात. उदा. राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, केशवचंद्रसेन ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोदावरी परुळेकर, अनुताई वाघ इत्यादी यासारख्या समाजसुधारकांनी चळवळींच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये जागृती घडवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. १९३२च्या सुमारास अनेक स्त्रियांच्या संघटना निर्माण झाल्या असल्या तरी राष्ट्रीय पातळीवर "नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन आणि विमेन्स इंडिया असोशिएशन" या संस्था स्त्रियांच्या हक्कांसाठी कार्यरत आहेत.

१८२८ मध्ये राजा राममोहन रॉय ब्राम्होसमाजाची स्थापना करुन सती प्रथेच्या विरोधात चळवळ निर्माण केली. १९२९ मध्ये सतीप्रथा बंदीचा कायदा केला. तसेच बालविवाह बंद करण्यासाठी व विधवांचे पुनर्विवाह व्हावेत यासाठी समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा बनविण्यात आला. केशवचंद्रसेन यांच्या प्रयत्नातून १८७२ मध्ये विशेष विवाह कायदा लागू झाला. त्यामुळे विधवा पुनर्विवाह व आंतरजातीय विवाहास मान्यता मिळाली.

याप्रमाणेच रमाबाई रानडे, मॅडम कामा, नोरदत्त, मारग्रेट नोबेल या महिलांनी तसेच अखिल भारतीय महिला संमेलन, भारतीय महिला समिती, विद्यापीठ महिला संघ, अखिल भारतीय स्त्री शिक्षण संस्था, कस्तुरबा गांधी स्मारक ट्रस्ट इत्यादी संघटना यांनी स्त्रियांना अधिकार प्राप्त करण्यासाठी व त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी अविरत प्रयत्न केलेत. महात्मा गांधी स्त्री-पुरुष समानतेचे समर्थक होते. स्त्रियांनी राष्ट्रीय आंदोलनात भाग घ्यावा याकरिता महात्मा गांधी यांनी त्यांना प्रोत्साहित केले.

१९व्या शतकात स्त्रीमुक्तीचा पाया समाजसुधारकांनी घातला असला तरी तो सर्वसामान्य स्त्रियांपर्यंत पोहचविण्याचे कार्य महात्मा गांधी यांनी केले. १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या लढ्यात हजारो स्त्रियांनी प्रतिसाद दिला. परिणामी स्त्री-पुरुष मतभेद विसरुन स्वातंत्र्याच्या चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी झालेत. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. त्या लढ्याचे स्वरुप "करेंगे या मरेंगे" असे होते. यामुळे स्त्रियांना कमी लेखण्याचा विचार कोणीही केला नाही. १९व्या शतकाच्या सातव्या दशकात "विमेन लिंब" ही चळवळ सुरु होती. स्त्री मुक्ती हा चळवळीचा उद्देश होता.

महाराष्ट्रात देखील पंडिता रमाबाई यांनी महिला समाजाची स्थापना केली. १८९२ मध्ये स्त्रियांसाठी सुधारणावादी कार्यक्रम राबविला. रमाबाई रानडे, काशिबाई कानिटकर, आनंदीबाई जोशी यांनी स्त्री शिक्षणाचा अर्थ सामाजिक परिवर्तन असा घेऊन सामाजिक कार्यक्रम सुरु केले. महाराष्ट्रात स्त्रियांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे तसेच कर्मठ समाज व्यवस्थेविरुध्द लढा पुकारुन स्त्रियांवरील अत्याचार, रुढी, परंपरेच्या शृंखला तोडण्याचे धाडस सावित्रीबाई फुले यांनी केले. खऱ्या अर्थाने त्यांना स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या म्हटले जाते. स्त्री म्हणजे भोग वस्तू, पायाची दासी, नरकारचे द्वार अशा कल्पा समाजरुढ असलेल्या कालखंडामध्ये सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्तीसाठी केलेले कार्य प्रचंड आहे. स्त्रियांकरिता शिक्षणाची दारे मोकळी करुन अज्ञानाच्या गुलामगिरीतून मुक्त करणे हे त्याचे स्त्रीमुक्तीचे प्रथम कार्य होते. सुशिक्षित स्त्रीच स्वत:वरील अन्याय हिमंतीने दूर करु शकते. याची जाणीव त्यांना झाली, स्त्रियांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचाराला त्यांचे अज्ञानच कारणीभूत आहे, हे त्यांनी ठामपणे मांडले, म्हणून त्यांनी "भगिनींनो साक्षर व्हा आणि निर्भय व्हा" हा संदेश त्यांनी दिला स्वत:च्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली व समाजाकडून अडलेल्या स्त्रियांना जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. विधवाना आसरा दिला, विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी सभा स्थापन केली. यामध्ये स्त्री शिक्षण, स्त्रीयांवरील अत्याचार यावर चर्चा होऊन उपाय सुचविले जात होते. यासारखी कार्य करणारी ही पहिलीच संघटना होती. पतीच्या मृत्युनंतर सावित्रीबाईंनी आपल्या पतीच्या चितेला

स्वत: अग्नी दिली व स्त्री-पुरुष विषमतेला त्यांनी दिलेले हे जळजळीत उत्तर होते. यापेक्षा स्त्रीमुक्तीचे क्रांतीकारक उदाहरण दुसरे कोणते असू शकते.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांवरील होणारे अन्याय, अत्याचार याविरुध्द लढण्याची शक्ती स्त्रियांमध्ये निर्माण केली. तसेच सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून ती मुक्त व्हावी. ती स्वावलंबी बनावी याकरिता कार्य केले. पण हीच चळवळ स्वातंत्र्यानंतर देखील चालू असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यानंतर स्त्री-पुरुष समान या तत्वावर भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली. १९४५ साली युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन ही संस्था स्थापन झाली. या संस्थेने १९४८ साली मानवाच्या मूलभूत हक्कांचा विचार करुन "मानवी हक्कांची सनद" तयार केली. १९६५ ते १९७० या काळात स्त्रीयांना मिळणारी विषमतेची वागणूक आणि सामाजिक विकासाच्या कार्यात तिला कसे सामावून घेता येईल, याबाबत विविध स्तरावर चर्चा करण्याकरिता चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले गेले. या वर्षात राष्ट्रां-राष्ट्रांतील स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अन्याय जाणून घेऊन त्यांच्या प्रगतीच्यादृष्टीने विविध योजना तयार करुन त्या राबविण्यात आल्या. या वर्षातच १९ जून ते २ जुलै, १९७५ मध्ये पहिली जागतिक महिला परिषदेचे आयोजन मेक्सिको येथे करण्यात आले. या परिषदेमध्ये महिलांची साक्षरता, रोजगार, समानसंधी, स्त्री-पुरुष भेदभावाचे उच्चाटन, आरोग्य सेवांमध्ये संधी, नागरिक, सामाजिक व राजकीय हक्कांमध्ये समानता, स्त्री संघटनांना प्रोत्साहन, ग्रामीणभागासाठी तंत्रज्ञान व आधारभूत सेवांचा विकास आणि धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग इत्यादी उद्दिष्ट्ये समोर ठेवून चर्चा करण्यात आली.

दिनांक २५-२६ ऑक्टोबर, १९८० रोजी श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाने निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत महिलांची परिषद घेतली. या परिषदेमध्ये महिलांवर होणाऱ्या बलात्कार आणि अत्याचार यावर चर्चा करण्यात आली. १९८० मध्ये पुण्यात असंघटीत महिला कामगारांचा प्रश्न हाती घेण्यात आला होता. नागपूरमध्ये डॉ. रुपा कुलकर्णी यांनी मोलकरीण संघटना स्थापन करुन त्यांना योग्य सेवाशर्ती आणि माणुसकीची वागणूक मिळावी याकरिता लढा पुकारला. १९८१ मध्ये महिला आयोग स्थापन व्हावा याकरिता लोकसभेत बिल सादर करण्यात आले आणि जानेवारी १९९२ मध्ये स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाची थोडक्यात कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्त्रियांनी राज्यघटनेने व इतर कायद्यांनी मिळणाऱ्या संरक्षण संदर्भातील सर्व मुद्यांचे परिक्षण व संशोधन करणे.

२) कायदेशीर उपाययोजनांची शिफारस करणे.

३) स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी सल्ला देणे व तशा प्रकारच्या योजना आखणे तसेच त्यामध्ये सहभागी होणे.

४) शैक्षणिक व गुणवत्ता वाढीचे स्त्रियासाठी संशोधन हाती घेणे जेणेकरुन त्यांच्या गुणवत्तेस वाव मिळून त्यांचा विकास होईल.

५) स्त्रियांच्या बाबतीत घडणाऱ्या हिसांचाराची दखल घेऊन अशा घटना सक्षम अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणणे.

या राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवरच महाराष्ट्रात देखील १९९३ मध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र, कर्नाटकातील देवदासींचा प्रश्न बाबा आढाव यांनी समाजासमोर मांडला. परित्यक्ता स्त्रिया व अत्याचारित स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याचे भरीव कार्य सीमा साखरे या महिलेने केले. इ.स २००१ मध्ये शासनाने सुधारित महिला धोरण जाहीर केले. या धोरणांमध्ये महिला संरक्षण, महिलांना केंद्रस्थानी धरुन योजनांचे नियोजन करणे महिला ग्रमासभा इत्यादींवर भर देण्यात आला. स्वयंसहाय्यता गट निर्माण करुन त्यातून महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशाप्रकारे महिलांचे विविध प्रश्न, समस्या सोडविणे, तसेच महिलांचे सक्षमिकरणाकरिता वरील चळवळ, संघटना व आयोगांमार्फत प्रयत्न करण्यात आलेले दिसून येतात. महिलांच्या समस्या विकासाच्या संदर्भात कार्य करणाऱ्या काही महिला चळवळी या संघटना पुढीलप्रमाणे दिसून येतात.

- द व्हिन्डिकेशन ऑफ राईटस् ऑफ वुमन.
- सेनेका फॉल्स परिषद.
- नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन इन इंडिया.
- अखिल भारतीय महिला परिषद.
- देशसेविका संघ.
- कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट.
- स्त्री झोरोस्ट्रीयन मंडळ.
- आर्य महिला समाज - भगिनी समाज.
- महिला बचत.

याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात लहान-मोठ्या महिला संघटना कार्यरत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महिला संघटनांनी निरनिराळ्या क्षेत्रातील, विविध प्रश्न, समस्या, अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा इत्यादी विषयी तीव्र स्वरुपाचा लढा दिला व त्यासंदर्भात कायदे देखील तयार करण्यात आलेले आहेत. यामुळे स्त्रियांना कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले. एकंदरीत आज महिलांमध्ये आपल्या न्यायहक्कांविषयी जागृती होत आहे.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न : भारतातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप याविषयी चर्चा करा.

६.४ भारतातील स्त्रियांचा राजकीय सहभाग :

भारतीय राजकारणात स्त्रियांचा सहभाग याविषयी अभ्यास केला असता असे आढळून येते कि, भारतात मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचा राजकीय सहभाग दिसून येतो. राजघराण्यातील स्त्रिया आपल्या कुटुंबाच्या नावासाठी व सत्तेसाठी राजकारण करीत होत्या. काश्मिरच्या राण्या सुगंधा व दिग्धा या राजकारभार करण्याबद्दल प्रसिध्द होत्या. दिल्लीची सुलताना रझिया, महाराष्ट्रातील चांदबीबी यांनी उत्तम राजकारण केले. जिजाबाई यांच्या मार्गदर्शनामुळेच शिवाजी महाराज यांना स्वराज्याचे तोरण बांधता आले. शिवाजी महाराज यांची सून ताराबाई हिने कोल्हापूरला छत्रपतींची दुसरी गादी स्थापन केली. तसेच अहिल्याबाई होळकर, उमाबाई दाभाडे यांनी आपल्या जहागिरी बद्दलचा उत्तम शासन कारभार चालविला. शिवकालीन व पेशवेकालीन स्त्रियांनी आपल्या मुलांना राजकीय शिक्षण देण्याचे पायाभूत काम केले आहे. पेशवाई गेल्यानंतर इंग्रजांविरुध्द जे उठाव झाले. त्यामध्येही स्त्रियांचा राजकीय सहभाग आहे. उदा. झाशीची राणी लक्ष्मीबाई, लक्ष्मीबाईनीं जगातील पहिली स्त्रियांची लढावू तुकडी तयार केली.

अवधचा नबाब वजिदअली याला इंग्रजांनी नबाब पदावरुन काढून टाकले व त्याला कलकत्याला पाठविले. त्याची पत्नी बेगम हसरत महल आपल्या पाच वर्षांच्या मुलाला घेऊन ती लखनौलाच राहिली. इंग्रजांशी युध्द करणे तिने पसंद केले. सन १८५८ साली व्हिक्टोरिया राणीने भारतातील राज्यकारभाराबाबतचे धोरण जाहीर केले. त्याला राणीचा जाहीरनामा असे म्हणतात. या जाहीरनाम्याचा डाव ओळखून बेगम हसरत महलने स्वत: राणीच्या जाहीरनाम्याला उत्तर दिले व दासीपदावरुन नबाबचे पद तिला का मिळाले हे आपल्या लक्षात येते. यावरुन तिच्या चाणाक्षपणाची व राजकारण धुरंधरत्वाचे गुण लक्षात येतात. नानासाहेब पेशवे व तात्या टोपे हे देखील शेवटी तिच्या आश्रयाला गेले होते. बेगम हसरत महल शेवटपर्यंत इंग्रजांना सापडली नाही. दिल्लीचा शेवटचा बादशहा बहादूरशहा याची पत्नी बेगम झीनत महल हिने १८५७ च्या

बंडाच्या वेळी धोरणीपणाने दिल्लीच्या तख्ताचा सांभाळ केला. उत्तरेकडील सर्व नबाब बंडवाल्यांना तिने मार्गदर्शन केले. याच काळात दक्षिणेकडील नरगुंदकर राण्या, नागपूरची बकाबाई भोसले, बयाजीबाई शिंदे, कोल्हापूरची बाईसाहेब राणीसरकार या सर्वांनी राजकारणात सक्रिय भाग घेतला होता. यावरुन राजकारण करणाऱ्या अनेक स्त्रिया १८ व १९ व्या शतकात होऊन गेल्याचे आढळून येते. या स्त्रियांचे राजकारणातील चाणाक्षपणाचे कौतुक त्यांच्या शत्रूंनाही केले आहे.

भारतात इंग्रजांचे आगमन होण्यापूर्वी राजकारण करणाऱ्या स्त्रियांची संख्या ही राजघराण्यातल्या स्त्रियांपुरतीच मर्यादित होती. सर्वसामान्य स्त्री ही राजकारणापासून लाखो मैल दूर होती. इंग्रजांच्या काळातच भारतीय स्त्री ही राजकारणात आली. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या निमित्ताने भारतीय राजकारणात येण्याची संधी स्त्रियांना मिळत गेली.

सन १८९२ च्या काँग्रेस अधिवेशनाला पंडिता रमाबाई यांच्या बरोबरच बंगाल व महाराष्ट्रातून एकूण दहा स्त्रिया प्रथम काँग्रेस अधिवेशनाला गेल्या होत्या. १९२० पर्यंत काँग्रेसच्या अधिवेशनाला रमाबाई रानडे व विदर्भातील यशोदाबाई जोशी या दोघी सातत्याने हजर रहात होत्या. महात्मा गांधीच्या आगमनानंतर राजकीय कार्यात असलेल्या अनेक स्त्रियांचे प्रेरणास्थान महात्मा गांधीच होते. परदेशी कापडाच्या होळ्या, दारुच्या दुकानांवर निदर्शने, झेंडा वंदन, मिठाचा सत्याग्रह, जंगलचा सत्याग्रह या सर्व राजकीय कार्यक्रमात शेकडो स्त्रियांनी भाग घेतला. एवढेच नव्हे तर तुरुंगातही गेल्या.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीनंतर अनेक सुशिक्षित मुलींनी आजन्म कार्याला वाहून घेतले. १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह व १९४२ चा अखेरचा चलेजावचा लढा यात हजारोंच्या संख्येने भाग घेतला होता. तुरुंगात राजकीय विचारसरणीचा अभ्यास केला. या स्त्रियांत तरुण मुलींची संख्या सर्वांत जास्त होती. तुरुंगातून बाहेर आल्यावर पुढे काय? हा प्रश्न प्रत्येकीने आपल्या पध्दतीने सोडविला. कुणी शिक्षण क्षेत्रात गेल्या, कुणी राष्ट्रसेवा दलात, कोणी पक्ष पध्दती अनिवार्य आहे म्हणून काँग्रेस व कम्युनिस्ट पक्षात काम करु लागल्या. सरोजिनी नायडू, हंसा मेहता, अम्मू स्वामीनाथन आणि उत्तरेकडच्या एक-दोन मुस्लिम कार्यकर्त्या केंद्रीय विधिमंडळावर निवडून गेल्या. तसेच सुमिताबाई गोरे, लक्ष्मीबाई ठुसे यांनी महाराष्ट्रातील विधानसभेत आवाज उठविला होता.

स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहासाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद या सभागृहांमध्ये अर्थात कायदेमंडळामध्ये स्त्रियांचे प्रमाण मात्र अगदीच कमी आहे. जागतिक तुलना करता जगात सर्वात जास्त स्त्री सदस्यांची संख्या स्विडन - ४० टक्के, न्युझीलंड - २९.२ टक्के, अर्जेंटिना - २५.३ टक्के, चीन - २१ टक्के या तुलनेत भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रमाण सरासरी ६ ते ७ टक्के इतके कमी आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा सहभाग फारच अल्प आहे. एकूणच लोकसभेतील सदस्य संख्येच्या तुलनेत स्त्रियांची संख्या ५० च्या आतच दिसून येते. मात्र १९९९ च्या लोकसभेत ती सर्वात जास्त

म्हणजे ४८ इतकी होती. हे प्रमाण आता हळूहळू वाढत आहे. परंतु ही वाढ समाधानकारक नाही कारण, देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास अर्ध्या स्त्रिया आहेत. या तुलनेत महिला प्रतिनिधींची संख्या मात्र अल्प महिलांना उमेदवारी दिली जात नाही. परंतु राज्यसभेवर पाठवितांना देखील निर्णय राजकीय पक्षांच्या हाती आहे. स्त्री ऐवजी पुरुषांनाच प्रतिनिधित्व दिले जाते. यावरुन राजकारणातील लिंगभेद दिसून येतो.

विधीमंडळातील सहभाग :

देशाच्या सर्वच घटक राज्यातील स्त्रियांचा विधीमंडळातील सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमीच आहे. उदाहरणार्थ महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचारांचे राज्य समजले जाते. परंतु या राज्याच्या विधीमंडळामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण फारच कमी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या निवडणुकांमध्ये विधिमंडळातील स्त्रियांचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून येते. १९५७ च्या विधानसभेत ३० स्त्रिया विधानसभा सदस्य म्हणून निवडून आल्या. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून सार्वत्रिक निवडणुकांमध्ये महिला प्रतिनिधींची संख्या पुरुष प्रतिनिधींपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत २८ महिला प्रतिनिधी निवडून आल्या. तर पुढील निवडणुकीत स्त्री प्रतिनिधींची संख्या नऊ होती. १९९० मध्ये फक्त सहा महिला प्रतिनिधी निवडून आल्या तर, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत १० महिला प्रतिनिधी म्हणून निवडून आल्या. यावरुन असे लक्षात येते कि, स्त्रियांचे राजकीय सहभागचे प्रमाण फारसे समाधानकारक नाही.

एकंदरीत वरील प्रमाणे चित्र असले तरी महाराष्ट्र शासनाने नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीलाच महिला धोरण जाहीर केले. स्त्रियांच्या सबलीकरणाचा विचार प्रथम महाराष्ट्र शासनाने केला. त्यातूनच स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक बिनविरोध मंजूर केले. तसेच १९९२ मध्ये ७३ वी घटना दुरुस्ती करुन तिची २४ एप्रिल, १९९३ पासून अंमलबजावणी सुरु झाली. या दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सरसकट ३३ टक्के आरक्षण मिळाले. यापुढे महिलांचा राजकीय सहभाग वाढण्यास मदतच झाली व गेल्या वीस वर्षात ग्रामीण स्त्रियांमध्ये राजकीय जागृती झपाट्याने होत आहे. ही राजकीय सहभागाची जमेची बाब आहे.

एकंदरीत देशाच्या कायदेमंडळात आजगी स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत फारच कमी आहे. ही खेदाची बाब आहे असे असले तरी ज्या स्त्रियांना कायदेमंडळात जाण्याची संधी मिळाली. त्यांनी आपल्या गुणांनी स्वत:का कर्तव्यतत्पर असल्याचे सिध्द करुन दाखविले आहे. समान संधी मिळाल्यास स्त्रिया देखील पुरुषांपेक्षा कोणत्याही गोष्टीत कमी नाहीत हे त्यांनी आपल्या कृतीतून वेळोवेळी दाखवून दिले असे कर्तव्यदक्ष महिलांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

अरुणा असफ अली, मणी बहेन, मीठु बहेन, खुशिंद बहेन, पेरिन बहेन, मादाम कामा, रमाबाई रानडे, मृणालताई गोरे, प्रमिलाताई दंडवते, अनुताई लिमये, डॉ. मथ्थुलक्ष्मी रेड्डी, इंदिरा गांधी, लक्ष्मी मेनन, हंसा मेहता, तारकेश्वरी सिन्हा, विजयाराजे शिंदे, मनेका गांधी, मार्गारेट अल्वा, सुभद्रा जोशी, डॉ. नजमा हेपतुल्ला, राजकुमारी अमृत कौर, विजयालक्ष्मी पंडित, सुचेता कृपालानी, सोनिया गांधी, मायावती, सुषमा स्वराज्य, उमा भारती, जयललिता, ममता बॅनजी व राष्ट्रध्यक्ष प्रतिभाताई पाटील इत्यादी मजहिलांनी आपल्या गुणांनी विधीमंडळावर एक वेगळीच छाप पाडलेली दिसून येते.

६.५ सारांश :

स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते कि, एकेकाळी "स्त्रीला चूल आणि मूल" या मर्यादेतच रहावे लागत होते. पुरुष प्रधान संस्कृती असलेल्या समाजात अन्याय-अत्याचाराला बळी ठरणारी स्त्री आणि आज एकविसाव्या शतकात असणारी स्त्री निश्चितच बदल झालेला जाणवतो. अर्थात याचे सर्व श्रेय स्त्री हक्कांसाठी लढणाऱ्या स्त्री चळवळी, विविध संघटना, समाजसुधारक यांना जाते. यांनी केलेल्या प्रयत्नांचे हे फळ आहे. अर्थात असे असले तरी आजच्या आधुनिक युगात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने जे स्थान मिळायला हवे ते मिळत नाही. ही एक शोकांतिका आहे असेच म्हणावे लागेल म्हणून जगाच्या विकासात वा समाजाच्या विकासात स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या दृष्टीने स्त्रियांना संधी देणे गरजेचे आहे. ही गोष्ट सहज शक्य आहे. याकरिता गरज आहे ती फक्त सामाजिक व राजकीय इच्छा शक्तीची असे झाले तरच खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता निर्माण होईल.

६.६ प्रश्न :

१) स्त्रीवादी चळवळींचा उदय आणि विकास विशद करा.

२) स्त्रीवादी चळवळीचे बदलते स्वरुप चर्चा करा.

३) भारतातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप स्पष्ट करा.

४) भारतातील स्त्रियांचा राजकीय सहभाग परिक्षण करा.

टीपा :

१) भारतातील स्त्रीवादी चळवळ.

२) भारतीय राजकारणात स्त्रियांचा सहभाग.

३) स्त्रीवादी चळवळीची उद्दिष्ट्ये.

* * *

७

दहशतवाद

७.१ उद्देश

७.२ प्रस्तावना

७.३ दहशतवादाचा अर्थ स्वरुप

७.४ दहशतवादाचे प्रकार

७.५ राज्यप्रणित दहशतवाद

७.६ राज्यविरोधी दहशतवाद

७.७ एकविसाव्या शतकातील दहशतवादाचे नवे प्रवाह

७.८ दहशतवादाशी लढा

७.९ शांतता चळवळ

७.१० सारांश

७.१ उद्देश :

दहशतवादाचा अर्थ, निर्मिती व स्वरुप पहाणे त्याचबरोबर दहशतवादाचे प्रकार, राज्यप्रणित दहशतवाद, राज्यविरोधी दहशतवाद, एकविसाव्या शतकातील दहशतवादाचे नवे प्रवाह व दहशतवादाविरुध्द लढा आणि शांततावादी चळवळींचा अभ्यास करणे.

७.२ प्रस्तावना :

आज संपूर्ण जगात जागतिकीकरणाचे वारे वाहताना आढळते. प्रत्येक घटकाचे या प्रक्रियेत जागतिकीकरण होत आहे. तसेच दहशतवाद हा सुध्दा आता काही देशांतील प्रश्न न राहता ही समस्या सुध्दा जागतिक झाली आहे. गेल्या २०-२५ वर्षात भारतातील जवळपास सर्व मोठी शहरे या दहशतवादाच्या छायेखाली आली आहेत. पण हा विषय सुध्दा आता भारतापूरता सिमीत राहीला नसून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात ही दहशतवादाची पाळेमुळे घट्ट होत आहेत. अमेरिका, इंग्लंड वरील हल्ल्यामुळे अनुक्रमे "अल कायदा" व "सिक्रेट ग्रुप ऑफ अल कायदा" या अतिरेकी संघटना विश्वात परिचित झाल्या. अमेरिकन सर्वेक्षणानुसार जगात ३७२ अतिरेकी संघटना आहेत. पण दहशतवादी संघटनांच्या सुचित अमेरिकेने २८ संघटनांचाच फक्त उल्लेख

केलेला आहे. पण १३ डिसेंबर, २००१ रोजी झालेल्या भारतीय संसदेवरील हल्ल्यानंतर या कारवाहीत गुंतलेल्या "लष्कर-ए-तोयबा" व "जैश-ए-महंमद" या संघटनांचा १३ दिवसांनी भारताच्या दबावामुळे दहशतवादी संघटनांच्या यादीत समावेश केला.

गेल्या २० वर्षात दहशतवादी प्रक्रियेने लोकशाही राज्यव्यवस्था लुळीपांगळी केली आहे. राजेशाहींनी शरणागती पत्कारली आहे. शासनव्यवस्था कोलमडली आहे. राजकारणी चिंताग्रस्त झाले आहेत. तर सर्वसामान्य नागरिक भांबावलेला आहे, असा दहशतवादाचा आहे. या मानवतेच्या शत्रूचा प्रताप! त्यामुळे बिहार, ईशान्य भारताची प्रगती ठप्प झाली आहे. उद्योगपती, उद्योगधंदे बंद करत आहेत. श्रीलंका, नेपाळ, इराक, अफगाणिस्तान, पॅलिस्टीन, बिहार राज्य ही याची चालती-बोलती उदाहरणे आहेत.

७.३ दहशतवादाचा अर्थ - स्वरुप :

व्याख्या (Definition) :

दहशतवाद म्हणजे काय? दहशतवाद या शब्दात शेवटी वाद असा शब्द येतो. हा शब्द समाजवाद, साम्यवाद व हिंदुत्ववाद या शब्दांमध्ये देखील येतो. त्यामुळे दहशतवाद ही देखील एखादी विशिष्ट विचारप्रणाली असेल असे वाटते. पण ती एक विचारसरणी नाही कारण, त्यात विचार करणाऱ्यांना स्थान नाही असे दिसते. मात्र सर्व दहशतवादी संघटनांचा विचारपूर्वक अभ्यास केल्यास असे दिसून येते कि, प्रत्येकाचे साध्य वेगळे असले तरी दहशतीचेच साधन वापरले जात आहे. ढोबळ मानाने त्याची व्याख्या करावयाची म्हटल्यास "हिंसेच्या किंवा दहशतीच्या मार्गाने आपले ईस्पित साध्य करुन घेणे म्हणजे दहशतवाद होय." राज्यशास्त्र शब्दकोशानुसार "आमुलाग्र राजकीय व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनैतिक, नियमबाह्य मार्गाचा वापर करण्याचा कृत्यास दहशतवाद मानणे."

या दहशतवादाची व्याख्या प्रत्येक राज्याच्या राजकीय परिस्थितीप्रमाणे, घटकाप्रमाणेच बदलतात. संयुक्त राष्ट्र संघटनेत तीन गट आहेत. तिसऱ्या जगातील राज्यांचा गट, साम्यवादी राज्यांचा गट, पश्चिमेकडील राज्यांचा गट या तिन्ही गटांचे व्याख्येबाबत एकमत नाही. नामीबियातील (Namibia) स्वापो बंडखोरांना दक्षिण आफ्रिका दहशतवादी मानते. तर तिसऱ्या जगातील राष्ट्रे त्यांना स्वातंत्र्यसैनिक मानतात. साम्यवादी निकाराग्वा सरकारला विरोध करणाऱ्या लेपीरी ना अमेरिकन सरकार स्वातंत्र्यसैनिक मानते. पण त्यांची कृत्ये खतरनाक दहशतवाद्यांसारखीच आहेत. पाकिस्तानच्या मते "मकबुल भट्ट" हा स्वातंत्र्यसैनिक होता तर भारतात त्याला दहशतवादी म्हणून कठोर शिक्षा ठोठावण्यात आली.

खरी अडचण फ्रान्स या देशाची आहे. स्वातंत्र्य समता बंधुभाव या त्रयींचा घोष करणाऱ्या व राजकीय निर्वासितांना आश्रय देणाऱ्या फ्रान्सला, देशात राजकीय

आश्रय घेणारे व दहशतवादी यांच्यात कसा फरक करावा ही एक फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. फ्रान्सच्या राज्यघटनेमुळे ही समस्या बिकट झाली आहे. व्याख्या करण्याकरिता सिनेट कमिटीने १७ मे, १९८४ रोजी अहवाल सादर केला. पण त्यात व्याख्या मात्र आढळून आली नाही. व्याख्या करण्याबाबत अडचणी लक्षात घेऊन काही महत्त्वाच्या व्याख्या देण्यात आल्या आहेत.

संयुक्त राष्ट्र संघटनेत ९२ वे कलम म्हणून या प्रक्रियेचा उल्लेख करण्यात येतो व यावर चर्चा केली जाते. गमतीची गोष्ट म्हणजे दहशतवादाचा अधिकृत उल्लेख न करताच चर्चा करण्यात येते. कलम ९२ पुढीलप्रमाणे -

Measure to prevent international terrorism, which endangers or takes innocent human lives or jeopardizes fundamental freedom and study of the underlying causes of those forms of terrorism and acts of violence, which lie in misery, frustration grievance and despair and which causes some people to sacrifice human lives including their own in an attempt to effect radical changes.

मराठी अर्थ :

१. ज्यामुळे निष्पाप माणसाला जीविताला धोका निर्माण केला जातो किंवा वेळप्रसंगी प्राण पण हरण केले जातात किंवा मूलभूत स्वातंत्र्य धोक्यात आणले जाते, अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादविरुध्द उपाय योजना करणे.

२. त्याचप्रमाणे दारिद्र्य, वैफल्य, दु:ख आणि निरोशा यातून निर्माण होणाऱ्या हिंसाचाराच्या आणि दहशतवादाच्या प्रकारांचा अभ्यास.

३. त्याचप्रमाणे काही माणसे झटपट आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याकरिता स्वत:चा व इतरांचा बळी देताना यातून निर्माण होणाऱ्या दहशतवादाचा आणि हिंसाचाराचा अभ्यास.

जॉन क्रेटमची व्याख्या :

१) Terrorism is a violent criminal behaviour designed primarily to generate fear in the community or substantial segment of up far political purpose.

अर्थ : राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिता समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भीती आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी वर्तवणूक म्हणजे दहशतवाद होय.

२) Terrorism is an attempt to acquire or maintain power or contract by intimidation, by instilling a fear of destruction or helplessness in the object of terrorism.

अर्थ : दहशतवाद हे कृत्य अशाप्रकारचे कृत्य आहे कि, त्यामुळे अतिरेक्यांची लक्ष्य बनलेल्या व्यक्तीत असाहाय्यता किंवा विनाशाची भीती निर्माण करुन सत्ता राखण्याचा किंवा सत्तेवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होय.

अमेरिकन कायदेमंडळाने १९५४ साली एक कायदा संमत करुन दहशतवादाची व्यापक व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

३) Terrorism is the threat or use of violence for political purposes by individual groups, whether acting far or in opposition to established government authority. When such actions are intended to shock stun or intimidate target group wider than immediate victims.

अर्थ : राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिता काही व्यक्तिगत गटांनी प्रस्थापित शासकीय अधिकाऱ्यांच्या बाजूने अगर विरुध्द कारवाई करताना दहशतीचा अगर हिंसाचाराचा केलेला वापर म्हणजे दहशतवाद होय. त्यावेळी अशी कारवाई, शिकार बनलेल्या जवळच्या व्यक्तीऐवजी अन्य गटाला धक्का देण्याकरिता किंवा त्याची शुध्द हरपण्याच्या उद्देशाने केलेली असते.

दहशतवादाच्या निर्मितीचे सामान्य घटक :

१. **ऐतिहासिक घटक -** काश्मीर, पॅलेस्टाईन यासारख्या भागात इतिहासातून निर्माण झालेले प्रश्न दहशतवाद निर्माण करतात.

२. **सामाजिक घटक -** बिहार, उत्तरप्रदेशसारख्या राज्यात सामाजिक परिस्थितीमुळे सवर्ण विरुध्द दलित अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे दहशतवाद पसरु लागतो.

३. **आर्थिक घटक -** ब्रिटिश राजवटीपासून जमिनदारी हा प्रकार जोर धरु लागला.. त्यातून स्थानिक जनतेच्या जमिनी बळकावण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे स्थानिक जनतेतून नक्षलवादासारखे दहशतवादी प्रकार वाढले.

४. **धार्मिक घटक -** जगात विविध धर्म अस्तित्वात असले तरी यातील एखादा धर्म स्वत:का उच्च समजतो किंवा तसे सिध्द करण्याचा प्रयत्न करतो या प्रचारासाठी हिंसेचा वापर केला जातो किंवा एखाद्या धर्मावर अन्याय झाल्यास त्यातून दहशतवाद जन्मास येतो.

दहशतवादाचे स्वरुप :

अपहरण - एखाद्या किंवा अनेक व्यक्तींचे अपहरण करुन त्यांना ओलीस ठेवले जाते. शासन किंवा विरोधी गटाकडून आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या जातात. १९९० मध्ये केंद्रीय गृहमंत्री मुक्तीमहंमद सईद यांच्या कन्या महेबुबा मुक्ती यांचे अपहरण करुन

अफगाणिस्तानात बंदी करुन ठेवले होते. पाच जहाल अतिरेक्यांच्या सुटकेनंतर महेबुबा यांची मुक्तता केली. अशी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवर उदाहरणे आहेत.

स्वैर गोळीबार - सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी, बाजारपेठ, स्टेशन, मंदिर अशा ठिकाणी स्वैर गोळीबार करणे, बॉम्बस्फोट घडविणे. (२६/११/२००८ मुंबई, अक्षरधाम मंदिर) व अनेकांचा बळी घेणे.

बॉम्बस्फोट - रिमोट कंट्रोलद्वारे स्वतःला सुरक्षित ठेवून टाईमबॉम्बचा वापर केला जातो. (लोकल, बस, पनवेल सिनेमागृह येथील बॉम्बस्फोट ही त्याची ठळक उदाहरणे आहेत)

मानवी बॉम्ब - काही दहशतवादी अती प्रखर विचाराने भारावून स्वतःच्या जीवनाचा विचार न करता दहशतवादी कारवायांसाठी (राजीव गांधीची हत्या स्वतःचे जीवन कुर्बान करतात.)

वैज्ञानिक दहशतवाद - माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुरक्षा कवचाला, जीवतंत्रज्ञान, आण्विक, रासायनिक अस्त्रांचा वापर करुन शत्रूपक्षावर वैज्ञानिक प्रहार करण्याची तयारी काही दहशतवादी संघटना ठेवू लागले आहे.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - दहशतवादाच्या अर्थ स्वरुपाची कारणे सांगा.

७.४ दहशतवादाचे प्रकार :

१. **धार्मिक भावना प्रधान दहशतवाद -** धार्मिक व वांशिक भावनेने प्रेरित झालेल्या दहशतवादाचे प्रमाण वाढत चालले आहे. या दहशतवादाला जबाबदार घटकांमध्ये आर्थिक अल्पसंख्याकांना वाटणारी असुरक्षितता, बहुसंख्याकांकडून होणारे अत्याचार, सांधिक राष्ट्रवाद, स्वतंत्र ओळख गमाविण्याची भीती, सांस्कृतिक वसाहतवादातून पश्चिम संस्कृतीचा वाढता प्रसार यांचा समावेश होतो. धार्मिक मुलतत्ववादातून "अलकायदा" व "हिजबुल" सारख्या संघटना विकसित होत आहेत.

२. **राज्यपुरस्कृत दहशतवाद -** देशांतर्गत विरोधकांचा नाश करण्यासाठी राज्यकर्ते दहशतवादी मार्गाचा अवलंब करतात. हा राज्यपुरस्कृत दहशतवादाचा प्रकार मानतात. उदा. नाझी जर्मनीतील हिटलरचे धोरण, फॅसिस्ट इटलीमध्ये मुसोलिनीचे धोरणे, रशियातील स्टॅलिनचे धोरण हे याच प्रकारातील उल्फा, हिजबुल - मुजाहिद्दिन ही त्याची उदाहरणे आहेत.

३. **राज्यविरोधी दहशतवाद -** या प्रकारात तेथील सरकारविरुध्द दहशतवादी संघटना सक्रिय असतात. स्वातंत्र्यप्राप्ती किंवा स्वातंत्र्य, सार्वभौम राज्याची निर्मिती बऱ्याचवेळा दहशतवादाची उद्दिष्टे असतात. श्रीलंकेतील L.T.T.E. याचे उत्तम उदाहरण आहे. श्रीलंकेत स्वतंत्र तमिळराज्याच्या स्थापनेसाठी लिट्टेचा तेथील माजी पंतप्रधान राजीव गांधीच्या हत्येमागे लिट्टेचा सहभाग होता. तसेच "हमास" ही दहशतवादी संघटना स्वतंत्र पॅलेस्टाईन राज्याच्या निर्मितीसाठी इस्त्रायलविरुध्द दहशतवादी कारवाया करीत आहे.

४. **आंतरराष्ट्रीय दहशतवाद -** एकापेक्षा अनेक देशांत दहशतवादी कारवाया विस्तारल्यास त्यास आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त होते. अलकायदा सारख्या संघटनेचे जाळे एकापेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये पसरले आहे. (५० देशांत) व अनेक देशांना यापासून धोका निर्माण झाला आहे. सर्व इस्लामिक राष्ट्रांना एकत्र करुन एकसंघ इस्लामिक राजवट निर्माण करण्याच्या कल्पनेने प्रभावित झालेली ही संघटना या उद्दिष्टाच्या आड येणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला आपले शत्रू मानते. अलकायदाच्या हिटलिस्टवर अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान, स्पेन हे देश जाणवतात. ११/०९/२००१ रोजी अमेरिकेवरील हल्ला हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

दहशतवादाच्या निर्मितीची सामान्य कारणे -

दहशतवादी संघटना विविध देशांतील विविध काळात उदयास आल्या. पण साधारणतः त्यांच्या निर्मिती कारणांमध्ये बऱ्यापैकी साम्य दिसते. विषम आर्थिक व्यवस्था, दडपशाही आणि द्वेषाचे राजकारण, समाजातील काही घटक सर्व लाभांपासून वंचित राहणे, निकृष्ठ राहणीमान, साम्राज्यवाद तसेच नैसर्गिक व मानवानिर्मित समस्यांनी ग्रासलेल्या समाजाला याविरुध्द लढा देत असताना अपयश आल्याने निराशेपोटी किंवा बदला घेण्याच्या तिव्र इच्छेने अनेकजण अशा दहशतवादी संघटनेमध्ये सामिल झाले. जागतिकीकरण व तंत्रज्ञानाची सहजपणे होणारी उपलब्धता यामुळे दहशतवादास फार मोठी चालना मिळाली आहे. दहशतवादाच्या उत्पत्तीच्या कारणमीमांसा करताना विचारवंतांनी काही कारणे दिली. ती पुढीलप्रमाणे लोकशाही जीवनपध्दती व संस्थांचा अभाव, दलित, वांशिक, धार्मिक, अल्पसंख्यांकांच्या गाऱ्हाण्यांकडे, अडचणींकडे दुर्लक्ष, वाढती बेकारी, राज्याची त्यांच्याविषतीची असहिष्णुता व वैरभाव, प्रदेशाचा मागासलेपणा या सर्व कारणांमुळे दहशतवादाला खतपाणी मिळत जाते व शांतता आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजतात.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - दहशतवादाचे प्रकार चर्चा करा.

७.५ राज्यप्रणित दहशतवाद :

राज्यप्रणित दहशतवादी कृत्यांची संख्या व त्यात बळी पडलेल्यांची संख्या दहशतवादी गटांनी केलेल्या कृत्यांपेक्षा कितीतरी अधिक आहे. प्राचीन काळापासून राज्यप्रणित (राजकीय) दहशतवादाचे भूत कोणत्या ना कोणत्या स्वरुपात नागरिकांच्या मानगुटीवर बसले होते. वंशभेदावर आधारित शासनयंत्रणा राबविणाऱ्या डच व इंग्रजांनी तेथे साडे-तीनशे वर्षे राज्य केले, ते दहशतवादाच्या बळावरच, भारतावत राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनीही दहशतवादाचा स्वातंत्र्यसैनिकांविरुध्द उपयोग केला.

कौटिल्याच्या "अर्थशास्त्र" या ग्रंथात राज्य शत्रूविरुध्द धाकदपटशा, दहशत याचे तंत्र कसे, कोठे आणि केव्हा वापरावे व दहशतवादाची संभाव्य लक्ष्ये कोणती असू शकतात. याचे विवेचन आहे. राजकीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, सत्तापालट करण्यासाठी हे तंत्र गेली अनेक शतके वापरले जात आहे. अलीकडील काळात या तंत्राचा वापर करणाऱ्यांमध्ये सत्ताधिशांबरोबरच डाव्या व उजव्या विचारसरणीच्या क्रांतीकारी संघटना, वांशिक गट, सेना दले व गुप्तचर संघटना आदींचा प्रामुख्याने समावेश होतो. नाझी जर्मनीत ॲडॉल्फ हिटलर याने "एस एस" संघटनेचा ज्यूविरुध्द केलेला वापर तसेच रशियामध्ये जोसेफ स्टॅलिनच्या व नंतरच्या काळात "के जी बी" या गुप्तचर संघटनेने जनतेवर केलेल्या अत्याचारांचे वर्णन अलेक्झांडर सोहसेवित्सिन सारख्या अनेक विचारवंतांनी केले आहे. काहींनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्या सर्वांना राज्यप्रणित दहशतवाद असे म्हणता येईल.

एखाद्या देशाने दुसऱ्या देशाशी केलेले युध्द हे अर्थातच हिंसक असते. परंतु त्यास दहशतवाद मानले जात नाही. राज्याने केलेल्या युध्दात लष्कराची प्राणहानी आणि संपत्तीची हानी घडविणे हा मुख्य उद्देश असतो. त्यानिमित्ताने नागरी जनतेची जिवीत किंवा संपत्तीहानी होत असते. परंतु दहशतवादी कृत्यात मात्र नागरी जनता हे लक्ष असते राज्याने केलेली दहशतवादी कृत्ये विविध प्रकारची आहेत. जगातील अनेक राज्य दहशतवादी संघटनेला पैसा पुरवितात. तसेच कायदेशीर कारवाई पासून अभय दिले जाते. अर्थात या दोन्ही गुप्तपणे केल्या जातात. त्यावेळी "राज्यपुरस्कृत दहशतवाद" असे म्हटले जाते. राज्याच्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून परराज्यामध्ये लष्कराच्या मदतीने घडवून आणलेली घातपाती कृत्ये ही सुध्दा त्यामध्ये समाविष्ट आहेत. उदा. पाकिस्तानच्या (I.S.I.) या गुप्तचर यंत्रणेने माफियामार्फत घडवून आणलेली दंगल हे राज्यपुरस्कृत दहशतवादाचेच उदाहरण आहे. भारतात हा अनुभव नवीन असलातरी जागतिक राजकारणात राज्याने दहशतवादी कृत्यांना प्रोत्साहन द्यावे हे तंत्र प्राचीन काळापासून वापरले जाते.

१. अमेरिका :

अमेरिकेने दुसऱ्या महायुध्दात "हिरोशिमा" आणि "नागासाकी" या शहरांचा अण्वस्त्रांच्या मदतीने जो विध्वंस घडविला या कृत्याचा समावेश युध्द या सदराखाली न करता दहशतवादी कृत्य या सदराखाली केला जातो. कारण अमेरिका आणि जपान यांचे परस्परांचे घोषित युध्द नव्हतेच. जपानने अमेरिकेच्या मालवाहू बोटी पॅसिफिक

महासागरात बुडविल्या. त्याची प्रतिक्रिया म्हणून अण्वस्त्रांचा एवढा भिषण वापर? हे कृत्य निव्वळ जपानी हल्ल्याचा प्रतिसाद म्हणून एवढे मर्यादित नव्हते. अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांना धक्का लावल्यास अमेरिका कशा पध्दतीने बदला घेईल याची दहशत जपानच्याच नव्हे तर सर्व जगाच्या मनात निर्माण करण्यासाठी निष्पाप नागरी जनतेवर केलेला हा हल्ला दहशतवादी म्हणूनच ओळखला जातो. घातपाती कृत्ये करणाऱ्या बंडखोरांमार्फत दहशतवादी हल्ले घडवून आणले जातातच पण हिरोशीमामुळे निःशास्त्र जनतेचा व्यापक विध्वंस राज्याने घडवावा हा नवा पैलू दहशतवादाला प्राप्त झाला. अमेरिकेनेच १९६७ साली व्हिएतनाम या देशातील "ग्रामीण जनतेला" उध्वंस्त करण्यासाठी "एजंट ऑरेंज" नावाच्या रसायनाची फवारणी केली. त्यामुळे वनस्पतीचा फुलोरा नष्ट झाला. परिणामी अन्न-धान्य-फळे यांचे उत्पादनच अशक्य झाले. परिणामी दुष्काळी स्थिती निर्माण झाली. तसेच वनस्पतीवरीळ आणि पाण्यातील या विषारी वायूच्या तवंगामुळे जनावरे आणि माणसे यांच्या मज्जासंख्या प्रभावित झाल्या आणि दीर्घकालीन अपंगत्व त्यांना प्राप्त झाले. अशाप्रकारे बॉम्बस्फोट, रासायनिक अस्त्र अशाप्रकारच्या संहारकांच्याद्वारे अमेरिकेने सर्व जगावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. इराक व अफगाण वरील हल्ल्याला केवळ निमित्त शोधण्याचा अमेरिकेने प्रयत्न केला. प्रत्यक्षात तेलाच्या राजकारणातून स्वतःची अर्थव्यवस्था मजबूत करुन जागतिक स्तरावर दहशत पसरविण्याचा अमेरिकेने प्रयत्न केला. इराकवरील लष्करी हल्ला, सद्दाम हुसेन याला मृत्युदंड, अफगाणिस्तान मधील लष्करी कारवाई ही अमेरिकेच्या राज्यपुरस्कृत दहशत वादाचीच उदाहरणे आहेत.

२. फ्रान्स :

"मी म्हणजे राज्य" (I am the State) म्हणणारा फ्रान्सचा सम्राट चौदावा लुई याच राज्यप्रणित दहशतवादात मोडतो. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात नव्या युगाची पहाट होत होती. फ्रेंच राज्यकालीन स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा उद्घोष होत असतानाच दहशतीचे राज्य एखाद्या अक्राळविक्राळ राक्षसाप्रमाणे आ वासून उभे राहिले. रेविस्विअर व चांडाळ चौकशी यांनी शेकडो लोकांना गिलोटीनच्या द्वारे निर्दयीपणाने यमसदनास पाठविले. दुर्दैवी सोळावा लुई, राणी अन्तानवेन या निष्पाप जीवांचा बळी सुध्दा दहशतवादाच्या कुंडात पडला.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या ज्वाला विझतात तोच युरोपीय लोकशाही आणि उदारमतवाद यांचे वारे वाहू लागले. पण फ्रेंच राज्यक्रांतीनंतर दहशतवादाने युरोपला अधूनमधून हादरे दिले. नवीन राजघराणी उदयास आली. प्रजेला राजकीय हक्क बहाल करण्यात आले. या परिवर्तनात विद्यापीठीय विद्यार्थी, विचारवंत व मध्यमवर्गीय समाज यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रवाद, उदारमतवाद व क्रांतीकारक तंत्वज्ञानाचा प्रसार होऊ लागला. या सर्वांचा नेपोलियनच्या साम्राज्याला अर्थात कडवा विरोध होता. एकीकडे पुराणमतवादी तर दुसरीकडे कालखंडात १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात साम्यवाद, अराजकलावाद, नाझीवाद आणि फैसिस्टवादाचा प्रभाव जाणवू लागला. यामुळे राजकीय दहशतवादाला पुन्हा प्रोत्साहन मिळाले. याचाच परिणाम म्हणजे पहिले व दुसरे महायुध्द होय.

३. राज्यप्रणित दहशतवाद - महायुध्द :

राज्यप्रणित दहशतवादाचे प्रणेते हिटलर, स्टॅलिन, मुसोलिनी या नरराक्षसांचा याच काळात उदय झाला. त्यांच्या पाशवी, क्रुर, सैतानी कृत्यांनी सर्व जगाला जबरदस्त धक्का दिला. रक्ताचे पाट, प्रेतांचे ढिगारे, आक्रोश, यातना, अश्रू यांनी जागतिक वातावरण भयग्रस्त बनले व भविष्यकाळ धुसर दिसू लागला. या जनसंहारक दहशतवादातूनच पहिल्या व नंतर दुसऱ्या महायुध्दांचे बिजारोपण झाले. आक्रमक राष्ट्रवाद, संकुचित देशभावना हे विचार व कृती पराकोटीला पोहोचले व युरोपातील या स्थितीमुळे संपूर्ण जगाला महायुध्दाचे परिणाम भोगावे लागले.

दोन महायुध्दांचा अनुभव चित्तथरारक होता. अभूतपूर्व अशी प्राणहानी झाली होती. हिटलर, स्टॅलिन, मुसोलिनी याच्या पाशवी निघृण हत्याकांडाची खिन्न, उदास, काळीकुट्ट छाया, युरोपला भयभीत वातावरणात घेऊन गेली.

४. साम्यवाद - राज्य दहशतवाद :

साम्यवादाने अराज्यवाद हे अंतिम उद्दिष्ट ठेवले असले तरी अद्यापही ते साध्य झाले नाही. पण त्याकडे जाण्यासाठी हिंसेच्या मार्गाचा साधन म्हणून स्विकार केला. त्यामुळे रशिया, चीन व इतर समविचारी राज्यांत धैर्य साध्य करण्यासाठी राज्य दहशतवादाचा आधार घेतल्याचे इतिहास सांगतो. लेलिनने नवीन आर्थिक धोरण अंमलात आणताच हजारोंना गोळ्या घालून ठार केले. लाखोंचा गुप्तहेरांकडून छळ केला. जमिनदार, कामगार, शेतकरी, शेतमजूर यांना जबर शिक्षा भोगाव्या लागल्या. स्टॅलिनने या दहशतवादाची पुढची पायरी गाठली. सामुहिक कृषी योजना अंमलात आणताना कित्येक लाख साधन शेतकऱ्यांची हकालपट्टी केली. कित्येकांना गोळ्या घातल्या.

माओ-त्से-तुंग याने साम्यवादी चीनमध्ये एकछत्री कारभार केला. त्याचा दहशतवादी राज्यकारभारावर जास्त भर होता. पक्षातील विरोधकांना संपविण्यासाठी हल्लासत्राची स्पर्धा जिंकल्याची जिद्द ठेवली.

राज्याच्या सुरक्षिततेकरिता, राष्ट्रीय संरक्षणाकरिता, अंतर्गत कायदा व सुव्यवस्थेकरिता जी कायदेशीर सत्ता, साधने, मार्ग उपलब्ध असतात. त्या सर्वांचा दुरुपयोग म्हणजेच राज्य प्रणित दहशतवाद होय. यामध्ये अपहरण, खोटे आरोप ठेवणे, विविध प्रकारचा मानसिक, शारीरिक छळ करणे, अन्नपाण्यावाचून वंचित ठेवणे, अटक केलेल्यांना बेपत्ता करणे, यमदूतांकडून संबंधितांना यमसदनात पाठविले अशा घटना त्या काळात नित्याच्या बनल्या होत्या.

सारांश - अमेरिकेचे अधिकृत परराष्ट्र धोरण म्हणून "एजंट ऑरेज" या रसायनाची फवारणी झाली. त्यामुळे राज्यपुरस्कृत दहशतवाद हा एखादा छोट्या घातपाती कृत्यापासून तर जैविक युध्दापर्यंत कितीही प्रकारची रुपे घेऊ शकतो. बड्या सत्तांनी दहशतवादी संघटनांना आय दिल्यामुळे संघटनांना खूप प्रोत्साहन लाभले. दहशतवादी संघटना आपले आर्थिक सामर्थ्य वाढविण्यासाठी शस्त्रांचा व्यापार आणि अंमली पदार्थांचा व्यापार सुरु

करतात. पण सरकार त्या संघटनेचे पुरस्कर्ते असल्याने या व्यापाराकडे दुर्लक्ष करते. परिणामी नागरी जनतेमध्ये शस्त्रांचा अनिर्बंध वापर आणी अंमली पदार्थांची व्यसनाधिनता याचा प्रसार होतो. त्यामुळे बेकायदेशीर शस्त्रांचा सुळसुळाट आणि अंमली पदार्थांचे वाढते व्यसन हा सुध्दा राज्यपुरस्कृत दहशतवादच ठरतो. भारत सरकारवर मुख्यतः पोलिस यंत्रणेवर "**इंकाऊंटर डेथ**" (चकमकीत मृत्यु) याचा आरोप केला जातो. न्याययंत्रणेला बगल देऊन शासन परस्पर संशयितांचा काटा काढणे, याचा सुध्दा समावेश राजप्रणित दहशतवादात केला जातो.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - राज्यप्रणित दहशतवाद स्पष्ट करा.

७.६ राज्यविरोधी दहशतवाद :

"राज्यसंस्थेचे स्थैर्य खिळखिळे करणे आणि शासनाची अधिसत्ता संशयास्पद बनवून ती उद्‌वस्थ करणे हे राज्यविरोधी दहशतवादाचे धैर्य आहे." या कामात गुंतलेल्या संघटना विशिष्ट भू-प्रदेश काबीज करणे किंवा उत्पादनांच्या साधनावर ताबा मिळविणे या हेतूने काम करीत नसतात. जनतेमध्ये प्रचलित राज्यपध्दती बद्दल संताप निर्माण करुन तसेच नेतृत्वाबद्दल अप्रियता निर्माण करुन राज्याचे नेतृत्व वेगळ्या गटांच्या हाती सोपविणे तसेच राज्याची धैर्य-धोरणे बदलून टाकणे हे त्यांचे उद्दिष्ट असते. राज्यातील दोन समुहांमध्ये शत्रुत्व वाढत जावे आणि त्यामुळे राज्यकर्त्या वर्गाविरुध्द संताप वाढत रहावा या उद्देशाने प्रत्येक कृती केली जाते.

उदाहरणार्थ - ऐशीच्या दशकात खलिस्तानवादी शीख अतिरेक्यांनी पंजाबमध्ये सार्वजनिक वाहने आडमार्गाला थांबवून हिंदू पुरुषांची वेचून हत्या करण्याचा उपक्रम राबविला. यामध्ये लोकसंख्येचे स्थलांतर घडविण्याचा उद्देश होता. शीख बहूल भागामध्ये आपला जीव सुरक्षित नाही. विशेषतः सरकार आपल्या जिवाचे रक्षण करण्यास असमर्थ आहे. अशी प्रतिमा त्यांना निर्माण करायची होती. जेणेकरुन हिंदू पंजाबमधून स्थलांतर करतील आणि हिंदू बहूल प्रांतात त्याची प्रतिक्रिया म्हणून शीखांचे हत्याकांड होईल. परिणामी पंजाब बाहेरचे शीख आश्रयासाठी पंजाबमध्ये येतील. अशाप्रकारे हिंदू विरहीत आणि शीख बहुसंख्य अशा पंजाबचे वेगळे राज्य मागणे सोपे जाईल, असा विध्वंस न घडविता माणसे आणि जनावरे यांना मरणासंन्न अवस्थेत नेऊन ठेवायचे हे महासंहारक अस्त्राचे हे नवेच तंत्र वापरण्यात आले.

राज्य प्रशासन अंतर्गत रित्या खिळखिळे करण्याचा प्रयत्न दहशतवादी संघटनांचा असतो. असलेले सरकार किती अपात्र आहे हे दाखविण्याचा उद्देश असतो. आंध्रप्रदेशात नक्षलवाद्यांनी "वळंगळ" व "अदिलाबाद" जिल्ह्यामध्ये आपल्या दलामचे प्रतिसरकार स्थापन केले आहे. अशाप्रकारे प्रशासन आतून पोखरल्याचा हेतू साध्य करतात. पाकिस्तान लष्करावर असलेले (I.S.I.) चे नियंत्रण आणि (I.S.I.) चे राज्यकर्ता वर्गावरील नियंत्रण, बांग्लादेश रायफल्स मधल्या इस्लामी मूलतत्ववाद्यांचा सहानुभूती असणाऱ्या गटाने केलेली

८० लष्करी अधिकाऱ्यांची हत्या, तसेच हिंदू दहशतवादांना "मालेगाव बॉम्बस्फोटांसाठी" लष्करी अधिकाऱ्यांमार्फत चोरलेले लष्कराचे (RDX) आणि डिटोनेटरर्स ही सर्व उदाहरणे राज्याच्या संरक्षण दलाला पोखरणाऱ्यांची उदाहरणे आहेत. राज्यविरुध्द दहशतवादी याशिवाय मनोवैज्ञानिक तंत्राचा वापर करु लागले आहेत. स्वत:च्या वेबसाईटस् गुप्तपणे चालवून तसेच भित्तीपत्रके, ऑडिओ, व्हिडिओ सिडीज, सॅटेलाईट रेडिओ अशा विविध माध्यमांचा स्वत:च्या विचारसरणीचा प्रभाव टाकण्यासाठी व उद्दिष्ट साध्यकरण्यासाठी वापरीत आहेत.

प्रचलित राज्य कसे अकार्यक्षम किंवा असमर्थ असण्याची प्रतिमा निर्माण करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत घातपात घडविणे हे प्रमुख तंत्र वापरले जाते. कारण निवडणूका हे लोकशाही राज्यपध्दतीचे अत्यावश्यक असे लक्षण आहे. निवडणुकीत दहशतीमुळे मतदानासाठी मतदार बाहेर पडू शकत नाहीत किंवा दहशतीमुळे उमेदवारांचे खून पाडले जाऊन निवडणूका पुढे ढकलल्या जातात. या सर्वांमुळे लोकशाही बाबत प्रश्न निर्माण होत आहे. याबरोबरच घातपाती कृत्ये करुन लष्कराचे व पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करणे, तसेच लष्कर व पोलीस दलात आपल्या विचारसरणीच्या व्यक्तीची भरती करुन ही दले आतून पोखरुन काढणे हे सुध्दा राज्यव्यवस्था खिळखिळी करण्याची महत्त्वाची तंत्रे बनली आहेत. भारतातील नक्षलग्रस्त भागात लष्कर व पोलीस पथकांवर हल्ले होतात. पोलीस चौक्यांमधील शस्त्रास्त्रे पळवितात. भू स्फोटाद्वारे पोलीस दलांना उध्वस्त करणे असे प्रकार नित्याचे बनत आहेत. त्यामुळे संरक्षण दलाची प्रतिमा खालावते, त्यांचे मनोधैर्य खालावले यातून राज्यविरोधी गटाला त्या भू प्रदेशावर आपले वर्चस्व प्राप्त करण्याची संधी मिळते.

अशा प्रदेशात स्वत:चे कर बसविता येतात, स्वत:चे प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांची समांतर व्यवस्था करुन राज्यविरोधी दहशतवाद विस्तारणे व सरकार, लोकशाही तसेच ही यंत्रणा चालविणाऱ्यांना अप्रत्यक्ष पराभूत करण्याचे धैर्य साध्य करण्याचा या दहशतवाद्यांचा मानस असतो.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - राज्यविरोधी दहशतवाद स्पष्ट करा.

७.७ एकविसाव्या शतकातील दहशतवादाचे नवे प्रवाह :

२१ वे शतक म्हणजे चमत्काराचे शतक आहे. उदा. मोबाईल, वेबसाईट, इंटरनेट वगैरे. मानवाने उपग्रह सोडून वैज्ञानिक प्रगतीचा उच्चांक गाठला आहे. विविध क्षेत्रात क्रांतीकारक शोध लागत आहेत. त्यामुळे मानवी समाज रचनेत, संस्कृतीत आमुलाग्र बदल होत आहेत. पण या मानवी संस्कृतीची उभारणी अत्यंत गुंतागुंतीची व परस्परावलंबी असल्याने अनेक समस्या झाल्या आहेत.

कट्टर, आत्मघातकी दहशतवादी गटांनी बेसावधपणे केलेल्या हल्ल्यांना, निर्दयपणे केलेल्या आघातांना, मानवी समुहाला तोंड द्यावे लागत आहे. कारखाने, उद्योगधंदे, शहरे, रेल्वेमार्ग, धरणे, खाणी या सर्वांचे रक्षण करणे कोणत्याही राज्याला शक्य नाही हे सर्व असुरक्षितच आहेत.

अ) प्रलयंकारी दहशतवादाच्या विकासाची कारणे :

भयंकर दहशतवाद विस्तारल्याचे कारण म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात होणारी विलक्षण प्रगती व संशोधन अणुऊर्जा केंद्रात झालेली वाढ, जैविक, रसायन व आण्विक शास्त्रातील संशोधनाचा जगभर झालेला प्रसार आणि लोकशाहीमुळे, दहशतवादाला खतपाणी मिळत गेले. तंत्रज्ञामात झालेल्या विलक्षण प्रगतीमुळे देखील या परिवर्तनाला हातभार लागत आहे. सॅटेलाईट, दूरदर्शन, वेबसाईट, नेटद्वारे साधा बॉम्ब बनविण्यापासून उच्च तांत्रिक ज्ञानापर्यंत माहिती मिळू शकते. त्यामुळे घातपाताचे आदेश, हालचाली, योजना याविषयी संदेश संबंधित दहशतवादी गटांना सहज देता येतात. तसेच दहशतवादी कारवाईचे सखोल वर्णन अन्य गोष्टींना प्रसारमाध्यमे ठळकपणे प्रसिध्दी देतात. (Breaking News) त्यामुळे एका दहशतवादी गटाचे कसब, तंत्र, अनुभव यांचे दर्शन अन्य दहशतवादी गटांना सहजपणे घडू शकते. परिणामी एका भागातील दहशतवाद सर्वत्र पसरु शकतो.

ब) महादहशतवादी वृत्ती - कृत्ती :

महादहशतवादाला चालना देणारा घटक म्हणजे कट्टरवादी किंवा मुलतत्ववादी विचारधारा. ओसामा बीन लादेन हा त्याचा पुरस्कृर्ता हा एक धनाढ्य अरबी आहे. त्याच्या "अल कायदा" या दहशतवादी संघटनेने अनुयायी जगभर विखुरलेले आहेत. कट्टरवादाचे एक प्रवक्ते, झीया तुरमहंमद हुसेन यांच्या मते, "दहशतवादी कारवाई हे एक धर्मयुध्द (जेहाद) आहे आणि दहशतवादी हे मुज्जाउद्दिन (धर्मवीर) आहेत. भारतातील गुजरात राज्यातील अक्षरधाम मंदीरावर केलेला हल्ला हा इस्लामी कट्टरवादाचा भाग होता.

दहशतवादाची वाढ होण्यास आणखीन एक घटक सहकार्य करतो, तो म्हणजे साम्यवादाचा गट. रशियातील साम्यवादी राजवट कोसळल्यामुळे जगभर लोकशाही संस्थांची होत असलेल्या वाढीमुळे यापूर्वी सत्तेपासून वंचित असलेल्या उपराष्ट्रीय जमाती, गट सत्ता व अधिकार मिळाल्यामुळे राज्यांतर्गत राज्य निर्माण झाली. कायद्याचे राज्य चालविणे प्रशासनाला अवघड झाले. ईशान्य भारतातील भागात ही स्थिती पहावयास मिळते. रशियातील चेचेन्यात दहशतवाद फोफावण्यास हीच परिस्थिती कारणीभूत आहे. यामुळे लोकशाही व्यवस्था धोक्यात येऊ शकते. अधिकार, स्वातंत्र्य यांच्या नरडीला नखे लागत आहे. सनदशीर प्रशासन डळमळीत होते. बहुजाती, वंश, धर्म यांनी बनलेला समाज दुबळा होतो. राज्याच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीवर विपरित परिणाम होतो. (उदा. श्रीलंकेतील वांशिक तंटा).

क) आत्मघातकी पथके :

इराकमध्ये नुकत्याच झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात २०० व्यक्ती मरण पावल्या. इतके हे तंत्र भयानक आहे. यापूर्वीचे दहशतवादी एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची हत्या करुन पळून जात. पण गेल्या काही वर्षात या आत्मघातकी दहशतवादामुळे एक दहशतवादी अनेकांना यमसदनी पाठवितो. या तंत्रात त्या दहशतवाद्यास स्वतःचे प्राण

गमवावे लागतात. अशा दहशतवाद्यांची मानसिकतेचा अभ्यास अमेरिकेतील अभ्यासक डॉ. पोस्ट यांनी केला. त्यांच्या मते, अशा माणसात एक प्रकारची न्यूनता असते. बालपणी काहीतरी हिरावून घेतल्याची भावना, मनाला झालेल्या खोलवर जखमा, आपल्यात काहीतरी कमी आहे याची जाणीव, भंगलेले व्यक्तीमत्त्व, आत्यंतिक निराशावादाच्या छटा आढळतात. कोणत्याही दहशतवादी शासनाच्या विरोधात असल्याने (Wanted) तो हवा असतो. सर्वजण आपल्याला नष्ट करतात मग आपणही त्यांना खत्म करु या, ही भावना बळावते.

ड) रासायनिक दहशतवाद :

पूर्वीच्या अस्त्रांच्या जागी आण्विक, रासायनिक, जैविक अस्त्रे दहशतवाद्यांच्या हाताशी आहेत. हातबॉम्ब, क्षेपणास्त्र, विषारी वायू, ॲटोमॅटिक गन ही त्याची प्रिय शस्त्रे बनली आहेत. स्फोटके कमरेला लपेटून ठरवलेल्या लक्ष्यावर (Timer) ने स्फोट घडविला जातो. त्यात तो स्वतः गतप्राण होत असतो. न्यूयॉर्कवरील भीषण हल्ल्यानंतर या दहशतवादाने भस्मासुराचे रुप धारण केले आहे. या हल्ल्याने आधुनिक जगाने महादहशतवादी युगात प्रवेश केला आहे.

रासायनिक दहशतवादाचा पहिला प्रयोग मे १९९५ मध्ये जपानी ओम शिरीको याने अत्यंत जहाल रासायनिक संयुग तयार करुन केला होता. त्यामध्ये टोकियोत ११ जणांचे प्राण गेले. तो अंध व योग शिक्षक होता. त्याच्यातील निराशावादातून तो दहशतवादाकडे वळला.

इ) जैविक दहशतवाद :

सूक्ष्म जंतूंना विखरुन अनेकांना यमसदनी पाठविता येईल असे भाकित डॉ. रेमंड झीलीन्स्कास यांनी केले आहे. ते शास्त्रज्ञ व युनोचे अधिकारी होते. त्यांच्या मते : जैविक दहशतवादी कारवाया तीन प्रकारे करता येतात.

साधारण दर्जाच्या तंत्रज्ञानाने जैविक शस्त्रे बनवून शत्रूच्या पाण्याच्या साठ्यात मिसळता येतील.

उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाने निर्माण केलेली जैविक हत्यारे विस्तृत परिसरात पसरुन देऊन अनर्थ माजविता येईल.

शत्रूंच्या परिसरात रोग-प्रतिकारक औषधअला दाद न देणाऱ्या सूक्ष्मजंतूंची निर्मिती (Viruses) करुन सर्वांच्या आरोग्याला धोका पोहचविता येईल.

पुढील काळात पाकिस्तान, इराण, उत्तर कोरिया यासारख्या देशांच्या दहशतवादी गटांच्या हातात जैविक, रासायनिक, आण्विक अस्त्रे पडण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे मानवी संस्कृतीच्या अस्तित्वालाच फार मोठा धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेने तालिबानची अफगाणिस्तानमधील दहशतवादी राजवट मोडून काढल्याने तेथील अनेक दहशतवादी गटांनी पाकिस्तानमध्ये आश्रय घेतल्याने पाकिस्तान हे आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे केंद्र बनत आहे.

ई) संगणकीय दहशतवाद (Cyber - Terrorism) :

सरकारच्या मते संगणकीय गुन्ह्यात नजिकच्या काळात ५०% ने वाढ झाली आहे. अत्यंत महत्त्वाच्या माहितीला अनेक धोक्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यावर बाह्य हल्ले होण्याची भीती निर्माण झाली आहे. आधुनिक अतिरेकी हे तंत्रज्ञान प्रविण आहेत. ते लॅपटॉपच्या माध्यमातून दहशतवादी कारवायांचे व्यवस्थापन करु लागले आहेत. संगणक जंतू (Computer Worms) संगणकात घुसवून तो निरुपयोगी केला जातो, त्याची स्मरणशक्ती नष्ट केली जाते.

जोम्स ॲडमच्या मते संगणकीय दहशतवाद पुढीलप्रमाणे असू शकेल :

(Sniffers - Computer Network) म्हणजेच संगणक जाळे म्हणजे विभागून घेतलेले जाळे असते. हे विभागून घेणे म्हणजे जी माहिती दुसऱ्या यंत्राकरिता असते ती या संगणकाला मिळू शकते. याचा आपल्याला पाहिजे तसा वापर करुन दुसऱ्याच्या दळणवळण, संदेश यावर पाळक ठेवता येते.

संगणक कृमी (Computer Worms) आणि संगणक जंतू (Virus) संगणकाच्या तबकडीवर नकळत आढळतात. त्याची वाढ अनेक पटीने होते. इतकी की संगणकाची स्मरणशक्ती नष्ट होते, असा (Virus) घुसवून संगणक निरुपयोगी केला जातो.

हर्फ गनस् (Herf Guns) या बंदुका म्हणजे एखाद्या आकाशवाणीच्या (F.M.) संगणकीय संचावर, रेडिओ प्रक्षेपणावर मारा करुन त्याचे कार्य बंद पाडता येते.

फ) अणू दहशतवाद :

गेल्या काही वर्षात अणुशक्ती प्रसारामुळे (Nuclear Proliferation) आंतरराष्ट्रीय राजकारणाला अनिष्ट वळण लागत आहे. गेल्या दशकात काही घटनांमुळे आण्विक दहशतवादाला अप्रत्यक्षपणे उत्तेजन मिळत आहे. सर्व युरोपात चोरुन, छुप्या मार्गाने अणुसाहित्याची चोरीचे प्रकार वाढले आहेत. नागरी अणुकेंद्र जगात वाढत आहेत. लहान पण कट्टर दहशतवादी गटसुध्दा त्यावर सहज हल्ला करु शकतात. १९९४ साली अणुसाहित्याची चोरुन पळवापळवी करण्याच्या १२४ घटना घडल्या आहेत. (न्यूयॉर्क टाईम्स - ११९५). रशियन विघटनानंतर अणू चोरीचे तेथील प्रमाण वाढले. संघटीत गुन्हेगारी, कामगारांना अपुरे वेतन, लष्कराचा खालावलेला दर्जा व कोसळलेली अर्थव्यवस्थेमुळे जनसंहाराकरिता लागणाऱ्या साहित्याचा दहशतीसाठी वापर होऊ लागला. ही सर्वांची झोप उडविणारी ऐतिहासिक घटना आहे. अणवस्त्र बनविण्यासाठी लागणारे सयंत्र (Reactor) पण उपलब्ध होणे अवघड आहे. पण अविभाजन साहित्य (Nonssionable Material) हे सहज मिळू शकेल त्याच्या वि-किरणाने सर्व वातावरण कमालीचे दूषित होईल व अनेक प्रकारचे विकार निच स्तरावरील जनतेला त्वरीत पहिल्यांसा होतील. उदा. त्वचारोग, कर्करोग (Cancer), दमा, खोकला वगैरे त्यामुळे सर्वजणांची प्रकृती अस्वस्थ होईल.

विविध पध्दतीने राज्यविरोधी दहशतवाद २१ व्या शतकात विस्तारित आहे व त्याची व्यापकता विश्वव्यापी होत आहे.

राज्यविरोधी दहशतवादाच्या काही नजिकच्या काळातील ठळक घटना पुढीलप्रमाणे :

१. चीनमध्ये १९११ च्या राज्यक्रांती दहशत व १९४९ च्या माओत्सेतुंगच्या नेतृत्वाखालील साम्यवादी क्रांती दरम्यान हिंसक साधनांचा वापर झाला.

२. रशियात जुलमी झारच्या राजवटीविरुध्द काही दहशतवादी संघटना निर्माण झाल्या. झारची सत्ता उलथून टाकण्यासाठी या संघटनांनी दहशतवादाचा अवलंब केला.

३. पॅलेस्टाईन राष्ट्राच्या निर्मितीसाठी दहशतवादाचा मार्ग पत्करुन १९४८ साली पॅलेस्टाईन विभाजन करुन स्वतंत्र इस्त्रायल राष्ट्र निर्माण करण्यात आले. इस्त्रायलचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी अनेक दहशतवादी संघटना उदयाला आल्या.

४. स्वातंत्र प्राप्तीच्या उद्दिष्टाकरिता भारतात बंगाल, पंजाब, महाराष्ट्रात क्रांतीकारी दहशतवादाचा विकास झाला.

५. १९६० च्या दशकात उत्तर आयलंडमधील रोमन कॅथलिक व प्रोटेस्टंट पंथियाच्या संघर्षातून काही दहशतवादी संघटना आकाराला आल्या. उदा. आयरिश रिपब्लीकन आर्मी (१९६९) उत्तर आयलंडमधून ब्रिटिश सैन्याला काढून उत्तर आयलंडचे आयलंड बरोबर एकीकरण घडवून आणणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते.

६. १९८० च्या दशकात धार्मिक मूलतत्ववादी चळवळीतून अनेक दहशतवादी संघटना उदयास आल्या. त्यातील बहुतांश संघटना या इस्लामिक जेहादी होत्या. त्यातून १९७९ साली इराणचे धार्मिक नेते आयातुल्ला खोपेनी यांच्या नेतृत्वाखाळी धार्मिक क्रांती झाली व जेहादी संघटनांच्या प्रसाराची प्रक्रिया गतिमान बनल्या. इस्लामिक मूलतत्ववादी चळवळीतून विकसित झालेल्या संघटनांमध्ये अल कायदा, अबू निदाल संघटना, सशस्त्र इस्लामिक संघ, हिजबूल अशा संघटनांचा समावेश होतो.

७. इटलीचे पंतप्रधान अल्टोमोरो यांचे रेड ब्रिगेडने केलेले अपहरण व ५५ दिवसानंतर त्यांची केलेली हत्या (१६-०३-१९७८).

८. इजिप्तचे राष्ट्रध्यक्ष अन्वर सादात यांची "तफकरीवल हाजिरा" या दहशतवादी संघटनेने केलेली हत्या (०६-१०-१९८१).

९. लेबोनौनचे पंतप्रधान बशीर गामाथेल यांची कारबॉंबच्या स्फोटात बेरुतमध्ये झालेली हत्या (१४-०९-१८८२).

१०. भारताचे पंतप्रदान इंदिरा गांधी यांच त्यांच्या अंगरक्षकांनी (सतवंतसिंह व बियातसिंग) यांनी केलेली हत्या (३१-१०-१९८४).

११. पैनअैम उड्डाण १०३ या विमानाच्या लिबियाच्या अतिरेक्यांनी बॉम्ब ठेवल्याने त्याचा स्फोट होऊन २५९ प्रवासी ठार (२१-१२-१९८८).

१२. श्रीलंकेतील तामिल वाद्यांच्या आत्मघाटकी अतिरेक्यांनी तामिडनाडूतील श्रीपेरांबदर थनू या मानवी बॉम्बच्या सहाय्याने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची केलेली हत्या (२१-०५-१९९१).

१३. ज्यू अतिरेक्यांकडून हेब्रॉनमधील हत्याकांड (२५-०२-१९९४).

१४. इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे कंदहार येथे अपहरण (२४-११-१९९९) व अतिरेक्यांच्या बदल्यात प्रवाशांची सुटका (३१-१२-१९९९).

१५. न्यूयॉर्कमधील वर्ल्डट्रेड सेंटरच्या जुळ्या इमारतीवर तसेच वॉशिंग्टन मधील पेंटॅगॉनच्या इमारतीवर ओसामा बिन लादेनच्या "अल कायदा" संघटनेकडून झालेला हल्ला (१९-०९-२००१).

१६. "जैश-ए-महमंद" चा जम्मू - काश्मिर विधानसभेवर प्राणघातक हल्ला (०१-१०-२००१).

१७. भारतीय संसदेवर "जैश-ए-महमंद" व "लष्कर-ए-तोएबा" च्या अतिरेक्यांचा हल्ला (१३-११-२००१).

१८. मुंबईतील हॉटेल ताज, सी.एस.टी. व अन्यय अजमल कसाब आणि त्याच्या साथिदारांनी घातलेला धुमाकूल व निर्दयी हल्ले (२६-११-२००८) लष्करे तोएबच्या या प्राणघातक हल्ल्यात अमेरिकाच्या १५ नागरिकांसह १७९ भारतीय ठार झाले. नोव्हेंबर २०१० मध्ये अमेरिका अध्यक्ष ओबामा भारत दौऱ्यावर आल्यानंतर वरील हल्ल्याग्रस्त ठिकाणांना धावती भेट दिली.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - एकविसाव्या शतकातील दहशतवाद चर्चा करा.

७.८ दहशतवादाशी लढा :

आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुध्द ११-०९-२००१ नंतर युध्द पुकारले गेले. तेव्हा भारतात पाकिस्तान पसरवित असलेल्या दहशतवादापासूनच त्याचा प्रारंभ व्हावा. "आम्ही जे सांगत होतो, तेच अमेरिका आज बोलत आहे, म्हणून तिच्याशी हात मिळविणे केली पाहिजे", असं भारताने न्यूयॉर्क व वॉशिंग्टन येथील हल्ल्यानंतर जाहीर केलं. पाक मधून

येणाऱ्या दहशतवाद्यांच्या कारवायांचा फटका आपल्याला बसत आला आहे. अमेरिकेने तेव्हा सहानुभूती दाखविण्याशिवाय काही केले नाही. त्याचवेळी अमेरिकेने दहशतवादाच्या विरुध्द प्रामाणिकपणे संघर्ष उभा केला असता तर आज त्यांच्यावर ही वेळ आली नसती. आग शेजारी लागली आहे, म्हणून स्वस्थ पहात बसण्याची भूमिका घेतल्याने ती आग अमेरिकेलाही लागली.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी १३-१२-२००१ रोजी झालेल्या संसदेवरील हल्ल्यानंतर संसदेत केलेल्या भाषणात दहशतवादाचा आपल्या सोयीनुसार अर्थ लक्षात येणार नाही त्याला सर्वत्र सारखाच मापदंड लावला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका अमेरिकेला उद्देशून मांडली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने २८ सप्टेंबर, २००१ रोजी एकमताने केलेला दहशतवाद विरोधी ठराव क्रमांक १,३७३ हा सर्वव्यापी असून त्याची अंमलबजावणी प्रत्येक राष्ट्राने केली पाहिजे, असे आवाहन सुरक्षा समितीने केले आहे.

भारतीय दहशतवाद प्रतिबंधक योजना - आदर्श लोकशाही, सक्रिय राज्य व्यवस्था, उत्तम प्रशासन, जनतेच्या अडचणींची त्वरित दखल व सोडवणूक, परिणामकारक पोलीस यंत्रणा, आर्थिक विकास हे सर्व दहशतवादाच्या साथीला (रोगाला) उत्तम औषध आहे. भारतात निवडणूक प्रक्रियेत दहशतवादी हिंसाचाराला कधीच अडथळा आणून दिला नाही. १९९० मध्ये पंजाबमध्ये दहशतवादाचा कहर असताना निवडणूका व्यवस्थित झाल्या. तसेच जम्मू-काश्मिर मध्येही निवडणूका सुरळीत होतात. विशेष म्हणजे ने जिहादी गटाला हिंसाचार करुन निवडणुकीत व्यत्यय आणण्याचा आदेश दिला असतानाही निवडणूका सुरळीत होतात. जे जगातील राजनैतिक शिष्टमंपळांनी स्वतः पाहून खात्री करुन निपक्षपाती निवडणूक यंत्रणेची खात्री केली आहे.

दहशतवाद विस्तारण्यास आर्थिक मागासलेपणा काही अंशी कारणीभूत असतो. भारतात दहशतवादी हिंसाचारला, आर्थिक विकासाला खिळ घालण्याची संधी दिली जात नाही. गेल्या काही वर्षात दहशतवाद ग्रस्त प्रदेशात काही विकास योजना राबविण्यात आल्या. उदा. - बिहार, ईशान्य भारत तसेच दहशतवादाने पंजाबमध्ये थैमान घातले असतानाही पंजाब भारताचे धान्याचे कोठार होते. काश्मिर मधील परदेशी पर्यटकांची संख्या कमी झाल्यानंतर तेथील पर्यटम क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न उभा राहिला असताना भारताने भारतीय पर्यटकांना अनेक योजना, सवलती देवून पर्यटकांचा ओघ काश्मिरकडे वाढविला. हस्तकलाकारांच्या वस्तूंचे प्रदर्शन-विक्री विविध शहरांमध्ये होत आहे. दहशतवाद ग्रस्त भागांना "एकत्रित आर्थिक सवलती योजना" लागू केल्या आहेत. दहशतवाद्यांच्या मागण्यास भिक न घालता त्या मोडून काढण्याचा कटाक्षाने प्रयत्न प्रशासन करते.

दहशतवादाबाबतचे भारताचे परराष्ट्र धोरण :

काश्मिर हा भारताचाच अविभाज्य भाग आहे. काश्मिर प्रश्नी आम्ही कोणाचीही मध्यस्थी स्विकारणार नाही. दहशतवादाच्याद्वारा काश्मिरच्या माध्यमातून भारताला कितीही त्रास देण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्ही हाणून पाडू अशा प्रकारच्या प्रतिक्रिया भारताने सदैव मांडल्या आहेत. अण्वस्त्र बंदी कराराची आवश्यकता प्रारंभीपासून भारताने मांडली. पण त्यामध्ये पक्षपात आम्ही चालू देणार नाही. या करारावर सर्वांच्या सह्या होऊन त्याप्रमाणे

त्याची अंमलबजावणी गरजेची आहे. पाकिस्तानमधील भारतविरोधी कारवाया थांबविल्याशिवाय पाकशी कोणतीही चर्चा अयोग्य आहे. तसेच भारतात दहशतवाद घडविणाऱ्या अतिरेक्यांना पाकने अभय न देता भारताच्या स्वाधीन करावे. त्याचप्रमाणे बांग्लादेशाशी सुध्दा याचप्रकारचे आपण धोरण ठेवले आहे. गुप्तहेर यंत्रणा अत्यंत आधुनिक करण्याचाही भारताने प्रयत्न केले आहेत. परराष्ट्र खात्यातील प्रतिबंधक दहशतवाद शाखा अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटच्या उपविभागासारखी याची रचना आहे.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - दहशतवाद नष्ट करण्याचे उपाय सांगा.

७.९ शांतता चळवळ :

"जेथे शांतता तेथे प्रगती" हा सिध्दांत आहे. त्यावर विश्वास ठेवून विश्वात अनेक ठिकाणी शांतता चळवळ विकसित होत आहे.

शांती चळवळ ही कोणतेही विशिष्ट युध्द टाळण्यासाठी तसेच सर्वच प्रकारची युध्दे टाळण्यासाठी आणि मानवांमधील हिंसा टाळण्यासाठी स्थापन झालेली सामाजिक चळवळ आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर चळवळीचा उदय झाला. त्यानंतर अण्वस्त्रांची निर्मिती तसेच जैविक आणि रासायनिक अस्त्रांची निर्मिती अण्विक तंत्रज्ञानाची तस्करी आणि गुप्त निर्यात वांशिक संघर्ष अशा समस्या गुंतागुंतीचा होत गेल्यामुळे शांतता चळवळ सातत्याने विस्तारित गेली. तर एकूणच मानवी व्यवहारातील कौटुंबिक, सामुदायिक हिंसाचाराचे प्रमाण सतत वाढत असल्यामुळे युध्द सोडून इतर प्रकारच्या हिंसाचाराचा विरोध हे शांतता चळवळीचे उद्दिष्ट म्हणून सामिल झाले. दुसरे महायुध्द संपतानाच विचारवंत "रसेल" आणि शास्त्रज्ञ "आईनस्टाईन" यांनी हिंसेविरुध्द जाहीरनामा प्रसारीत केला. त्यामध्ये जगभरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रशासक, वैज्ञानिक यांना आवाहन केले कि, हिंसाचाराची विकृती नियंत्रित होईल, अशा पध्दतीने आपली धोरणे आणि कार्यक्रम यांचा फेरविचार प्रत्येकानेच केला तरच शांतता चळवळ यशस्वी होऊ शकते.

शांततावादी संघटन कार्य :

१. **पगवॉश संघटना :** युरोपामध्ये पगवॉश नावाची संघटना याच आडनावाच्या विचारवंताने निर्माण केली.

उद्देश - विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जागतिक शांतता कशी धोक्यात येते याचा आढावा घेत राहणे आणि त्यावर उपाययोजना सुचविणे यासाठी सातत्याने जागतिक परिषदांचे आयोजन या संघटनेने केले. जगभराच्या राज्यकर्त्यां वर्गावर हिंसाचाराच्या नियंत्रणासाठी दबाव निर्माण करणे हे परिषदांचे उद्दिष्ट आहे. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे १९९५ सालाचे नोबल शांतता पारितोषिक "पगवॉश परिषद" या संघटनेला देण्यात आले.

२००० साली युनोने "शांतता - संस्कृती वर्ष" म्हणून घोषित केले आणि पुढे २००० हे दशक "शांतता संस्कृती" तसेच "बालकाप्रती अहिंसा दशक" म्हणून घोषित केले.

कौटुंबिक तसेच आंतरराष्ट्रीय अशांततेचा सर्वाधिक दुष्परिणाम ज्या असाहाय्य घटकांवर होतो. तो घटक म्हणजेच बालक त्यामुळे बालकांशी अहिंसक वर्तन हा केंद्रबिंदू मानला तर सर्वच हिंसेला प्रतिकूल वातावरण तयार होईल असा युनोचा दृष्टीकोन होता. २००० सालानंतर अमेरिकेने इराकमध्ये २००३ साली बेकायदेशीर हस्तक्षेप केला. अमेरिका - इराण युध्द अनैतिक आहे ते थांबवण्यात यावे याकरिता शांतता चळवळीतील सर्व वैचारिक प्रवाह या प्रसंगाच्या निमित्ताने एकत्र झाले. "ख्रिस्ती धार्मिक शांतता" वादी इतकेच नव्हे तर "विश्व इस्लामी शांततावादी" यांची सुध्दा एकजूट घडून आली. शांतता चळवळ मुख्यत: शस्त्रास्त्रांची तसेच लष्करी तत्रंज्ञानाची विकसित देशाकडून अविकसित देशाकडे होणारी कायदेशीर आणि बेकायदेशीर निर्यात याचा विरोध करते. त्याचप्रमाणे मानवी जीविताला हानीकारक असलेल्या तंत्रज्ञानाच्या आणि शस्त्रास्त्रांच्या विशेषत: आण्विक, जैविक आणि रासायनिक शस्त्रास्त्रांच्या प्रसाराला विरोध करते. अमेरिकेसारख्या अनेक देशांमध्ये सामान्य प्रौढाला शस्त्र बाळगण्याचा परवाना कायद्याने मिळतो आणि त्यामधून वैयक्तिक संघर्ष हत्याराने सोडविण्याच्या प्रवृत्तीला बळ मिळते. सहजपणे उपलब्ध असलेल्या हत्याराच्या मदतीने आर्थिक, लैगिक गुन्हेगारी करण्याची प्रवृत्ती बळावते. तसेच शुध्द मनस्थितीतील व्यक्ती अशा वातावरणाला बळी पडतात.

जागतिक शांतता निर्मितीच्या उपाय योजना :

शस्त्रांस्त्र स्पर्धा थांबविणे : शेजारील देशाबाबत वास्तव किंवा अवास्तव भीती बाळगून देशातील जास्त पैसा, शस्त्राला खरेदीसाठी, सैन्यावर होत आहे. त्याऐवजी देशाअंतर्गत असलेल्या कुपोषण, बेरोजगारी, निरक्षरता अशा मानवी कल्याणावर जास्त पैसा खर्च व्हावा.

जनतेचा दबाब : आक्रमक देशाविरुध्द जागतिक स्तरावर जनआंदोलन उभे करुन शांतता भंग करणाऱ्या व्यक्ती, प्रवृत्तीचा विरोध, निषेध व्हावा.

जनप्रबोधन : नागरिकांनी प्रंचड इच्छाशक्ती दाखवून दहशतवादी कृत्ये धाडसाने बाहेर काढावीत. प्रलोभनास बळी पडू नये. शांततेत विकास आहे यावर श्रध्दा ठेवून त्यावरच प्रचंड जागृती व्हावी.

विश्वशासन : वैश्विव कायदा आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही पध्दतीने निवडलेले, संघराज्य तत्वावर काम करणारे जागतिक सरकार स्थापन केले पाहिजे आणि त्या सरकारने मानवी हक्कांचे रक्षण आणि आंतरराष्ट्रीय संघर्षाची सोडवणूक, बंधनकारक न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून केली पाहिजे. कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी, दहशतवादाला जात, धर्म नसून केवळ दहशतवादी हिच त्याची ओळख असावी व त्याप्रमाणे सर्वांनी तो दृष्टीकोन विकसित करावा.

परस्पर विश्वास वृध्दी : प्रचंड शस्त्रास्त्र साठा करुन युध्दाचे भय निर्माण करणे ही राष्ट्रीय सुरक्षिततेची कवचकुंडले आहेत. या तत्वावर आंतरराष्ट्रीय राजकारण सध्या काम करते. भीती, संशय, अविश्वास आणि असुरक्षितता या नकारात्मक जाणीवांवर आधारलेले हे आंतरराष्ट्रीय राजकारण बदलण्यासाठी परस्पर विश्वास, साहचर्य आणि आत्मियता यावर आधारित राजकारणाची उभारणी करणे.

शांतता चळवळीची कार्यपध्दती :

१. मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी युनो सारखी जागतिक व्यासपीठे मजबूत बनवीत यासाठी प्रयत्न करणे.

२. जागतिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायालय या यंत्रणेला बंधनकारक अधिकार क्षेत्र म्हणून सर्व सार्वभौम राष्ट्रांकडून मान्यता मिळावी याकरिता प्रयत्न करावे.

३. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी जागतिक मानवी हक्क आयोगाका बंधनकारक अधिकार क्षेत्र प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न करणे. शस्त्रांचा अतिरेकी वापर सहजपणे करते म्हणून सर्व देशांनी शस्त्रांच्या मुक्त उपलब्धतेला नियंत्रित करणारे कायदे करावेत. त्यामुळे हिंसा संस्कृती नियंत्रित होईल, इतकेच नव्हे तर समाज मनावर प्रभाव पाडू शकणाऱ्या व्यक्तींनी हिंसेचे उदात्तीकरण होईल अशा छायाचित्रांना, कलात्मक दृष्यांना विरोध करावा म्हणून मोहिम सुध्दा शांतता चळवळीकडून चालविली जाते. यासाठी चळवळींमध्ये विविध तंत्रे वापरली जातात.

उदा. : अहिंसक प्रतिकार, बहिष्कार, युध्द विरोधी उमेदवारांना निवडणुकीमध्ये मदत करणे, हिंसाविरोधी कायदे केले जावेत यासाठी जगभरच्या संसद सदस्यांवर दबाव आणणे, संघर्षमय परिस्थितीत शांती स्थापनेसाठी राजनय (मुसद्देगिरी) याला चालना देणे.

सारांश : जागतिक स्तरावरील शांततावादी चळवळी विकसित होत असतानाच भारतामध्ये, मुंबईमध्ये सुध्दा काही शांततावादी उपक्रम चालू आहे. मुंबई पोलिसांनी याच धर्तीवर "मुहल समिती" संकल्पना विकसित केली व आज त्याचा चांगला परिणाम जाणवत आहे. दहशतवादी आक्रमणाच्या काळातही हिंदू - मुस्लिम ऐक्य साधण्याचा हेतू साध्य होत आहे. तसेच महात्मा गांधींचा जन्मदिवस "शांतता दिन" म्हणून जगाने स्विकारणे हे शांतता प्रेम वृध्दीचे द्योतकच आहे.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न - जागतिक शांतता निर्माण करण्याचे उपाय सांगा.

* * *

८

नागरी समाज संकल्पना

८.१ प्रस्तावना

८.२ नागरी समाजाचे स्वरुप

८.३ नागरी समाजाचा उदय

८.४ नागरी समाजाची भूमिका

८.१ प्रस्तावना :

नागरी समाज (समुदाय) ही संकल्पना २०व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक शास्त्राच्या अध्ययनात व्यापक प्रमाणात अभ्यासली जाणारी आहे. १७व्या शतकातील "जॉन लॉक" या ब्रिटिश विचारवंताने समाज आणि राज्याचे विभाग विषद करण्यासाठी व समाजाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी "नागरी समुदाय" या संकल्पनेचा उपयोग केला जातो.

नागरी समुदायाला "सुंसस्कृत समुदाय" असे ही म्हटले जाते कारण, असा समुदाय शोषण मुक्त, समाजधिष्टित व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करणारा असतो. निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा समावेश किंवा सहभागाची समानसंधी असते. या संकल्पनेचे मुर्त स्वरुप म्हणजे बिगर शासकीय संस्था (NGO - Non Government Organisation) किंवा स्वंयसेवी संस्था (VO - Voluntary Oraganisation) या संस्था स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर समाजोपयोगी उपक्रम राबवितात.

शासकीय उपक्रमांना समांतर आणि पूरक असे यांचे उपक्रम असतात. कल्याणकारी उपक्रमात विशेषतः शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात त्याचा कार्यभाग उत्तरोत्तर विस्तारित आहे. पर्यावरण संवर्धन, दुर्बल समाजघटकांच्या अधिकारांसाठी, शासकीय व्यवहारात पारदर्शकता व उत्तरदायित्व, भष्ट्राचारास विरोध या क्षेत्रात भारतात अशा प्रकारच्या संघटना क्रियाशील असलेल्या दिसून येतात.

१९७० च्या शतकापासून भारतात त्यांच्या कार्यभागास शासकीय स्विकृती मिळाली आहे. विशेषतः ग्रामीण विकासाचे शासकीय उपक्रम राबवण्यास त्यांचा सहभाग असावा आणि शासनाशी त्याने सहकार्य करावे अशी भूमिका सरकारने स्विकारली आहे.

नागरी समाजाची संकल्पना तशी बरीच जुनी आहे. एक नागरी समाज निर्माण झाला आहे. या नागरी समाजात अनेक संस्था कार्यरत आहेत, विविध क्षेत्रांमध्ये आणि पातळ्यांवर काम करणाऱ्या अशासकीय संघटना संस्था आणि विवध समस्या सोडविण्यासाठी उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींनी स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

सध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात या संकल्पनांची नव्याने चर्चा सुरु झाली आहे. अनेक राजकीय विचारवंतांनी या संकल्पनेचा उहापोह केलेला आहे.

सिसेरो, लॉक, हेगेल आणि ग्राम्सी यांच्या लिखानामध्ये या संकल्पनेचा उल्लेख आठवतो. रोमन तत्वज्ञ सिसेरोने समाजाच्या दोन अवस्थांचे चित्रण केले आहे. एका अवस्थेत समाज कायद्यावर अवलंबून असतो. तर दुसऱ्या अवस्थेत कायदे अस्तित्वात नसतात. पहिल्या समाजात कायद्यावर आधारित सुंसस्कृत राजकीय समुदाय निर्माण होतो. दुसऱ्या समाजात नागरी संबंध प्रस्थापित करणे कठीण होऊन बसते.

लॉक या तत्वज्ञानाच्या मते नागरी आणि राजकीय समाज एकच असतो. नागरी समाजामध्येच राज्यसंस्था निर्माण होऊ शकते. नागरी समाजात शिस्त, व्यवस्था आणि सुरक्षा या गोष्टी शक्य आहेत.

जर्मन विचारवंत हेगेल यांच्या मताप्रमाणे राज्य आणि नागरी समाज या दोन स्वतंत्र्य संस्था आहेत, नागरी समाज ही कुटुंबसंस्था आणि राज्यसंस्था याच्यामधली अवस्था आहे. राज्य ही सर्वोच्च सामाजिक संस्था आहे.

राज्याच्या निर्मितीमुळे नागरी समाज नष्ट होत नाही. विसाव्या शतकातील इटालीयन विचारवंत ॲन्टोनिओ ग्राम्सी यांच्या मते राज्य दमनावर आधारित असते, तर नागरीसमाज सहमतीवर अवलंबून असतो. एकूण काळाच्या ओघात नागरी समान या संकल्पनाची प्रगती झालेली आहे.

नागरी समाजामध्ये अशा संघटनांचा समावेश होतो कि, ज्यांना शासकीय परवाना लाभलेल्या आहेत. त्या सेवाभावी संस्था असतात. नागरी समाज अंतर्गत सामाजिक गट स्त्रीयांच्या संघटना, धार्मिक गट, व्यावसायिक संघटना, कामगार युनियन, स्वयदत गट, सामाजिक चळवळ, व्यापारी संघटना, पर्यावरणीय संघटना, सहकारी संस्था, सांस्कृतिक गट, विना-नफा संस्था, शिक्षण संस्था इत्यादी स्वरुपाच्या संघटनाचा समावेश होतो.

अशासकीय संघटना आणि सामाजिक चळवळी या संस्था नेहमी वापरात येतात. खाजगी व्यक्तींनी चालविलेल्या औपचारिक रचना असलेल्या आणि नफा कमावण्याच्या कोणत्याही हेतू नसलेल्या संस्था म्हणजे अशासकीय संघटना यामध्ये थोड्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचा समावेश होतो. ह्या संघटना शासनाचे धोरण प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात. या व्यावसायिक चळवळींना आधारभूत ठरतात. सामाजिक चळवळींमध्ये समान हितसंबंध असलेले गट आणि व्यक्ती विशिष्ट राजकीय उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी एकत्र येतात. त्यांना समाज व्यवस्थेमध्ये बदल अपेक्षित असते.

८.२ नागरी समाजाचे स्वरुप :

नागरी समाज या प्रमुख घटकांचे स्वरुप वैविध्यपूर्ण आहे. त्यांचे कार्यक्षेत्र, कौशल्य क्षेत्र, हितसंबंध, आकारमान त्यांच्याकडील संसाधने भौगोलिक स्थान आणि व्याप्ती संघटनांची पातळी उद्दिष्ट्ये, ती साध्य करण्याचे मार्ग आणि डावपेच अशा सर्वच पातळ्यांवर भिन्नता आढळून येते.

नागरी समाज हे असे एक अवकाश आहे. जिथे राज्य आणि बाजार यांच्या व्यतिरिक्त स्वंयस्फुर्तीने व्यक्ती समान हितसंबंध जोपासण्यासाठी एकत्र येतात.

"काळदौरच्या मते", "नागरी समाज ही एक प्रक्रिया आहे. ज्यामुळे व्यक्ती आप-आपसात आर्थिक आणि राजकीय सत्ता केंद्रबरोबर वाटाघाटी, वाद, संघर्ष किंवा समझोता करतात." या व्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रातील हितसंबंधी गटांना प्रतिनिधीत्वच मिळते आणि त्याच्यामुळे सार्वजनिक संस्था आणि प्रक्रिया मध्येच जनतेचा सहभाग रुंदावतो. त्याचा सहभाग होणे शक्य होते.

नागरी समाजाचे स्वरुप स्पष्ट करणारी महत्वाची वैशिष्ट्ये आहेत :

१) नागरी समाज कायद्यावर आधारित असल्याने त्यात सहमतीला जास्त महत्त्व असते. नागरी समाज म्हणजेच समान उद्देश प्राप्तीसाठीची मुक्त संघटना होय. तसेच त्याचे सदस्यत्व सहमतीने स्विकारलेले असते.

२) नागरी समाज राजकीय व्यवस्थेपासून पूर्णपणे वेगळा असतो.

३) नागरी समाजाचे क्षेत्र बाजारापासूनही स्वतंत्र्य आहे. बाजारामध्ये नफा मिळविणे हे सर्व सहभागी घटकांचे मुख्य उद्दिष्ट असते. परंतु नागरी समाजातील घटक नफ्यातील उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून काम करत नाहीत. त्यामुळे या क्षेत्राला ना नफा क्षेत्र असे ही म्हणतात.

४) नागरी समाज लोकशाहीस पोषक असतो म्हणून दहशतवादी, गुन्हेगारी संघटना नागरी समाजाच्या भाग मानता येत नाही. उदा. फॅसीस्ट, नाझीवार्दी.

८.३ जागतिक नागरी समाजाचा उदय :

आधुनिक तंत्र ज्ञानाने जग फार जवळ आलेले आहे. तसेच अनेक राष्ट्रे एकमेकांच्या जास्त संपर्कात येण्याचे प्रमाणही वाढलेले आहे. त्याचाच परिणाम जागतिक नागरी समाजावर झालेला दिसून येतो. कारण अनेक संघटना जागतिक समस्येवर भाष्य करताना दिसून येतात. आधुनिक युगात संघटनाही एका राष्ट्रपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. त्या जागतिक अनेक देशांच्या व्यवस्थेवर बारीक लक्ष ठेवून असतात. त्यांचा जागतिक पातळीवर चांगला संपर्क असतो. ते बरेचदा जागतिक प्रश्नांवर चर्चा करतात यातूनच जागतिक नागरी समाजाची संकल्पना पुढे आली आणि ती विकसित होऊन त्यास आजचे आधुनिक रुप प्राप्त झाले.

काही समस्या सर्वांच्याच आहेत आणि त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य केले पाहिजे याची वाढती जाणीव जागतिक पातळीवर काम करणाऱ्या या संस्थांमध्ये दिसून येते. मानवी हक्क संरक्षण, स्त्रियांचे हक्क, विविध आपत्तीमध्ये सापडणाऱ्यांना, मानवी सहायत्ता करणे, शास्त्रीय संशोधन आणि शास्त्रीय दृष्टीकोणातून प्रसार इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या एकूण ४५,००० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था जगभर पसरलेल्या आहेत. उदा. कॅथॉलिक रिलीफ सेवा, ॲग्नेरटी इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सायंटिफिक युनियन वुमन फॉर न्युपुरा इत्यादी.

जागतिक नागरी समाजाच्या उदयाची कारणे :

विविध देशातील नागरिकांनी आपल्या देशाच्या सीमेपलीकडे जाऊन संघटीतरित्या कार्य करण्याची कल्पना तशी नवीन नाही. जागतिक नागरी समाजाची निर्मिती मात्र नव्याने अलिकडेच झाली आहे त्याची उदयाची कारणे :

१) राष्ट्रीय पातळीवर नागरी समाजाची संकल्पना पुन्हा नव्याने मांडण्यात आली. ऐंशीच्या दशकात दक्षिण अमेरिका आणि पूर्व युरोपमधील कम्युनिस्ट राजवटीमध्ये कम्युनिस्ट व्यवस्थांना विरोध करण्यासाठी जनता एकत्र आली. शांतता आणि मानवी हक्क हे जागतिक विषय असल्याने या विषयावर आधारित नागरिकांना संघटनांना जागतिक स्वरुप प्राप्त झाले. शीतयुध्द संपल्यानंतर संक्रमण व्यवस्थेत असलेल्या समाजाची. नागरी समाजाची आर्थिक आणि राजकीय पुर्नरचनेच्या कार्यात महत्त्वाची भूमिका दिली हे समाज या संघटनांकडे विश्वासाने पाहतात. या संघटना योग्य दिशा दाखवतील असा विश्वास बहुसंख्य जनतेला वाटतो.

२) राज्याचे स्वरुप बदललेले आहे, कल्याणकारी राज्याची जागा नवउदारमतवादी राज्याने घेतली आहे. याचा परिणाम म्हणजे विकसित जगात नागरिकांचे कल्याणकारी हक्क हिरावून घेण्यात आले. त्यांना मिळणाऱ्या सवलती आणि अनुदाने बंद झाली. विकसनशील देशामध्ये नवउदारमतवादी धोरणामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना असलेले राज्याचे संरक्षण नष्ट झाले. अनेकजण आर्थिक संकटात सापडले. १९८० आणि १९९० च्या दशकात जगात एकूण सल्ला आणि सेवा पुरविणाऱ्या तसेच एखाद्या मुद्याचा पुरस्कार करुन त्यासाठी लढणाऱ्या अनेक नवीन संघटना निर्माण झाल्या.

३) याच काळात उत्तम आणि आदर्श प्रशासनाची संकल्पना पुढे आली. या संकल्पनेच्या चर्चेमुळे नागरिकांना सहकारी संस्थांच्या मर्यादांची जाणीव झाली. सरकारी सेवाच्या कार्यक्षमतेबद्दल आणि योग्यतेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाली. त्यामुळे सरकारी सरकारी सेवाविरुध्द दाद मागण्यासाठी जनता संघटीत होऊ लागली. या संघटनांच्या शासनाच्या कार्यातील सहभागामुळे प्रशासनातील पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांचा प्रशासन प्रक्रियेतील सहभाग वाढीस लागला आहे.

४) जागतिक स्तरावर काही रचनात्मक बदल झालेले दिसून येतात. त्यामुळे स्वंयसेवी संस्थांच्या सहभागाला वाव मिळाला आहे. बऱ्याच बंदिस्त व्यवस्था खुल्या झाल्या आहेत. राष्ट्रा-राष्ट्रांमधील परस्पर संबंध वाढले आहेत. सहज उपलब्ध होणाऱ्या प्रभावी संपर्क साधनांमुळे जग जवळ आले आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदल झालेले दिसून येतात. नागरी संघटनांनी या तिन्ही क्षेत्रात आपले कार्य विस्तारले आहे. जागतिकीकरणाचा सर्वांना फायदा झालेला नाही. काही समाजगटांना त्यांचा चांगलाच फटका बसला आहे. त्यांच्या संदर्भात सामाजिक न्यायाच्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत. नागरी संघटनांनी या समस्या सोडविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. जुबीली २००० या संस्थेने विकास, धर्म आणि मानवी हक्क या क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना तिसऱ्या जगातील देशाच्या आंतरराष्ट्रीय कर्जाच्या प्रश्नाच्या संदर्भात एकत्र आणले आहे.

५) माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानात झालेली प्रगती हा पाचवा महत्त्वाचा घटक आहे. यामुळे एकमेकांपासून हजारो मैल राहूनही नागरी संघटनांचा एकमेकांशी संपर्कात राहून आपल्या कार्यात सुसूत्रता आणणे शक्य झाले आहे. माहितीच्या प्रसारणाचा वेळ, वेग प्रचंड वाढला आहे. इंटरनेटच्या माध्यमातून प्रचंड माहितीची देवाण-घेवाण सहजपणे करता येते. तसेच माहितीच्या प्रसारणावर पूर्वीसारखे माध्यमांचे बंधन राहिलेले नाही. लेख, चित्रे, ध्वनी, चलचित्रे, व्हिडिओ कॉन्फरन्सींग इत्यादी बहुविध माध्यमांद्वारे संपर्क साधता येतो. यामुळे राष्ट्रीय सीमांच्या पलिकडे संघटन करणे, संसाधने उपलब्ध करणे शक्य झाले आहे. चीनमध्ये लोकशाहीसाठी झगडणाऱ्या विद्यार्थ्यांना आपला आवाज जगभर पोहचवता येऊ शकतो. तसेच विविध असाध्य रोगांवर संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना एकमेकांच्या संपर्कात राहून माहिती मिळवता येते.

८.४ नागरी समाजाची भूमिका :

स्वंयसेवी संस्था, सामाजिक चळवळ आणि नागरी संघटनांविषयी उपलब्ध असलेल्या माहितीचा आढावा या सर्व संस्था आणि संघटना जागतिक राजकारण आणि अर्थकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत ते स्पष्ट होते.

१) **सामाजिक न्यायाच्या स्थापनेत पुढाकार :** सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात नागरी संघटनांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जागतिकीकरणामुळे गरीब आणि श्रीमंत आणि गरीबांमधील दरी रुंदावली आहे. हे अलिकडेच उपलब्ध झालेल्या काही माहितीवरुन निर्विवादापणे सिध्द झाले आहे. मानवी हक्क कामगार आणि विकासाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी याची विशेष दखल घेतली आहे. अनेक स्वंयसेवी संघटनांनी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि नागरिक जागतिक व्यापार संघटना सारख्या संघटनांच्या उदारमतवादी धोरणाविरुध्द जनआंदोलन उभे करुन निषेध व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. याच संघटनांच्या या धोरणामुळे विकसनशील. राष्ट्रांमधील दारिद्र्य वाढले आहे असे त्याचे म्हणणे आहे.

जागतिक असमानता दूर करणे आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करण्याच्या दृष्टीकोनातून पाहिले असता गरीब देशांचे कर्ज श्रीमंत राष्ट्रांकडून आणि त्यांचेच वर्चस्व असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांकडून घेतलेले माफ करण्यासंबंधीचे नागरी संघटनांचे आंदोलन महत्त्वाचे ठरते. जी-८ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या संघटनांवर यासंबंधी दबाव आणला जात आहे. जुबीली चळवळीत हे कर्जमाफीचे आंदोलन चालविले आहे. नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या निर्मितीसाठी ही संघटना विशेष प्रयत्न करीत आहे. या नव्या अर्थव्यवस्थेत विकसनशील आणि मागास राष्ट्रांना विशेष स्थान असेल आणि त्यांना विकासाची संधी दिली जाईल. कर्ज माफीमुळे नवी व्यवस्था प्रत्यक्षात आणणे शक्य होईल. कर्ज माफी हा केवळ आर्थिक प्रश्न नसून तो न्यायाचा प्रश्न आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

२) **प्रशासनाचे लोकशाहीकरणास हातभार :** ज्या सामाजिक गटांना कुठेच प्रतिनिधीत्व मिळत नाही, अशा गटांना आवाज जगासमोर मांडून नागरी संघटना महत्त्वाची भूमिका बजावित आहे. या कार्यातून ते जागतिक लोकशाहीला एकप्रकारे चालना देत आहेत. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक संघटना या तीन प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांच्या व्यवहारामध्ये लोकशाहीच्या तत्वाचा पुरस्कार करुन त्यांच्या कारभारामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक नागरी संघटना आंदोलन करीत आहेत.

त्यांच्या मते - तिन्ही संस्था जगातील सर्व राष्ट्रांचे योग्य प्रतिनिधीत्व करीत नाही. त्यांचे वर्तन बेजबाबदारपणाचे आहे. त्यांचा कारभार अपारदर्शी आहे. आंतरराष्ट्रीय अर्थ संस्थांनी या सव मुद्यांची आणि मागण्यांची दखल घेतली आहे. त्यांनी नागरी संघटनांबरोबर या संदर्भात चर्चेला सुरुवात केली आहे. जबाबदारीचा मुद्दा लक्षात ठेवून जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने स्वत:च्या कार्याच्या स्वतंत्र्य लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र्य यंत्रणा उभी करुन सुरुवात केली आहे.

३) **विकासात्मक पर्यायी चळवळ :** विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात सामाजिक न्याय, सहभाग, सबलीकरण, टिकाऊपणा या मुद्यांवर आधारित विकासाच्या नव्या संकल्पना विकसित केल्या. उदा. भारतातील नर्मदा बचाव आंदोलन किंवा चिपको आंदोलन संयुक्त राष्ट्रांच्या विविध परिषदांना समांतर परिषद आयोजित करणे हा नियमच होवून गेला आहे. जागतिक सामाजिक परिषद दरवर्षी भरविली जाते.

World Social Forum कोपनहेगन येथे मार्च १९९५ मध्ये भरवलेल्या स्वंयसेवी संस्थांच्या शिखर परिषदेमध्ये आर्थिक उदारिकरणाचे धोरण नाकारण्यात आले आहे. उत्तर आणि दक्षिण गोलार्धातील शासनांना स्विकारलेल्या या धोरणामुळेच जागतिक पातळीवर सामाजिक समस्या वाढल्या आहेत असे मत या शिखर परिषदेत मांडण्यात आले. समुद्यांचा वाढता सहभाग, सामाजिक न्याय, सबलीकरण स्वंयपूर्तता इत्यादी तत्वांचा त्यांनी पुरस्कार केला.

४) **संघटनात्मक सल्लागाराचे कार्य :** बालमजुरी, पर्यावरणाचा ऱ्हास मानवी हक्कांचा भंग ह्या क्षेत्रात स्वंयसेवी नागरी संघटनांनी सहभागी होऊन महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे जागतिक अर्थकरण आणि राजकारणांना बरेच बदल झाले आहेत. उदा. बालमजुरी विरुध्दच्या त्यांच्या कार्यामुळे अनेक शासनांनी त्या विरोधात कायदे केले आहेत किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्यांची कडक अंमलबजावणी केली आहे.

नागरी संघटनांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणावरही आपला प्रभाव टाकला आहे. विविध दबावांचा सर्व पातळ्यांवर प्रयोग करुन त्यांनी हे साध्य केले आहे. जागतिक व्यापारी संघटनेने बौध्दिक संपदा हक्काविषय काही व्यापारी करार केले. त्यामुळे जागतिक स्तरावर औषधांच्या किमंती प्रचंड वाढल्या. त्याचा मोठा फटका विकसनशील राष्ट्रातील गरीब रुग्णांना बसला. एच.आय.व्ही. बाधित आणि तस्तम असाध्य रोगांनी ग्रस्त झालेल्या रुग्णांना स्वस्त दरात औषधे मिळणे कठीण होऊन बसले. नागरी संघटनांनी यावर जगभर आवाज उठविला आहे.

५) **सेवांचा ओघ नागरी संघटनांकडून होतो :** स्वंयसेवी संस्था अनेक जीवनाश्यक वस्तूंचा आणि सेवांचा पुरवठा करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक प्रसंगात त्यांनी मानवी कल्याणकारी व विकासासाठीची मदत करणे मुश्किल झाले होते. अशा ठिकाणी या संस्था कार्य करीत आहेत. बऱ्याचवेळा त्या सरकारच्या बरोबरीने काम करतात. काही संस्था खाजगी कंपन्याच्या बरोबर सामाजिक कार्य करतांना दिसतात.

६) **योग्य माहितीचा प्रसार :** काही नागरी संस्था, संघटना, स्वतंत्र संशोधन करुन नागरी समस्या विषयीची मते आणि शासनासमोर मांडतात. पर्यावरणवादी, विकासवादी आणि स्त्रीवादी चळवळींनी याबाबतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याच्यांमुळे आजवर अंधारात राहिलेले अनेक मुद्दे प्रकाशात आले आहेत. त्याच्यासंबंधीची चर्चा होत आहे. लोकांच्या आणि शासनाच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावल्याचे महत्त्वाचे कार्य ह्या संस्था करीत आहेत.

त्याच्यासंबंधीची चर्चा होत आहे. नागरी संघटनांचा विविध माध्यमांशी चांगला संपर्क असतो. माध्यमांद्वारे जनतेला माहिती पुरविण्याचे कार्य केले जाते. विशेषत: पर्यावरणाच्या प्रश्नासंबंधी झालेल्या जनजागृतीचे उदाहरण होय.

संयुक्त राष्ट्रांस सल्ला :

संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यातील ७१व्या कलमामध्ये आर्थिक आणि सामाजिक परिषदेने निर्णय घेताना ठराव करताना स्वंयसेवी संस्थांशी सल्ला मसलत करावी अशी तरतूद करण्यात आली आहे. १९५० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेने तशा आशयाचा कायदा केला. त्याचप्रमाणे तीन प्रकारच्या संस्थांना मान्यता देण्यात आली.

१) परिषदेच्या कार्याशी थेट संबंधीत काही मोजक्या संस्था.

२) विशिष्ट क्षेत्रात मान्यता प्राप्त अशा संस्था.

३) इतर छोट्या संस्था.

१९५० पासून स्वंयसेवी संस्थांनी संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात सहभागी होवून महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

युध्द क्षेत्रात आणि इतरत्र पेरुन ठेवलेल्या भू-सुरुंगाबाबत आणि पर्यावरणाच्या प्रश्नासंबंधी स्वंयमसेवी संस्थांनी मोठे कार्य केले आहे. विविध देशांच्या धोरणांवरील त्यांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. परंतु सर्वच क्षेत्रात त्यांना अशा प्रकारचे यश मिळालेले नाही. विशेषत: संघर्ष निवारण्यामध्ये आणि युध्द थांबविण्यामध्ये या संघटना कमी पडल्याचे स्पष्ट जाणवते.

आपली प्रगती तपासा :

१) समाजाच्या संकल्पनेची व्याख्या देऊन स्वरुप स्पष्ट करा?

२) जागतिक नागरी समाजाची संकल्पना स्पष्ट करा?

३) समकालीन जागतिक राजकारणात नागरी समाजाच्या भूमिकेची चर्चा करा?

* * *

८(अ)

ॲम्नेस्टी इंटरनॅशनल

८.अ. प्रस्तावना
८.अ.१ पूर्व इतिहास
८.अ.२ उद्दिष्ट्ये
८.अ.३ रचना
८.अ.४ भूमिका
८.अ.५ मूल्यमापन

८.अ. प्रस्तावना :

ॲम्नेस्टी इंटरनॅशनल ही मानवी हक्क जाहीरनाम्यामध्ये समाविष्ट असलेली आणि इतर मानवी हक्कांचा पुरस्कार करणारी वैश्विक स्तरावर कार्य करणारी एक प्रशासकीय मान्यता प्राप्त अशी संस्था आहे. या संस्थेचे प्रमुख कार्य म्हणजे जगात कोठेही मानवी हक्कांचा भंग झाला असेल तर त्या संदर्भात संशोधन करुन मानवी हक्कांचा भंग थांबविण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविणे व मानवी हक्कांपासून वंचितांना न्याय मिळवून देणे. या उद्दिष्टांसाठी ही संस्था अस्तित्वात आलेली आहे.

या संस्थेची स्थापना जुलै, १९६१ साली करण्यात आलेली आहे. पीटर बॅनेखान हे या संस्थेचे मुख्य संस्थापक असून एकूण १६२ देशांमध्ये २२ लाखांपेक्षा जास्त सभासद कार्यरत आहेत. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल संस्थेचे मुख्य सचिवांच्या रुपात कार्यरत आहेत. जगातील मानवी समूह मानवी हक्कांपासून वंचि राहू नये यासाठी मानवी हक्कांचे संरक्षण करणे या उद्दिष्टांसाठी, प्रसिध्दी माध्यमांचे लक्ष वेधून घेणे यासाठी आंदोलने, संशोधन आणि दबाव तंत्राचा वापर करणे अशा स्वरुपाचे धोरण या संस्थेने आखलेले आहे. आज मितीस ॲम्नेस्टी इंटरनॅशनल ही मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी लढणारी जगातील सर्वात मोठी संस्था आहे. कारण, या संस्थेने या संदर्भात काम करण्यासाठी विविध क्षेत्रात तज्ञ असलेल्या व्यक्तीचे गट निर्माण केलेले आहेत. उदा. डॉक्टर, वकील, अभियंते.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या मते राष्ट्रीय, सांस्कृतिक, धार्मिक आणि विचार प्रणालीच्या सीमांच्या पलिकडे जाऊन लोकांना मूलभूत हक्क असतात. सर्व शासकीय संस्थांनी धर्मापासून दूर रहावे यासाठी ॲम्नेस्टी इंटरनॅशनल ही संस्था कार्यरत आहे.

८.अ.१ पूर्व इतिहास :

वर उल्लेख केल्याप्रमाणे या संस्थेची स्थापना जुलै १९६१ साली असली तरी ही संस्था निर्माण होण्यामागे मानवी हक्कांची पायमल्ली झाल्याच्या घटना आहेत आणि प्रमुख कारण म्हणजे पार्तुगालमध्ये एका विद्यार्थ्यांच्या गटाने एका सार्वजनिक रेस्टॉरेंट मध्ये स्वातंत्र्याच्या

घोषणा केलेल्या होत्या आणि ऐरीक बार्कर व तत्सम विद्वान कायदे तज्ञांशी चर्चा करुन "दयेसाठी याचना १९६१" या नावाने आंदोलन चालू केलेले होते. या आंदोलनांसाठी जे कोणी तुरुंगामध्ये गेले त्यांना "सदसद्विवेक बुध्दीचे कैदी" या नावाने संबोधले गेले. त्यानंतर आंदोलन कर्त्यांनी अशी मागणी केली कि, ज्या-ज्या देशांमध्ये स्वतंत्र्यासाठी लढणारे कैदी आहेत त्या सर्वांची सुरक्षा करावी. या चळवळीचे रुपांतर "ॲम्नेस्टी इंटरनॅशनल" अशा नावाने झाले.

पोर्तुगालच्या एका रेस्टॉरेंटमध्ये सुरुवात झालेली ही एक चळवळ आज जागतिक स्तरावरील एक महत्त्वाची चळवळ म्हणून आपले अस्तित्व टिकवून आहे. आलेल्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील कलम नं. १८ व १९ याचे पालन झाले पाहिजे, या चळवळीसाठी जगभरातून जे-जे आंदोलनकर्ते तुरुंगात गेलेले आहेत त्यांच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे. अशा स्वरुपाचे कार्य पार पाडण्यासाठी स्थानिक पातळीवर काम करण्यासाठी (Threes) नावाचे कार्यकर्त्यांचे गटांचे जाळे विणलेले आहे. मानवी हक्कांचे जागतिक स्तरावरील सर्वसणाचे, संवर्धनाच्या कार्याची दखल घेऊन १९७७ साठी या संस्थेस नोबेल शांतता पुरस्कार मिळाला.

तसेच १९७८ सालचे संयुक्त राष्ट्रांचे विशेष पारितोषिकही प्राप्त झालेले आहे.

८.अ.२ उद्दिष्ट्ये :

जगातील मानवी समूहाच्या मानवी हक्कांचे संरक्षण संवर्धन करण्यासाठी अस्तित्वात आलेली "ॲम्नेस्टी इंटरनॅशनल" ही संस्था, प्रांत, भाषा, वर्ण, धर्म, जात, जन्मस्थान, लिंग अशा कोणत्याच आधारावर भेदाभेद न करता सर्व मानव प्राण्याला मानवी हक्कांची प्राप्ती झाली पाहिजे. तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेने स्विकारलेल्या "जागतिक मानवी हक्कांचा जाहीरनामातील सर्व हक्क आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व हक्कांचा अंमलबजावणी होऊन त्या हक्कांचा कायदा सर्व मानवी समूहाला व्हावा हा प्रमुख उद्देश या संस्थांचा आहे. इतकेच नव्हे तर त्या कायद्याचा आधार असलेल्या मूल्यांचा म्हणजे स्वातंत्र्य, समता सामाजिक न्याय, बंधुता यांचा सन्मान केला पाहिजे असा आग्रह ही संस्था धरते." या संघटनेची पुढील उद्दिष्ट्ये आहेत.

१) राजकीय कैद्यांना नि:पक्षपाती आणि शक्य तितक्या लवकर न्याय मिळवून देणे.
२) सद्विवेक बुध्दीच्या कैद्यांची मुक्तता करणे.
३) मृत्युदंडाशी शिक्षा रद्द करण्याचा आग्रह सर्व राष्ट्रांकडे धरणे.
४) कैद्यांचा छळ किवा त्यांना मिळणारी क्रूर, अमानुष आणि अपमानकारक वागणूक थांबविणे.
५) तुरुंगातील व्यवस्था आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या मानकाप्रमाणे असावी.
६) जगातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षन मिळण्याची व्यवस्था करावी.
७) राजकीय हिंसाचार थांबवून हत्या व अपहरण यासारख्या घटनांना प्रतिबंध घालणे.
८) लहान मुलांना शारीरिक, बौध्दिक नुकसान होईल अशा सेवांपासून वंचीत करणे.
९) जागतिक स्वरुपावर मागास वर्गाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा पुरस्कार करणे.
१०) वेगवेगळ्या कारणाने झालेल्या स्थलांतरीताच्या व आश्रय मागणाऱ्याच्या मागण्याच्या हक्कांचे संरक्षण करणे.
११) बेकायदेशीर रित्या होणाऱ्या हत्या व सशस्त्र संघर्ष थांबविणे.

८.अ.३ रचना :

आज जागतिक स्तरावर काम करीत असलेल्या या संस्थेच्या स्थापनेची कल्पना एका व्यक्तीच्या डोक्यात आलेल्या विचाराची परिनिती होय. आज या संस्थेचे रुपांतर अगदी सुसंघटीत संस्थेत झालेले आहे. या संस्थेचे एक विशेष वैशिष्ट्ये म्हणजे कि, या संस्थेचे सभासद "स्वंयसेवक" आहेत. त्यांना या संस्थेचे काम करतात म्हणून कोणत्याही प्रकारचे मानधन किंवा मोबदला दिला जात नाही तर त्यांना या संस्थेचे उद्देश व धैर्य धोरणे आवडतात म्हणून विचार पटतात म्हणून ते सर्व सभासद स्वंयस्फूर्तीने या संस्थेत काम करतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या संस्थेचे सभासदत्व मिळविण्यासाठी कसल्याही प्रकारची पूर्व परिक्षा द्यावी लागत नाही.

या संस्थेची काम करण्याची पध्दत म्हणजे ॲम्नेस्टीचे त्याच्या देशातील सदस्य त्या-त्या देशात "सेक्शन" चालवितात. ज्या देशात सदस्य संख्या कमी असेल तिथे त्याला "स्ट्रक्चर" म्हणतात. ज्या ठिकाणी "सेक्शन व स्ट्रक्चर दोन्ही नसतात ते ॲम्नेस्टी असते." एका झालेल्या अभ्यासावरुन असे लक्षात येते कि, २००५ मध्ये संपूर्ण जगभरात "ॲम्नेस्टी इंटरनॅशनलची" ४२ सेक्शन होती. दर दोन वर्षांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाते ते विशिष्ट चर्चा करण्यासाठी.

जागतिक दर्जाच्या या संस्थेचा कारभार पाहण्यासाठी पुढील प्रकारची यंत्रणा निर्माण केलेली आहे.

अ) आंतरराष्ट्रीय कार्यकारी समिती :

ही संस्थेची प्रथम समिती होय. ह्या समितीमध्ये खालील प्रकारचे अधिकारी असतात.

१) अध्यक्ष - संख्या एक.

२) खजिनदार - संख्या एक.

३) सदस्य - ०८.

वरील सदस्यांना आंतरराष्ट्रीय परिषद निवडून देते. वरील सर्व सभासद व इतर जनाचा कार्यकाल हा दोन वर्षांचा असतो. ही समिती सर्व सदस्याच्या वतीने निर्णय घेते.

ब) आंतरराष्ट्रीय सचिवालय :

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे दैंनदिन कामकाज पाहण्यासाठीची जबाबदारी सचिवालयावर असते. या सचिवालयाचे कार्ये आंतरराष्ट्रीय परिषद व आंतरराष्ट्रीय कार्यकारी समिती यांच्या निर्देशानुसार चालते. या सर्वांचा मुख्य (नेता) सचिव असतो. या संस्थेचे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणजे सभासदाच्या वर्गणी व देणगीदाराच्या देणगी हे होय. उत्पन्नाचे साधणे फारचे नसले तरी ही संस्था शासकीय मदत स्विकारीत नाही.

८.अ.४ भूमिका :

जगातील कोणताही माणूस हक्कांपासून वंचित राहू नये हे ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे स्वप्न आहे. प्रतिष्ठेचे आणि दर्जाचे जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व हक्क प्रत्येक माणसाला मिळाले पाहिजेत. यासाठी माहितीचा प्रसार करणे, जनमत तयार करणे, वेगवेगळ्या स्वरुपाच्या चळवळी करणे असे अनेक कार्यक्रम या संस्थेने विकसित केलेले आहेत.

संस्थेचे कार्यक्रम :

एखाद्या घटनेचा अहवाल पूर्ण करण्याअगोदर ही संस्था त्यावर अगोदर पूर्णपणे संशोधन करते म्हणून नि:पक्षपाती व अचूक अहवाल प्रसिध्द करणे हे ॲम्नेस्टीचे स्वत:चे आगळे वेगळे खास वैशिष्ट्य आहे. अहवाल प्रसिध्द करण्यापूर्वी आवश्यक तितक्या व्हड्या लोकांच्या मुलाखाती घेऊन व अनेक संबंधित संस्थांशी संबंध प्रस्थापित केला जातो. नंतर ह्या आधारावर मिळालेली माहिती ही दृक, दृकश्राव्य प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसिध्द केली जाते. जसे वर्तमानपत्रे, टी. व्ही. रेडिओ इत्यादी तसेच संगणकाच्या युगात तर संकेत स्थळांचाही वापर केला जातो. ॲम्नेस्टी इंटरनॅशनल जनमतासाठी जे आंदोलने उभारते ते व्यक्तिगत पातळीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीवरचे असतात अशा स्वरुपाच्या आंदोलनाचे तंत्र म्हणजे संबंधीतांना आव्हाण, मताचा प्रसार, मोर्चे, निदर्शने, माध्यमांचा वापर इ. होत. आंदोलने उभारण्यासाठी लागणारा पैसा ही संस्था सांस्कृतिक कार्यक्रमातून उभी करते यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द असलेले गायक, नट, नट्या, डापटू यांचे कार्यक्रम लावून उभा केला जातो.

"ॲम्नेस्टी इंटरनॅशनल" ही संस्था खऱ्या अर्थाने मानवीय दृष्टीकोनातूनच कार्ये करते हे त्यांच्या कार्य करण्याच्या पध्दतीवरुन लक्षात येते. ॲम्नेस्टीचे स्वंयसेवक कैद्यांना दत्तक घेऊन त्यांच्या सुटकेसाठी आटोकाट प्रयत्न करतात. तसेच त्यांच्या कुटुंबियांची पूरेपूर काळजी घेतात. कैद्यांच्या सुटकेसाठी ही संस्था विविध राष्ट्रांना भेटी देतात व मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने त्या संबंधीत राष्ट्रांच्या कायद्यामध्ये काही कमतरता असतील तर त्या दूर करण्यासाठीच सल्ला देतात. यामध्ये एखाद्या राष्ट्रांची बदनामी करण्याचा उद्देश नसतो तर त्या संबंधित कायद्यामुळे आंतरराष्ट्रीय मानवी अधिकार कायद्याचा भंग होऊ नये हाच एकमेव हेतू असतो. भारत सरकारने आंतरराष्ट्रीय मानवी अधिकारवादी कार्य मान्य केलेली आहे.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या कार्याचा आढावा पुढील टप्प्यातून घेता येईल.

१. १९७० च्या दशकातील कार्य :

१९६१ साली स्थापन झालेल्या या संस्थेने या दशकात बऱ्यापैकी कार्य केल्याचे दिसून येईल. कैद्यांच्या सुटकेसाठीचे कार्ये तर त्यांचे चालूच होते. पण त्याचबरोबर कैद्यांच्या सुटकेसाठीच उचीत स्वरुपाचा खटला चालविण्याचा हक्क मिळावा आणि तुरुंगामध्ये जो कैद्यांचा अनन्वीत छळ केला जायच तो थांबविण्यासाठी याच दशकात कार्ये केले. विशेष म्हणजे मृत्युदंडाची शिक्षास असलेले विरोध व बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्याच्या मोहिमा, या संस्थेने राबविल्या यासाठी "त्वरीत कृतीचा" कार्यक्रम लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी चालू करुन जनमत मिळविण्याचा प्रयत्न केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांना पूरक अशा कायद्याचा समावेश आपआपल्या घटनेत करावा यासाठी प्रयत्न केले.

२. १९८० च्या दशकातील कार्य :

या दशकात "ॲम्नेस्टी इंटरनॅशनल" समितीने बाळसे धरलेले होते. या दशकात या संस्थेंस मागील दशकाच्या कार्यापेक्षा जरा वेगळ्या रुपाचेच कार्ये करावे लागले.

या दशकात जगभरात शरणांगतांची संख्या वाढलेली होती. काही देश शरणागतास आश्रय नाकारीत होते. कारण आश्रय दिल्यास त्या संबंधीत देशाच्या अर्थ व्यवस्थेवर परिणाम तर पडणार होताच पण सामाजिक स्वास्थ बिघडणार होते. नकाराची भूमिका घेतल्यामुळे अशा देशांवर टिकेंची झोड उठत होती. ॲम्नेस्टीची भूमिका या सर्व बाबींवर प्रकाश टाकणारी होती. या संस्थेने असे जाहीर केले कि, आश्रय देण्याचा वा न देण्याचा प्रश्न हा वेगळा आहे. मुळ प्रश्न असा आहे कि, आश्रय मागण्यासारखी ज्या देशात परिस्थिती निर्माण होते यास जबाबदार कोण? म्हणून त्या संबंधीत देशातील मानवी हक्कांचा जो भंग होतो त्याविषयी सखोल विचार झाला पाहिजे.

३. १९९० च्या दशकातील कार्य :

या दशकात ॲम्नेस्टीने महत्त्वाचे कार्ये केले कारण याच दशकात दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी धोरणा विरुध्द आवाज उठविला गेला होता. तसेच सर्बिया, कोसोवो या देशात जो हिंसाचाराचा डोंब उफाळला होता त्याविरुध्द या संस्थेने आवाज उठविला या सर्व बाबींमध्ये ॲम्नेस्टीची भूमिका अशी होती कि, मानवी हक्कांसंबंधी किरकोळ वाटणाऱ्या प्रश्नाकडे जर वेळीच लक्ष दिले तर वरीलप्रमाणे समस्या उद्भवणार नाही.

याच दशकात (When the state kills) ह्या मृत्युदंडाची शिक्षा रद्द करण्यासंबंधीचा अहवाल प्रसिध्द करुन या शिक्षेविषयी आपली भूमिका साफ केली. कोणत्याही परिस्थितीत मानवी हक्कांचे संवर्धन झाले पाहिजे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वतंत्र उच्चायुक्त तर नेमलेच पण त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर फौजदारी न्यायालयाच्या स्थापनेची मागणी करणे हे कार्य फार मोलाचे समजले जाते.

४. २१ व्या शतकातील कार्ये :

२१ व्या शतकात जागतिक स्तरावर जे बदल झाले त्यानुसार "ॲम्नेस्टी" ने आपल्या धैर्य धोरणात बऱ्याच प्रमाणात बदल केल्याचे दिसून येईल. या बदला बरोबरच "ॲम्नेस्टीने" आपल्या मोहिमांमध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील हक्कासंबंधीच्या लढ्याचा समावेश केला. जागतिकीकरणाच्या प्रचंड वाढत्या प्रभावामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची ताकद वाढली त्यामुळे दुर्बल राष्ट्रे ही जास्तच दुर्बल होत गेली. या काळात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली होती. जगात दहशतवादी हल्याने थैमान माजविले होते. दहशतवादी हल्ल्याचे सोंग पुढे करुन, अमेरिकेसारख्या महासत्तानी ही नागरिकांच्या सुरक्षिततेचे कारण पुढे करुन (इतर राष्ट्रांनी सुध्दा) आपआपल्या देशात नागरिकांना असलेल्या हक्क व स्वातंत्र्य संकुचीत करण्याचा (त्यावर गदा आणण्याचा) प्रयत्न करत होते. या वरील सर्व कारणांमुळे "ॲम्नेस्टीस" आपल्या आंदोलनामध्ये बऱ्याच प्रमाणात बदल करावे लागले. ॲम्नेस्टीचा वरील सर्व बाबीस विरोध होताच तिच्या म्हणण्यानुसार मानवी हक्क हे मानवी समूहाच्या संरक्षणासाठीचा आधार आहेत ते अडथळा नाहीत.

८.अ.५ मूल्यमापन :

जगातील कोणत्याही देशाची शासन व्यवस्था आणि मानवी हक्क संघटना याच्यामध्ये फार खोलवर संबंध असणे कठीण बाब असते. याचे महत्त्वाचे कारण असे सांगता येईल कि, कोणत्याही शासन व्यवस्थेला गुप्तता ही प्रिय असते. बऱ्याच वेळा

शासनास मिळालेले अधिकार यांचा वापर व गैरवापर यांच्यामधील सीमा रेषा बरीचशी पूसट असते. याच कारणांमुळे त्या-त्या देशातील शासन व्यवस्था व मानवी हक्क संघटना यांच्यात खटके उडत असतात. जगात सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला म्हणून या कार्याची दखल घेऊन १९७७ सालचा नोबेल शांतता पुरस्कार ॲम्नेस्टीस मिळाला. या पुरस्काराबरोबरच जगामध्ये मानवी हक्कांपासून कोणीही वंचित राहू नये म्हणून यासाठी झटत असलेल्या ॲम्नेस्टीस संयुक्त राष्ट्र संघटनेचे मानवी हक्क विषयक पारितोषिकही मिळाले. ही जमेची बाजू असून ॲम्नेस्टीची एक प्रकारची सकारात्मक बाजू आहे. पण दुसरीकडे या संघटनेस टीकेस सुध्दा सामोरे जावे लागले. ते असे कि, चीन कांगो, रशिया, इस्त्रायल, दक्षिण कोरीया, अमेरिका, व्हिएटनाम या देशांनी ॲम्नेस्टी ही एकतर्फी स्वरुपाची काम करते असा ठपका ठेवला. तसेच ती कायद्याचा भंग करणारी संघटना आहे अशा प्रकारची संभावना केली गेली. अमेरिकेसारख्या प्रगत देशातील ५० पैकी २४ राज्यामध्ये १८ वर्षाखालील गुन्हेगारांसाठीही फाशींची शिक्षा दिली जायची या विरुध्द ॲम्नेस्टीने जोरदार आवाज उठविला. २००० साली ॲम्नेस्टीने असा आरोप केला कि, युध्दात विशेष काळजी न घेतली गेल्यामुळे अनेक निरपराध नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले.

ॲम्नेस्टीचे मूल्यमापन करीत असताना एक मुद्दा लक्षात घ्यावा लागतो कि, "ॲम्नेस्टीने" चीन, अमेरिका सारख्या महासत्तेवर सुधा टीका केलेली आहे. या महासत्ताच्या म्हणण्यानुसार भारतीय लष्कर व इतर शस्त्रत्र दलाने, दहशतवाद व इतरांच्या विरोधात केलेल्या कारवाईमुळे अनेक निरपराध लोकांचे प्राण गेलेले आहेत. याविरुध्द ॲम्नेस्टीने आपला अहवाल देऊन मत व्यक्त केलेले आहे. जगभरातील पत्रकार, राजकीय अधिकारी कार्यकर्ते, ॲम्नेस्टीचा अहवालाला विश्वासहार्य मानतात. त्यांच्या म्हणण्यानुसार ॲम्नेस्टीचा अहवाल वस्तुनिष्ट स्वरुपाचा असतो. यावरुन ॲम्नेस्टीचे हे कार्ये मानवी हक्क संरक्षणासंदर्भात महत्त्वपूर्ण योगदान आहे.

"ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने" २००८ सालू आपला वार्षिक अहवाल प्रसिध्द केलेला होता. त्या अहवालात स्पष्टपणे नमूद केलेले आहे कि, "मानवी हक्काचा जाहीरनामा" प्रसिध्द होऊन ६० वर्षे उलटून गेली तरी आजही जगभरात जवळपास ८१ देशांमध्ये लोकांचा छळ केला जातो. ५४ देशांमध्ये अनुचीत स्वरुपात गुन्हाच्या घटना घडतात. तर २१ व्या शतकातही ७७ देशांमध्ये तेथील नागरिकांना मत स्वातंत्र (अभिव्यक्ती स्वातंत्र) नाही. स्वत:ला प्रगत समजणारे युरोपीयन युनियन मधील काही देश मानवी हक्कांचे पालन करीत नाहीत म्हणून याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

आपली प्रगती तपासा :

१) ॲम्नेस्टी इंटरनॅशनलची रचना व स्वरुप स्पष्ट करा?

२) ॲम्नेस्टीचे इंटरनॅशनलची उद्दिष्ट्ये कोणती आहेत?

३) ॲम्नेस्टीच्या इंटरनॅशनलची कार्याचे मुल्यमापन?

* * *

८(ब)

कंझ्युमर्स इंटरनॅशनल

८.ब. प्रस्तावना
८.ब.१ पूर्व इतिहास
८.ब.२ उद्दिष्ट्ये
८.ब.३ भूमिका
८.ब.४ मूल्यमापन

८.ब. प्रस्तावना :

कंझ्युमर्स इंटरनॅशनल ही एक स्वातंत्र्य व खाजगी कोणत्याही प्रकारचा नफा न मिळविण्याचा उद्देशाने अस्तित्वात आलेली स्वंयसेवी संघटना आहे. जगातील सर्वच ग्राहक संघटनांना मदत करुन त्यांचे प्रतिनिधीत्व करणारी ही एक आंतरराष्ट्रीय स्वरुपाची संघटना आहे.

अशा या स्वंयसेवी संघटनेची स्थापना १९६० साली न्युयॉर्क येथे झाली. तसेच महत्त्वाच्या शहरात म्हणजे क्वांलालंपूर, सैटिएगे, लंडन, हरारे इत्यादी शहरात विभागीय कार्यालये आहेत. तसेच या व्यतिरिक्त जगातील प्रमुख ११९ देशातील २६३ ग्राहक संघटना या संघटनेच्या सभासद आहेत.

कंझ्युमर्स इंटरनॅशनल ही संघटना प्रामुख्याने ग्राहकांना मदत करणे, त्यांचे संरक्षण करणे व त्यांचे सबलीकरण करणे हे या मुख्य कार्यासाठीच ही संस्था अस्तित्वात आलेली आहे. या संघटनेच्या कार्यावरुन कंझ्युमर्स इंटरनॅशनल संयुक्त संघामध्ये सल्लागाराचा दर्जा मिळाला आहे. सदरचे स्थितीमध्ये या संघटनेचे सॅम्यूअल ओशिंग हे अध्यक्ष आहेत.

८.ब.१ पूर्व इतिहास :

न्युयॉर्कमध्ये कंझ्युमरची स्थापना झाल्यापासून आपल्या हक्कांसाठी लढा देऊ लागले आहेत असे मानण्यात येते. या संघटनेने अशी भूमिका घेतली कि, ज्या कंपन्या कामावर बाल मजूर ठेवत नाही, त्याची मजुरी देतात. कामाच्या ठिकाणी उत्तम सोयी पुरवितात. अशाच कंपन्यांचा माल खरेदी करावा अशी भूमिका आहे.

अमेरिकेमध्ये ग्राहक चळवळी संदर्भात दोन घटना महत्त्वपूर्ण मानल्या जातात. "जॉन एफ केनेडी" हे अमेरिकन राष्ट्रध्यक्ष आणि अमेरिका सरकार ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यास कटिबंध्द असल्याचे घोषित केले. त्यांनी ग्राहकांच्या चार मूलभूत हक्कांना मान्यता दिली. सुरक्षा, माहिती निवड आणि तक्रार निवारणाचा हक्क हे चार हक्क होते.

१५ ऑगस्ट, १९६२ रोजी अमेरिकेच्या कायदेमंडळात ग्राहकांच्या हक्कासंबंधीचे विधेयक मांडण्यात आले. त्यावेळच्या आपल्या भाषणात केनेडी म्हणाले तसे पाहिल्यास आपण सर्वच ग्राहक आहोत. ग्राहकांचा गट हा सर्वात मोठा आर्थिक गट आहे.

त्याच्यावर प्रत्येक खाजगी आणि सार्वजनिक निर्णयाचा परिणाम होतो. पण त्याचे मत कधीच ऐकून घेतले जात नाहीत. या भाषणात स्मृती जागृत ठेवण्यासाठी १९८३ पासून दरवर्षी १५ मार्च हा "ग्राहक हक्क दिन" म्हणून साजरा केला जातो.

याच दशकातील दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे १९६० मध्ये संघाची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आली. सुरुवातीलाच तिचे मुख्यालय नेदरलँडमध्ये (हॉलंड) द हेग येथे होते आणि काळानंतर हीच संस्था कंझ्युमर्स इंटरनॅशनल म्हणून ओळखली जावू लागली. तिचे मुख्यालय लंडन येथे हलविण्यात आले. त्यानंतर १९७० आणि १९८० ह्या दशकांमध्ये ग्राहक चळवळीचा प्रसार आशिया आणि आफ्रिकेत झाला. १९९० च्या दशकात ही चळवळ पूर्वीच्या सोव्हिएट युनियन पासून स्वतंत्र झालेल्या देशामध्ये झाला.

ग्राहकांचे हक्क :

कंझ्युमर्स इंटरनॅशनल हे ग्राहकांचे मूलभूत हक्क मानले आहेत.

१. मूलभूत गरजापूर्ण करुन घेण्याचा हक्क :

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, सार्वजनिक सोयीसुविधा, खेळाचे मैदान, सिनेमा आणि नाट्यगृहे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, संपर्क साधने, पिण्याचे पाणी आणि इतर वापरासाठीचे पाणी, सांडपाणी व्यवस्था या सगळ्या गोष्टींचे समावेश मूलभूत गरजांमध्ये होतो.

२. सुरक्षिततेचा हक्क :

घातक आणि अपायकारक उत्पादनापासून तसेच सेवापासून सुरक्षा, त्याशिवाय धोकादायक उत्पादन प्रक्रियांपासून संरक्षण.

३. ग्राहकांच्या उत्पादने व सेवाविषयी माहिती मिळविण्याचा हक्क :

ग्राहकाला वस्तु अथवा सेवांची निवड करताना योग्य निर्णय घेता यावा इतपत माहिती उपलब्ध झाली पाहिजे. अप्रामाणिक आणि दिशाभूल करणाऱ्या जाहीरातीपासून ग्राहकाचे संरक्षण केले पाहिजे.

४. निवड करण्याचा हक्क :

बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक पर्यांयामधून योग्य वाटेल त्याची निवड करण्याचा अधिकार.

५. ग्राहकांच्या त्यांची बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क :

सरकारी धोरण तयार करताना ग्राहकाचे म्हणणे ऐकून घेतले गेले पाहिजे तसेच उत्पादनाची आणि सेवांची निर्मिती करतानाही ग्राहकाच्या म्हणण्याला महत्त्व दिले पाहिजे.

६. तक्रार करणे व समाधानकारक मोबदला मिळविण्याचा हक्क :

न्यायदानाचे उचित समाधान झाले पाहिजे. ग्राहकाने केलेला दावा योग्य असल्यास त्याचे समाधान झाले पाहिजे. त्याला योग्य नुकसान भरपाई मिळाली पाहिजे.

७. ग्राहक शिक्षणाचा हक्क :

वस्तु पारखून घेण्यासंबंधीचे प्रशिक्षण, कायद्याचे ज्ञान, हक्काचे भान ते कसे मिळवायचे त्याचे मार्ग, तक्रार केव्हा आणि कशी करायची याचे ज्ञान ग्राहकाला मिळाले पाहिजे.

८. आरोग्यदायी पर्यावरणाचा हक्क :

उदा. एखादी व्यक्ती किंवा एखादी कंपनी केवळ आपल्या फायद्यासाठी मागास तंत्रज्ञान वापरुन पर्यावरणाचे नुकसान करीत असेल तर त्यांना थांबविणे.

विकास आणि पर्यावरण संरक्षण यापैंकी बऱ्याच वेळा एकच गोष्ट शक्य असते. उदा. विकास म्हणजे पक्की घरे बांधणे, नद्यांव धरणे उभी करणे, रस्ते आणि महामार्ग उभे करणे हे सर्व करतांना पर्यावरणाची हानी होते. पर्यावरणाचे संतुलन बिघडते असे असले तरी आजच्या आपल्या जीवनशैलीचा स्तर राखण्यासाठी हे सर्व करणे आवश्यक असते. ह्या गुंत्यातून मार्ग काढण्यासाठी उत्पादनाची पध्दती बदलणे, तसेच जीवनशैली बदलणे आवश्यक आहे. तसे झाले तरच पर्यावरणाचे रक्षण आणि पर्यायाने नागरिकांच्या आरोग्यदायी पर्यावरणाचा हक्क सुरक्षित ठेवणे शक्य होईल. कंझ्युमर्स इंटरनॅशनल या सर्व मुद्यांवर संशोधन आणि धोरण ठरविण्याचे कार्य करते. गरज पडेल तेथे जनआंदोलने पुकारली जातात.

८.ब.२ कंझ्युमर्स इंटरनॅशनलची उद्दिष्ट्ये :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

१) प्रत्येक देशांमध्ये सर्वसमावेशक ग्राहक संरक्षण कायदे असावेत.

२) बाजाराच्या योग्य नियंत्रणासाठी कायदे असावेत, सरकारने ते प्रभावीपणे अंमलात आणावेत.

३) सर्व ग्राहकांना योग्य प्रशिक्षण मिळावे.

४) ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारी आणि धोरणावर व धोरण तयार करणाऱ्यावर प्रभाव टाकू शकणारी स्वतंत्र व प्रभावी ग्राहक संघटना असावी.

५) आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्णय घेताना ग्राहक हित लक्षात घेतले जाईल आणि त्यांचा सन्मान केला जाईल हे पहावे.

६) जगाच्या वेगवेगळ्या भागात विकास, बाजार आणि ग्राहकांची स्थिती भिन्न आहे. त्यामुळे कंझ्युमर्स इंटरनॅशनल प्रवेशानुसार आपली उद्दिष्टे आणि त्याचा प्राधान्य क्रम बदलतो.

७) आफ्रिकेत मूलभूत विकासांच्या मुद्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. सामान्य नागरिकांना आवश्यक वस्तू आणि सेवा उपलब्ध व्हाव्या यासाठी विशेष प्रयत्न केले जातात त्याकरिता आर्थिक आणि सामाजिक धोरणाकडे आणि त्याच्या अंमलबजावणीकडे लक्ष दिले जाते. मूलभूत मानवी हक्कांना मान्यता मिळावी, त्याचे संरक्षण व्हावे ग्राहकांना आपल्या हक्कांचे आणि जबाबदाऱ्यांची जाणिव व्हावी यासाठी कंझ्युमर्स इंटरनॅशनल प्रयत्न करते. स्थानिक ग्राहक संघटनाना सर्व मदत करुन प्रोत्साहन देण्याचे कार्य ही केले जाते.

८) आशिया, पॅसिफिक विभागात जीवनाचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात आला आहे. दारिद्र्याने गांजलेल्या लोकांसाठी विशेष कार्यक्रम राबविले जातात. या भागात चळवळीचा प्रसार व्हावा यासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

९) दक्षिण अमेरिका आणि कॅरेबियन विभागातून वस्तू आणि सेवाविषयी ग्राहकांच्या माहितीच्या अधिकारावर विशेष भर देण्यात येतो.

कंझ्युमर्स इंटरनॅशनल नव्या योजना :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या २००७ - २०१० च्या नवीन योजनेमध्ये खालील उद्दिष्टांच्या नव्या योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

१) जगभरातील ग्राहकांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या मुद्यांवर जिथे कंझ्युमर्स इंटरनॅशनलला शक्य असेल तेथे प्रभावी मोहिम घालविणे.

२) बहुराष्ट्रीय कंपन्याच्या जगभरातील वर्तनावर लक्ष ठेवणे.

३) देशांदेशांमध्ये आणि कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या माध्यमातून जगभर ग्राहकांसाठी झटणाऱ्या ग्राहक संघटना देशोदेशी स्थापन करणे.

४) जगभराच्या ग्राहक संघटनांना सामावून घेऊ शकणारी सशक्त भावी चिरकाल टिकेल अशी संघटना चयीर करणे.

कंझ्युमर्स इंटरनॅशनलचे सदस्यत्व :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलने राष्ट्रीय ग्राहक संघटनांची स्थापना केलेली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण करणे ही या संघटनांची उद्दिष्ट्ये होती. कंझ्युमर्स इंटरनॅशनलमध्ये तीन प्रकारचे सदस्य असतात.

१) **पूर्ण सदस्यत्व :** स्वतंत्र्य ना नफा, ना तोटा तत्वावर आधारित संस्थांना हे सदस्यत्व मिळते. त्यांना आपल्या उत्पन्नातील काही वाटा कंझ्युमर्स इंटरनॅशनलला वर्गणीच्या स्वरुपात द्यावा लागतो.

२) **सलग्न सदस्यत्व :** मर्यादित किंवा विशिष्ट उद्दिष्ट्ये असलेल्या नव्या ग्राहक संघटनांना या प्रकारचे सदस्यत्व दिले जाते.

३) **शासकीय संलग्न सदस्यत्व :** ग्राहकांविषयी धोरणे राबविणाऱ्या सहकारी विभागांना या प्रकारचे सदस्यत्व दिले जाते.

कंझ्युमर्स इंटरनॅशनलचे प्रशासकीय मंडळ :

दर तीन वर्षांनी कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या सर्व सदस्यांचे जागतिक अधिवेशन भरविले जाते. अधिवेशनात सर्व सदस्य वीस प्रतिनिधीच्या परिषदेची निवड करतात. या परिषदेत एक अध्यक्ष आणि एकोणीस सदस्य असतात. त्यांची वर्षांतून एकदा बैठक होते. परिषदेच्या चार सदस्यांनी मिळून बनलेली लेखापरिक्षा आणि अर्थ समिती कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या आर्थिक अहवालावर आणि अर्थसंकल्पावर लक्ष ठेवते आणि वेळोवेळी त्यांचा आढावा घेते. परिषदेच्या आणखी चार सदस्यांची नैतिक समिती नियमभंगाविषयी तक्रारींची दखल घेते. हितसंबंधामध्ये संघर्ष निर्माण होत असल्यास त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे.

प्रशासकीय कर्मचारी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळतात. परिषदेने नियुक्त केलेल्या कार्यकारी संचालक त्याचे नेतृत्व करतो. कार्यकारी संचालक परिषदेला जबाबदार असतो.

प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधीत्व :

संयुक्त राष्ट्र आर्थिक आणि सामाजिक परिषद, जागतिक आरोग्य संघ;ना, संयुक्त राष्ट्र बालकनिधी (UNICEF), संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषद (UNCTAD) आंतरराष्ट्रीय प्रमाणक संघटना (ISO - International Organisation for Standardision) या आंतरराष्ट्रीय संघटनामध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनला प्रतिनिधीत्व देण्यात

आले आहे. त्याच बरोबर या प्रादेशिक संघटनांनाही कंझ्युमर्स इंटरनॅशनल जागतिक व्यापार संघटनेमध्येही कृतीशील आहे. पण त्यांना औपचारिक स्थान दिले नाही.

कंझ्युमर्स इंटरनॅशनलची अर्थव्यवस्था :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलला एक तृतीयांश उत्पन्न सदस्यांनी दिलेल्या शुक्लातून आणि देणग्यांतून मिळते. त्याचे इतर उत्पन्न जगभरातील शासनसंस्था, बिगर सरकारी संघटना, बहुराष्ट्रीय संस्था, विविध ट्रस्ट आणि फाँडेशनच्या देणग्या सल्लागाराच्या भूमिकेतून मिळणारे शुल्क इत्यादी स्वरुपात मिळते.

आंतरराष्ट्रीय बिगर शासकीय संघटनांच्या जबाबदाऱ्यांचा जाहीरनामा :

६ जून २००६ रोजी लंडन येथे आंतरराष्ट्रीय बिगर शासकीय संघटनांच्या जबाबदाऱ्यांच्या जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. कंझ्युमर्स इंटरनॅशनलने या जाहीरनाम्यावर सहाय्यक म्हणून सही केली आहे. शासन व्यवस्थांनी आणि उद्योगांनीही बांधिलकी मानावी अशी अपेक्षा या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे.

कंझ्युमर्स इंटरनॅशनलने न स्विकारलेली मुल्ये :

१) अनैतिकता.
२) राजकारणापासून अलिप्त.
३) एकात्मता.
४) प्रामाणिकपणा, सचोटी, पारदर्शकता, जबाबदारी.
५) सर्वसमावेशकता.

८.ब.३ कंझ्युमर्स इंटरनॅशनलची भूमिका :

स्थापनेपासूनच कंझ्युमर्स इंटरनॅशनलने विविध विषयांसंबंधी विविध कार्यक्रम राबविले आहेत. या कार्यक्रमामध्ये काळ आणि गरजेनुसार बदल करण्यात आले आहेत. संशोधन, धोरणांचा विकास, समर्थन, दबावतंत्र्याचा वापर संघटनांचे जाळे उभे करणे इत्यादी कार्यक्रमाचा त्यामध्ये समावेश होतो. ग्राहक संरक्षणासंदर्भात कंझ्युमर्स इंटरनॅशनलने बजावलेल्या भूमिकेची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

१) ग्राहक शिक्षण :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या कार्यक्रमांच्या प्रभावामुळे अनेक देशांमधील सरकारांनी शालेय अभ्यासक्रमातून ग्राहक शिक्षणाचा समावेश केला आहे. कंझ्युमर्स इंटरनॅशनल या भागात शिक्षकांना आणि लोकप्रिय कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देवून शैक्षणिक साहित्य तयार करण्यास मदत करते.

२) ग्राहक संरक्षणासाठीची संयुक्त राष्ट्रांची मार्गदर्शक तत्वे :

१९६० च्या दशकापासून कंझ्युमर्स इंटरनॅशनलने संयुक्त राष्ट्रांवर आणि त्याच्याशी संबंधीत इतर संघटनांवर आपला प्रभाव टाकला आहे. १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ग्राहक संरक्षणासाठीच्या मार्गदर्शकतत्वांना मंजूरी दिली आहे. ही तत्वे तयार करण्यामध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनल सहभागी होती.

३) क्षमता बांधणी :

कंझ्युमर्स इंटरनॅशनलचा ७५ टक्क्याहून अधिक सदस्य संघटना विकसनशील देशांमधील आहेत. संस्था उभी करताना आणि संसाधने उपलब्ध करताना विकसनशील देशातील संघटनांना विशेष अडचणींना तोडं द्यावे लागते. कंझ्युमर्स इंटरनॅशनल या संस्थांची विशेष गरज लक्षात घेऊन त्यांच्यासाठी विशेष कार्यक्रम राबविते.

४) ग्राहक संरक्षण कायदे :

संयुक्त राष्ट्रांच्या मार्गदर्शकतत्वांच्या आधारावर कंझ्युमर्स इंटरनॅशनलचे दक्षिण अमेरिका, दक्षिण पॅसिफिक आणि आफ्रिकेसाठी आदर्श ग्राहक संरक्षण कायदे तयार करुन दिले आहेत. अनेक देशांनी त्याचा समावेश आपल्या राष्ट्रीय कायद्यांमध्ये केला आहे. भारताने १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा केला. हा कायदा म्हणजे भारतीय ग्राहकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण अशी सनद आहे. भारतीय कायद्यामध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनलने मान्य केलेल्या आठपैकी सहाच हक्कांना मान्यता देण्यात आली आहे. संरक्षण, माहिती निवड, प्रतिनिधीत्व, तक्रार निवारण आणि ग्राहक शिक्षण हे ते सहा हक्क आहेत.

५) संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातलेल्या उत्पादनांच्या यादीचा स्विकार :

१९८० च्या दशकात सुरुवातीला कंझ्युमर्स इंटरनॅशनलच्या आग्रहावरुन संयुक्त राष्ट्रांच्या आमसेभेने बंदी घातलेल्या उत्पादनांच्या यादीला संमती दिली. या यादीचा उपयोग करुन ग्राहक संघटनांनी ब्राझिल, मेस्कीको आणि इक्केडोर मधील दुकानामधून व्यापाऱ्यांना अनेक धोकादायक उत्पादने काढून टाकण्यास भाग पाडले.

६) उद्योगांची सामाजिक जबाबदारी :

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्तन सुधारण्याचे आणि त्यांना नैतिक तत्वांना अनुसरुन वागण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न कंझ्युमर्स इंटरनॅशनलने नेहमीच केले आहेत. गेली बरीच वर्षे त्यांच्यासाठी तो एक महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. त्यांनी जगभरातील उद्योगांसाठी ग्राहकांना उद्योगांकडून काय हवे आहे. ते त्यांच्याकडून कशाची अपेक्षा करतात त्यांची थोडक्यात अपेक्षांची रुपरेषा दिली आहे. आंतरराष्ट्रीय प्रमापक संस्थेची सामाजिक जबाबदारी संदर्भातील मार्गदर्शक तत्वे तयार करण्यामध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनलने महत्त्वाचे योगदान दिले आहे.

७) अन्न विषयक मोहिमा :

स्थापनेपासून कंझ्युमर्स इंटरनॅशनलने अन्न विषयक अनेक मुद्यांवर मोहिमा राबविल्या आहेत. जानेवारी २००२मध्ये सुरु केलेल्या जागतिक अन्न उत्पादन व उपयोग या मुद्यांचा समावेश होतो. अन्नाचा दर्जा ठरविण्याबाबत काम करणाऱ्या (Codere Alimentoruies) या संयुक्त राष्ट्रांच्या आयोगाबरोबर कंझ्युमर्स इंटरनॅशनल काम करीत आहे.

८) आरोग्य विषयक सजगता :

ग्राहकांचे आरोग्य आणि संरक्षण हे कंझ्युमर्स इंटरनॅशनलसाठी सर्वात महत्त्वाचे मुद्दे आहेत ते अत्यावश्यक औषधांचा योग्य प्रमाणात वापर व्हावा यासाठी प्रयत्न करतात. आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करतात. तसेच रुग्णांच्या हक्कांसाठी लढतात. लहान बालकांसाठी खास खाद्य पदार्थ बनविणाऱ्या कंपन्या आपली उत्पादने खपविण्यासठी अनुचित विपणन, तंत्राचा वापर करतात. त्याविरुध्द कंझ्युमर्स इंटरनॅशनलने अनेक मोहिमा राबविल्या.

त्यांनी तंबाखू उत्पादक कंपन्या विरुध्दही आंदोलने केली आहेत. सुरक्षित औषधे, औषधांची उपलब्धता आणि औषधांच्या किंमती या संदर्भात काम करणारी (Health Action International Network) संस्था म्हणून कंझ्युमर्स इंटरनॅशनलचा मोठा वाटा आहे.

९) बौध्दिक संपदा :

बौध्दिक संपदेसंबंधीत नियम अधिक संतुलित व्हावेत यासाठी कंझ्युमर्स इंटरनॅशनल प्रयत्न करते. सर्वांसाठी खुल्या असलेल्या सार्वजनिक उपयोगांच्या वस्तूंची (Public Goods) निर्मिती व्हावी यासाठी ते प्रयत्न करतात.

१०) सार्वजनिक सुविधा :

ऊर्जा, पाणी, दूरसंचार या मूलभूत सेवा सर्वच ग्राहकांसाठी महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या खाजगीकरणातून निर्माण होणारे प्रश्न, त्यांचे सरकारकडून केले जाणारे नियंत्रण या सर्व बाबींमध्ये ग्राहकांचा सहभाग याबद्दल कंझ्युमर्स इंटरनॅशनल स्वतंत्र्य संशोधन करते. या संदर्भातील धोरण ठरविण्यासाठी विविध देशातील शासकीय संस्थांना मदत करते.

११) पर्यावरणातील प्रश्नाचे जतन :

किटकनाशकांच्या वापरावर निर्बंध आणण्यासाठी काम करणाऱ्या संस्थेच्या स्थापनेमध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनल सहभागी होती तसेच पर्यावरण संरक्षणासाठी काम करणाऱ्या (United Nations Environment Programme) संयुक्त राष्ट्र पर्यावरण प्रकल्पामध्ये ग्राहक हित रक्षणासाठी बरेच काम केले आहे.

१२) व्यापार :

आंतरराष्ट्रीय व्यापारी करारांचा फायदा अंतिमतः ग्राहकांना मिळाला पाहिजे ह्यासाठी कंझ्युमर्स इंटरनॅशनल विविध आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये सतत कार्यरत असते. जागतिक व्यापार संघटनेमध्ये कंझ्युमर्स इंटरनॅशनल दबाव तंत्राचा वापर करुन ग्राहकांच्या फायद्याचे निर्णय होतील हे पहाते.

१३) ई-कॉमर्स :

इंटरनेटचा वापर करुन केला जाणारा व्यापार म्हणजे ई-कॉमर्स. या नवीन तंत्रामुळे अनेक सुविधा निर्माण झाल्या. परंतु त्यामध्ये फसविले जाण्याचे धोके ही तितकेच आहेत. कंझ्युमर्स इंटरनॅशनल या नवीन क्षेत्रातही ग्राहकांचे हित सुरक्षित रहावे यासाठी प्रयत्न करते.

१४) तांत्रिक प्रमाणे :

ही संस्था मुख्यतः मालाचा दर्जा निश्चित करणारी संस्था आहे. कंझ्युमर्स इंटरनॅशनल बरोबर काम करते. त्यामुळे मालाचा दर्जा योग्य रहाण्यास या ही संघटनेची मदत होते.

८.ब.४ कंझ्युमर्स इंटरनॅशनलचे मुल्यमापन :

जगभरातील ग्राहक चळवळीच्या विकासात कंझ्युमर्स इंटरनॅशनलने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षक म्हणून त्यांनी आपले कार्य केले आहे. अनेक मोहिमा राबविल्या गेल्या आहेत. ग्राहकांचे मूलभूत हक्क स्पष्ट केले. ग्राहकांच्या

हिताचे रक्षण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आखून दिली. कायद्याची चौकट तयार करण्यासाठी जे काम केले त्यांच्या पुढाकारामुळेच १९८५ साली संयुक्त राष्ट्रांनी संरक्षण संबंधात मार्गदर्शक तत्वे मंजूर केली.

खरेदी करण्याची आवड ही पाश्चिमात्य संकल्पना असेल पण प्रत्येकाला काही ना काही खरेदी करावेच लागते. ती जगातील सर्वांची गरज आहे. केनेडी म्हणाले तसे आपण सर्वजण ग्राहक असतो. त्यामुळे ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी गरज सार्वत्रिक आहे. आपल्या जागतिक पातळीवरील कार्याने कंझ्युमर्स इंटरनॅशनलने जगातील सर्व जनतेची ही महत्त्वाची गरज पूर्ण केली आहे.

आंतरराष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेमध्ये ग्राहकांच्या हिताला मध्यवर्ती स्थान देण्याचा प्रयत्न कंझ्युमर्स इंटरनॅशनलने केला आणि अजूनही करीत आहे. कंझ्युमर्स इंटरनॅशनलचा बहुतांश सदस्य संघटना विकसनशीळ देशातील ग्राहकांच्या प्रश्नांना कंझ्युमर्स इंटरनॅशनलने प्राधान्य दिले आहे.

विकसनशील देशातील ९४ अब्ज लोकांचे उत्पन्न आजही दरदिवसाला एक डॉलरपेक्षा कमी आहे. त्याची खरेदी करण्याची क्षमता जवळ-जवळ शुन्य आहे. केवळ जीवनावश्यक गोष्टींच्या पलिकडे ते काहीही खरेदी करु शकत नाहीत. त्यांचे "ग्राहक" या गटात वर्गीकरण तरी कसे करावे असा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. पण ग्राहक चळवळीने यांचे उत्तर अगोदरच दिले आहे. दारिद्र्या विरुध्दाचा लढा हे ग्राहक चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्राहकांच्या आठ मूलभूत हक्कांमध्ये पहिले स्थान मूलभूत गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या साधनांच्या उपलब्धतेला दिले आहे.

कोणताही निर्णय घेतांना त्यांच्याशी संबंधीत आणि त्याच्यापुढे प्रभावित होणाऱ्या सर्व पक्षांचे मत समजावून घेतले पाहिजे. त्यांचा आवाज ऐकला पाहिजे. या तत्वांवर कंझ्युमर्स इंटरनॅशनलने नेहमीचा भर दिला आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करताना कंझ्युमर्स इंटरनॅशनलचे अनेक देशांच्या सरकारच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक धोरणांवर प्रभाव टाकला आहे. हल्ली या धोरणांवर मुक्त बाजारपेठेच्या धोरणाचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे बऱ्याच वेळा ग्राहक हित मागे पडते आणि सार्वभौम राष्ट्रसंकट कुणालाही न जुमानणाऱ्या धनदांडग्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आजच्या युगात ग्राहकांच्या संरक्षणासाठी कंझ्युमर्स इंटरनॅशनल आणि तत्सम संस्थांची कधी नव्हे इतकी गरज निर्माण झाली आहे.

आपली प्रगती तपासा :

१) कंझ्युमर्स इंटरनॅशनलची उद्दिष्ट्ये कोणती ते सांगा?

२) कंझ्युमर्स इंटरनॅशनल संघटनेची भूमिका स्पष्ट करा?

* * *

८(क)

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती

८.क. प्रस्तावना
८.क.१ उद्दिष्ट्ये
८.क.२ संघटन
८.क.३ भूमिका
८.क.४ मूल्यमापन

८.क. प्रस्तावना :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीची स्थापना "हेन्री ड्यूनांट" यांनी १८६३ साली केली. या मानवतावादी चळवळीचे मुख्यालय स्विझरलँडची राजधानी असलेल्या जिनिव्हा या शहरात आहे. या आंतरराष्ट्रीय समितीची स्थापना जिनिव्हा करारात मान्य असलेल्या मानवतावादी कायद्याप्रमाणे करण्यात आलेली आहे. या संघटनेस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघर्षातील बळीचे संरक्षण करण्याचा खास अधिकार देण्यात आलेले आहेत. यामध्ये जखमी सैनिक, कैदी, शरणागत, युध्दात अप्रत्यक्षपणे सहभागी असलेले डॉक्टर्स, नर्सेस यांचा समावेश केलेला आहे.

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती ही मानवतावादी चळवळ आहे, ही चळवळ देश, वंश, धर्म, वर्ग, राजकीय नेते यापैंकी कोणत्याच आधारावर भेदाभेद न करता, या चळवळीचे जगभरातील ९ कोटी सत्तर लाख स्वंयसेवक नागरिकांच्या जीविताचे आणि आरोग्याचे रक्षण करुन, यातनेपासून सुटका करण्याचा प्रयत्न करतात.

रेडक्रॉस समिती, आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस आणि रेडक्रिसेंट चळवळीचा भाग आहे. यामध्ये १८६ राष्ट्रीय समित्या आणि त्यांचे आंतरराष्ट्रीय फेडरेशन सहभागी आहे. भारतामध्ये १९२० साली भारतीय रेडक्रॉस समितीची स्थापना करण्यात आली. आज या समितीच्या ७०० हून अधिक शाखा आहेत. जगात ज्या काही फार थोड्या मान्यताप्राप्त असलेल्या संघटना आहेत त्यापैंकी ती एक संघटना आहे.

इतिहास :

युध्दाच्या परिणामापासून मानवाचे संरक्षण केले पाहिजे अशी समज समाजात फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. पण आधुनिक काळात युध्दाच्या स्वरुपात बदल झाल्यामुळे ते अधिक मानवीय करण्यात आले.

स्विस उद्योगपती "हेन्री ड्यूनांट" याने १९५९ साली झालेल्या सॅलकरीनोच्या युध्दातील परिस्थिती पाहिली. तेथे जखमी सैनिकांना मदत मिळत नव्हती हे पाहून त्यांना मोठा धक्का बसला. म्हणून त्यांनी या युध्दाच्या आठवणींवर आधारित "ए मेमरी ऑफ सेलकरीनो" हे आपले पुस्तक प्रकाशित केले व युरोपातील लष्करी नेत्यांना त्याच्या प्रती भेट म्हणून दिल्या. या पुस्तकात "ड्यूनांटने" युध्दात अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या वैद्यकीय कर्मचारी युध्दस्थळाजवळील, औषधांमध्ये या सर्वांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय करार करण्याची मागणीही केली. तसेच त्याने १९६३ साली

एक पाच जणांची समिती स्थापन केली. त्या समितीचे पुढील काळात नामांतर करुन तिचे नाव "जखमींच्या साह्यतेसाठी समिती" असे ठेवण्यात आले. पुढील काळात २२ ऑगस्ट, १९६४ रोजी "जिनिव्हा" कराराचा पहिला भाग परिषदेने स्विकारुन, "युध्द क्षेत्रातील जखमींच्या अवस्थेत सुधारणा करण्यासाठी" या शीर्षकाखाली युरोपातील राष्ट्रांना स्विस शासनाने राजनैतिक परिषदेला हजर राहण्याचे निमंत्रण दिले. यानुसार जखमी सैनिक, वैद्यकीय मदतीस आणि सामान्य नागरिकांच्या भूमिकेचे रक्षण करण्यासाठी प्रथमच कायदा करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय सहायता संस्थेला देण्यासाठी पुढील दोन अटी टाकण्यात आल्या.

१) संबंधित राष्ट्रीय संस्थेला प्रथम तिच्या सरकारने सहायता संस्था म्हणून मान्यता द्यावी.

२) संबंधित देशाचे सरकार जिनिव्हा करारामध्ये सहभागी असले पाहिजे.

यानंतर युरोपातील काही देशात जसे फ्रान्स, स्पेन, प्रशिया, डेन्मार्क या देशात राष्ट्रीय संस्था स्थापन केल्यानंतर १८७६ ला "आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती" हे नाव पडले व ते आजही प्रचलित आहे. १८८१ ला अमेरिकन रेडक्रॉसची स्थापना करण्यात आल्यावर बहुतेक राष्ट्रांनी जिनिव्हा करारावर सह्या केल्यावर या संस्थेस आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. पुढील काळात अनेक लोक रेडक्रॉस संस्थेचे कार्य स्वच्छेने करु लागले. या कार्याचाच एक भाग म्हणून हेन्री ड्यूनांट आणि फ्रेडरिक पॅसी या दोन शांततावाद्यांना १९०१ सालचे शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले.

१९०६ ला जिनिव्हा करारा सुधारणा केल्यानंतर १९१४ मध्ये जगात ४५ राष्ट्रीय स्थापना झाल्या होत्या याचा अर्थ ही चळवळ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचू लागली होती.

पहिले महायुध्द व दुसऱ्या महायुध्द दरम्यान कार्ये :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने पहिल्या महायुध्दादरम्यान राष्ट्रीय रेडक्रॉस बरोबर मदतीचे कार्य केले, त्याचे कारण असे कि, या युध्दात प्रथमतः रासायनिक अण्वस्त्रांचा वापर झालेला होता. त्यामुळे खूपच मानवहानी झाली होती. या गोष्टींचा रेडक्रॉसने निषेध केला व युध्द संपल्यानंतर जवळपास ४,२०,००० कैद्यांना सुखरुपपणे आपआपल्या घरी पोहचविण्याची व्यवस्था केली. या कार्याची दखल म्हणून की काय आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसला १९१७ सालचे शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले. याचा परिणाम असा झाला कि, जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय "रेडक्रॉस समितीची" पत, मानमर्यादा व अधिकाराच्या क्षेत्रातही वाढ झाली.

पहिल्या महायुध्दाप्रमाणेच "आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसने" दुसऱ्या महायुध्दातही महत्त्वाची कामगिरी बजावली ती प्रामुख्याने युध्दा कैद्याच्या तळावर लक्ष ठेवणे, त्यांच्या भेटी घेणे, तसेच सामान्य नागरिकांना अनेक स्वरुपाच्या सेवा देणे, त्यांना सहायता करणे, गायब झालेल्या व्यक्तींसंबंधी संदेशाचे आदानप्रदान करणे अशा कामासंबंधी माहिती देणाऱ्या या संस्थेस जळवपास ३००० कर्मचारी काम करीत होते. अपवाद फक्त जर्मनीमधील जर्मन रेडक्रॉस समिती ही जिनेव्हा कराराचे पालन करीत नव्हती. दुसऱ्या महायुध्दादरम्यान या संस्थेकडे ४.५ कोटी कैद्याची माहिती होती. तसेच १२ कोटी संदेश त्यांनी वहन केले होते. तसेच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसला "कॉन्सस्ट्रेशन कॅम्पसमधील" कैद्यांना मदत देण्याची रितसरपणे परवानगी मिळाली. या सर्व कामाचा परिणाम म्हणून या संस्थेस १९४४ सालाचे शांततेसाठीचे दुसरे पारितोषिक मिळाले.

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने फक्त युध्दादरम्यान कार्ये केलेले नसून महायुध्दानंतरही या समितीला १९६३ सालचे शांततेच तिसरे नोबेल पारितोषिक मिळाले.

१) युध्दातील जखमींच्या परिस्थितीमध्ये सुधारणा.
२) बुडालेल्या किंवा बुडवल्या गेलेल्या जहाजावरील सैनिकांची देखरेख.
३) आजारी सैनिकांची काळजी घेणे.
४) युध्दाच्या वेळी सामान्य नागरिकांची काळजी घेणे इत्यादी.

वरील सर्व कार्याची दखल घेऊन आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीस संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या उपसमितीच्या बैठकांच्या निरीक्षकाचा दर्जा दिला गेला. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस ही पहिली खाजगी समिती आहे की जिला असा दर्जा प्राप्त झाला.

८.क.१ उद्दिष्ट्ये :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती ही तटस्थ, नि:पक्षपाती व स्वतंत्र संस्था आहे. ती युध्द किंवा कोणत्याही स्वरुपाच्या तडाख्यात सापडलेल्या जीवांचे रक्षण करुन त्यांना मदत करणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टाव्यतिरिक्त संस्थेची काही उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) युध्द लढणारी राष्ट्रे जिनिव्हा कराराचे पालन करीत आहे की नाही हे पाहणे.
२) युध्दाच्या क्षेत्रातील जखमीसाठी वैद्यकीय मदतीची व्यवस्था करणे.
३) युध्द कैद्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर लक्ष ठेवणे व संबंधित अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन कैद्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून चांगल्या वागणुकीसाठी प्रयत्न करणे.
४) निरपराध नागरिकांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणे त्याची काळजी घेणे.
५) संबंधित वाताहत झालेल्या माणसांसाठी मदत करणे.
६) लढणाऱ्या दोन पक्षामध्ये तटस्थ माणसाची भूमिका बजावणे.

"आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटना" वरील उद्दिष्टांच्या आधारे जगात मानवतावादी कायदा व वैश्विक मानवी मूल्ये बळकट करण्याचा प्रयत्न करते.

१९६५ साली आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने सात मूलभून तत्त्वे मांडली. ती संपूर्ण तत्त्वे रेडक्रॉस चळवळीने स्विकारलेली आहेत ती तत्त्वे पुढीलप्रमाणे :

१) मानवता.
२) नि:पक्षपाती धोरण.
३) तटस्थता.
४) स्वांतत्र्य.
५) उत्स्फूर्तता.
६) एकता.
७) वैश्विक दृष्टीकोन.

८.क.२ संघटन :

जागतिक स्तरावर नि:पक्षपातीपणे कार्यरत असलेल्या या समितीचे संघटन पुढीलप्रमाणे आहे.

१) समिती :

समिती हे प्रमुख अंग आहे. या समितीचे सदस्य २५ स्विस नागरिक चार वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्त केले जातात. तसेच त्यांची मुदत संपल्यावर त्यांना पुन्हा नियुक्त केले जाते. किती वेळेस नियुक्ती करावी यावर काहीही बंधने नाहीत, मात्र चौथ्यांदा

निवडून येण्यासाठी ७५ टक्के मते मिळवावी लागतात. बहुराष्ट्रीय संघटना असूनसुध्दा तिचे एक राष्ट्रीय स्वरुप ठेवण्यासाठी फक्त स्विस नागरिकांनाच सदस्यत्व दिले जाते. या सदस्यांच्या नियमित बैठका होतात.

२) संचालनालय :

संचालनालय हे समितीचे कार्यकारी अंग आहे. समितीचे धोरण ठरविणे व रोजच्या कामाकडे लक्ष देणे हे प्रमुख कार्य आहे. यामध्ये एक मुख्य संचालक व पाच इतर संचालक असतात. या व्यतिरिक्त पुढील विभाग असतात.

१) प्रत्यक्ष कृती विभाग.
२) मानवी संसाधन विभाग.
३) संसाधने आणि कृती सहाय्यक विभाग.
४) संसूचन.
५) आंतरराष्ट्रीय कायदा व चळवळी अंतर्गत सहकार्य विभाग.

या पाचही विभागाचे नेतृत्व संचालनालयाकडे असते.

३) समिती परिषद :

समिती परिषदेच्या पाच सदस्याची नियुक्ती समितीमध्यन करण्यात येते या समिती परिषदेच्या सदस्याची सभा वर्षातून कमीत कमी १० वेळेस होते. समितीच्या बैठका घेण्याची जबाबदारी परिषदेवरच असते. समिती परिषद हा समितीचा मुख्य कार्यकारी विभाग असतो.

समिती परिषद, समिती व संचालनालय यांच्यातील दुव्याचे काम करते. समिती परिषदेमध्ये एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष व निवडून आलेले सदस्य असतात.

४) अध्यक्ष :

समिती चार वर्षांच्या काळासाठी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती करते. तो आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचा नेता असतो. तसेच तो परिषदेचाही सदस्य असतो. त्याचे कार्य व भूमिका समितीने ठरवून दिलेले असतात. २००० सालापासून "जैकब केलेन बर्गर" हे आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचे अध्यक्ष आहेत.

५) कर्मचारी वर्ग :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचे मुख्यालय स्विझरलँडमधील जिनिव्हा शहरात आहे. त्याचप्रमाणे जवळपास ८० देशांमध्ये प्रतिनिधी मंडळे की ज्यांना "डेलिगेशन्स" म्हणतात ते आहेत. या डेलिगेशन्सचा प्रमुक त्या-त्या देशातील प्रत्यक्ष काम पाहतो. दिवसेंदिवस "आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस" समितीच्या कामाचा व्याप वाढत चाललेला आहे. समितीमध्ये स्वंयसेवकांबरोबर डॉक्टर्स, कृषी, तज्ञ, अभियंते इत्यादी तांत्रिकांची संख्याही वाढत आहे. २००४ साली सर्व राष्ट्रात मिळून १३००० कर्मचारी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसच्या कर्मचाऱ्यांना मदत करीत असतात.

६) अर्थव्यवस्था :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीला स्वत:चे असे काही उत्पन्नाचे साधन नाही. तर प्रामुख्याने सर्व उत्पन्नाची मदार ही स्वच्छेने दिलेल्या देणग्यावर अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीच्या एकूण अर्थसंकल्पापैंकी ८० ते ८५ टक्के रक्कम अमेरिका, स्विझरलँड, ऑस्ट्रेलिया, जपान, कॅनडा, न्यूझीलंड, युरोपियन देश या भागातून येते. तसेच ३ टक्के रक्कम खाजगी भेटीच्या माध्यमातून मिळते व बाकीची रक्कम उर्वरित

राष्ट्रीय समित्याकडून मिळते. आंतरराष्ट्रीय ध्वजाचे स्वरुप हे पांढऱ्या पार्श्वभूमीवर लाल क्रॉस आणि Committee International Geneve असे शब्द आहे.

७) कायदेशीर दर्जा :

"आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीस" जे सार्वभौम अधिकार प्राप्त झालेले आहेत ते दुसऱ्या कोणत्याही खाजगी संस्थेस मिळालेले नाहीत. तिची प्रत्यक्षपणे खाजगी संस्था म्हणून स्विझरलँडच्या कायद्याप्रमाणे नोंद झालेली आहे. तसेच तिला अनेक सवलतीही मिळालेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसने स्विझंरलँडच्या सरकारबरोबर करार करुन स्वत:च्या स्वातंत्र्यावर शिक्कामोर्तब करुन घेतलेले आहे. त्याचा कर्मचाऱ्यांवर कायद्याचे विशेष संरक्षण मिळालेले आहे. परकीय दूतावासना ज्या सवलती मिळतात त्या सर्व या सदस्यांना मिळतात.

८.क.३ भूमिका :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती फक्त आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीच्याच कायद्याचे पालन करते असे नसून मानवतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या कायद्यामध्येही सहभागी होते. उदा. राजकीय कैद्यांना भेटी देणे, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत पुरविणे इत्यादी तसेच समिती प्रत्येक शासन व्यवस्थेबरोबर प्रत्यक्षपणे वाटाघाटी करुन युध्दातील कैद्यांना मानवीय वागणूक मिळावी यासाठी प्रयत्न करते.

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचे महत्त्वाचे काम म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण करणे तसेच सर्व राष्ट्रांकडून त्याचे संरक्षण करुन घेणे हे होय. सशस्त्र संघर्षाचे भयानक परिणाम कमी करणे हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रमुख काम आहे. तसेच या कायद्याचा प्रमुख हेतू म्हणजे जे राष्ट्र युध्दा सहभागी होत नाहीत किंवा युध्द काळात माघार घेतात अशा लोकांचे संरक्षण करणे हा होय. या अशा कायद्याची संरक्षण करण्याची जबाबदारी आंतरराष्ट्रीय समुदायाने या समितीवर टाकलेली आहे.

पुढील काही महत्त्वाच्या बाबीसंबंधी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे.

१) नागरिकांचे रक्षण :

युध्द काळामध्ये सर्वात जास्त त्रास होतो तो सर्वसामान्य जनतेस कारण, युध्दाची त्यांची तयारी नसते. ती मानसिक आणि शारीरिक, पण दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांच्याकडे आत्मसंरक्षणासाठी किंवा युध्द करण्यासाठी साधनेही नसतात म्हणून ही समिती अशा अडचणीतील लोकांसाठी त्यांना आधार देण्याचे कार्य करते. अलिकडील काळात ज्या-ज्या ठिकाणी संघर्ष झालेत. उदा. सर्बिया, क्रोशिया, सुदान, सोमालिया या भागातील लोकांना (सामान्य) मोठा आधार देण्याचे काम केलेले आहे. या भागातील अनेक विस्तापित, उद्ध्वस्त झालेल्या लोकांना मदत पुरविलेली आहे.

२) मानवतावादी दृष्टीने मदत करणे :

युध्दाच्या काळात तटस्थपणे आवश्यक ती मदत पुरविण्याचे काम ही समिती करते. या समितीच्या अथक प्रयत्नांमुळे आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे स्वरुप बदलवून तो आता राष्ट्रांतर्गत बंडाळीसही लागू करण्यात आलेला आहे.

३) युध्दाच्या साधनांवर मर्यादा टाकणे :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचा विरोध प्रामुख्याने भूसुरुंगाच्या वापरावर आहे. त्याचप्रमाणे एक बॉम्बमधून अनेक बॉम्ब बाहेर पडून सभोवतालचा प्रदेश बेचीराख "क्लस्टर बॉम्ब"च्या वापरावर बंदी घालण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले आहेत. प्रामुख्याने सामान्य नागरिकांना किंवा इतरानांही झळ पोहचेल असे साधन युध्दात वापरु नये, हा विचार या समितीचा आहे.

४) आंतरराष्ट्रीय सेवा :

जर्मनीमध्ये नाझी राजवटीच्या काळात ज्यूंचा अनन्वीत छळ करण्यात आला. त्यांना जाणूनबुजून तुरुंगात डांबण्यात आले. काहींना तर अक्षरश: गोळ्या घालून ठार मारण्यात आले. कित्येक स्त्रियांवर बलात्कार झाले. कित्येकांच्या संसाराची राख रागोंळी केली गेली. कित्येक लोकांकडून जबरदस्तीने कामे करुन घेण्यात आले. या सर्वांसंबंधीचे जवळपास एक कोटीपेक्षाही जास्त दस्तऐवज या समितीने जपून ठेवलेले आहेत. २००८ च्या नंतर ही सर्व कागदपत्रे संशोधनासाठी खुली करण्यात आलेली आहेत.

५) स्त्रिया व युध्दासंबंधी :

युध्दमार्गातील स्त्रियांवर युध्दाचा खूपच परिणाम होतो. बरेचदा त्यांना शारीरिक अत्याचाराला बळी पडावे लागते. रेडक्रॉस समितीने १९९९ मध्ये अशा स्त्रियांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन काही निश्चित अनुमान काढले आहेत. तेव्हापासून स्त्रियांचा आदर वाढविण्यासाठी खास प्रकारचे प्रयत्न करीत आहे.

६) युध्द व बालके :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती युध्दादरम्यान बालकांची विशेष प्रकारे काळजी घेते. ती अशी कि, त्यंना वेळेवर औषधे, अन्न, पाणी मिळेल याची. तसेच महत्त्वाचे म्हणजे ते लहान मुलांना सैन्यात भरती करण्यात प्रखरपणे विरोध करतात. त्यासाठी वेळप्रसंगी आंदोलनेही केली जातात.

७) युध्द कैदी :

सर्व युध्द कैद्यांना माणुसकीची वागणूक मिळावी या बाबीचा रेडक्रॉस समिती आग्रह धरते. युध्द कैद्यांविषयी रेडक्रॉसने बऱ्याचदा मोलाचे कार्य केलेले आहे.

८) विस्थापितांना मदत :

युध्दाच्या परिणामामुळे बऱ्याच लोकांना आपला जीव वाचविण्यासाठी आपली राहती जागा सोडून दुसरीकडे पळ काढावा लागतो. जंगलात आणि कुठेही भटकावे लागते. अशा लोकांसाठी विशेष अशी संक्रमण शिबीरे उभारुन त्यांना आश्रय देण्याचे काम या संस्थेने केलेले आहे.

९) आपतकालीन मदत :

नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी जसे भूकंप, चक्रीवादळ, ढगफुटी अशा वेळी ही समिती मदतीसाठी धावून येते. तसेच अचानक झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रसंगी ही समिती रक्तपुरवठा करणे, जखमींना दवाखान्यात भरती करणे, त्यांच्या कुटुंबियांना योग्य अशी माहिती देणे इत्यादी. उदा. २००८ मध्ये झालेला मुंबईतील दहशतवादी हल्ला.

१०) आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचा प्रचार :

सामान्य जनतेबरोबरच पोलीस व सशस्त्र दले या सर्वांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन केले पाहिजे. त्याचा सन्मान करावयास शिकले पाहिजे. यासाठी रेडक्रॉस खास प्रयत्न करते. तसेच मानवतावादी कायद्यासंबंधी खास प्रशिक्षण दिले जावे, यासाठी रेडक्रॉस विविध देशातील सरकारांना विविध स्वरुपाची मदत करते. शाळा, कॉलेजेस, विद्यापिठीय स्तरावर अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविले जातात.

जगभरातील केलेली कामगिरी :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिताचे जगातील साठपेक्षा अधिक देशात कायमस्वरुपी कार्यालयीन यंत्रणा आहे. त्यांना जिनिव्हा येथील मुख्यालय सर्व प्रकारची मदत करते. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटना ही त्या देशातील रेडक्रॉस समिती व शासन व्यवस्था यांच्याबरोबर संयोजन करुन अनेक कार्यक्रमांचे आयोजन करते.

आशिया खंडातील कार्ये :

भारतात १९८२ साली विभागीय समिती उभी करण्यात आली तेव्हापासून आजपर्यंत जम्मू काश्मिर प्रांतावर यांचे विशेष लक्ष आहे. श्रीलंका, अफगाणिस्तान या दहशतवादी भागात या संघटनेचे विशेष स्वरुपाचे कार्ये केलेले आहे. भूतान, मालदीव, बांग्लादेश या भागातही खास प्रकारचे काम केलेले आहे. तसेच, २००४ च्या सुनामी वेळी, २००५ च्या काश्मिर भूकंप, २००८ च्या मुंबई दहशत हल्ल्याच्या वेळी खास प्रकारचे सहकार्य केलेले आहे.

अमेरिकेसंबंधी :

ग्वाटानामो बे मधील कैद्यांच्या (बदनाम झालेल्या) भेटी देऊन मदत देण्याचे काम या समितीने केलेले आहे. आता हा तुरुंग काही कालावधीसाठी बंद करण्यात आलेला आहे.

आफ्रिकेतील कार्ये :

आफ्रिकेतील सुदान व सोमानीया आणि काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक राज्यामध्ये सर्वात मोठे काम केलेले आहे. तसेच युगांडातील आशियायी वंशाच्या विस्थापितांना मायदेशी जाण्यासाठी मदत केलेली आहे.

तसेच इरान-इराक संघर्ष, अरब-पॅलेस्टाईन या संघर्षात महत्त्वाची कामगिरी पार पाडलेली आहे. तसेच अमेरिकन व युरोपियन पत्रकारांवर, सरकारी अधिकाऱ्यांना ओलिस ठेवण्याच्या तंत्राविषयी "रेडक्रॉस"ने आवाज उठविला आहे. तसेच पूर्व युरोप बाल्कन राज्ये या भागातही महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

याचा अर्थ आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने जगातील प्रमुख राष्ट्रांसह छोट्या - छोट्या राष्ट्रात पण मदत कार्य केलेले आहे.

८.क.४ मूल्यमापन :

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती ही जगातील चार शांततेचे नोबेल पारितोषिके मिळविलेली एकमेव मान्यताप्राप्त संस्था आहे. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीचा जिनिव्हा कराराशी जवळचा संबंध आहे. पण या अशा संस्थेवरही काही आक्षेप घेतले जातात कि, या संस्थेला खूप मर्यादित अधिकार आहेत. राज्यसंस्थेअंतर्गत कार्ये करीत असताना तिच्यावर खूप मर्यादा येतात.

दुसरे असे कि, ही संस्था नेहमीच त्या संबंधीत देशाच्या शासनास विश्वासात घेऊन कार्य करीत असल्यामुळे त्यांना बळी पडलेल्यांना मदत करता येते. त्यांना मिळालेली माहिती ते इतरांना देत नाहीत पण अम्नेस्टी सारखे दबाव आणण्याचे कार्ये मात्र करु शकत नाही.

काही टिकाकारांचे असे मत आहे कि, काही देश या संस्थेचा वापर करुन घेतात. त्यांच्या मते या संस्थेस कामाची परवानगी दिली की हुकूमशाही राजवटींना अधिमान्यता मिळते. रेडक्रॉस राजकीय निर्णयामध्ये ढवळाढवळ करीत नाही म्हणून संबंधीत देश त्याबरोबर सहकार्य करतात.

नेल्सन मंडेलाच्या मतानुसार रेडक्रॉसने कैद्यांना चांगली वागणूक मिळावी यासाठी कार्य केले परंतु वर्णद्वेषाचे धोरण संपविण्यासाठी खास असे कोणतेही कार्य केलेले नाही.

काहींच्या मते रेडक्रॉस ही बचावात्मक पवित्रा घेते, ते आक्रमक भूमिका कधीच घेत नाही. ते फक्त घडलेल्या अत्याचारांचा निषेध करतात. म्हणून रेडक्रॉसचे स्वरुप दिवसेंदिवस बदलत चाललेलेल आहे. ते फक्त समर्थकाची भूमिका घेतात असे अमेरिकेने ग्वाटानामो बे मधील कामावरुन टिका केलेले आहे.

असे असले तरी रेडक्रॉस ही आजही भूमिकेवर ठाम आहे आणि ती तटस्थपणे व सेवाभावी वृत्तीने, कसलाही मोबदला न घेता काम करीत आहे हे काही कमी नाही.

आपली प्रगती तपासा :

१) आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीच्या भूमिकेचे टिकात्मक परिक्षण करा?
२) आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समिती म्हणजे काय? तिचे संघटन स्पष्ट करा.
३) आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीची भूमिका स्पष्ट करा?

संदर्भग्रंथ :

* समकालीन राजकारणातील महत्त्वाचे प्रश्न : प्रा. महेश भगवत, प्रा. शुभराज बुवा, प्रा. केतन भोसले, मोनिका वर्मा, मिनल मापुसकर - शेठ प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट २००९.
* संयुक्त राष्ट्रे - डॉ. शैलेंद्र देवळणकर, प्रतिमा प्रकाशन पुणे, डिसेंबर २००८.
* भारताच्या संदर्भातील नागरिकांचे हक्क - अनघा फाटक.
* डॉ. श्रीकांत गायकवाड, प्रा. रामकिशन मांजरे, "भारतातील सामाजिक चळवळी" अरुणा प्रकाशन, लातूर दि. २८ सप्टेंबर, २००९.
* डॉ. बी. डी. इंगळे, "विकास आणि पर्यावरणातील अर्थशास्त्र", अरुणा प्रकाशन, लातूर.
* डॉ. य. दि. दी. फडके, "राजकीय दहशतवाद" अक्षर प्रकाशन, मुंबई.
* मुजफ्फर हुसैन, "लादेन दहशतवाद आणि अफगाणिस्तान", चंद्रकला प्रकाशन, मुंबई.
* **www.wto.org**
* **www.world bank**
* **http:"www.g2o.org**
* **http://en.wikipedia.org**

नमुना प्रश्नपत्रिका

राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. ६
समकालीन जगातील प्रमुख राजकीय समस्या
(मराठी रुपांतर)
(३ तास) एकूण गुण : १००

सूचना : १) एकूण **पाच** प्रश्न सोडवा. प्रत्येक विभागातून कमीतकमी **दोन** प्रश्न सोडवा.
२) सर्व प्रश्नांना **समान गुण** आहेत.
३) दोन्ही विभागासाठी एकच मुख्य उत्तरपत्रिका वापरा आणि गरज पडल्यास पुरवणी वापरा.

विभाग - १

१) शीतयुध्दोत्तर काळातील दारिद्र्याच्या परिणामांची चर्चा करा. दारिद्र्य निर्मुलनासाठी कोणते महत्त्वाचे उपाय केलेले आहेत ?

२) आजच्या काळामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास योजनांचे टिकात्मक परिक्षण करा.

३) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा कार्यक्रम तिसऱ्या जगात प्रसार करण्यात जागतिक बँकेची भूमिका कोणती आहे ?

किंवा

पर्यावरणाच्या ऱ्हासाचा समस्येशी तपशीलवार चर्चा करा. जैवविविधता किंवा वातारवणातील बदलांच्या विविध संदर्भात माहिती लिहा.

४) खालीलपैंकी कोणत्याही **दोन**वर टिपा लिहा.
(अ) एकध्रुवीय जग.
(ब) एचआयव्ही / एड्स या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिबंधात्मक उपाय.
(क) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टे.
(ड) पारंपारीक विकासाचे प्रारुप (Model).

५) मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यावर (UDHAR) प्रकाश टाका.

६) राजकीय सक्षमीकरणाच्या संदर्भात भारतीय स्त्रियांनी किती प्रगती केली आहे ? भारतीय राजकारणातील स्त्रीची भूमिका कोणती आहे ?

७) २१ व्या शतकातील अम्नेस्टी इंटरनॅशनल एक घटक आहे यासंदर्भात अम्नेस्टी इंटरनॅशनलची भूमिका कोणती आहे ?

८) खालीलपैकी कोणत्याही **दोन**वर टिपा लिहा.
(अ) समुहाचे हक्क.
(ब) स्त्रीवादाची पहिली लाट / टप्पा.
(क) शांतता चळवळीची उद्दिष्टे.
(ड) कन्झुमर्स इंटरनॅशनल.